# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग–३ : राज्यशास्त्र**

(सत्र ५ : पेपर १०)

# अमेरिकेची राज्यघटना

**(Constitution of United States of America)**

(सत्र ६ : पेपर १५)

# चीन आणि स्वीडनची राज्यघटना

**(Constitution of China and Sweden)**

(शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१५

बी. ए. (राज्यशास्त्र) भाग-३ पेपर १० व १५ करिता

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-661-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
मा. कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
मा. कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
मा. प्र-कुलगुरू,
इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. अनिल गवळी**
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील**
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे**
अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. आर. जी. फडतरे**
अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे**
संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**कॅ. डॉ. एन. पी. सोनजे** (सदस्य सचिव)
प्रभारी संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र


अध्यक्ष – **डॉ. (श्रीमती) भारती पाटील**
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. बाळासाहेब गोविंदराव भोसले**
  सहकार भुषण एस. के. पाटील महाविद्यालय,
  कुरुंदवाड, जि. कोल्हापूर.
- **डॉ. मोहन रामचंद्र घनवट**
  मुधोजी कॉलेज, फलटण, ता. फलटण, जि. सातारा.
- **डॉ. आत्माराम बाजीराव जगदाळे**
  सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर, कराड, जि. सातारा.
- **डॉ. श्रीमती अमिता संजीव कणेगांवकर**
  डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, द्वारा- विद्यापीठ हायस्कूल, कोल्हापूर.
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. पाटण, जि. सातारा.
- **डॉ. करिअप्पा शिवाप्पा खापरे**
  दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी.
- **डॉ. भालचंद्र बी. विभूते**
  प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र–५ : पेपर–१० अमेरिकेची राज्यघटना**
**सत्र–६ : पेपर–१५ चीन आणि स्विडनची राज्यघटना**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. विजय जालिंदर देढे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | १ | – |
| **प्रा. डॉ. आर. एस. कांबळे**<br>के. एच. कॉलेज, गारगोटी | २ | – |
| **प्रा. बाबूराव निवृत्ती पवार**<br>श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी | ३ | – |
| **प्रा. राजरतन शामराव जाधव**<br>न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर | ४ | – |
| **प्राचार्य एस. डी. पवार**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण | – | १–अ |
| **प्रा. बी. एस. पाटील**<br>डी.के.ए.एस्सी. कॉलेज, इचलकरंजी | – | २–अ, ३–अ<br>४–अ |
| **प्रा. सुनिल गायकवाड**<br>आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा | – | १–ब, २–ब<br>४–ब |
| **प्रा. शिवाजी पाटील**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | – | ३–ब |

**■ संपादक ■**

**प्रा. बी. जी. भोसले**
सहकारमहर्षी एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड

**प्रा. शिवाजी पाटील**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

**प्रा. सुनिल गायकवाड**
आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर क्रमांक १० सत्र पाच साठी 'अमेरिकेची राज्यघटना' आणि पेपर क्रमांक १५ सत्र सहा साठी 'चीन व स्वीडनची राज्यघटना' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर क्रमांक १० अमेरिकेची राज्यघटना यामध्ये संघराज्य शासन : अर्थ व स्वरूप; संविधानाची वैशिष्ट्ये, अमेरिकेचे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ : रचना आणि कार्ये तर सत्र ६ साठी पेपर क्रमांक १५ चीन व स्विडनची राज्यघटना यामध्ये चीन व स्विडनची राज्यघटना, चीन व स्विडनचे कायदेमंडळ, चीन व स्विडनचे कार्यकारी मंडळ, चीनचे न्यायमंडळ; चीनमधील राजकीय पक्ष यांचा अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. बी. शिंदे यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. भारती पाटील, नेहरू अभ्यास केंद्र समन्वयक, राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. वासंती रासम, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार, डॉ. भणगे रविंद्र, डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. वसंत पाटील व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूर शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक कॅप्टन डॉ. एन. जी. सोनजे, दूर शिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. बी. जी. भोसले**
सहकारमहर्षी एस. के. पाटील
महाविद्यालय, कुरुंदवाड

**प्रा. शिवाजी पाटील**
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा

**प्रा. सुनिल गायकवाड**
आमदार शशिकांत शिंदे
महाविद्यालय, मेढा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | सेमिस्टर–५ : पेपर–१० | |
| | अमेरिकेची राज्यघटना | |
| १. | अ) संघराज्य शासन : अर्थ व स्वरूप | १ |
| | ब) संविधानाची वैशिष्ट्ये | |
| २. | अमेरिकेचे कायदेमंडळ | १८ |
| ३. | कार्यकारी मंडळ : रचना आणि कार्ये | ४४ |
| ४. | अ) न्यायमंडळ : रचना व कार्ये | ६४ |
| | ब) राजकीय पक्ष पद्धती | |
| | सेमिस्टर–६ : पेपर–१५ | |
| | चीन व स्वीडनची राज्यघटना | |
| १. | अ) चीनच्या राज्यघटनेची पार्श्वभूमी व वैशिष्ट्ये | ७९ |
| | ब) स्वीडनच्या राज्यघटनेची पार्श्वभूमी व वैशिष्ट्ये | ९३ |
| २. | अ) चीनचे कायदेमंडळ | १०२ |
| | ब) स्वीडनचे कायदेमंडळ | ११० |
| ३. | अ) चीनचे कार्यकारी मंडळ | ११४ |
| | ब) स्वीडनचे कार्यकारी मंडळ | १२४ |
| ४. | अ) चीनचे न्यायमंडळ व राजकीय पक्ष | १३८ |
| | ब) स्वीडनचे न्यायमंडळ व राजकीय पक्ष | १५० |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक – १

# अ) संघराज्य शासन : अर्थ व स्वरूप
# ब) संविधानाची वैशिष्ट्ये

**घटक संरचना :**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

   १.२.१ अमेरिकन संघराज्याचे स्वरूप, वैशिष्ट्ये, व केंद्रीकरणाची प्रवृत्ती

   १.२.२ अमेरिकन संविधानाची वैशिष्ट्ये

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं: अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठीचे प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठीची संदर्भ ग्रंथ


### १.० उद्दिष्टे :

संघराज्य संस्था व एकात्म संस्था असे शासन संस्थेचे दोन प्रकार पडतात. एकात्म शासन संस्था म्हणजे सर्व सत्ता एकाच ठिकाणी केंद्रीभूत झालेली असते. केंद्र हेच संपूर्ण देशासाठी कायदे करते. याउलट संघराज्यात केंद्र सरकार व घटकराज्यसरकार यांच्यामध्ये संविधानानुसार सत्ता विभागणी झालेली असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये अमेरिकन संघराज्याच्या संदर्भात आपण अभ्यास करणार आहोत त्याची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे –

- संघराज्य पद्धतीचा उदय व अमेरिकन संघराज्याचे स्वरूप यांचा अभ्यास.
- संघराज्य निर्मितीसठीच्या पूर्व अटी व संघराज्याचे प्रकार.
- संघराज्यनिर्मितीची वैशिष्टे.
- अमेरिकन संघराज्याच्या संविधानाची ठळक वैशिष्टे
- अमेरिकन संघराज्याच्या केंद्रीरकणाच्या प्रवृत्ती.

## १:१ प्रस्तावना :

संघराज्यात अनेक राज्ये एकत्र येवून एका संघराज्याची निर्मिती करतात. आज ज्याला आपण आदर्श संघराज्य व्यवस्था म्हणतो ती अमेरिकेच्या संघराज्याच्या आधारावरच संघराज्याचा सिद्धांत आधारित आहे. इ.स. पूर्व ३ ऱ्या शतकामध्ये ग्रीस मध्ये जगातील पहिले संघराज्य अस्तित्वात आले. त्या संघराज्याचे नाव 'अकियण' संघराज्य असे होते. मात्र हे संघराज्य अत्यंत लवचिक स्वरूपाचे संघराज्य होते.

प्राचीन भारतात देखील इ.स. पूर्व ५ व्या शतकात संघराज्य अस्तित्वात होती. प्राचीन काळातील अनेक छोटी-छोटी राज्ये एकत्र येवून 'लिच्छवी' संघराज्य निर्माण केले. काळाच्या ओघात ही संघराज्ये नष्ट झाली. कारण ही संघराज्ये लवचिक स्वरूपाची होती. मध्ययुगीन कालखंडात इटलीमध्ये 'इटालियन सिटीज्' एकत्र येवून संघराज्याची निर्मिती केली. परंतु ही संघराज्ये तात्पुरत्या स्वरूपाची होती

१७८९ मध्ये अमेरिकन संविधान निर्माण झाले. या संविधानाची निर्मिती एकाएकी झाली नाही. याच्यामागे जवळपास १५० वर्षाचा संघर्षाचा इतिहास आहे. १३ वसाहती एकत्र येवून ब्रिटीश सत्ते विरुद्ध संघर्ष करून अमेरिकन संघराज्याची निर्मिती केली. अमेरिकन संघराज्य हे जगातील पहिले संघराज्य आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना संघराज्याची व संविधानाची ओळख व्हावी म्हणून संघराज्याचा अर्थ, स्वरूप, आदर्श असे अमेरिकन संघराज्य, अमेरिकन संविधानाची प्रमुख वैशिष्टे व अमेरिकन संघराज्याच्या केंद्रीरकणाच्या प्रवृत्ती यांची सविस्तर मांडणी केली आहे. ती पुढीलप्रमाणे -

### १.२.१ संघराज्याचा अर्थ :

मानव दिवसेंदिवस प्रगती करीत चालला असतानाच त्याच्या प्रगतीबरोबरच समाजव्यवस्थाही बदलताना दिसतात. जगातील प्रत्येक समाजाची दिशा वेगळ्या प्रकारची आहे. यामुळे त्यामधून निर्माण झालेल्या शासन पद्धतीही भिन्न स्वरूपाच्या दिसतात. या सर्वांमधूनच जगामध्ये प्रामुख्याने एकात्म व संघराज्यांत्मक शासन व्यवस्था अस्तित्वात आलेल्या दिसतात. या व्यवस्थांनाच Unitary system व Federal system असे इंग्रजीमध्ये म्हटले जाते.

'Foedus' या मूळ लॅटिन शब्दापासून 'Federation' (संघराज्य) हा शब्द प्रयोग अस्तितव आला. संघराज्य व्यवस्थेमध्ये अनेक राज्यांनी स्वखुषीने एकत्रित येण्याची इच्छा दर्शविलेली असते. आणि या स्वखुषीच्या इच्छेतूनच संघराज्य निर्माण होते. अशाप्रकारच्या संघराज्याचा राज्यकारभार संविधानावरच अवलंबून असतो. जगातील प्रत्येक देशाला संविधानाची गरज असते. आधुनिक काळामध्ये तर संविधानाशिवाय शासन यंत्रणा चालवणे शक्य नाही. कारण संघराज्यामध्ये अनेक राज्ये एकत्र येवून आपले हक्क व स्वातंत्र्य अबाधित ठेवत असतात. सुरूवातीच्या काळामध्ये लिखित व अलिखित संविधानाची निर्मिती झालेली आपणास पहावयास मिळते. लिखित संविधानाला जास्त महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे आधुनिक काळामध्ये लिखित संविधानाला खूप महत्त्व प्राप्त झालेले आहे. लिखित संविधानाला संघराज्य शासन पद्धतीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. संघराज्य शासन पद्धतीमध्ये एकाच ध्येयाच्या पुर्तीसाठी अनेक शासनसंस्था (घटकराज्य) एकत्र आल्याचे दिसून येते. अशा

प्रकारची संघराज्य व्यवस्था १७८७ साली सर्वप्रथम अमेरिकेमध्ये अस्तित्वात आली. कालांतराने नंतरच्या कालखंडात अमेरिकन संघराज्याचे अनुकरण जगातील बऱ्याच देशांनी केले. संघराज्यशासन व्यवस्थेचे उत्तम उदाहरण म्हणून अमेरिकन संघराज्याचे नाव घेतले जाते. असे सी. एफ. स्ट्राँग यांनी म्हटले आहे. कारण जगामध्ये सर्वप्रथम संघराज्यपद्धतीचा प्रयोग अमेरिकेत केला गेला.

संघराज्य पद्धतीमध्ये शासनाचे दोन स्तर निर्माण होतात. प्रथम स्तर मध्यवर्ती ठिकाणी (केंद्रस्थनी) व द्वितीय स्तर घटकराज्याच्या स्तरावर कार्यरत असतो. या स्तरांच्या ठिकाणी असे अपेक्षित असते की, केंद्रशासनाचा मध्यवर्ती स्तर महत्त्वाच्या बाबीविषयी निर्णय घेईल व राज्यस्तरावर स्थानिक व कमी महत्त्वाच्या विषयावर निर्णय होईल. संघराज्य व्यवस्थेचे वैशिष्ट्ये म्हणजे शासनाचे दोन स्तर, लिखित संविधान व सत्तेचे विभाजन लिखित स्वरूपात असते. या आधावरच संघराज्याची निर्मिती होते. थोडक्यात असे म्हणता येईल की, समान हितसंबंध असलेली घटकराज्ये एकत्र येवून त्यांचे सु सुत्रनियंत्रण करण्यासाठी बळकट अशा मध्यवर्ती शासनाची आवश्यकता असते. यातूनच संघराज्यात्मक व्यवस्थेचा उदय झाला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रामध्ये एकजिनसीपणा निर्माण करणे हा मूळ उद्देश यामध्ये अभिप्रेत असतो.

- **संघराज्याच्या व्याख्या :**

**१) मॉटेस्क्यु :** अनेक राज्यांनी एकत्रित येऊन एक राज्याचे सभासद होण्याची संमती देणे म्हणजे संघराज्य (Federal government is a convention by which several similar states agree to be members of a large one montesquiey)

**२) प्रा. डायसी :** संघराज्य ही राष्ट्रीय ऐक्य व राष्ट्रीय सत्ता आणि स्थनिक सत्ता यांचा समन्वय घडवून आणणारी एक राजकीय यंत्रणा होय. (A federal state is a political contrivance intended to reconcile national unity and power with the maintenance of state rights - Dicey)

**३) हॅमील्टन :** नवीन राज्ययंत्रणा प्रस्थापित करण्यासाठी अनेक राज्यतंत्रज्ञांनी एकत्र येवून तयार केले सरकार म्हणजे संघराज्य होय. (Federal Governemtn is an association of states to form a new state - Hamiltion)

**४) प्रा. गार्नर :** राष्ट्रीय ऐक्य व सामर्थ्य यांची प्राप्ती करण्यासाठी दोन किंवा दोन पेक्षा अधिक स्वतंत्र घटक राज्ये स्वत:चे वेगळेपण कायम राखून एक मध्यवर्ती सरकार निर्माण करतात व करारात समाविष्ट असलेले अधिकार आपल्याकडे ठेवतात. या उद्देशाने केलेले संयोजन म्हणजे संघराज्य होय.

थोडक्यात, संघराज्य म्हणजे राज्यांच्या हक्कांना बाधा न येता राष्ट्रीय ऐक्य आणि सामर्थ्य ह्यांची निर्मिती व्हावी म्हणून निर्माण केलेले संयोजन आहे.

- **संघराज्य निर्मितीच्या दोन पद्धती :**

जगामधील संघराज्य निर्मितीच्या प्रक्रियांचा अभ्यास किंवा अवलोकन केले असता संघराज्य पद्धतीमध्ये अनेक राज्ये एकत्रित येण्याची किंवा संघराज्य निर्माण होण्याच्या दोन पद्धती आहते. त्या पुढीलप्रमाणे –

**अ) केंद्राकर्षी संघराज्य पद्धती :** ज्या पद्धतीमध्ये घटक राज्ये किंवा सार्वभौम राज्ये समान हितसंबंधाचे रक्षण व्हावे. म्हणून प्रबळ अशा मध्यवर्ती सत्तेची स्थापना करतात व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या आपल्या सार्वभौम सत्तेचा काही भाग मध्यवर्ती सत्तेकडे देतात व राहिलेला सभेचा भाग स्वत: जवळ ठेवतात. तेव्हा केंद्रकवर्षी संघराज्य निर्माण होतो. उदा. अमेरिका, ऑस्ट्रेलिया.

**ब) केंद्रोत्सारी संघराज्य पद्धती :** एकात्म शासन पद्धती झालेल्या देशात जेव्हा मध्यवर्ती सत्ता आपल्या प्रांतात घटकराज्याना दर्जा देऊन काही प्रमाणात अधिकार घटकराज्यांना बहाल करतात. तेव्हा केंद्रोत्सारी संघराज्य निर्माण होते. उदा. भारत, कॅनडा.

अमेरिकेचे संघराज्य पहिल्या पद्धतीने निर्माण झालेले आहे. फिलाडेल्फिया येथील परिषदेमध्ये १३ वसाहती एकत्र येऊन राज्यांचा संघ निर्माण केला व नंतर केंद्रोत्सारी प्रवृत्ती संघराज्यांची निर्मिती करण्यात आली. प्रक्रियेतून आज अमेरिकेत ५० घटकराज्य निर्माण झाली. तीच बाब भारताबद्दल सांगायची झाली तर भारतातील सर्व संस्थानाचे सक्तीने विलिनीकरण करण्यात आले. नंतर १९५६ मध्ये भाषावार प्रांत रचनेच्या माध्यमातून घटकराज्य अस्तित्वात आली. याचाच अर्थ कोणत्याही संघराज्यात प्रथम केंद्राकर्षी प्रवृत्तीतून राज्यांचा संघ निर्माण होतो व पुढे केंद्रोत्सारी प्रवृत्तीतून संघराज्याची निर्मिती होते. मात्र अशी संघराज्ये निर्माण होण्यासाठी लिखित संविधान, सत्तेची विभागणी व स्वतंत्र न्यायमंडळ या घटकांची नितांत आवश्यकता असते. अनेक घटकराज्ये मिळून संघराज्य निर्माण होते. प्रत्येक घटक राज्याचे स्वतंत्र शासन असते. तसेच संघराज्याचे एक केंद्र शासन असते. म्हणजेच संघराज्यात केंद्रशासन आणि घटक राज्य शासन अशी दुहेरी शासन व्यवस्था असते. के. सि. व्हेअर यांनी संघराज्याची व्याख्या करताना म्हटले आहे की, संघराज्यात केंद्र शासन आणि घटकराज्य शासन यामध्ये अशाप्रकारे अधिकार विभागणी करण्यात आलेली असते की, प्रत्येक शासन आपल्या अधिकार क्षेत्रात स्वतंत्र असते व केंद्र शासन तसेच घटक राज्याचे शासन ही समान दर्जाची असतात.

- **संघराज्य निर्मितीसाठी आवश्यक बाबी :**

**१) प्रबळ इच्छाशक्ती :** संघराज्य निर्माण होण्यासाठी सर्व घटकराज्यांना एकत्र येण्याची प्रबळ इच्छाशक्ती असावी. त्याच बरोबर त्या राज्यातील लोकांचीही प्रबळ इच्छा असली पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नेतृत्वाद्वारे त्या इच्छेचे अविष्करण व्हावे लागते.

**२) एकजिनसत्व :** घटकराज्याच्या एकत्र येण्याच्या इच्छेबरोबरच या राज्यामध्ये किमान समान धागे आवश्यक असतात. त्याच्यामध्ये एकजिनसीपणा आवश्यक असतो. घटकराज्यामध्ये एकसमान इतिहास, समान संस्कृती, समान विचारसरणी, समान भाषा असणे गरजेचे असते. वरील घटक संघराज्य निर्मितीसाठी आवश्यक असतात. उदा. अमेरिकेत एक भाषा, एक संस्कृती, धर्म व वंश इ. घटक घटकराज्यात समान आढळतात. तसेच भारताची संस्कृती व इतिहास एक असलेला पहावयास मिळतो.

**३) परकीय सत्तेला आवाहन :** परकिय सत्तेपासून धोका निर्माण झाल्यास किंवा मोठ्या साम्राज्याला आव्हान देण्यासाठी घटकराज्य निर्माण होऊन संघराज्य अस्तित्वात येऊ शकते. उदा. ब्रिटिश सत्तेविरुद्ध

लढण्यासाठी अमेरिकन संघराज्यामधील घटकराज्ये एकत्रित येवून (१३ वसाहती) संघराज्याची स्थापना केली. तसेच सोव्हिएत रशिया हे संघराज्य अमेरिकेबराबेर स्पर्धा करण्यासाठी भौगोलिक विचार करून निर्माण झालेले संघराज्य होते.

**४) लोकशाहीबद्दल दृढविश्वास :** संघराज्य हे लोकशाहीवर आधारित असते. त्यामुळे संघराज्य पद्धती यशस्वी होण्यासाठी राज्यातील लोकांच्या मनामध्ये लोकशाहीबद्दल दृढविश्वास व प्रेम असणे आवश्यक आहे.

**५) दळणवळणासाठी भौगोलिक समिपता :** लोकांची इच्छा प्रतिनिधींची इच्छा एवढेच घटक संघराज्यासाठी उपयुक्त आहेत असे नाही. तर या घटका बराबेरच दळणवळणाच्या सोईसाठी भौगोलिक समिपता आवश्यक असते.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ संघराज्याची वैशिष्ट्ये / संघराज्य निर्मितीची पूर्व अटी :

**१) लिखित संविधान व सांविधानाचे सार्वभौमत्व :** लिखित व ताठर संविधान हे संघराज्याचे खास वैशिष्टे आहे. केंद्र व घटकराज्यसरकारानी संविधानाला सर्वश्रेष्ठ मानले पाहिजे. संविधानाचे सार्वभौमत्व संघराज्यपद्धतीचा विशेष आहे. संविधानाने ठरवून दिलेल्या कार्यक्षेत्रात शासनसंस्थांनी कार्य करावयास हवे. लिखित संविधानाच्या आवश्यकतेविषय K.C. व्हिअर म्हणतात की, The terms of Agreement which establishes the general and regional governments of which distributes powers between them must be binding upon these general governments. This is a logical necessity from the definitions of federal government itself (Federal government Page No. 53) संविधान हे ताठर असावे कारण संविधान ताठर असेल तर त्यामध्ये सतत बदल होण्याचा संभव नसतो. तसेच सत्ताविभाजन तत्त्वामुळे सत्तासंघर्षाची शक्यता जास्त असते. हे सर्व टाळण्यासाठी संघराज्यामध्ये लिखित संविधान व संविधानाचे सार्वभौमत्व असावे.

**२) सत्तेची विभागणी :** मध्यवर्ती सरकार / केंद्र सरकार व घटकराज्य यांच्या अधिकार क्षेत्रांची स्पष्ट व निश्चित विभागणी हे संघराज्य पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या विभागणीमुळेच वरील दोन्ही सरकारे आपल्या क्षेत्रात स्वातंत्र समजली जातात. या विभागणीच्या विभाजनाची तरतुद संविधानात केलेली असते. संघराज्य व्यवस्तेमध्ये सत्तेचे विभाजन योग्य रित्या झालेले असते. केंद्राकडे परराष्ट्र, संरक्षण इ. महत्त्वाचे विषय असावेत. उरलेले अधिकार घटकराज्याकडे असावेत. संविधानाद्वारे केंद्र-राज्य अधिकाराची विभागणी व्हावी अशी संघराज्याची पूर्वअट असते.

K. C. Wheare यांनी भारतीय संविधानाचा सखोल अभ्यास केला असता ते म्हणतात की, 'भारतात केंद्राकडे जास्त प्रमाणात अधिकार असून घटकराज्याकडे अल्पप्रमाणात अधिकार आहेत. केंद्र आणि घटक राज्य / प्रांतिक सरकार यांच्यामधील संबंधावर संघराज्य पद्दती अवलंबून असते. दोन्ही सरकारच्या

हितसंबधात बाधा आली तर मात्र संघराज्यपद्धती यशस्वी होऊ शकणार नाही. याच कारणास्तव अधिकाराची विभागणी दोन्ही सरकारमध्ये योग्य पद्धतीने व स्पष्टपणे होणे आवश्यक असते.

**३) स्वतंत्र न्यायपालिका :** संघराज्याच्या संविधानाचे पालन करवून घेण्याचे व त्याचे संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी न्याय मंडळावर असते. त्यामुळे स्वतंत्र न्यायपालिका हा संघराज्य व्यवस्थेचा तिसरा महत्त्वाचा टप्पा आहे. मध्यवर्ती सरकार व घटकराज्य सरकार यांना देऊ केलेल्या कार्यक्षेत्रातच राहून त्यांना कार्य करावे लागते. जर निश्चित केलेल्या कार्यक्षेत्रावर एखाद्या घटकाकडून अतिक्रमण होत असेल तर त्यावर नियंत्रण ठेवणारी तिसरी सत्ता महत्त्वाची भूमिका बजावते व ती म्हणजे न्यायपालिका होय. संविधानाने दिलेल्या अधिकाराच्या मर्यादेची जाणिव वेळीच न्यायपालिका करून देत असते. याच दृष्टिकोनातून विचार केला तर न्यायालयीन पुनर्विलोकनाचा दिलेला अधिकार योग्य ठरतो.

न्यायव्यवस्था फक्त संघराज्य व्यवस्थेमध्येच कार्य करते किंवा असते असे नाही. तर एकात्म शासनव्यवस्था असलेल्या देशामध्ये सुद्धा नि:पक्षपातीपणे न्यायपालिका कार्य करीत असते. संघराज्य व्यवस्थेत न्यायमंडळ स्वतंत्र व स्वायत्त कार्य करते. कार्यकारी मंडळ व विधिमंडळ यांना कोणतेही घटनाबाह्य कृत्य करण्यापासून परावृत्त करण्याचे कार्य न्यायपालिका बजावत असते.

- **अमेरिकन संघराज्याचे स्वरूप :**

कोलंबसने अमेरिकेचा शोध लावल्यानंतर युरोपातील लोक हळूहळू अमेरिकेत स्थायीक झाले. या स्थायिक झालेल्या लोकांमध्ये ब्रिटनचे लोक सर्वात जास्त होते. इ.स. १६०७ ते १७७६ ह्या काळात ब्रिटीश पद्धतीची स्थानिक सरकारे स्थापन झाली. या सरकारांनी येथील लोकांवर सत्ताप्राप्त होताच अन्याय करून त्यांना आपल्या गुलामगिरीत जखडून ठेवले. परंतु १७७६ साली अमेरिकेतील १३ वसाहती एकत्र येवून ब्रिटीश साम्राज्याला विरोध करून अमेरिकन स्वातंत्र्याची घोषण केली. ४ जुलै १७७६ अमेरिकेत १३ वसाहतीनी आपल्या स्वातंत्र्याची घोषणा करून १९७६ च्या जूनमध्ये राज्यसंघाची स्थापना केली. ब्रिटीश सत्तेशी युद्ध करण्याचा प्रसंग आपल्यास सर्व वसाहतीनी सामुहिकरित्या प्रतिकार करणे हा राज्यसंघ स्थापण्यमागचा प्रमुख हेतू होता. तसेच युद्धकाळात परस्पर सहकार्य आणि मैत्रिसाठी जो संघ स्थापन केला तो म्हणजे राज्यसंघ होता. १३ वसाहतीच्या प्रतिनिधीची मिळून बलेली काँग्रेस ही राज्यसंघाची मध्यवर्ती यंत्रणा (सरकार) होती. मात्र या काँग्रेसला नाममात्र अधिकार होते. तसेच कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ अशी स्वतंत्र यंत्रणा काँग्रेसची नव्हती. राज्यसंघाची ही मर्यादा व अपयश तेथील प्रतिनिधीच्या व राष्ट्रवादी विचारवंताच्या लक्षात आल्यानंतर मध्यवर्ती सत्ता म्हणजेच केंद्र सत्ता अधिक बळकट करण्याच्या हेतूने विचार सुरू झाले. याचाच परिणाम म्हणजे १७८७ चे फिलोडल्फिया अधिवेशन होय. या अधिवेशनामध्ये राज्यांची स्वायत्तता सुरक्षित ठेवून मध्यवर्ती सरकार अधिक प्रबळ व परिणामकारक करण्याचा यशस्वी प्रयत्न संविधानाच्या माध्यमातून झाला.

अमेरिकेच्या संविधानाने संघराज्य पद्धती ही राज्यशास्त्राला महत्त्वपूर्ण अशी देणगी दिलेली आहे. कारण संघराज्याचा सर्वप्रथम प्रयोग लोकशाहीच्या मार्गाने अमेरिकेत झाला. अमेरिकन संघराज्याचे अनुकरण

जगातील अनेक देशांनी नंतरच्या काळामध्ये केलेले आपणाला पहावयास मिळते. कॅनडा, भारत व स्वित्झर्लंड इ. देशात संघराज्ये निरनिराळ्या पद्धतीने अस्तित्वात आली. १७८९ मध्ये १३ वसाहती एकत्र येवून अमेरिकन संघराज्याची निर्मिती झाली. नंतरच्या काळात अमेरिकन संघराज्यामध्ये ५० घटकराज्ये आहेत. अमेरिकन संघराज्य पूर्वी स्वतंत्र व सार्वभौम असलेल्या वसाहती एकत्रित येऊन निर्माण झालेले असल्याकारणाने ते केंद्राकर्षी (Centripetal) स्वरूपाचे संघराज्य आहे. या संघराज्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे–

### १) मध्यवर्ती सरकार व घटकराज्य यांच्यातील अधिकाराची विभागणी :

मध्यवर्ती सरकार व घटकराज्य यांच्यातील अधिकाराची विभागणी संविधानाने निश्चित केली आहे. सत्तेचे विभाजन किंवा विभागणी करताना मध्यवर्ती सरकारला काही अधिकार दिलेले आहेत. तर काही अधिकारावर निर्बंध घातले आहेत. त्याचप्रकारे घटकराज्य सरकारांना काही अधिकार दिलेले आहेत तर काही अधिकारावर निर्बंध घातले आहेत. तसेच शोषराधिकार घटकराज्याकडे दिलेले आहेत.

**अ) मध्यवर्ती सरकारचे अधिकार व बंधने :** संघराज्याचे नागरिकत्व, अणुशक्ती, राष्ट्राचे अंतर्गत व बाह्य संकटापासून संरक्षण, परराष्ट्राशी तह, करार, युद्ध, सैन्य, संघटन, अर्थव्यवस्था, चलनव्यवस्था, आंतरराष्ट्रीय व्यापार, तार, टपाल, केंद्राकडून घटक राज्यांच्या कारभाराची तपासणी, राजधानीची (वॉशिंग्टन) प्रशासन व्यवस्था इ. महत्त्वाच्या विषयासंबंधी मध्यवर्ती सरकारला कार्य करता येईल व त्यासंबंधी विविध कायदे करता येतील.

धार्मिक स्वातंत्र्याविरोधी कायदे, मूलभूत हक्क विरोधी कायदे, व्यक्तीची संपत्ती बेकायदेशीरपणे हिरावून घेणे, शस्त्रास्त्र बाळगण्यावर बंदी घालणे, घटकराज्यातून निर्यात होणाऱ्या वस्तूंवर कर आकारणे, गुन्हेगाराला स्वत: विरोधी साक्ष देण्यास बळजबरी करणे तसेच सन्माननीय पदव्या बहाल करणे इ. बाबतीत मध्यवर्ती सरकारला कार्य करता येणार नाही. अशा प्रकारची संविधानात तरतूद आहे.

**ब) घटकराज्य सरकारचे अधिकार व बंधने :** केंद्रसरकारला म्हणजेच मध्यवर्ती सरकारला दिलेले अधिकार सोडून उर्वरित अधिकार घटकराज्यांना देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने आंतरराज्यीय व्यापार व नियंत्रण, राज्याची आर्थिक व्यवस्था पाहणे, शिक्षण, आरोग्य व सामाजिक व्यवस्था ठेवणे, दिवाणी व फौजदारी दावे, स्थानिक शासनाच्या कारभारावर नियंत्रण, शेती, दळणवळणाच्या सोयी सुविधा निर्माण करणे, आंतर्गत शांतता व सुव्यवस्था, स्थानिक कर इ. बाबतीत कायदे करण्याचा व कार्य करण्याचा घटकराज्यांना अधिकार अमेरिकन संविधानाने दिलेला आहे.

### २) लिखित व परिदृढ संविधान :

अमेरिकन संविधान अमेरिकेत सर्वश्रेष्ठ मानले जाते. अमेरिकेच्या संविधानातील कलम ६ मध्ये 'संविधान हा देशाचा सर्वोच्च कायदा आहे. प्रत्येक राज्यातील न्यायाधिश हा कायदा लक्षात ठेवून कार्य करतील व कायद्याचे रक्षण करतील. तसेच मध्यवर्ती सरकार व घटकराज्य, एक घटक राज्य दुसरे घटक राज्य ह्यांच्यात निर्माण झालेला संघर्ष संविधानातील तरतुदीनुसार सोडविला जाईल.' असा उल्लेख केलेला आहे. अमेरिकेचे

संविधान हे परिदृढ किंवा अपरिवर्तनीय आहे. त्यामुळेच अमेरिकेत २२५ वर्षाच्या कालावधीमध्ये फक्त ३० घटनादुरुस्त्या झालेल्या आहेत. कारण घटना दुरुस्ती करण्यासाठी विशिष्ट व कठिण स्वरूपाची पद्धती वापरली जाते. परिदृढ संविधानामुळे मध्यवर्ती सरकार व घटकराज्य सरकार यांच्यामध्ये कमी संघर्ष निर्माण होतो. भौगोलिकदृष्ट्या मोठ्या घटकराज्यांनी लहान घटकराज्यावर वर्चस्व प्रस्थापित करू नये म्हणून अमेरिकन सिनेटमध्ये सर्व घटकराज्यांना संघराज्यात एकदा सामील झाल्यानंतर फुटून निघण्याचा अधिकार नाही. यावरून संविधानाचे श्रेष्ठ दिसून येते.

**३) स्वतंत्र न्यायपालिका :**

अमेरिकन संघराज्याचे आणखी एक वैशिष्टे म्हणजे सर्वोच्च न्यायालय होय. अमेरिकन संघराज्यात मध्यवर्ती सरकार व घटकराज्य सरकार यांनी केलेला कोणताही कायदा जर तो संविधनाच्या विरुद्ध असेल तर तो अवैध ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. मध्यवर्ती सरकार व घटकराज्य सरकार आणि एक घटकराज्य व दुसरे घटकराज्य यांच्यातील संघर्ष व वाद सर्वोच्च न्यायालयाद्वारे सोडवता येतात. सर्वात महत्त्वपूर्ण म्हणजे न्यायालयाचे निर्णय सर्वांवर बंधनकारक असतात. सर्वोच्च न्यायालय संविधानातील तरतुदींचा अर्थ लावून केंद्र अथवा घटक राज्य शासनाची कृती किंवा कायदा संविधानाशी सुसंगत आहे की विसंगत ते तपासते आणि विसंगत असल्यास अवैध ठरवते. यालाच न्यायालयीन पुनर्विलोकन असे म्हणतात. या अधिकाराचा वापर करून सर्वोच्च न्यायालय संविधानाचे व संघराज्य व्यवस्थेचे रक्षण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते.

- **स्वयं: अध्ययन प्रश्न – १**

१) ............ वसाहती एकत्र येवून अमेरिकन संघराज्याची निर्मिती झाली.

२) Federation हा शब्द .......... या लॅटिन मूळ शब्दापासून तयार झाला.

३) संघराज्यामध्ये शासन व्यवस्थेचे ........... व .......... स्तर निर्माण होतात.

४) अमेरिकन संघराज्याची निर्मिती ........... या पद्धतीने झालेली आहे.

५) ............. यांच्यामध्ये भारतात केंद्राकडे जास्त प्रमाणात अधिकार आहेत.

६) १३ वसाहती एकत्र येवून .............. रोजी अमेरिकन स्वातंत्र्याची घोषणा केली.

७) अमेरिकेच्या संविधानातील कलम .............. नुसार अमेरिकन संविधान हा सर्वोच्च कायदा आहे.

८) अनेक राज्यांनी एकत्रित येवून एक राज्याचे सभासद होण्याची संमती देणे म्हणजे .......... होय.

९) भारत हे ............. पद्धतीने संघराज्य बनले आहे.

१०) सध्यकाळात अमेरिकेत ............. घटक राज्ये आहेत.

## • अमेरिकन संघराज्याच्या केंद्रीकरण प्रवृत्ती वाढीची कारणे :

अमेरिकन संविधानाची वैशिष्टे पाहिली असता किंवा अभ्यासली असता अमेरिकन संघराज्य हे एक आदर्श संघराज्य आहे असे म्हणता येईल. असे असेल तर गेल्या काही वर्षामध्ये अमेरिकन संघराज्यातील काही अंशी सत्ता मध्यवर्ती सरकारकडे (केंद्रकडे) झुकलेली दिसते. अमेरिकेच्या गेल्या १५० ते १७५ वर्षातील परिस्थितीकडे पाहिले तर अध्यक्ष व केंद्रसरकार यांच्या सत्तेमध्ये व्यापक वाढ झालेली दिसते. संविधानामध्ये जरी केंद्र व घटकराज्यांना समान न्याय देणारी तरतुद असली तरी घटनाबाह्य घटकांमुळे अमेरिकन संघराज्यामध्ये केंद्रीकरणाच्या प्रवृत्ती बळकट झाल्याची बरीच कारणे दिसतात. त्यामध्ये प्रामुख्याने अमेरिकेचे संरक्षण आणि संवर्धन यासाठी केंद्रसरकार व प्रबळ व सामर्थ्यशाली असले पाहिजे असा सर्वत्र सूर चालू झालेला आहे. अंतर्गत यादवी, पहिले व दुसरे महायुद्ध, जगातील अणवस्त्र स्पर्धा, घटनादुरुस्ती व न्यायालयीन निर्णय यामुळे घटकराज्ये दुर्बल बनत चालली असून केंद्र सरकारचे अधिकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. ते पुढीलप्रमाणे सविस्तर पाहुया.

### १) अंतर्गत यादवी :

१८६१ ते १८६५ या कालखंडात अमेरिकेत अंतर्गत यादवी युद्ध झाले. 'टेक्सास' विरुद्ध 'व्हाईट' या वादात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, संघराज्य अविनाशी असून संघराज्यातून कोणत्याही घटकराज्याला बाहेर पडण्याचा अधिकार नाही. त्यामुळे अंतर्गत किंवा गृहयुद्धाला समर्थपणे तोंड देण्यासाठी केंद्र सरकारला व राष्ट्राध्यक्षाला जास्तीत जास्त अधिकार देण्यात आले. या अधिकाराचा वापर राष्ट्राध्यक्ष व काँग्रेस यांनी मोठ्या प्रमाणात केला.

### २) १९२९-३० ची आर्थिक महामंदी :

१९२९-३० साली जागतिक आर्थिक महामंदी निर्माण झाली. त्यामुळे भांडवल निर्मिती, कर्ज, बाजारभाव, मालक-मजूर संबंध इ. बाबतीत घटकराज्य सरकारचे आर्थिक व्यवस्थेवरील नियंत्रण अपुरे पडत चालले असून औद्योगिक आर्थिक व्यवस्थेवर घटकराज्यांचा ताबा किंवा नियंत्रण राहत नाही. त्यामुळे अमेरिकन अर्थव्यवस्था डबघाईला आली. या मंदीतून बाहेर पडण्यासाठी तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनी 'New Deal' नावाचा कार्यक्रम राबवला गेला. या कार्यक्रमाअंतर्गत अधिक गुंतवणूक विकासाचे प्रकल्प व रोजगाराच्या संधी यामुळे अमेरिकेच्या अर्थ व्यवस्थेला नवसंजीवनी मिळाली. या दरम्यानच्या काळामध्ये अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी आपल्या अधिकारात मोठ्याप्रमाणात वाढ केली. परिणामी केंद्रीकरणाची प्रवृत्ती वाढली.

### ३) न्यायालयीन निर्णय :

अमेरिकेचे संविधान फारच लहान असल्यामुळे संविदानातील अंतर्भूत तत्त्वांचा अर्थ लावण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर आहे. संविधानाचे संरक्षण करणे, बदलत्या काळानुसार संविधानात महत्त्वपूर्ण भर घालण्यासाठी न्यायालयाने जे निर्णय घेतले आहेत, त्यामध्ये केंद्रसरकारला झुकते माप देण्याचा प्रयत्न

केला आहे. त्यामुळे केंद्राच्या अधिकारात वाढल झाली परिणामी घटकराज्याचे अधिकार कमी होत गेले. या सर्वांचा परिणाम केंद्रीकरणाची प्रवृत्ती वाढत गेली.

### ४) कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेतून सहाय्यता अनुदान :

संविधानातील दुरुस्तीनुसार केंद्र सरकारला राष्ट्राच्या हितासाठी कर लावण्याचा अधिकार मिळाला. त्यातच भर म्हणून कल्याणकारी राज्याचा स्विकार केल्यामुळे घटकराज्यांना सहाय्यता अनुदान केंद्र सरकारला द्यावे लागले. अमेरिकेतील सर्व घटकराज्यांची आर्थिक स्थिती चांगल्या प्रकारची नाही. परिणामी केंद्राच्या सहाय्यावर घटकराज्यांना आपली अर्थव्यवस्था चालवावी लागते. आर्थिक सहायता करताना केंद्र सरकार व राष्ट्राध्यक्ष घटकराज्यावर काही अटी लादतो. यामुळे केंद्र सरकारच्या अधिकारात वाढ होते. या संदर्भात उदाहरण देताना लियोनार्ड म्हणतात की, ''जिथे संपत्ती त्याठिकाणी सत्तासुद्धा जास्त प्रमाणात एकवटते. याचा परिणाम संविधानिक सत्ताविभाजन पण नष्ट होते.''

### ५) राष्ट्राध्यक्षावरील दृढविश्वास :

अमेरिकेमध्ये राष्ट्राध्यक्ष हे पद शक्तीशाली व प्रतिष्ठेचे मानले जाते. या पदाबद्दल अमेरिकन लोकांना प्रचंड अभिमान, आत्मियता व विश्वास आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचे महत्त्व दुसऱ्या महायुद्धानंतर वाढल्यामुळे सर्वसामान्याची निष्ठा आपल्या घटकराज्यांच्या गव्हर्नरपेक्षा राष्ट्राध्यक्षाबद्दल अधिक आदर व विश्वास वाढला. या सर्वांच्या परिणामी घटकराज्यांच्या प्रतिष्ठेपेक्षा राष्ट्राध्यक्षाची प्रतिष्ठा वाढली.

### ६) आंतरराष्ट्रीय महत्त्व :

दुसऱ्या महायुद्धानंतर व रशियाच्या विघटनानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचे वर्चस्व वाढले. जगाचे नेतृत्व अमेरिकेकडे आले. जगातील लोकशाही व्यवस्थेच्या रक्षणाचे उत्तरदायित्व संयुक्त राष्ट्र संघाच्या माध्यमातून अमेरिकेने स्विकारले. त्यामुळे एक शक्तीशाली अमेरिका ठेवण्यासाठी राष्ट्राध्यक्ष व केंद्रसरकार अधिकाधिक अधिकारसंपन्न ठेवणे अमेरिकन जनतेला व घटकराज्यांना आवश्यक वाटले. म्हणूनच अमेरिकन संघराज्यामध्ये केंद्रीकरणाची प्रवृत्ती वाढली.

### ७) जागतिकीकरण :

जगातील संपूर्ण राष्ट्रांनी जागतिकीकरणाचा स्विकार केला. परिणामी आंतरराष्ट्रीय व्यापारात घटकराज्यापेक्षा केंद्र सरकारची भूमिका अधिकच असल्यामुळे केंद्र सरकारच्या व अध्यक्षाच्या अधिकारात मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली. त्यामुळे केंद्रीकरण प्रवृत्ती वाढीला लागली.

अशाप्रकारे वरील सर्व कारणामुळे आदर्श संघराज्यव्यवस्था असणाऱ्या अमेरिकन संघराज्यामध्ये केंद्रीकरणाची प्रवृत्ती वाढलेली आहे हे स्पष्ट होते.

- **स्वयं: अध्ययन प्रश्न – २.**

१) १० व्या घटनादुरुस्तीनुसार अमेरिकन संविधानात कशाचा समावेश करण्यात आला?

२) संविधानातील तत्त्वांचा अर्थ लांबण्याची जबाबदारी अमेरिकेत कोणाची आहे.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिकेचे महत्त्व कधी वाढले?

४) कोणत्या कारणामुळे अमेरिकन संघराज्यात केंद्रीकरणाची प्रवृत्ती वाढली.

५) आधुनिक काळात संविधानिक सत्ताविभाजन नष्ट होत चालले आहे. असे कोणत्या विचारवंताला वाटते?

### १.२.२ अमेरिकन संविधानाची वैशिष्ट्ये :

३० एप्रिल १७८९ पासून आजपर्यंत म्हणजे २२५ वर्ष अमेरिकन संविधान कार्यरत आहे. जगातील निर्मित संविधानात ते सर्वात जुने संविधान म्हणून ओळखले जाते. अमेरिकन संघराज्याची जी काही वैशिष्ट्ये आहेत त्याबरोबरच संविधानाची ही तशीच वैशिष्ट्ये आहेत ती पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

#### १) निर्मित व लिखित संविधान :

१७८७ मध्ये फिलाडेल्फिया येथील परिषदेमध्ये लिखित स्वरूपाच्या संविधानाचा स्विकार करण्यात आला. अमेरिकन संघराज्यात संविधान हे सर्वश्रेष्ठ मानले जाते. जगातील लिखित स्वरूपाची पहिली राज्यघटना म्हणून अमेरिकन संविधानाकडे पाहिले जाते. इंग्लंडच्या संविधानाप्रमाणे अमेरिकन संविधान हळूहळू निर्माण झालेले नाही. तर अमेरिकन संविधान निश्चित काळात निर्माण झालेले आहे. परंतू पुन्हा त्यामध्ये थोड्याफार प्रमाणात कलमांची भर घालण्यात आलेली आहे.

#### २) जगातील सर्वात लहान संविधान :

अमेरिकन संविधान हे जगातील इतर देशांच्या संविधानाची तुलना करता सर्वात लहान संविधान आहे. अमेरिकन मूळ संविधानामध्ये ४ हजार शब्द असून १२ पानांमध्ये संविधान मुद्रित झालेले आहे. तसेच संपूर्ण संविधान वाचून काढायला केवळ अर्धा तास लागतो. अमेरिकन संविधान लहान असल्याचे कारण संविधानकर्त्यांनी शासनाची फक्त मूलभूत तत्त्वे व प्रशासनाच्यासाठी आवश्यक अशा तत्त्वांचा समावेश करून एक मूळ चौकट तयार केली आहे. ज्या बाबीपुढील कालानुसार कायद्यानुसार ठरविता येतात. त्यांचा समावेश संविधानात करण्याची गरज निर्मात्यांना वाटली नाही. मन्रो म्हणतो की, 'अमेरिकन संविधान हे संक्षिप्ततेचा एक नमुना आहे. कारण त्यामध्ये फक्त चार हजार शब्द असून अर्ध्या तासात वाचून पूर्ण होते.'

#### ३) परिदृढ संविधान :

अमेरिकन संविधानाचे महत्त्वपूर्ण आणखी एक वैशिष्टे म्हणजे हे संविधान अतिशय ताठर किंवा परिदृढ आहे. या संविधानामध्ये परिवर्तन किंवा दुरुस्ती करावयाची असेल तर सामान्य कायद्यापेक्षा वेगळी अशी विशेष पद्धती वापरावी लागते. घटनादुरुस्तीसाठी काँग्रेसच्या दोन्ही सभागृहाच्या २/३ बहुमताने संमती दिली पाहिजे. तसेच अमेरिकेतील ३/४ घटक राज्यांची मंजूरी मिळाल्याशिवाय कोणतीही घटनादुरुस्ती करता येत नाही. अमेरिकन संविधानातील घटना दुरुस्ती प्रक्रियेत घटकराज्यांनाही महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.

म्हणूनच सध्यकालापर्यंत ३० घटनादुरुस्त्या अमेरिकन संविधानामध्ये झालेल्या आहेत. यावरून अमेरिकन संविधान किती मोठ्या प्रमाणात ताठर/परिदृढ आहे हे आपणाला दिसून येते.

### ४) संविधानाला सर्वश्रेष्ठ स्थान :

अमेरिकन संविधान हे अमेरिकेतील सर्वश्रेष्ठ कायदा आहे. (The supreme law of the country) वरील विधान अमेरिकन संविधानाच्या कलम ६ मध्ये स्पष्ट केले आहे की, अमेरिकन संविधान आणि त्याच्या अनुसार निर्माण केलेले सर्व कायदे, अमेरिकन संघराज्याच्या अधिकारांतर्गत केलेले करार किंवा भविष्यात होणारे करार अमेरिकेचे सर्वोच्च कायदे असतील आणि घटक राज्यातील न्यायाधीश त्याला बांधील असतील, कोणत्याही घटकराज्याच्या संविधानामध्ये किंवा कायद्यामध्ये यांच्याशी विसंगत असणारी कोणतीही बाब अवैध समजली जाईल. याच कारणास्तव अमेरिकन संविधानाचा मोठ्याप्रमाणात आदर केला जातो. व्हेवर म्हणतो की, "There can, indeed, be no other people anywhere in the world, who regard their constitutions with greater respect of than do the Americans." (व्यवहारात अमेरिकन जेवढा आपल्या संविधानाचा सन्मान करतात, तेवढा सन्मान अन्य कोणत्याही देशातील नागरिक आपल्या संविधानाचा करीत नसतील) इतक्या मोठ्या प्रमाणात अमेरिकन नागरिक संविधानाला श्रेष्ठ मानतात.

### ५) संघराज्यशासन व्यवस्था :

संघराज्य पद्धतीमध्ये लिखित संविधान, केंद्र व घटकराज्य यांच्यामध्ये सत्तेची विभागणी, न्यायालयीन स्वातंत्र्य या बाबींची नितांत आवश्यकता असते. या सर्व बाबी अमेरिकन संविधानाने स्विकारलेल्या आहेत. अमेरिकेतील १३ वसाहती एकत्र येवून ब्रिटीश सत्तेविरुद्ध संघर्ष करून अमेरिकन संघराज्याची निर्मिती केली. सध्यकाळामध्ये अमेरिकन संघराज्यात ५० घटकराज्यांचा समावेश आहे. अमेरिकन संघराज्यात सर्व घटकराज्यांचा दर्जा समान आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणत्याही घटकराज्याला संघराज्यातून फुटून जाण्याचा अधिकार नाही. समान राष्ट्रीय हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व करणारी राष्ट्रीय सत्ता व घटक राज्यांच्या वैयक्तिक हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व करणारी राष्ट्रीय सत्ता व घटक राज्यांच्या वैयक्तिक हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व करणारी घटकराज्य सत्ता यांचा सुरेख मेळ अमेरिकन संघराज्यात दिसून येतो. अमेरिकन संघराज्य हा संघराज्य पद्धतीचा पहिला प्रयोग आहे. जगात आज अस्तित्वात असलेल्या संघराज्यात अमेरिकन संघराज्य हे सर्वात जुने संघराज्य आहे. अमेरिकन संघराज्य हे केंद्राकर्षी पद्धतीने बनलेले आहे.

### ६) स्वतंत्र न्यायपालिका :

सर्वोच्च कायदा म्हणून देशाच्या संविधानाचा आदर होत रहावा आणि कोणाकडूनही त्यांची अवहेलना किंवा उल्लंघन होऊ नये याकरिता अमेरिकेत स्वतंत्र अशा सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. व्यक्तीचे स्वातंत्र्य व शासनाची सत्ता यांच्या समतोलाचे पालकत्व सर्वोच्च न्यायालयाकडे देण्यात आले आहे. अमेरिकन न्यायदान पद्धती दुहेरी स्वरूपाची आहे. संघराज्य न्यायालय व घटकराज्य न्यायालय अशी दोन प्रकारची न्यायमंडळे स्वतंत्रपणे आपल्या क्षेत्रात कार्यरत असतात. एकमेकांना समांतर अशी श्रेणीबद्ध

रचना आहे. संघराज्य शासन पद्धतीत मध्यवर्ती सरकारे व घटकराज्य सरकारे यांच्यातील किंवा घटक राज्यातील आपापसातील संघर्ष सोडवण्यासाठी सर्वोच्च न्यायालय कार्य करतात.

न्यायालयीन पुनर्विलोकनाचे तत्त्व हे अमेरिकन शासन व्यवस्थेचे आधुनिक संविधानवाादतील महत्त्वपूर्ण योगदान आहे. कायदेमंडळाच्या कायदा किंवा कार्यकारी मंडळाचे आदेश घटनेतील नियमांशी सुसंगत असावे लागतात. कायद्याचा अर्थ लावण्याचे कार्य न्यायालय करत असते. लावलेला अर्थ सुसंगत की विसंगत हे ठरविण्याचा आणि तो विसंगत ठरल्यास तो अवैध म्हणून रद्दबातल ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. यालाच न्यायालयीन पुनर्विलोकन असे म्हणतात. न्यायालयीन पुनर्विलोकनाचे तत्त्व अमेरिकेच्या राज्यघटनेत स्पष्ट स्वरूपात मांडलेले आहे. परंतु या संविधानाने जी शासन व्यवस्था निर्माण केलेली आहे त्या शासनव्यवस्थेतून निर्माण झालेले हे तत्त्व आहे. केंद्रसत्ता व घटकराज्य सरकारे यांच्या अधिकाराची संविधानाने निश्चित विभागणी केलेली आहे. यातील कोणत्याही शासनाने या घटनात्मक मर्यादेचे उल्लंघन केल्यास त्याला प्रतिबंध घालण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाला पार पाडावी लागते. म्हणून सर्वोच्च न्यायालयाला हा अधिकार बहाल केलेला आहे. भारताने अमेरिकेच्या न्यायालयीन पुनर्विलोकन पद्धतीप्रमाणे भारतात सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार दिलेला आहे.

### ७) सत्ता विभाजन :

अमेरिकन संविधान निर्मात्यांच्यावरती मॉन्टेस्क्युच्या सत्ताविभाजनाच्या तत्त्वाचा फार मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. याच कारणास्तव अमेरिकन संविधान निर्मात्यांनी आपल्या संविधानात सत्ता विभाजनाचे तत्त्व, नियंत्रण व संतुलनाची तरतूद केलेली दिसते. व्यक्तीस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी न्यायविभाग, शासन विभाग आणि कायदेमंडळ यांत सत्ताविभाजन आवश्यक आहे. असे १७४८ साली मॉंटेस्क्युचा सत्ताविभाजनाचा सिद्धांत सांगतो. अशा पद्धतीने संविधानातील तरतुदीनुसार शासनाचे तिनही विभाग (कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ) परस्परांपासून अलग ठेवलेले आहेत. तसेच घटकराज्यांची सत्ता आणि केंद्रसरकारची सत्ता यांच्यामध्ये सत्तेची विभागणी केलेली आहे. अमेरिकन शासन विषयक सत्ता राष्ट्राध्यक्षांना कायद्याची सत्ता कॉंग्रेसला, न्यायविषयक सत्ता सर्वोच्च न्यायालयाला संविधानाने दिलेली आहे.

### ८) नियंत्रण व संतुलनाची तरतूद :

अमेरिकन संविधानकर्त्यांनी नियंत्रण आणि संतुलन या तत्त्वाचा स्विकार केलेला आहे. सत्तेचे विभाजन तीन विभागात करून त्याचे काटेकोरपणे पालन करणे अशक्य आहे. याची जाणीव संविधान निर्मात्याना झाली होती. म्हणूनच त्यांनी सत्तेचे नियंत्रण व संतुलन हे तत्त्व स्विकारले. म्हणजेच कायदेमंडळ, राष्ट्राध्यक्ष व न्यायपालिका यांना काही अधिकार दिले पण त्यावर इतर विभागांचे नियंत्रण ठेवण्यात आले. उदा- अमेरिकन राष्ट्राध्यक्षाला शासनविषयक अधिकार दिले. मात्र त्यावर सिनेटचे नियंत्रण ठेवले आहे. कायदेमंडळाला कायदेविषयक सत्ता दिली. परंतु राष्ट्राध्यक्षाला नकाराधिकाराचा अधिकार दिला आहे. तसेच न्यायाधिशांची नेमणूक राष्ट्राध्यक्षाद्वारे केली जाते. यावरून आपणास असे दिसून येते की, सत्तेचे नियंत्रण व संतुलन यांचा मिलाप अमेरिकन संविधानामध्ये दिसतो.

**९) अध्यक्षीय शासनपद्धती :**

अमेरिकन संविधानाने संसदीय पद्धतीपेक्षा वेगळ्या अशा अध्यक्षीय पद्धतीचा स्विकार केला आहे. अध्यक्षीय पद्धतीनुसार अमेरिकेचा अध्यक्ष व त्याचे कार्यकारी मंडळ (मंत्रीमंडळ) हे काँग्रेसला (कायदेमंडळाला) जबाबदार ठेवण्यात आलेले नाही. तसेच काँग्रेस अध्यक्षाविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडू शकत नाही अथवा अध्यक्षाला प्रश्नही विचारू शकत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा अध्यक्ष वास्तविक प्रमुख असून त्याला मोठ्या प्रमाणात अधिकार देण्यात आलेले आहेत. अमेरिकन अध्यक्ष हा जनतेकडून प्रत्यक्षपणे मतदान प्रक्रियेतून निवडून जात असल्यामुळे अमेरिकन संविधानाने गणराज्याची स्थापना केलेली आहे.

**१०) मूलभूत हक्क :**

संविधानात मूलभूत हक्कांचा समावेश करणारे अमेरिका हे जगातील पहिले राष्ट्र आहे. परंतु सुरूवातीच्या संविधानामध्ये व्यक्तीचे मूलभूत हक्क नव्हते. १७९१ मधील १० व्या घटनादुरुस्तीनुसार अमेरिकन संविधानात मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला. सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर सोपविलेली आहे. नंतरच्या काळामध्ये जगातील इतर काही राष्ट्रांनी मूलभूत हक्कांचा समावेश आपापल्या राष्ट्राच्या संविधानात केला. शासनाकडून नागरिकांच्या अधिकारांवर अतिक्रमण होऊ नये म्हणून संविधानाने शासनावरही काही बंधने घातली आहेत. त्यामुळेच व्यक्तीच्या व्यक्तिविकासासाठी नागरिकांना विविध प्रकारचे मूलभूत हक्क बहाल केलेले आहेत. भारतामधील मूलभूत हक्क अमेरिकन संविधानातील मूलभूत हक्कामधूनच घेण्यात आले आहेत.

**११) दुहेरी नागरिकत्व :**

अमेरिकेच्या मूळ संविधानात दुहेरी नागरिकत्व अमेरिकन नागरिकांना देण्यात आले नव्हते. २८ जुलै १८६८ रोजीच्या १४ व्या घटनादुरुस्तीनुसार अमेरिकेतील नागरिकांना संघराज्याचे नागरिकत्व व ज्या घटकराज्यात राहतो त्या घटक राज्यांचे नागरिकत्व अशाप्रकारचे दुहेरी नागरिकत्व देण्यात आले. मात्र या घटकराज्यात निवास करित असताना दुसऱ्या घटकराज्याचे नागरिकत्व देता येत नाही. संविधानातील तरतुदीनुसार एकाच वेळी संघराज्याचे नागरिकत्व घटकराज्याचे नागरिकत्व व्यक्तीला मिळते. भारतामध्ये नागरिकाला एकेरी नागरिकत्व देण्यात आलेले आहे.

**१२) धर्मनिरपेक्ष राज्य :**

अमेरिकन संघराज्याच्या संविधानामध्ये कोणत्याही धर्माला अधिकृत मान्यता दिलेली नाही. संविधानाच्या दृष्टीकोनातून सर्व धर्म समान आहेत. तसेच धर्माच्या आधारावर सरकार भेदभाव करू शकत नाही. कोणत्याही धर्माला शासनाकडून प्रोत्साहन अगर आश्रय दिला जात नाही व कोणत्याही धर्मावर बंदी घालत नाही. भारताप्रमाणे अमेरिका हे धर्मनिरपेक्ष संघराज्य आहे. इंग्लंडमध्ये इंग्लंडलचा राजा हा प्रोटेस्टंट पंथाचाच असावा असे बंधन आहे. त्यामुळे इंग्लंडला धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणता येणार नाही.

वरील वेगवेगळ्या प्रकारे अमेरिकन संविधानाची किंवा राज्यघटनेची विविध वैशिष्ट्ये पहावयास मिळतात.

• **स्वयं: अध्ययनासाठी प्रश्न – ३**

१) अमेरिकन संविधानाचा स्विकार कोणत्या परिषदेमध्ये केला ?

२) कोणत्या देशाचे संविधान जगातील सर्वात लहान संविधान म्हणून ओळखले जाते?

३) अमेरिकन संविधानाने सर्वोच्च न्यायालयाला कोणता असा विशेष अधिकार दिलेला आहे?

४) अमेरिकन संविधान निर्मात्यांवर कोणत्या विचारवंतांच्या सत्ताविभाजन तत्त्वाचा प्रभाव पडलेला जाणवतो?

५) अमेरिकेने कोणत्या शासन पद्धतीचा स्विकार केलेला आहे?

## १.३ सारांश :

शासनसंस्थेचे एकात्म शासन व्यवस्था व संघराज्य शासन व्यवस्था असे दोन प्रकार पडतात. यापैकी प्रस्तुत प्रकरणामध्ये संघराज्य व्यवस्थेचा सविस्तर अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्राचिन काळी व मध्ययुगीन काळात सुद्धा संघराज्य व्यवस्था ग्रीक, इटली व भारतात अस्तित्वात होती. परंतु काळाच्या ओघात या व्यवस्थांचा ऱ्हास झाला. परंतु आधुनिक काळात अमेरिकन संघराज्य हे जगातील एक आदर्श संघराज्य आहे. या संघराज्याचा जगातील अनेक संघराज्यांनी अनुकरण करून आपल्या संघराज्य व्यवस्था निर्माण केल्या. संघराज्य निर्मितीसाठी लिखित संविदान, सत्तेची विभागणी, स्वतंत्र न्यायपालिका यांचा प्रामुख्याने उपयोग होतो. केंद्राकर्षी व केंद्रोत्सारी पद्धतीने जगातील अनेक संघराज्ये निर्माण झाली. केंद्राकर्षी पद्धतीने अमेरिकन संघराज्य तर केंद्रोत्सारी पद्धतीने भारतीय संघराज्याची निर्मिती झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकन संघराज्य हे जगातील सर्वात शक्तीशाली संघराज्य बनलेले आपणाला दिसून येते. अमेरिकन संघराज्याच्या निर्मितीपूर्वी तेथे ब्रिटिश सत्तेविरुद्ध वसाहतीचा संघर्ष पहावयास मिळतो. या संघर्षामधूनच स्वातंत्र्यानंतर अमेरिकेतील प्रतिनिधीनी व विचारवंतांनी आदर्श अशा संविधानाची उत्तम प्रकारे निर्मिती केली. अमेरिकन संविधानाची वैशिष्टे पाहिली तर जगातील आदर्श असे संविधान असल्याचे दिसते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे संविधान जगातील सर्वात लहान असून देखील आदर्शावत बनले आहे. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकन संघराज्य हळूहळू केंद्रीकरणाच्या प्रवृत्तीकडे वळताना दिसते. ही प्रवृत्ती संघराज्य व्यवस्थेच्या दृष्टीने घातक आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**संघराज्य :** अनेक घटकराज्य एकत्र येवून मध्यवर्ती सरकार बनवते व या सरकारला काही अधिकार देते व काही अधिकार आपल्याकडे ठेवणे.

**केंद्राकर्षी :** घटकराज्यांनी एकत्र येवून संघराज्याची निर्मिती करणे.

**केंद्रोत्सारी :** मध्यवर्ती सरकारने घटकराज्याची निर्मिती करून त्यांना अधिकार देणे.

**परिदृढ :** ताठर, बदलण्यास कठिण.

**संविधान :** राज्यघटना

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

१) १३ २) Foedus ३) मध्यवर्ती सरकार (केंद्र व घटकराज्य सरकार (घटकराज्य)

४) केंद्राकर्षी ५) K. C. Wheare ६) ४ जुलै १७७६ ७) कलम ६

८) संघराज्य ९) केंद्रोत्सारी १०) ५०

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

१) मूलभूत हक्कांचा २) सर्वोच्च न्यायालय ३) दुसऱ्यामहायुद्धानंतर

४) मध्यवर्ती सरकार व अध्यक्ष यांच्या कार्यात वाढ ५) लियोनार्ड

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

१) १७८७ मध्ये फिलाडेल्फिया २) अमेरिका ३) न्यायालयीन पुनर्विलोकन

४) मॉन्टेस्क्यु ५) अध्यक्षीय शासन पद्धती

## १.६ सरावासाठी स्वाध्याय किंवा प्रश्न.

**अ) टिपा लिहा.**

१) संघराज्याचा अर्थ व व्याख्या

२) संघराज्य निर्मितीच्या पद्धती.

३) संघराज्य निर्मितीसाठी आवश्यक बाबी

४) अमेरिकन संघराज्याचे स्वरूप.

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) संघराज्य म्हणजे काय ते सांगून अमेरिकन संघराज्याचे स्वरूप स्पष्ट करा?

२) अमेरिकन संविधानाची ठळक वैशिष्ट्ये सांगा?

३) अमेरिकन संघराज्याच्या केंद्रीकरणाच्या प्रवृत्तीची चर्चा करा.

## १.७ संदर्भ ग्रंथ


**अ) इंग्रजी संदर्भ ग्रंथ**

1) J. C. Johari - 'Comparative Politics', Sterling, Delhi.

2) S. R. Maheshwari - Comparative Govt. & Politics, Laxmi Naraya Agarwal, Agra 1983

3) Vidya Bhushan, Comparative Politics, Atlantic Publication and Distributers, Delhi.

**ब) मराठी संदर्भ ग्रंथ :**

१) भास्कर ल. भोळे, शासन आणि राजकारण, तौलनिक अध्ययन, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

२) शांताराम भोगले, प्रमुख देशांची शासन पद्धती, विद्या प्रकाशन, नागपूर.

३) डॉ. के. के. कावळेकर, प्रा. भाळबा विभुते, निवडक संविधाने, भाग-२, शांती प्रकाशन, सातारा.

४) डॉ. वासंती रामम, डॉ. विजय देठे, तुलनात्मक शासन आणि राजकारण, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.


❖ ❖ ❖

## २.१ प्रस्तावना :

अमेरिकेच्या कायदेमंडळामध्ये दोन सभागृहे आहते. दोन्ही सभागृहांना मिळून काँग्रेस असे म्हटले जाते. प्रतिनिधी सभा (गृह) हे कनिष्ठ सभागृह असून ते देशातील लोकांचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह म्हणून देखील ओळखले जाते. सिनेट (senate) हे वरिष्ट सभागृह असून ते घटकराज्यांचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे.

अमेरिकेच्या कायदेमंडळाला काँग्रेस हे नाव ठेवण्याचे प्रमुख कारण म्हणजे या शब्दाने संघराज्याचा भाव प्रकट होतो. कायदेमंडळाचे स्वरूप द्विगृही केले आहे. कारण कायदे विषयक सत्ता एकाच सभागृहाच्या हाती असल्यास एकाच सभागृहाची जुलमी सत्ता निर्माण होऊ शकते. याशिवाय एका सभागृहाने घाई घाईने विधेयक मंजूर केल्यास द्वितीय सभागृहात सविस्तर चर्चा होऊ शकते. यामुळे कायदेमंडळाची रचना द्विगृही करण्यात आली आहे.

अमेरिकेच्या कायदेमंहळाचा अभ्यास रकत असताना सत्ता विभाजन आणि नियंत्रण व संतूलन पद्धतीचा स्विकार केला आहे. अमेरिकन संघटनेने ‘अध्यक्षीय लोकशाहीचा’ स्विकार केला आहे. यामुळे या पद्धतीमध्ये कनिष्ठ सभागृह (प्रतिनिधीगृह) हे अधिकाऱ्याच्या बाबत दुय्यम असे सभागृह आहे. तर वरिष्ठ सभागृह (सिनेट) या सभागृहात अधिक अधिकार दिलेले आहेत.

काही कायदेमंहळामध्ये सभागृहाच्या सभासदांना विशेष अधिकार दिले आहेत. याशिवाय सभागृहातील सदस्यांच्या अमर्याद भाषण स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्यासाठी १९१७ साली एक कायदा केला आहे.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ प्रतिनिधी सभागृहाची रचना, कार्ये व अधिकार (प्रतिनिधी सभागृह) :

- **प्रतिनिधी सभा** (House of Representatives) :

प्रतिनिधी सभा हे काँग्रेसचे प्रथम सभागृह आहे. याला कनिष्ठ सभागृह देखील म्हणतात. हे सभागृह लोकांचे प्रतिनिधीत्व करते. कारण या सभागृहातील सभासदांची निवड लोकांच्याकडून प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने होते.

- **प्रतिनिधी सभेची रचना :**

या सभृहाची सदस्य संख्या सुरूवातीस ६५ इतकी होती. नंतर देशाची लोकसंख्या व घटकराज्यांत वाढ होत गेल्याने या सभागृहातील सभासदांची संख्या वाढत गेली. १९२९ च्या विधी नियमानुसार ४३५ इतकी सभासदांची संख्या होती. १९५८ व १९५९ साली आलास्का व हवाई ही दोन घटकराज्ये संघराज्यात समाविष्ठ झाल्याने या सभागृहाची सदस्य संख्या ४३५ इतकी आहे. लोकसंख्येच्या वाढीनुसार या सभागृहाची सदस्य संख्य बदलत असते. सध्या ३,४५,००० लोकसंख्येला एक प्रतिनिधी असे प्रमाण असलेचे दिसते.

- **मतदार संघ :**

एकप्रतिनिधी मतदार संघातून या सभागृहाच्या सभासदांची निवड होत असते. राज्यघटनेत मतदार संघ

निर्माण करण्याबाबत कोणतीही व्यवस्था केली नव्हती. मतदार संघ निर्माण करण्याचे अधिकार घटकराज्यातील कायदेमंडळाना देण्यात आले होते. यामुळे मतदार संघ हे विषम स्वरूपाचे होते. त्यामुळे १८४२ साली एक कायदा करून राज्यात समान पद्धतीचे मतदार संघ निर्माण करावेत असे ठरवले. परंतु समानतेचे हे तत्त्व पूर्णपणे आमलात आले नाही. मतदार संघाची निर्मिती करत असताना जेरिमँडींग पद्धतीचा अवलंब प्रत्येक घटकराज्याने केला. या पद्धतीनुसार ज्या मतदार संघात सत्ताधारी पक्ष असतो त्यांचे उमेदवार परत निवडून येतील अशा पद्धतीने मतदार संघ निर्माण केलेले असतात. ही पद्धत मॅसेच्युएटस् या राज्याचा गव्हर्नर ''राजब्रीज जेरी' या व्यक्तीने १८१२ साली या पद्धतीचा वापर करण्यास सुरूवात केली. त्यामुळे त्याच्या नावावरून जेरिमँडींग हा शब्द प्रचलित झाला आहे.

- **उमेदवाराची योग्यता (पात्रता) :**

प्रतिनिधी गृहाचा सभासद होण्यासाठी उमेदवाराकडे पुढील पात्रता असावी लागते.

१) उमेदवाराचे वय कमित कमी २५ वर्षे पूर्ण असावे.

२) निवडणूकीस उभे रहाण्यासाठी तो सात वर्षे अमेरिकेचा नागरीक असावा.

३) ज्या घटकराज्याचे तो प्रतिनिधीत्व करणार आहे त्या घटकराज्याचा तो नागरीक व रहिवाशी असला पाहिजे.

४) तो सरकारी नोकर नसावा.

- **मतदानाधिकार :**

वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या प्रत्येक नागरीकास मतदानाचा अधिकार दिलेला आहे. मतदानास पात्र असण्यासाठी त्याचे किमान दोन वर्षे संबंधित घटकराज्यात वास्तव्य असले पाहिजे व किमान एक वर्षे त्या मतदार संघात वास्तव्य असले पाहिजे.

- **कार्यकाल :**

या सभागृहाचा कार्यकाल राज्यघटनेनुसार २ वर्षाचा आहे. इतर लोकशाही देशातील कनिष्ठ सभागृहापेक्षा अमेरिकेच्या या सभागृहाचा कालखंड अत्यंत अल्प आहे. त्यामुळे राजकारणातील जेष्ठ व अनुभवी लोक या निवडणूकीकडे फारसे आकर्षीत होत नाहीत. या सभागृहाचा कालावधी बदलण्याचे थोडेफार प्रयत्न झाले होते. परंतु त्याचा उपयागे झाला नाही. या सभागृहाची अधिवेशने वर्षातून किमान एकवेळा होते व हे अधिवेशन किमान पाच महिने चालू रहाते.

- **गणसंख्या :**

या सभागृहाचे कामकाज सुरू करण्यासाठी किमान अर्ध्यापेक्षा जास्त सभासद उपस्थित आसेवत एवढे सभासद उपस्थित नसतील तर सभा तहकुब करण्यात येते.

- **वेतन व भत्ते :**

या सभागृहाच्या प्रत्येक सभासदाला ६९,८०० डॉलर्स इतके वार्षिक वेतन मिळते. याशिवाय निवृत्तीवेतन व इतर सुविधा त्याला सभासदत्वाच्या कार्यकाळात मिळतात.

- **सभासदाचे विशेष अधिकार :**

लोकशाही शासन व्यवस्थेस प्रत्येक सभासदाला सभागृहास आपली मते प्रभावीपणे व निर्भयपणे मांडता आली पाहिजेत. यासाठी भाषण स्वातंत्र्याबरोबर सभासदाला न्यायालयीन कारवाई पासून मुक्त रहाता आले पाहिजे. यासाठी प्रत्येक सभासदास पुढील प्रमाणे विशेष अधिकार दिले आहेत.

१) प्रतिनिधी गृहाच्या प्रत्येक सभासदाला या गृहाच्या अधिवेशनासाठी जात व येत असताना प्रतिबंध करता येत नाही. फक्त देशद्रोह घोर अपराध, शांतता भंगाचे गुन्हे यासाठी संरक्षण देता येत नाही.

२) सभागृहात आपले मत अथवा भूमिका मांडण्यासाठी सर्व सभासदांना भाषण करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. त्याने केलेल्या भाषणावर न्यायालयीन कारवाई करता येत नाही.

३) ज्या सभासदाचे वर्तन आणि आचरण अनैतिक व अयोग्य असेल अशा सभासदाचे सदस्यत्व २/३ बहूमताने रद्द करण्याचा अधिकार सभागृहाला आहे. उदा. १९१८ साली व्ही. एल. बर्गर यांना सरकारच्या कार्यात अडथळा आणल्याच्या कारणावरून त्याचे सदस्यत्व सभेने रद्द केले होते.

- **प्रतिनिधी गृहाचा अध्यक्ष / सभापती** (Speaker) :

प्रतिनिधीगृहाच्या सार्वत्रिक निवडणूका झाल्यानंतर पहिल्या अधिवेशनात सभापतीची निवड केली जाते. संसदीय शासन पद्धतीप्रमाणे सभापतीची निवड झाल्यानंतर तो निपक्षपातीपणे काम करतो. परंतू या सभागृहातील सभापती हा राजकीय पक्षाच्या कार्यात सक्रिय सहभागी असतो. त्यामुळे हे पद पूर्णपणे राजकीय स्वरूपाचे आहे.

सभापती पदासाठी उमेदवार निश्चित करत असताना राजकीय पक्षाद्वारे पुढील दोन बाबींचा विचार केला जातो. एक उमेदवाराची लोकप्रियता व दुसरी म्हणजे उमेदवाराचे वय जेष्ठता होय. सभापतीचा कार्यकाळ हा प्रतिनिधी गृहाच्या एवढाच म्हणजे दोन वर्षाचा आहे.

सभापतीला किती अधिकार असावेत या संबंधीचा उल्लेख घटनेत नाही. त्यामुळे सुरूवातीच्या काळात त्याने आपली सत्ता व प्रभाव वाढवण्यास सुरूवात केली. त्यानुसार तो सर्व स्थायी व प्रवर समित्यांची नेमणूक करत असे. सभागृहाच्या कामकाजाचे समितीची तो नेमणूक करत असे आणि या समितीचा तो अध्यक्ष असे. नियम समितीचा सुद्धा तो प्रमुख असल्याने जी विधेयके त्याला जी योग्य वाटत तीच सभागृहापुढे चर्चेला ठेवण्याची तो व्यवस्था करत असे. त्यामुळे विधेयके सादर करण्यापासून ते मंजूर होईपर्यंत त्याचाच अधिकार विधेयकावर होता. त्यामुळे त्याची विधीविषयक क्षेत्रात त्याची हुकूमशाही निर्माण झाली होती.

१९११ च्या विधीनियमानुसार सभापतीच्या हातातील अधिकार कमी केले निरनिराळ्या समित्या

नेमण्याच्या अधिकार सभागृहाला देण्यात आला. स्थायी समितीतील सदस्यांची निवड प्रतिनिधी सभा करू लागली. त्यामुळे सभापतीच्या अधिकारावर व हुकूमशाहीवर नियंत्रण आले व त्याची सत्ता मर्यादित झाली. प्रतिनिधी सभागृहाच्या सभासदाचे स्थान अध्यक्ष आणि उपाध्यक्ष नंतर तिसऱ्या क्रमांकाचे आहे. अध्यक्षपदाच्या वारसदारामध्ये त्याचे स्थान तिसऱ्या क्रमांकाचे असल्यामुळे या पदाला अमेरिकन शासन व्यवस्थेमध्ये महत्त्व प्राप्त झाले आहे.

- **सभापतीची कार्ये :**

    १) सभागृहाचे कामकाज व्यवस्थीत चालण्याची जबाबदारी सभापतीची असते. त्यामुळे या बैठकीचे अध्यस्थान स्विकारून तो सभागृहाचे कामकाज व्यवस्थीतपणे पार पाडत असतो.

    २) सभागृहाचे कामकाज सुरू असताना सभागृहात नियंत्रण ठेवणे सभासदाना आपले मत व्यक्त करण्याची संधी देणे.

    ३) प्रतिनिधी गृहाच्या सभासदाना मिळालेल्या विशेष अधिकारांचे रक्षण करणे.

    ४) विधेयक निर्मितीची प्रक्रिया आपल्या नियंत्रणाखाली पार पाडणे.

    ५) एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास आपले निर्णायक मत (Casting vote) देणे.

    ६) सभागृहातील कामकाजाच्या नियमांचा अर्थ लावणे.

    ७) सभागृहाचे कामकाज सुरळीत व शांततेने चालण्यासाठी सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणणाऱ्या सभासदावर कारवाई अथवा त्यांचे सभासदत्व तात्पुरत्या कालासाठी रद्द करणे इत्यादी कार्ये सभापतीला करावी लागतात.

- **प्रतिनिधी गृहाचे अधिकार व कार्ये :**

**१) विधीविषयक अधिकार :**

कोणत्याही विषयावरील विधेयक प्रथम प्रतिनिधीगृहात मांडले जावू शकते. या सभागृहात विधेयक निर्मितीची प्रक्रिया झाल्यानंतर ते सिनेटच्या मंजूरीसाठी पाठवले जाते. जर एखादे विधेयक प्रथम सिनेटने मंजूर करून प्रतिनिधी गृहाकडे पाठवले असल्यास या सभागृहाने मंजूरी देईपर्यंत विधेयकाचे कायद्यात रुपांतर होऊ शकत नाही. याशिवाय सिनेटने मंजूर केलेल्या विधेयकात प्रांतनिधी गृह दुरुस्त्या सुचवू शकते. दोन्ही सभागृहात एखाद्या विधेयकाबाबत मतभेद झाल्यास ते विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठवले जाते. या समितीत ते विधेयक मंजूर किंवा नामंजूर करण्यात येते. थोडक्यात सामान्य विधेयकाबाबत दोन्ही सभागृहाना समान अधिकार आहेत.

**२) आर्थिक अधिकार :**

कोणतही प्रकारचे आर्थिक विधेयक हे सर्वप्रथम कनिष्ठ सभागृहात मांडण्याची प्रथा आहे. त्याप्रमाणे

अर्थ विधेयक हे प्रथम प्रतिनिधीगृहात मांडली जातात. विविध कर आकारणी, राष्ट्रीय निधी, जमा करणे व खर्च करणे या संबंधीच्या विधेयकाबाबत याच सभागृहाला विशेष अधिकार आहेत. अर्थ विधेयकाला प्रतिनिधी गृहाने मंजूरी दिल्यानंतरच ते सिनेट सभागृहाकडे पाठवले जाते. सिनेट या विधेयकामध्ये दुरुस्त्या सुचवू शकते. परंतु या दुरुस्त्या प्रतिनिधीगृहाला मान्य असाव्या लागतात.

**३) न्यायिक अधिकार :**

अध्यक्ष, उपाध्यक्ष, न्यायाधिश व अन्य उच्च पदावरील व्यक्तीने पदावर काम करत असताना गंभीर स्वरूपाचा गुन्हा केला असल्यास त्यांना पदावरून काढून टाकण्यासाठी महाभियोगाचा खटला चालवण्याचा अधिकार या सभागृहाला देण्यात आला आहे. महाभियोगाचा प्रस्ताव सभेच्या सभासदाकडून सादर करण्यात आल्यावर महाभियोगाचा खटला चालवण्याचा अधिकार या सभागृहाला आहे. सिनेट फक्त त्या आरोपाची चौकशी करते व निर्णय देते.

**४) घटनादुरुस्ती व निर्वाचन विषयक अधिकार :**

प्रतिनिधी गृहाला घटना दुरुस्तीचा प्रस्ताव मांडण्याचा व मंजूर करण्याचा अधिकार आहे. या गृहाने २/३ बहूमताने घटना दुरुस्ती मंजूर केल्यानंतर ते दुसऱ्या सभागृहाकडे पाठवले जाते. या शिवाय अध्यक्षपदाच्या होणाऱ्या निवडणूकीत कोणत्याही उमेदवाराला स्पष्ट बहुमत मिळाले नाही तर सर्वाधिक मते मिळवणाऱ्या पहिल्या तिन उमेदवारामधून एकाची अध्यक्षपदावर निवड करण्याचा अधिकार प्रतिनिधी गृहाला आहे. अमेरिकेत संघटीत राजकीय पक्षांचा उदय झाल्यामुळे या सभागृहाच्या अध्यक्ष निवडीचे महत्त्व संपले आहे.

**५) प्रशासकीय अधिकार :**

प्रशासनातील कोणत्याही खात्यामध्ये गैरव्यवहार झाला असल्यास अशा प्रकरणांची चौकशी करण्यात यावी असा ठराव प्रतिनिधी सभागृह मंजूर करते. यानंतर हे सभागृह चौकशी समिती निर्माण करून संबधीत खात्याची तपासणी करते हा अधिकार या सभागृहास आहे.

- **प्रतिनिधी गृहाचे स्थान व भूमिका :**

लोकशाही शासन पद्धतीमध्ये लोकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सभागृहाला महत्त्वाचे स्थान असते. प्रथम सभागृह हे महत्त्वाचे व श्रेष्ठ समजले जाते. परंतु अमेरिकेत प्रतिनिधीगृह हे अधिकाराच्या बाबतीत कनिष्ठ बनले आहे. याची पुढील प्रमाणे कारणे आहेत.

**१) अल्पकार्यकाल :**

या सभागृहाचा कार्यकाल फक्त दोन वर्षाचा आहे. या कालावधीत या सभागृहाची फक्त दोन अधिवेशने होतात. त्यामुळे या सभागृहला प्रभावीपणे काम करणे शक्य होत नाही. या सभागृहाच्या अल्प कालावधीमुळे सभासदाना भावी निवडणूकीची काळजी सतत असते. याचा परिणाम सभागृहाच्या कार्यक्षमतेवर होत असतो.

**२) सदस्य संख्या :**

या सभागृहाच्या सभासदाची संख्या फार जास्त असल्यामुळे या सभागृहाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून सविस्तर चर्चा करणे आवश्यक होते. याउलट सिनेटची सभासद संख्या मर्यादित असल्याने एखाद्या विधेयकावर सविस्तर व चांगल्या प्रकारची चर्चा होऊ शकते.

**३) प्रतिनिधीचा दर्जा :**

या सभागृहाचा कालावधी कमी असल्यामुळे अत्यंत महत्त्वाचे राजकीय क्षेत्रातील लोक या गृहाच्या निवडणूकीकडे आकर्षित होत नाहीत. त्यामुळे सहाजीकच दुय्यम व कमी महत्त्वाचे लोक या सभागृहात निवडून येतात. याशिवाय उमेदवार हा संबंधीत निर्वाचन क्षेत्राचा रहिवाशी असावा अशी अट असल्यामुळे प्रतिनिधीच्या निवडीला मर्यादा येतात. या सभागृहातील सभासद स्थानिक प्रश्नावर अधिक चर्चा करत असतात. त्यामुळे त्यांच्या विचाराला मर्यादा येते.

**४) अध्यक्षावर नियंत्रण :**

अध्यक्षावर नियंत्रण ठेवण्याच्या अधिकार प्रतिनिधी गृहाला दिलेला नाही. त्यामुळे हे सभागृह लोकांचे प्रतिनिधीत्व करत असूनदेखील असा अधिकार या सभागृहाला नसल्याने याला दुय्यम स्थान मिळाले आहे. त्यामुळे हे सभागृह कमकुवत व कमी महत्त्वाचे मनले आहे.

प्रतिनिधी गृह कमकुवत असले तरी या सभागृहाचे महत्त्व टिकून आहे. कारण विधेयक निर्मितीमध्ये दोन्ही सभागृहाना समान अधिकार आहेत. आर्थिक विधेयके ही सर्वप्रथम कनिष्ठ सभागृहातच मांडली जातात. अमेरिकेचा अध्यक्ष हा महत्त्वपूर्ण विषयावर निर्णय घेताना व धोरण ठरवताना सिनेट प्रमाणे प्रतिनिधी गृहातील वरिष्ठ सभासदाबरोबर चर्चा करत असतो. या सभागृहाचा कालावधी दोन वर्षाचा असल्यामुळे दर दोन वर्षांनी लोकांचा कल कोणत्या राजकीय पक्षाकडे आहे हे समजते व त्यानुसार विद्यमान अध्यक्षाला आपल्या धोरणात बदल करण्याची संधी मिळत असते. यामुळे या सभागृहाची भूमिका व स्थान हे वेगळे व महत्त्वपूर्ण आहे.

**२.२.३ वस्तुनिष्ठ प्रश्न** (Objective type questions) :

१) अमेरिकेच्या कायदेमंडळाला ............ असे म्हटले जाते.

(संसद, काँग्रेस, यापैकी नाही.

२) अमेरिकन कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृहास ............. म्हणतात.

(लोकसभा, राष्ट्रीय जन काँग्रेस, प्रतिनिधी गृह)

३) अमेरिकेच्या कनिष्ठ सभागृहात ............ एवढे सभासद आहेत.

(५५०, २५८, ४३५)

४) अमेरिकेच्या कनिष्ठ सभागृहाचा कार्यकाल ........... वर्षे आहे.

(दोन, पाच, सात)

५) अमेरिकेच्या कनिष्ठ सभागृहाच्या निवडणूकीसाठी उमेदवाराच्या .......... वयाची अट आहे.

(३० वर्षे पूर्ण, २५ वर्षे पूर्ण, १८ वर्षे पूर्ण)

६) प्रतिनिधी गृहामध्ये ......... वयाची अट पूर्ण करणाऱ्याना मतदानाचा अधिकार दिला आहे.

(१८ वर्षे पूर्ण, २१ वर्षे पूर्ण, यापैकी नाही.)

७) कनिष्ठ सभागृहाचे कामकाज सुरू करण्यासाठी ............ गणसंख्या असावी लागते.

(२३/ सभासद संख्या, निम्या पेक्षा जास्त, यापैकी नाही)

८) कनिष्ठ सभागृहाचे एखादे विधेयक मंजूर करण्यासाठी ......... बहुमतांची आवश्यकता असते.

(१/२, २/३, ३/४)

९) कनिष्ठ सभागृहाच्या उमेदवारासाठी अर्ज करताना उमेदवार हा ......... वर्षे अमेरिकेचा नागरीक असला पाहिजे.

(पाच, दोन, सात)

१०) अर्थविषयक विधेयके ही सर्वप्रथम ............... सभागृहात मांडली जातात.

(वरिष्ठ, कनिष्ठ, यापैकी नाही)

## २.२ सिनेट रचना, कार्ये अधिकार :

सिनेट हे अमेरिकेतील द्वितीय सभागृह आहे. त्याला वरीष्ट सभागृह असे देखील म्हटल जाते. हे सभागृह घटक राज्यांचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह म्हणून ओळखले जाते.

- **सिनेटची रचना :**

सिनेट मध्ये प्रत्येक घटक राज्याला दोन प्रतिनिधी पाठवण्याचा अधिकार आहे. सध्या अमेरिकेत ५० घटकराज्ये आहेत. प्रत्येक घटकराज्याचे आकारमान, लोकसंख्या यांचा विचार न करता प्रत्येक घटकराज्याला दोन प्रतिनिधी निवडून सभागृहात पाठवता येतात. त्यामुळे या सभागृहाची सदस्य संख्या १०० इतकी आहे. सर्व घटकराज्याना समान दर्जा हे सिनेटच्या रचनेचे वैशिष्ट्य आहे.

- **निवडणूकीस उभे राहण्याची पात्रता :**

सिनेटचा प्रतिनिधी म्हणून निवडणूकीस उभे रहाण्यासाठी उमेदवाराची पुढील पात्रता असावी लागते.

१) उमेदवाराच्या वयाची ३० वर्षे पूर्ण असली पाहिजेहत.

२) निवडणूकीला उभे रहाण्यासाठी उमेदवार कमीत कमी ९ वर्षे अमेरिकेचा नागरिक असला पाहिजे.

३) उमेदवार ज्या घटक राज्यातून निवडणूक लढवणार आहे या घटक राज्यांचा तो रहिवाशी असला पाहिजे.

४) सरकारी नोकराना निवडणूकीस उभा रहाता येत नाही.

- **उमेदवार निवडण्याची पद्धती :**

अमेरिकेच्या राज्यघटनेस सिनेटच्या सभासदांची निवड अप्रत्यक्ष करण्याची तरतूद होती. म्हणजेच घटक राज्याच्या कायदेमंडळातील सदस्य सिनेटसाठी दोन प्रतिनिधींची निवड करत होते. १९१३ साली राज्यघटनेत १७ वी दुरुस्ती करण्यात आली आणि निवडणूकीची पद्धत प्रत्यक्ष करण्यात आली. यानुसार जनतेकडून प्रत्यक्ष मतदान पद्धतीने सिनेटच्या सदस्यांची निवड करण्यास सुरूवात झाली.

- **सिनेटचा कार्यकाल :**

सिनेट हे कायम स्वरूपाचे सभागृह आहे. ते कधिही विसर्जीत होत नाही. या सभागृहातील प्रत्येक सभासदाचा कार्यकाल ६ वर्षांचा आहे. प्रत्येक दोन वर्षांनी या सभागृहातील १/३ सभासद आपला सहा वर्षाचा कार्यकाल संपल्याने निवृत्त होत असतात. या रिकाम्या जागी परत तेवढेच नवीन सभासद निवडून येतात. त्यामुळे सभागृहाची सदस्य संख्या टिकून रहाते.

- **सभागृहाचा सभापती** (Ex-Officio) **:**

अमेरिकेचा उपाध्यक्ष हा सिनेटचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. सिनेटला एका सभासदाची निवड तात्पुरता अध्यक्ष म्हणून करता येते. पदसिद्ध अध्यक्षाच्या गैर हजेरीत तात्पुरता अध्यक्ष काम करत असतो. सिनेटच्या सभापतीला पुढील कार्ये करावी लगतात.

१) सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालवणे.

२) सभागृहात प्रत्येक सभासदास बोलण्याची संधी उपलब्ध करून देणे.

३) सभासदांच्या विशेष अधीकारांचे रक्षण करणे.

४) सभागृहातील शांतता टिकवणे.

५) सभागृहात एखाद्या प्रश्नावर समान मते मिळाल्यास तो आपले निर्णायक मत (Casting vote) देवू शकतो.

६) एखाद्या ठरावावरील चर्चा पूर्ण होताच तो ठराव मतदानास टाकतो व मतदानाचा निर्णय घोषित करण्याचे कार्य सभापतीने करावे लागते.

- **सिनेटच्या सभासदांचे विशेष अधिकार :**

१) दिवाणी गुन्ह्याबाबत सिनेटला सभागृहाकडे अधिवेशनासाठी जात व परत येत असताना अटक करता येत नाही.

२) प्रत्येक सिनेटर्सला सभागृहात आपले मत व्यक्त करण्यासाठी भाषण करता येते. त्याने केलेल्या भाषणा विरुद्ध न्यायालयात कारवाई करता येत नाही.

३) प्रत्येक सिनेटरने सभागृहामध्ये शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे. अन्यथा त्याचे सदस्यत्व सभागृह २/३ बहुमताने रद्द करू शकते.

- **फिलिबस्टरिंग** (Filibustering) :

सिनेटच्या प्रत्येक सभासदाला मिळालेल्या अधिकारामध्ये 'भाषण स्वातंत्र्य' हा एक अधिकार आहे. या अधिकाराचा वापर करून एखादा सभासद अमर्याद काळ भाषण करू शकतात. या मार्गाने ते सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणू शकतात. या अधिकाराचा वापर विशषत: अधिवेशनाच्या कामकाजाच्या शेवटी करून एखादे विधेयक मंजूर करण्यास प्रतबंध केला जातो. यामुळे सभागृह विधेयक सादर करणारा सभासद ते विधेयक मागे घेतो. किंवा ते मागे न घेतल्यास सतत केल्या जाणाऱ्या भाषणामुळे चर्चा पूर्ण होण्याऐवजी अधिवेशनाचे कामकाज थांबते. परिणामत: ते विधेयक मंजूर होत नाही. याप्रकारे भाषण स्वातंत्र्याच्या अधिकाराचा दुरुपयोग होणारी अनेक उदाहरणे सिनेट मध्ये घडली आहेत. उदा. टेक्सास राज्याचा एक सिनेटर 'शेफर्ड' हा सहा तास पन्नास मिनीटे राष्ट्रसंघांच्या कार्यासंबंधी भाषण करत होता. तर १९०८ साली रॉबर्ट लॉफॉलेट यांनी सिनेटमध्ये सलग १८ तास भाषण केले होते. अशाप्रकारे भाषण स्वातंत्र्याचा अतिरेक करणे याला फिलिबस्टरिंग असे म्हटल जाते. या अधिकारामुळे सभागृहाचे कामकाज अडथळा निर्माण होतो. असे होऊ नये म्हणून १९१७ साली एक कायदा पास करण्यात आला. त्यानुसार सिनेटच्या १/६ सभासदांनी एखाद्या सदस्याचे भाषण बंद करावे असा ठराव मंजूर केल्यस या प्रस्तावाला सभागृहातील २/३ सदस्यांनी पाठींबा दिला तर त्याचे भाषण बंद करता येते. या नविन नियमाचा वापर फारच कमी केळा केला जातो. कारण सिनेटचा एखादा सभासद किंवा सभासदांचा लहानसा गट फिलिबस्टींग या पद्धतीचा वापर करून संपूर्ण देशातील लोकांचे लक्ष आपल्याकडे वेधू शकतो. या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीमुळे सभासदांना पूर्ण देशातील लोकांचे नेतृत्व करण्याची संधी प्राप्त होत असते.

- **सिनेटचे अधिकार व कार्ये :**

**१) कायदेविषयक अधिकार :**

अर्थ विधेयक सोडून अन्य कोणत्याही विषयावरील विधेयक प्रथमत: सिनेट मध्ये मांडता येते व त्यानंतर ते प्रतिनिग्रहाच्या मंजूरीसाठी जावू शकते. जर प्रतिनिधी गृहाने विदेयक प्रथम मंजूर करून सिनेटकडे पाठवले तर ते सिनेटच्या मंजूरी शिवाय विधेयकाचे कायद्यात रूपांतर होऊ शकत नाही. थोडक्यात दोन्ही सभागृहांच्या मंजूरी शिवाय विधेयकाचे कायद्यात रूपांतर होऊ शकत नाही. कायदे निर्मिती बाबत दोन्ही सभागृहांना समान

अधिकार दिले आहेत. तर दोन्ही सभागृहात विधेयकाला संमती देण्यावरून मतभेद झाले तर संयुक्त समिती निर्माण केली जाते. या समितीत दोन्ही सभागृहाचे प्रतिनिधी असतात. या समितीत विधेयका संबंधी एकमत झाले नाही. तर ते विधेयक रद्द मानले जाते.

**२) अर्थविषयक अधिकार :**

अर्थविषयक विधेयक हे सर्वप्रथम कनिष्ठ सभागृहात म्हणजे प्रतिनिधी गृहात मांडून मंजूर केले जाते. त्यानंतर ते सिनेटच्या मंजूरीसाठी पाठवले जाते. सिनेट हे विधेयक रद्द करू शकते किंवा त्यात दुरुस्त्या सूचवू शकते. त्यामुळे सिनेटच्या मंजूरीशिवाय अर्धविधेय मंजूर होऊ शकत नाही. थोड्यात आर्थिक बाबतीत दोन्ही सभागृहाना समान अधिकार आहेत असे दिसते.

**३) शासन विषयक अधिकर :**

हा सिनेटच्या सभागृहाला महत्त्वाचा व कनिष्ठ सभागृहाला नसलेला अधिकार आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्याचा अधिकार आहे. उदा. राजदूत, न्यायाधिश, उच्च अधिकारी इ. अधिकाऱ्यांच्या नेमणूका करताना अद्यक्षांने सिनेटचा सल्ला घेतला पाहिजे असा संकेत आहे. अध्यक्षाने नियुक्त केलेल्या पदाना जो पर्यंत सिनेट मान्यता देत नाही तोपर्यंत त्याने केलेली नियुक्ती अंतिम मानली जात नाही.

- **सिनेटचा शिष्टाचार :**

अध्यक्षाच्या या अधिकारा संबंधात सिनेटचा शिष्टाचार (Senatorial courtesy) ही प्रथा निर्माण झालेली आहे. या प्रथेनुसार अध्यक्ष हा नेमणूका करत असताना संबंधीत घटक राज्यातील दोन सिनेटर्स बरोबर अध्यक्ष चर्चा करतो. त्यामुळे ज्या घटक राज्यात अधिकाऱ्याची नेमणूक करावयाची आहे. त्यातील दोन प्रतिनिधींच्या नेमणूकांना मान्यता मिळाली म्हणजे संपूर्ण सभागृहाकडून त्या नियुक्तीचे समर्थन केले जाते. सिनेट कडून अनेक वेळा अध्यक्षाच्या निवडीला विरोध केला जातो. सिनेटचा विरोध असेल तर त्या नेमणूका होऊ शकत नाहीत. परंतु अधिकाऱ्यांच्या नेमणूका करत असताना ज्या घटक राज्यात नेमणूका करावयाच्या आहेत त्या घटक राज्याच्या सिनेटर्सना सल्लामसलत केल्यामुळे त्याच्या निवडीला विरोध होत नाही. यालाच 'सिनेटचा शिष्टाचार' असे म्हटले जाते.

**१) महाभियोगाचा अधिकार :**

राष्ट्राध्यक्ष, उपराष्ट्राध्यक्ष व अन्य वरिष्ठ पदावर काम करणाऱ्या व्यक्तीने गंभीर स्वरुपाचा गुन्हा किंवा घटनाबाह्य वर्तन केल्यास त्यांना काढून टाकण्यासाठी राज्य घटनेत महाभियोगाची पद्धत दिली आहे. यानुसार एखाद्या अधिकाऱ्यावर या महाभियोगाचा खटला चालवण्याचा अधिकार सिनेटला दिला आहे. सर्वप्रथम प्रतिनिधीगृह संबंधीत अधिकाऱ्यावर आरोप ठेवते या सिनेटमध्ये आरोपाची चौकशी केली जाते आणि २/३ बहूमताने हा आरोप मान्य केला तर संबंधीत अधिकारी बडतर्फ होतो.

**३) परराष्ट्राशी तह मंजूरीचा अधिकार :**

राष्ट्राध्यक्ष हा परराष्ट्राबरोबर अनेक प्रकारचे तह व करार करत असतो. या तहांना किंवा कराराना सिनेटची २/३ बहुमताने मंजूरी असावी लागते. त्याशिवाय हा कर किंवा तह अंमलात येवू शकत नाही. सिनेटचा हा अधिकार फार महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे राष्ट्राध्यक्षाला परराष्ट्राशी तह किंवा करार करताना सिनेट बरोबर सल्लामसलत करावी लागते. आणि त्याची संमतीही घ्यावी लागते. सिनेट हा अधिकाराचा वापर करून राष्ट्राध्यक्षावर नियंत्रण ठेवण्याचे काम करते.

**४) घटना दुरुस्तीचा अधिकार :**

घटना दुरुस्तीचे विधेयक सिनेटमध्ये प्रथम सादर केले जावू शकते व २/३ बहुमताने मंजूर केले जावू शकते. तर एखादी घटना दुरुस्ती विधेयक प्रतिनिधी गृहाने मंजूर करून सिनेटकडे पाठवल्यास या गृहाच्या २/३ बहूमताशिवाय घटना दुरुस्ती होऊ शकत नाही. थोडक्यात घटना दुरुस्तीबाबत दोन्ही सभागृहाना समान अधिकार आहेत.

- **उपराष्ट्रपतींच्या निवडी संबंधीचा अधिकार :**

निर्वाचन मंडळाने उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूका घेतल्यानंतर कोणत्याही उमेदवाराला स्पष्ट बहुमत न मिळाल्यास पहिल्या तिन उमेदवारापैकी एका उमेदवाराची निवड करण्याचा अधिकार सिनेटला दिलेला आहे.

- **सिनेटचे स्थान व महत्त्व :**

निर्वाचन मंडळाने उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूका घेतल्यानंतर कोणत्याही उमेदवाराला स्पष्ट बहुमत न मिळाल्यास पहिल्या तिन उमेदवारापैकी एका उमेदवाराची निवड करण्याचा अधिकार सिनेटला दिलेला आहे.

- **सिनेटचे स्थान व महत्त्व :**

संघराज्य शासन पद्धतीमध्ये घटक राज्यांचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह निर्माण केले जाते. यानुसार सिनेट हे घटक राज्याचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह तयार केले आहे. या सभागृहाला राज्यघटनेने प्रभावी व अधिकार संपन्न असे बनवले आहे. या सभागृहातील सभासद हे प्रौढ मताधिकार पद्धतीने निवडले जात असल्याने हे सभागृह देशातील लोकांच्या बरोबर ते घटक राज्याचे देखील प्रतिनिधीत्व करते असे म्हणावे लागते. या शिवाय या सभागृहाला प्रत्यक्ष अध्यक्षावर व त्यांच्या अधिकारांच्यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्याची सत्ता दिल्यामुळे या सभागृहाचे महत्त्व वाढले आहे. कायदेविषयक, आर्थिक व शासन विषयक अधिकारामध्ये या सभागृहाला प्रतिनिधीगृहा बरोबर अधिकार दिलेले आहेत. या शिवाय परराष्ट्र तह व करार आणि अधिकाऱ्यांच्या नेमणूकामध्ये राष्ट्राध्यक्षाला सिनेटच्या मंजूरीशिवाय अधिकाराचा वापर करता येत नाही. त्याकडे हे सभागृह अत्यंत कार्यक्षम बनले आहे. फिलिबस्टरिंगचा खास अधिकार सिनेटला असल्यामुळे या अधिकाराचा वापर सभागृहातील सभासद करत असतात. यामुळे या सभागृहाचे महत्त्व अधिक वाढलेले दिसते.

**२.२.३.१ वस्तुनिष्ठ प्रश्न.**

१) सिनेट या सभागृहाची सभासद संख्या ........... इतकी आहे.

(४३७, २५८, १००)

२) अमेरिकेत .......... घटकराज्ये आहते.

(५०, १००, यापैकी नाही)

३) सिनेटचा सभासद होण्यासाठी तो ........... इतकी वर्षे अमेरिकेचा नागरिक असला पाहिजे.

(५ वर्षे, १० वर्षे, ९ वर्षे)

४) सिनेट या सभागृहाचा कार्यकाळ ............ इतका आहे.

(५ वर्षे, २ वर्षे, कायमस्वरूपी)

५) सिनेटचा सभापती निवड ........... कडून होते.

(सभासदातून, पदसिद्ध, यापैकी नाही.)

**२.२.३ सिनेटचा प्रभाव :**

सिनेट हे सभागृह जगातील सर्व द्वितीय गृहामध्ये अत्यंत कार्यक्षम व प्रभावी ठरले आहे. या सभागृहाला दिलेल्या प्रत्यक्ष अधिकारामुळे हे सभागृह प्रतिनिधी गृहापेक्षा महत्त्वाचे बनले आहे. पुढील कारणांमुळे हे सभागृह प्रभावी ठरण्यास मदत झाली आहे.

**१) राज्यघटनेतील तरतुदी :**

राज्यघटनेची निर्मिती करत असताना त्यातील सभासदांना शासनाचा कोणताही एक विभाग हुकूमशाही प्रवृत्तीचा होवू नये म्हणून त्यानी सिनेटला राष्ट्राध्यक्षांच्या कार्यावय नियंत्रण ठेवण्याचे अधिकार दिले. तह व करार करताना राष्ट्राध्यक्षाला सिनेटची मान्यता द्यावी लागेल. ही राष्ट्रघटनेत तरतुद केली. घटना दुरुस्ती व विधेयक निर्मितीमध्ये पण सिनेटला समान अधिकार दिले. त्यामुळे इतर देशाप्रमाणे द्वितीय सभासद कमकूवत न बनता ते प्रभावी झालेले दिसते.

**२) सभासद संख्या :**

सिनेटमध्ये फक्त १०० सभासद आहेत. अमेरिकेत पन्नास घटक राज्ये आहेत. प्रत्येक घटक राज्याला त्या घटकाचे आकारमान किंवा लोकसंख्या यांचा विचार न करता प्रत्येकी दोन सभासद सभागृहात पाठवता येतात. ही सभासद संख्या मर्यादित व नियंत्रित स्वरूपाची असल्याने एखाद्या विषयावर सभागृहात विस्तृत व चांगल्या प्रकारची चर्चा होऊ शकते. या शिवाय सभापतीला सभागृहात नियंत्रण ठेवता येते. या मर्यादीत सभासद संख्येकडे सभागृहाचे महत्त्व वाढले आहे. याउलट प्रतिनिधी गृहात सभासद संख्या जास्त असल्यामुळे एखाद्या विषयावर सविस्तर आणि चांगली चर्चा होऊ शकत नाही.

### ३) भाषण स्वातंत्र्याचा अधिकार :

सिनेटच्या प्रत्येक सभासदाला सभागृहात आपले मत मांडण्यासाठी त्याना भाषण स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. या अधिकाराचा अमर्याद वापर करून सभासद आपला प्रभाव सभागृहामध्ये पाडतात याशिवाय प्रत्येक बाबीवर सविस्तर चर्चा होऊ शकते. या भाषण स्वातंत्र्यामुळे सिनेटच्या सभागृहाचे महत्त्व व प्रभाविपणा वाढला आहे.

### ४) निवडणूकीची पद्धत :

सिनेटच्या प्रत्येक सभासदाची निवड ही प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने होते. त्यामुळे ते प्रत्यक्ष लोकांच्याकडून निवडून येत असतात. प्रत्येक घटक राज्याला फक्त दोनच प्रतिनिधी सिनेट मध्ये पाठवण्याचा अधिकार असल्यामुळे अत्यंत प्रभावी व कार्यक्षम प्रतिनिधी या सभागृहात निवडून येत असतात. यामुळे सिनेट हे घटक राज्याबरोबर लोकांचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह बनले आहे. या पद्धतीमुळे सिनेटचा प्रभावीपणा वाढण्यास मदत झाली आहे.

### ५) कायमस्वरूपी सभागृह :

सिनेट हे कधिही बरखास्त न होणारे कायमस्वरूपी सभागृह आहे. या सभागृहाची अशी रचना केली आहे की, दर दोन वर्षांनी १/३ सभासद निवृत्त होतात व त्याजागी परत तेवढेच सभासद निवडले जातात. प्रत्येक सभासदाचा कालावधी हा ६ वर्षाचा आहे. याउलट प्रतिनिधी गृहाच्या सभासदाचा कार्यकाल फक्त दोन वर्षाचा आहे. त्यामुळे देशातील प्रभावी व कार्यक्षम राजकीय पक्षातील लोक या सभागृहाच्या निवडणूकीकडे आकर्षीत होतात. सहाजीकच या कालावधीमुळे व पक्षातील श्रेष्ठ व कार्यक्षम लोकांचा वा सभागृहात समावेश होतो. त्यामुळे सिनेट हे प्रतिनिधी गृहाच्या तुलनेत अधिक कार्यक्षम व प्रभावी बनले आहे.

### ६) अध्यक्षाच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार :

राज्यघटनेने अमेरिकेच्या अध्यक्षाला अमर्याद अधिकार दिले आहेत. अध्यक्षीय शासन पद्धतीमुळे अध्यक्षावर व त्याच्यार कार्यावर मर्यादा येत नाहीत. परंतु अध्यक्षाने गैरवर्तन केल्यास अथवा घटनाबाह्य वर्तन केल्यास व हुकूमशाही प्रवृत्तीने वागू लागल्यास त्याला काढून टाकण्यासाठी महाभियोगाचा अधिकार घटनेने कायदेमंडळाला दिला आहे. यानुसार प्रतिनिधी गृहाने अध्यक्षावर आरोप ठेवल्यास सिनेटला त्या आरोपाची चौकशी करून पदावरून (अध्यक्षाला) दूर करता येते. या पद्धतीमुळे प्रत्यक्ष अध्यक्षावर नियंत्रण ठेवण्याची सत्ता सिनेटला मिळाल्यामुळे हे सभागृह प्रभावी बनले आहे.

### ७) कायद्याची निर्मिती विचारपूर्वक होते :

एखाद्या विदेयकाचे कायद्यात रुपांतर होत असताना संबंधीत विधेयकावर सर्व दृष्टीकोनातून सविस्तर चर्चा होणे गरजेचे असते. प्रतिनिधी गृहाची सभासद संख्या ४३७ असल्याने या सभागृहात विधेयकावर चर्चा करणे अशक्य होऊ शकते. परिणामी या सभागृहातून ते विधेयक घाईने व विशेष चर्चा न होता मंजूर होवून

दुसऱ्या सभागृहाच्या मंजूरीसाठी जाऊ शकते. प्रतिनिधी गृहाने मंजूर केलेल्या विधेयकावर सविस्तर व स्पष्टपणे चर्चा होऊ शकते. कारण या सभागृहाची सभासद संख्या मर्यादित असल्याने व या सभागृहातील सभासद कार्यक्षम व अनुभवी असल्याने संबंधीत विधेयकावर सखोल चर्चा होऊ शकते व आवश्यक असणारे विधेयकच मंजूर होऊ शकते. त्यामुळे या सभागृहाला कायद्याची निर्मिती विचारपूर्वक करणारे सभागृह असे म्हटले आहे. यामुळे सिनेटचा प्रभावीपणा वाढण्यास मदत झाली आहे.

**८) परराष्ट्रीय अधिकार :**

परराष्ट्रात नेमले जाणारे वकील आणि प्रतिनिधी सिनेटच्या सहकार्याने व संमतीने नेमले जातात. तसेच परराष्ट्राशी केलेल्या तहाना व कराराना मान्यता देण्याचा अधिकार सिनेटला आहे. यामुळे सिनेट अध्ययांच्या परराष्ट्र विधेयक कार्यावर नियंत्रण ठेवते. हा अधिकार प्रतिनिधी गृहाला दिलेला नाही. त्यामुळे सिनेटचे महत्त्व व प्रभावीपणा वाढलेला आहे.

- **सिनेटचे स्थान :**

सिनेट हे जगातील सर्व द्वितीय सभागृहामध्ये अत्यंत प्रभावी व शक्तीमान असे सभागृह आहे. या सभागृहात घटक राज्यांचे समान प्रतिनिधीत्व आहे. याउलट इतर देशात वरिष्ठ सभागृहाना फारच कमी अधिकार दिले आहेत. सिनेटला इतर देशांच्या वरिष्ट सभागृहाच्या तुलनेत फार मोठे अधिकार दिलेले आहेत. अध्यक्षानी केलेल्या नेमणूकाना मान्यता देणे परराष्ट्रीय तह व कराराना मान्यता देणे या दोन अधिकारामुळे सिनेटचे महत्त्व प्रतिनिधी गृहापेक्षा महत्त्वाचे बनले आहे. लॉर्ड ब्राईस यांच्या मते, ''सिनेट हे सभागृह एका गुरुत्वाकर्षन शक्तीचे केंद्र बनवण्यात आले असून ते एक प्रकारे प्रतिनिधी सभेच्या लोक लहरीवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे. दुसऱ्या बाजूला अध्यक्षाच्या महत्त्वाकांक्षेला लगाम घालण्यात आला आहे.

सिनेटचा शिष्टाचार या पद्धतीमुळे सिनेटची सत्ता कमी झाल्यासारखी वाटत असली तरी इतर देशातील वरिष्ठ सभागृहापेक्षा निश्चित सिनेटला जास्त अधिकार आहेत. एकंदरीत सिनेटचे स्थान अमेरिकेच्या कायदेमंडळामध्ये महत्त्वाचे आहे.

**२.२.३.१ वस्तुनिष्ठ प्रश्न.**

१) सिनेट हे कायदे मंडळाचे ............. सभागृह आहे.

(वरिष्ठ, कनिष्ठ, यापैकी नाही)

२) सिनेटच्या ................. बहूमताशिवाय घटना दुरुस्ती होत नाही.

(१/२, २/३, ३/४)

३) सिनेटच्या सभासदांची निवड ............... पद्धतीने केली जाते.

(घटक राज्याच्या कायदेमंडळाकडून, वंशपरंपेने, प्रौढ मताधिकार)

४) सिनेटचा सभाग्रहात प्रत्येक घटक राज्यातून .............. प्रतिनिधी निवडून पाठवले जातात.

(दहा, पाच, दोन)

५) सिनेट हे ................. प्रतिनिधीत्व करते.

(देशातील लोकांचे, घटकराज्याचे, यापैकी नाही.)

**२.२.४ विधिनियमांची प्रक्रिया :**

कायदेमंडळाची निर्मिती ही प्रामुख्याने कायदे करण्यासाठी झालेली असते. कायद्याची निर्मिती ही कायदेमंडळाच्या सभासदाकडून तयार केली जावून ती सभागृहात बहूमताने मंजूर केली जाते. या पद्धतीला विधेयकाचे कायद्यात रूपांतर करणे असे म्हणतात. विधेयकाचे कायद्यात रुपांतर करत असताना प्रत्येक देशात वेगवेगळ्या पद्धती अस्तीत्वात आहेत. भारतामध्ये विधेयकाचे कायद्यात रूपांतर करत असताना पहिले वाचन, दुसरे वाचन, समिती अवस्था, तिसरे वाचन, सभागृहाची बहूमताने मंजूरी त्यानंतर दुसऱ्या सभागृहात देखील हिच पद्धत वापरून अंतीम राष्ट्रपतीची सही झाल्यानंतर विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. परंतु अमेरिकेत अध्यक्षीय शासन पद्धती असल्यामुळे यामध्ये थोडा भेद स्पष्ट दिसतो.

**१) विधेयक सभागृहात सादर करणे (पहिले वाचन) :**

अर्थ विषयक सोडून सर्व विधेयकाची सुरवात कोणत्याही सभागृहामध्ये होऊ शकते. हे विधेयक मांडण्यापूर्वी स्वत:च्या पक्षाची संमती घेवूनच सभागृहात विधेयक मांडण्यात येते. एकट्या सभासदाला विधेयक सभागृहात सादर करावयाचे असेल तर ते संबंधीत सभागृहाच्या अधिकाऱ्याच्या शेजारील पेटीमध्ये ते विधेयक टाकले जाते. अध्यक्षीय शासन पद्धतीमध्ये अध्यक्ष किंवा त्यांचे मंत्रीमंडळ हे कायदेमंहळाचे सदस्य नसल्याने त्यांना विधेयक निर्मिती मध्ये समाविष्ट करून घेतले जात नाही. संबंधीत सभागृहाच्या सभासदाने विधेयक पेटीमध्ये टाकल्यानंतर ते प्रविष्ठ झाले असे समजण्यात येते. आणि नंतर त्या विधेयकाची विषयवार वाटणी होते. आणि त्या विदेयकाना सरकारी सुचनेच्या स्वरूपात छापले जाते. विधेयक छापून झाले की, त्या विधेयकाचे पहिले वाचन झाले असे समजण्यात येते.

यानंतर दुसरे वाचन होण्यापूर्वी समितीकडे ते नियंत्रक विचारार्थ (अभ्यासासाठी) पाठवण्यात येते. समिती आवश्यक वाटल्यास त्या विधेयकाच्या हितसंबंधी सभासदांची मुलाखत होते. त्यानंतर सुधारणा करून किंवा न करता ते विधेयक समितीकडे पाठवले जाते. परंतु यापैकी अनेक विधेयके समितीकडे सादर केली जात नाहीत. या पद्धतीला 'पिजन होलिंग ए बिल' (Pigeon-holing a bill) असे म्हटले जाते. परंतु अशाप्रकारे सादर न केलेली विधेयके सभागृहात सादर करण्यात यावीत असा ठराव सभागृहाने बहूमताने मंजूर केल्यास समित्यांना ते सादर करावे लगतात.

सर्व साधारणपणे एका कॉंग्रेसपुढे दहा हजार ते बारा हजार विधेयके येतात. पहिल्या वाचनानंतर ती विधेयके समिती अवस्थेकडे पाठविली जातात.

- **समिती अवस्था :**

पहिल्या वाचनानंतर ते विधेयक समिती अवस्थेकडे पाठविले जाते. ते विधेयक ज्या विषयाशी संबंधीत असते त्या विषय समितीकडे ते विधेयक पाठवण्यात येते. विषय समितीत ते विधेयक गेल्यानंतर या विषयाचा उद्देश काय आहे आणि हे विधेयक राष्ट्राच्या दृष्टीने कितपत उपयुक्त आहे ते योग्य आहे का अयोग्य आहे हे समिती ठरवते आणि काही विधेयके ही अयोग्य आहेत असे वाटल्यास ती विधेयक येथेच रद्द केली जातात. अशा प्रकारे सुमारे ६५% विधेयके ही समिती अवस्थेत रद्द केली जातात. समितीने रद्द केलेली विधेयके काँग्रेसकडे पूर्ण विचारासाठी येऊ शकतात. परंतु सहसा कायदेमंडळ या अधिकाराचा वापर करत नाही. याबाबत विलमन असे म्हणतात की, ''समितीमध्येच काँग्रेस खरे कार्य करीत असते असे म्हणावे लागेल. काही विधेयके ही समितने मंजूर मान्य केलेली असतात. या विधेयकाच्या संबंधी समिती संपूर्ण माहिती गोळा करण्याचे काम करते. एखादे विधेयक ज्या सरकारी विधेयकाशी संबंधीत असेल त्याचा सल्ला घेण्यात येतो याच बरोबर तज्ञ लोकांचा सल्ला घेण्यात येतो. यानंतर प्रत्यक्ष समितीच्या बैठका आयोजित केल्या जातात. आणि या बैठकीत विधेयकाच्या प्रत्येक शब्दावर व वाक्यावर सविस्तरपणे चर्चा व विचार विनीमय काढण्यात येतो. सर्व माहिती गोळा केल्यानंतर आवश्यक त्या सुधारणा सुचवल्यानंतर त्या विधेयकासंबंधी संबंधी सर्वसाधारण रिपोर्ट तयार केला जातो. आणि ते विधेयक रिपोर्ट सहित कायदेमंडळाकडे पाठवले जाते. समितीमधील सर्व सभासदांचे त्या विधेयकाबाबत एकमत नसले तर समितीतील विरोधी सभासदांचा वेगळा रिपोर्ट तयार केला जातो व ते दोन्ही रिपोर्ट कायदे मंडळाकडे पाठवले जातात.

- **सुसुत्रीकरण आणि द्वितीय वाचन :**

समितीकडून विधेयक आल्यानंतर त्याचे पुढील चार सुचित विभाजन केले जाते. या सुचिना कॅलेंडर (Calender) असे संबोधले जाते.

**१) संघ कॅलेंडर :** ज्या विदेयकाचा संबध संपत्तीशी आहे अशा विधेयकाचा समावेश संघ सुचीमध्ये केला जातो.

**२) गृह कॅलेंडर :** अर्थ विधेयके सोडून जेवढी विधेयके असतील ती सर्व विधेयके गृह कॅलेंडर मध्ये त्यांचा समावेश केला जातो.

**३) सहमती कॅलेंडर :** गृह कॅलेंडरच्या ज्या विधेयकाचे दोन्ही सभागृहात, कमत होण्याची शक्यता वाटते अशा विधेयकांचा या सूचीमध्ये समावेश केला जातो. आणि ज्या विधेकाना कमीत कमी विरोध होण्याची शक्यता असेल अशा प्रकारच्या विधेयकांचा समावेश या सुचिमध्ये केला जातो.

**४) खाजगी कॅलेंडर :** ज्या विधेयकांचा संबंध देशातील काही व्यक्तींशी अथवा विशेष संस्थांशी संबंधीत असतील व त्यांचा समावेश या सूचिमध्ये केला जातो.

- **दुसरे वाचन :**

दुसऱ्या वाचनासाठी जी विधेयके सभागृहात चर्चेसाठी घेतली जातात त्यावेळी वाचन करत असताना

विधेयकावर कलमवार चर्चा होते. या वाचनात आवश्यक त्या दुरुस्त्या विधेयकात केल्या जावू शकतात. कधी कधी या विधेयकावर परत विचार व्हावा अशी मागणी करण्यात येते. ही मागणी झाल्यास विधेयकावर चर्चा केली जाते आणि मतदान घेतले जाते.

- **तिसरे वाचन :**

हे वाचन फारसे महत्त्वाचे नसते. यावेळी फक्त शिर्षकाचे वाचन केले जाते. तिसऱ्यात वाचनानंतर विधेयकाला मंजूरी मिळाल्यानंतर ते दुसऱ्या सभागृहाकडे पाठवण्यात येते.

- **दुसरे सभागृह :**

दुसऱ्या सभागृहात देखील विधेयकावर पहिले वाचन, समिती अवस्था, द्वितीय वाचन व तृतिय वाचन ह्या अवस्थेकडून विधेयकाला जावे लागते. दुसऱ्या सभागृहात देखील हे विदेयक बहुमताने मंजूर झाले तर ते राष्ट्राध्यक्षांच्या सहीसाठी पाठवले जाते.

- **राष्ट्राध्यक्षांची स्वाक्षरी :**

कायदेमंडळाने मंजूर केलेल्या प्रत्येक विधेयकावर अध्यक्षांची स्वाक्षरी झाल्यानंतर त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते. कायदेमंहळाने मंजूर करून विधेयके अध्यक्षांच्या सहीसाठी पाठवल्यानंतर त्याला दहा दिवसाच्या आत अध्यक्षांनी ते विधेयक संमत अथवा नासंमत करावे लागते. अध्यक्षांनी विधेयकाला संमती दिली तर त्याचे कायदद्यात रुपांतर होते. अध्यक्षाने ते विधेयम नामंजूर केले तर ते विधेयक परत कायदे मंडळाकडे येते आणि कायदेमंहळाने तेच विधेयक परत २/३ बहुमताने पार केले तर अध्यक्षाला त्या विधेयकाला मान्यता द्यावीच लागते.

- **मतभेद दूर करण्याची पद्धत :**

एखाद्या विधेयकाबाबत दोन्ही सभागृहाच्या सभागृहातील सभासदांची मिळून एक संयुक्त समिती निर्माण करण्यात येते. या समितीमध्ये प्रत्येक सभागृहातून पंधरा-पंधरा सभासद घेण्यात येतात व या समितीत निर्माण झालेले मतभेद दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. आणि दोन्ही सभागृहाना मान्य होतील अशा सुधारणा व बदल विधेयकात केल्या जातात. त्यानंतर त्या विधेयकाला दोन्ही सभागृहात संमती घेण्यात येते. संमती मिळाल्यानंतर ते विधेयक राष्ट्राध्यक्षाच्या सहीसाठी पाठवले जाते.

वरील प्रकारे विधेयकाचे कायद्यात रूपांतर करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाते. अमेरिकेच्या कायदेमंडळाला दोन्ही सभागृहात विधेयक निर्मीती मध्ये समान अधिकार दिलेला आहे. इतर देशांतील वरिष्ठ सभागृहाना विधेयक निर्मिती मध्ये असे अधिकार दिलेले नाहीत. उदा. भारत व इंग्लंड या देशातील वरिष्ठ सभागृहाना कायदेविषयक अधिकार फारच मर्यादित असलेचे दिसतात.

**२.४.१.१ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

१) ............. विषयक विधेयके सर्वप्रथम कनिष्ठ सभागृहामध्ये मांडावी लागतात.
(अर्थ, गृह, सामान्य)

२) प्रतिनिधी सभेच्या अधिकाऱ्याला .................. असे म्हणतात.

(सभापती, क्लार्क, सेक्रेटरी)

३) सिनेटच्या सभेच्या अधिकाऱ्याला ............. असे म्हणतात.

(सेक्रेटरी, सभापती, क्लार्क)

४) ज्या विधेयकाचा संबंध संपत्तीशी असतो अशा विधेयकाचा समेवाश ............ सुचिमध्ये केला जातो.

(गृह, सहमती, संघ)

५) ज्या विधेयकाचा संबंध देशातील काही व्यक्ती किंवा संस्था यांच्याशी संबंधीत असतो अशा विधेयकाचा समावेश ............. सुचींमध्ये केला जातो.

(संघ, गृह, खाजगी)

६) काँग्रेसने मंजूर केलेले विधेयक .................. दिवसाच्या ात राष्ट्राध्यक्षाने मंजूर करावे लागते.

(दहा, पाच, विस)

७) विधेयक पहिल्या वाचनानंतर .............. साठी जाते.

(दुसऱ्या वाचनासाठी, समिती अवस्थे, यापैकी नाही.)

**२.२.५ कायदेमंडळातील समित्या :**

लोककल्याणकारी राज्यामुळे कायदेमंडळाची कार्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. त्यामुळे कायदेमंडळाच्या कामात मदत करण्यासाठी निरनिराळ्या समित्या निर्माण करण्याची पद्धत अनेक देशात निर्माण झालेली दिसते. अमेरिकेत सुरक्षा समिती पद्धतीचा विकास झालेला दिसतो. अध्यक्षीय शासन पद्धतीमुळे अमेरिकन समित्यांना फार महत्त्वाचे अधिकार मिळालेले दिसतात. इतर संसदीय शासन पद्धतीत पंतप्रधान व त्यांचे मंत्रीमंडळ हे कायदेमंडळाचे सभासद असतात. त्यामुळे विधेयके निर्माण करणे व इतर कार्यामध्ये कायदेमंडळात त्यांचा समावेश असल्यामुळे त्यांचा प्रभाव कज्ञायदेमंडळामध्ये पडलेला दिसतो. परंतु अध्यक्षीय शासन पद्धतीमध्ये अध्यक्ष व मंत्रीमंडळ यांचा कायदेमंडळाशी काहीही संबंध नसतो. त्यामुळे चांगल्या प्रकारची विधेयके तयार करण्याची जबाबदारी कायदेमंडळावर येते. कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहाची सभासद संख्या लक्षात घेता कोणतेही कार्य व्यवस्थीत होण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे अनेक कामे ही समितीकडे सोपवली जातात. विधेयकाच्या निर्मितीमध्ये समितीचे कार्य महत्त्वाचे असते. त्यामुळे अमेरिकेतील या समित्यांना सभागृहाचे डोळे, कान व डोके समजले जाते.

● **समित्यांची रचना :**

**१) स्थायी समित्या :**

प्रतिनिधी सभेच्या सभागृहात समित्यांची संस्था विस आहे. तर सिनेट या सभागृहाच्या समित्यांची संख्या सोळा आहे. या समितीतील सभासदांची केवळ औपचारिक रित्या सभागृह करत असले तरी प्रत्येक पक्ष आपल्या पक्षाच्या बैठकीत कोणत्या सभासदांची निवड करावयाची हे निश्चित करत असतो. आणि ज्यावेळी सभागृहापुढे ज्या सभासदांची नावे येतात. त्यांची निवड करण्याचे काम सभागृह करते. प्रत्येक पक्ष आपले संख्याबळ किती सभागृहात आहे याचा विचार करून आपले किती व कोणते सभासद समितीत असावेत हे ठरवत असतो. अमेरिकेतील स्थायी समित्याच विषयवार निर्माण केलेल्या असतात. उदा. अनुदान समिती, कृषी समिती, बँक समिती इत्यादी समित्या विषयवार अमेरिकेत तयार केलेल्या असतात.

**२) विशेष समित्या :**

अशा प्रकारच्या समित्या विशेष उद्देश पूर्ण करण्याकरता निर्माण केल्या जातात. एखादे विशेष विधेयक असेल तर त्या मतावर चर्चा केली जाते. चर्चा पूर्ण झाल्यानंतर अशा समित्या रद्द केल्या जातात. अमेरिकेतील समित्या या विषयवारच केलेल्या असतात. त्यामुळे अगदी क्वचित वेळेला अशा विशेष समित्या नेमल्या जातात.

**सकल समिती :** या प्रकारच्या समितीत सभागृहाच्या सर्व सभासदांचा समावेश केला जातो. एखाद्या विधेयकावर विचार विनिमय करण्यासाठी या सभागृहामध्ये परिवर्तन सकल सभा समिती करण्यात यावे अशी सुचना सभागृहातील कोणताही सभासद करू शकतो. सूचना मंजूर झाल्यास सभासदाचे रूपांतर सकल समितीत होते. अशावेळी सभागृहाचा सभापती अध्यक्ष सथानावर राहू शकत नाही. सभापतीची जागा दुसरा सभापती घेतो. ही सकलसभा सुरू करण्यासाठी १०० सभासद ही गणसंख्या सांगीतली आहे. या समितीस प्रत्येक सभासदाला पाच मिनीटे बोलता येते. सभागृहाच्या समितीने एखाद्या सभासदाला जास्त काळ बोलता येते. या समितीच्या वेळी सभागृहाचे नियम लागू करता येत नाहीत. समितीचे कामकाज संपल्यानंतर परत सभागृहात रूपांतर करण्यात येते आणि सभापती परत अध्यक्ष पदावर येतात. सकल सभा समितीचा अध्यक्ष सभागृहाला अहवाल सादर करतो. अर्थ विषयक विधेयके आणि महत्त्वाची सामान्य विदेयके यावर चर्चा करण्यासाठी अशा प्रकारची समिती निर्माण केली जाते.

**नियम समिती :** ही समिती फार महत्त्वाची समजली जाते. या समितीत १५ सभासद असतात. सभागृहाच्या कार्य पद्धतीची रूपरेशा ठरवण्याचा अधिकार या समितीला आहे. एखादे विधेयक सभागृहाकडे परत विचारासाठी पाठवायचे की नाही हे ठरवण्याचा अधिकार समितीला आहे. प्रत्येक समिती त्यांच्याकडे आलेल्या विधेयकावर चर्चा करून एक रिपोर्ट तयार करते आणि तो रिपोर्ट आणि विधेयक या समितीकडे पाठवून देते या विशेष अधिकारामुळे या समितीला फार महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**संयुक्त समिती :** दोन्ही सभागृहात विधेयकाच्या बाबतीत मतभेद झाल्यास हे मतभेद दूर करण्यासाठी दोन्ही सभागृहातील सभासदांची समिती निर्माण केली जाते. या समितीत दोन्ही सभागृहातून १५-१५ सभासद

घेतले जातात आणि ज्या विधेयका बाबतीत मतभेद असतील तर तेवढीच विधेयके चर्चेला घेतली जातात. आणि मतभेद मिटवण्याचा प्रयत्न केला जातो. मतभेद जर दूर झाले नाहीत तर ते रद्द केले जातात. चर्चा झाल्यानंतर ही समिती लगेच बरखास्त करण्यात येते. या समित्यांच्या बैठकी बाबत गुप्तता राखील जाते.

**धोरण समिती :** प्रतिनिधीगृह आणि सिनेट या सभागृहाकडून आलेल्या असंख्य विधेयकामधून ज्या विधेयकाला पाठींबा मिळेल अशी विधेयके बाजूला काढण्याचे कार्य ही समिती करत असते. या विधेयका संबंधी विरोधी पक्षाबरोबरही ही समिती विचार विनिमय करते. बहुमतवाल्या पक्षाचा नेता या समितीचा अध्यक्ष असतो.

अमेरिकन समित्या या निर्णय घेणारी महत्त्वाची केंद्रे बनली आहेत. समित्यांनी दिलेले बहुतेक निर्णय सभासगृहाकडून मान्य केली जातात. यामध्ये विशेषत: सरकारी खर्च विषयक विधेयकाना फार महत्त्व दिले जाते. तसेच सरकारी उत्पन्न विषयक समिती ही एक महत्त्वाची समिती आहे. वैधानिक प्रक्रियेत या सर्व समित्या महत्त्वाची भूमिका बजावत असतात. अमेरिकेच्या समितीने थोडे फार दोष दिसत असले तरी ही समिती पद्धत येथे यशस्वी झालेली दिसते.

**२.२.५.१ वस्तुनिष्ठ प्रश्न :**

१) प्रतिनिधी सभेच्या सभागृहात समित्यांची संख्या ............ आहे.
(विस, सोळा, दहा)

२) सिनेट या सभागृहाच्या समितीची संख्या ............. आहे.
(सोळा, दहा, पाच)

३) सभागृहाच्या सर्व सभासदांचा समावेश .............. समितीत केला जातो.
(विशेष, नियम, सकल)

४) सभागृहाच्या कार्यपद्धतीची रुपरेशा ठरवण्याचा अधिकार ............ मितीला आहे.
(सकल, नियम, संयुक्त)

५) दोन्ही सभागृहात विधेयकाच्या बाबतीत मतभेद झाल्यास हे मतभेद दूर करण्यासाठी ........... समिती नेमली जाते.
(सकल, संयुक्त, यापैकी नाही.)

६) कायदेमंडळाच्या सभागृहाकडून आलेल्या असंख्य विधेयकापासून ज्या विधेयकाला बहुमताचा पाठींबा मिळेल असे वाटते अशी विदेयके बाजूला काढण्याचे कार्य ........... समिती करते.
(तकडे, ख्याई, धोरण)

## २.३ सारांश :

- **प्रतिनिधी गृहाची रचना कार्ये आणि अधिकार :**

प्रतिनिधी गृह हे काँग्रेसचे कनिष्ठ सभागृह आहे. या सभागृहाचा कालावधी दोन वर्षांचा आहे. या सभागृहाच्या सभासदांची निवड प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने केली जाते. सभासद निवडीसाठी लोकसंख्येच्या आधारावर मतदार संघाची निर्मिती केली जाते. या सभागृहाची सभासद संख्या ४३७ इतकी आहे. या सभागृहाचा सभासद म्हणून निवडून येण्यासाठी उमेदवार म्हणून त्याकडे पुढील पात्रता असावी लागते. तो अमेरिकेचा नागरिक असावा, त्याच्या वयाची २५ वर्षे पूर्ण असावीत. तो संबंधीत घटकराज्याचा रहिवाशी असावा व निवडणूकी पूर्वी तो सात वर्षे अमेरिकाचा नागरीक असावी.

या सभागृहाचे अधिवेशन वर्षातून एकदा भरवले जाते. या सभागृहाचे कामकाज चालवण्यासाठी किमान निम्म्या पेक्षा जास्त सभासद सभागृहात उपस्थित असावे लगातात. या सभागृहातील प्रत्येक सभासदाला सभागृहात आपली मते स्पष्टपणे मांडण्यासां काही विशेष अधिकार दिलेले आहेत.

या सभागृहाचे कामकाज चालवणारी एका सभासदाची सभापती म्हणून निवड केली जाते. तो सभागृहावर नियंत्रण ठेवून सभागृहाचे कामकाज शांततेन पार पाडण्यासाठी आवश्यक त्या अधिकारांचा वापर करत असतो. एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास तो आपले निर्णायक मत देवू शकतो.

या सभागृहाला कायद्याने पुढील प्रकारचे अधिकार दिले आहेत. विधेयक निर्मितीमध्ये या सभागृहाच्या बहूमताच्या मंजूरी शिवाय ते दुसऱ्या सभागृहाकडे पाठवले जात नाही. आर्थिक विधेयक सर्व प्रथम हे सभासद मंजूर करते व मंजूरीसाठी दुसऱ्या सभागृहाकडे पाठवले जाते. घटना दुरुस्तीसाठी या सभागृहाच्या २/३ बहूमताची आवश्यकता असते.

सभागृह देशातील लोकांचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह मानले जाते. अधिकारांच्या बाबतीत हे सभासद सिनेट पेक्षा कमी महत्त्वाचे समजले जाते.

## २.२ सिनेटची रचना, कार्ये व अधिकार :

सिनेट हे घटकराज्याचे प्रतिनिधीत्व करणारे द्वितीय सभागृह आहे. हे कायम स्वरुपी सभागृह असून ते कधीही बरखास्त हाते नाही. सिनेटची रचना अशी केली आहे की, प्रत्येक घटकातून २ प्रतिनिधी असे १०० प्रतिनिधी सभागृहात असतात.

या सभागृहाच्या निवडणूकीस उभे रहाणाऱ्या उमेदवाराची पात्रता पुढीलप्रमाणे आहे. त्याच्या वयाची ३० वर्षे पूर्ण असली पाहिजेत. निवडणूकीपूर्वी तो नऊ वर्षे अमेरिकेचा नागरिक असला पाहिजे. ज्या घटक राज्यातून निवडणूक लढवणार आहे त्या घटकाच्या तो रहिवाशी पाहिजे आणि तो सरकारी नोकर नसावा.

या सभागृहाचा सभापती पदसिद्ध असतो. त्याचे कार्य म्हणजे सभागृहात शांतता, सुव्यवस्था राखणे, सभासदांच्या विशेष अधिकारांचे रक्षण करणे, समान मतावर (Casting vote) देणे व विधेयक निर्मितीची

प्रक्रिया पार पाडणे इ.

सिनेटला फार व्यापक प्रमाणावर अधिकार दिले आहेत. अर्थ विषयक विधेयक सोडून कोणतेही विधेयक प्रथम या सभागृहात येवू शकते. सिनेटच्या बहुमताशिवाय कोणतेही विधेयकाचे कायद्यात रुपांतर होऊ शकत नाही. आर्थिक विधेयकात बदल व दुरुस्ती सुचवण्याचा अधिकार सिनेटला आहे. याशिवाय त्याला शासनावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्याची सत्ता मिळाली आहे. राष्ट्राध्यक्षाला अधिकाऱ्यांच्या नेमणूका करत असताना व परराष्ट्र धोरण विषयक तह व करार परत असताना सिनेटच्या संमती शिवाय हा अधिकार वापरता येत नाही. याशिवाय घटनादुरुस्ती, महाभियोगाचा खटला चालवणे, उपराष्ट्रपतीची प्रसंगी निवड करणे हे अधिकार या सभागृहाला आहेत.

सिनेटचे स्थान हे कनिष्ठ सभागृहापेक्षा महत्त्वाचे बनवले आहे. कारण संघराज्य पद्धतीमध्ये घटक राज्याचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सभासदाला महत्त्वाचे स्थान अमेरिकन राज्यघटनेने दिले आहे.

**२.३ सिनेटचा प्रभावीपणा :**

सिनेट हे जगातील द्वितीय सभागृहामध्ये अत्यंत प्रभावी सभागृह बनले आहे. या सभागृहाचे सभासद लोकांच्याकडून प्रौढ मताधिकार पद्धतीने निवडले जात असल्याने हे सभागृह घटकराज्याबरोबर लोकांचेही प्रतिनिधीत्व करते असे म्हटले जाते.

या सभागृहाचा प्रभावीपणा वाढण्यास पुढील भाषांच्यामुळे मदत झाली आहे. सभासदांची मर्यादित संख्या, भाषण स्वातंत्र्याचा सभासदांना मिळालेला अमर्याद अधिकार, निवडीची पद्धत, अध्यक्षांच्या कार्यावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्याचा राज्य घटनेने दिलेला अधिकार यामुळे हे सभागृह प्रभावी बनले आहे.

- **विधीनियमांची प्रक्रिया :**

कायदेमंडळाचे महत्त्वाचे कार्य म्हणजे कायदे करणे होय. कायद्यांची निर्मिती करताना विधेयकाचे कायद्यात रुपांतर करावे लागले. यासाठी ते विधेयक पुढील प्रक्रियेतून जात असते. पहिले वाचन, समिती अवस्था, दुसरे वाचन, तिसरे वाचन, दुसऱ्या सभागृहाची संमती आणि अध्यक्षाची स्वाक्षरी या प्रकारे विधेयकाचे कायद्यात रुपांतर होत नसेल तर दोन्ही सभागृहाच्या सभासदांची संयुक्त समिती नेमूण विधेयकावर निर्णय घेतला जातो.

- **कायदेमंडळातील समित्या :**

आधुनिक काळामध्ये कायदेमंडळाच्या कामाचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे कायदेमंडळाच्या कामात मदत करण्यासाठी निनिराळ्या समित्या तयार केल्या जातात.

यामध्ये स्थायी समिती महत्त्वाची असते. या समितीची रचना विषयवार केलेली असते. यानंतर संपूर्ण सभागृहाच्या सभासदांची सकल समिती निर्माण केलेली असते. एखाद्या विधेयकावर सविस्तरपणे चर्चा करण्यासाठी ही समिती नेमलेली असते. सामान्यता अर्थ विषयक व महत्त्वाची सामान्य विधेयके यावर चर्चा

करण्यासाठी अशी समिती निर्माण केली जाते. सभागृहाच्या कामकाजाची रुपरेषा ठरवण्यासाठी नियम समिती निर्माण केलेली असते. एखादे विधेयक सभागृहामध्ये परत चर्चेसाठी पाठवावे किंवा नाही याबाबत निर्णय घेण्याचे कार्य ही समिती करते. एखाद्या विधेयकाबाबत मतभेद असेल तर दोन्ही सभागृहाच्या सभासदांची संयुक्त समिती निर्माण केली जाते. एखाद्या विधेयकाला बहुमताने पाठींबा मिळू शकेल अशी विधेयके बाजूला काढण्याचे काम धोरण समिती करत असते.

## २.४ पारिषाषिक शब्द, शब्दार्थ :

**१) पदसिद्ध** (Ex-Officio) : एखादे पद प्रत्यक्ष निवडणूकीने न भरता ते घटनात्मक तरतुदीनुसार केले जाते याला पदसिद्ध असे म्हणतात.

**२) संघराज्य** (Federation) **:** एखाद्या देशातील शासन व्यवस्थेत केंद्र सरकार व घटकराज्ये अशी द्विदल शासन पद्धती तयार केलेली असते. आणि अधिकार क्षेत्राची विभागणी केंद्र व घटकराज्यामध्ये केलेली असते त्या शासन पद्धतीला संघराज्य म्हणतात.

**३) निर्णायक मत** (Casting vote) **:** एखाद्या प्रस्तावावर किंवा विधेयकावर समान मते पडल्यास बहुमताने निर्णय होण्यासां सभापतीला आपले मत देण्याचा अधिकार म्हणजे निर्णायक मत होय.

**४) विशेष अधिकार** (Privileges) **:** कायदेमंडळाच्या प्रत्येक सभासदाला सभागृहात अपाली मते स्पष्ट करण्यासाठी राज्यघटनेने त्यांना दिलेला अधिकार म्हणजे विशेष अधिकार होय.

**५) गणपूर्ती** (Quorum) : एखाद्या सभागृहाचे कामकाज सुरू करण्यासाठी आवश्यक असणारी संख्या म्हणजे गणपूर्ती होय.

**६) प्राभियोग (महाभियोग)** (Impeachment) : एखाद्या महत्वाच्या पदावरील व्यक्तीला काढून टाकण्यासाठी (त्याने गैरवर्तन केल्यास) कायदेमंडळाला राज्य घटनेने दिलेला अधिकार म्हणजे प्राभियोग होय.

**७) जेरिमॅड्रींग** (Jerry Mandering) : लोकसंख्येच्या आधारावर प्रतिनिधीची निवड करत असताना सत्ताधारी पक्ष आपल्याच पक्षाचे लोक जास्तीत जास्त कसे निवडून येतील हे पाहून मतदार संघांची निर्मिती करणे म्हणजे जेरिमॅड्रींग होय.

**८) फिलिबस्टरींग** (Filibystering) : सिनेटच्या सभागृहाच्या सभासदाला सभागृहात आपले मत व्यक्त करण्यासाठी अमर्याद भाषण स्वातंत्र्याचा अधिकार आहे. जर एखादा सभासद या अधिकाराचा वापर करून सभागृहात अडथळा आणत असेल तर त्याला फिलिबस्टरिंग म्हणतात.

**९) सिनेटचा शिष्टाचार** (Senatorial courtesy) : अध्यक्ष, अधिकाऱ्याच्या नेमणूका करताना फक्त घटकराज्यातील दोन सिनेटर्स्‌चा सल्ला होतो हा सल्ला म्हणजे संपूर्ण सभागृहाचा समजला जातो. याला सिनेटचा शिष्टाचार म्हणतात.

**१०) पिजन होलींग ए बिल** (Pigeion-holing a bill) : समिती अवस्थेत विधेयक आल्यानंतर परत सादर केली जात नाहीत. या प्रथेला पिजन होलींग ए बिल म्हणतात.

## २.५ वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे :

| | | | |
|---|---|---|---|
| **२.१** | १) काँग्रेस | २) प्रतिनिधी गृह | ३) ४३७ |
| | ४) दोन | ५) २५ वर्षे पूर्ण | ६) १८ वर्षे पूर्ण |
| | ७) निम्म्यापेक्षा जास्त | ८) २/३ | ९) सात |
| | १०) कनिष्ठ. | | |
| **२.२** | १) १०० | २) ५० | ३) ९ वर्षे |
| | ४) कायम स्वरूपी | ५) पदसिद्ध | |
| **२.३** | १) वरिष्ठ | २) २/३ | ३) सेक्रेटरी |
| | ४) संघ | ५) खाजगी | ६) दहा |
| | ७) | समिती अवस्था. | |
| **२.४** | १) २० | २) सोळा | ३) सकल |
| | ४) नियम | ५) संयुक्त | ६) धोरण |

## २.६ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या.**

१) प्रतिनिधी गृहाची रचना, कार्ये व अधिकार स्पष्ट करा.

२) सिनेट या सभागृहाची रचना, कार्ये व अधिकार यावर सविस्तर चर्चा करा?

३) अमेरिकेत सिनेटचा प्रभावीपणा वाढण्याची कारणे सविस्तरपणे विषद करा?

४) विधेयकाचे कायद्यात रुपांतर होण्याची प्रक्रिया सविस्तरपणे विषद करा?

५) अमेरिकेच्या कायदेमंडळामध्ये समित्यांची आवश्यकता स्पष्ट करून त्या समित्यांची कार्ये सविस्तर पणे लिहा.

**ब) खालील प्रश्नांची थोड्यात उत्तरे लिहा.**

१) प्रतिनिधी सभागृहाचे अधिकार

२) प्रतिनिधी सभागृहाचा सभापती

३) सिनेटची कार्ये व अधिकार

४) सिनेटर्स, संबंधीचा शिष्टाचार

५) फिलिबस्टरींग

६) समिती अवस्था

७) संयुक्त समिती.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) प्राचार्य डॉ. विजय नलावडे व प्रा. विश्वनाथ पवार (डिसें. २००५) 'अमेरिकेचा इतिहास' फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२) रा. ज. लोटे (जून २०११) 'तुलनात्मक शासन आणि राजकारण', पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

३) दि. वा. इन्दापवार, प्रा. नलिनी कानेटकर (१९७९) 'निवडक राजकीय व्यवस्था३, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

४) प्रा. बी. बी. पाटील, (डिसें. २०१२) 'अमेरिका आणि फ्रान्सची राज्यघटना', फडके प्रकाशन, कोलपूर.

५) प्रा. प्र. ग. मुळे (१९८८) 'निवडक आधुनिक राजकीय व्यवस्था', विद्या प्रकाशन, नागपूर.

६) चंद्रशेखर य. शास्त्री (१९७३) 'प्रमुख देशांची शासन प्रणाली', पायल प्रकाशन, नागपूर.


❖ ❖ ❖

## घटक – ३

# कार्यकारी मंडळ – रचना व कार्ये

**घटक संरचना :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ अमेरिकन राष्ट्राध्यक्ष

 ३.२.२ अमेरिकन उपराष्ट्राध्यक्ष

 ३.२.३ अमेरिकन अध्यक्षीय मंडळ (सचिव मंडळ)

३.३ सारांश

३.४ पारिषाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं: अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठीचे प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठीची संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- अमेरिकन राष्ट्राध्यक्षाची निवडणूक, अधिकार, कार्ये आणि स्थान समजून घेता येईल.
- अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षांची निवड, अधिकार, कार्ये व स्थान समजून घेता येईल.
- अमेरिकन अध्यक्षीय मंत्रीमंडळाची रचना, निवड, अधिकार व कार्ये स्पष्ट करता येतील.

## ३:१ प्रस्तावना :

आधुनिक शासनाच्या कार्यात झालेली वाढ आणि जनतेच्या प्रती सरकारचे उत्तरदायित्व या कारणामुळे शासनाच्या तीन शाखा निर्माण झाल्या. उदा. कायदे करणारे कायदेमंडळ, कायद्यांची अंमलबजावणी करणारे कार्यकारी मंडळ आणि न्यायदान करणारे न्यायमंडळ होय. लोकशाही शासनपद्धतीत हे तिन्ही विभाग महत्त्वाचे असतात. अमेरिकन राज्यघटनेने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. त्यानुसार अमेरिकन शासनात

हे तिन्ही विभाग महत्त्वपूर्ण आहेत. अमेरिकेच्या राज्यघटनेने सत्ताविभाजनाच्या तत्त्वाचा अवलंब केला आहे. त्यानुसार कायदेविषक सत्ता, कार्यकारी सत्ता आणि न्यायदानविषयक सत्ता या शासनाच्या प्रमुख तीन सत्ता परस्परांपासून स्वतंत्र ठेवल्या आहेत. म्हणजेच त्यांची जबाबदारी वेगवेगळ्या विभागांच्या हाती सोपविण्याचा प्रयत्न अमेरिकन घटनाकारांनी केला आहे. शासनसंस्थेचे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ हे तिन्ही विभाग आपआपल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र असतील. मात्र यातील कोणताही विभाग इतरांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करणार नाही. अशाप्रकारे व्यवस्था राज्यघटनेत करण्यात आली आहे. अशारितीने प्रत्येक विभाग आपल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र व सर्वश्रेष्ठ असतो. परंतु त्यांच्याकडून सत्तेचा गैरवापर होऊ नये म्हणून त्यांचे एकमेकांवर नियंत्रण ठेवण्याची 'नियंत्रण व संतुलनाची पद्धती' ही राज्यघटनेत सांगितली आहे. त्यामुळे शासनाचा कोणताही विभाग शक्तिशाली किंवा वरचढ होत नाही. तसेच अमेरिकन राज्यघटनेने अध्यक्षीय शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. त्यानुसार शासनाच्या इतर दोन विभागापेक्षा त्याचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वपूर्ण असते. राज्यघटनेनेच राष्ट्राध्यक्ष पद प्रभावशाली निर्माण केले असल्यामुळे आज जगातील सर्वात अधिक सामर्थ्यशाली पद म्हणून ओळखले जाते. अशाप्रकारे वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या अमेरिकन शासन पद्धतीतील कार्यकारी मंडळाची रचना, अधिकार, कार्ये व घटनात्मक स्थान या संबंधीचा सविस्तर अभ्यास करणे आवश्यक ठरते.

## ३.२ विषय विवेचन :

अमेरिकेच्या कार्यकारी मंडळात १) राष्ट्राध्यक्ष, २) उपराष्ट्राध्यक्ष व ३) अध्यक्षीय मंत्रीमंडळ हे महत्त्वाचे तीन घटक आहेत.

### ३.२.१ अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष :

अमेरिकेत अध्यक्षीय शासन पद्धती असल्यामुळे राष्ट्राध्यक्ष हा अमेरिकेचा घटनात्मक व वास्तव कार्यकारी प्रमुख आहे. इंग्लंडच्या राजाप्रमाणे ते नाममात्र शासक नसून त्याला राष्ट्रप्रमुख आणि संघराज्याचा कार्यकारी प्रमुख अशा दुहेरी भूमिका पार पाडावी लागते. म्हणजेच राष्ट्रप्रमुख व शासनप्रमुख म्हणून राष्ट्राध्यक्षाला राज्य घटनेने व्यापक सत्ता दिलेली आहे. तो आपल्या अधिकार क्षेत्रात सर्वश्रेष्ठ समजला जातो. कार्यकारी मंडळाची निर्णायक सत्ता एकट्या राष्ट्राध्यक्षाला प्राप्त झालेली आहे. अध्यक्षीय शासन पद्धतीमुळे अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष हा एकच कार्यकारी प्रमुख असतो. इंग्लंडमधील राजा व पंतप्रदान या दोन्ही पदाना असणारी सत्ता अमेरिकेतील एकट्या राष्ट्राध्यक्षाला प्राप्त झालेली आहे. त्याला राज्य कारभारात मदत करण्यासाठी मंत्रिमंडळ असते. परंतु मंत्रीमंडळाची भूमिका फक्त सल्लागाराची असते. थोडक्यात अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा संघराज्य प्रमुख, घटनात्मक व वास्तव कार्यकारी प्रमुख एकटाच असतो. अमेरिकेत त्याच्यापेक्षा दुसरे कोणतेही श्रेष्ठ पद नाही. त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षपद अत्यंत सन्मानाचे, प्रतिष्ठेचे आणि महत्त्वाचे समजले जाते.

- **राष्ट्राध्यक्षाची घटनात्मक तरतूद :**

अमेरिकेच्या राज्यघटनेच्या दुसऱ्या कलमात राष्ट्राध्यक्षाच्या पदाची व त्याच्या कार्याची तरतूद केलेली

आहे. राष्ट्रघटनेत दुसऱ्या कलमात असे स्पष्ट केले आहे की, 'अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाच्या अध्यक्षाकडे कार्यकारी अधिकार राहतील.' म्हणजेच अधिशासनविषयक सत्ता अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाची राहील. त्यानुसार राष्ट्राध्यक्ष हा घटनात्मक व वास्तव कार्यकारी प्रमुख बनला आहे. राज्यघटनेने संघराज्याची कार्यकारी विषयक सत्ता एकट्या राष्ट्राध्यक्षाकडे देवून सर्वशक्तीमान व महत्त्वपूर्ण असे निर्वाचित पद निर्माण केले आहे.

- **राष्ट्राध्यक्षपदासाठी पात्रता :**

अमेरिकन राष्ट्रध्यक्षपदाची निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीची पात्रता राज्यघटनेत कलम २ च्या पोटकलम १ मध्ये सांगितली आहे ती पुढीलप्रमाणे–

१) ती व्यक्ती अमेरिकन संघराज्याची जन्मजात नागरिक असावी.

२) तिचे वय ३५ वर्षे पूर्ण झलेले असावे.

३) तिचे अमेरिकन संघराज्यात कमीतकमी १४ वर्षे वास्तव्य असले पाहिजे.

४) त्याव्यक्तीला कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नसावी किंवा तो गुन्हेगार नासावा.

५) राज्यघटनेनुसार या पदासाठी स्त्री व पुरुष दोन्हीही पात्र ठरविले आहेत. परंतु आजपर्यंतच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत एकाही स्त्रीने उमेदवारी जाहीर केलेली नाही.

- **राष्ट्राध्यक्षाची निवडणूक :**

अमेरिकन राज्यघटनेतील तरतुदीनुसार 'राष्ट्राध्यक्ष हा अप्रत्यक्ष निवडणूक पद्धतीने निवडला जातो. राज्यघटनेत त्याच्या निवडणूकीसाठी एक विशिष्ट अशी प्रक्रिया सांगितली आहे, जी इतर कोणत्याही लोकशाही राष्ट्रात आढळत नाही. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा निर्वाचित असतो. अमेरिकन जनता त्याला अप्रत्यक्ष पद्धतीने निवडून देते. त्याच्या निवडीसाठी एक निर्वाचक मंडळ निर्माण केले जाते. घटनेनुसार प्रत्येक घटकराज्यातील लोक त्या घटकराज्याचे काँग्रेसमध्ये (सिनेट व प्रतिनिधी सभासद) जेवढे प्रतिनिधी असतील तेवढेच दुसरे प्रतिनिधी (निर्वाचक) निवडतात. आणि या निर्वाचक गणाकडून (अध्यक्षीय मतदार) राष्ट्राध्यक्षाची निवड होते.

अशारितीने राज्यघटनेप्रमाणे राष्ट्राध्यक्षाची निवडणूक अप्रत्यक्षपणे होत असली तरी व्यवहारात या निवडणूकीला प्रत्यक्ष निवडणूकीचे स्वरूप प्राप्त झालेले दिसते. म्हणूनच अशा वैशिष्ट्यपूर्ण निवडणूकीची प्रक्रिया कशी चालते हे समजून घेणे आवश्यक आहे.

**१) राजकीय पक्षांच्याकडून अध्यक्षीय उमेदवारांची निवड :**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाची निवडणूक दर चार वर्षांनी येणाऱ्या लीप वर्षात होते. निवडणूक वर्षात ही निवडणूक प्रक्रिया साधारणत: ७ ते ८ महिने चालू असते. अमेरिकेत द्विपक्षपद्धती असून तेथील राजकारणात रिपब्लिकन व डेमोक्रॉटिक हे प्रमुख दोन पक्ष आहेत. हे दोन्हीही राजकीय पक्ष निवडणूक वर्षात सुरूवातीच्या काळात राज्यातील महत्त्वांच्या शहरात आपापल्या पक्षाचे राष्ट्रीय मेळावे स्वतंत्रपणे भरवितात. या मेळाव्यात

हे पक्ष आपले राष्ट्राध्यक्ष व उपराष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार निश्चित करात. सदरच्या मेळाव्यासाठी प्रत्येक घटकराज्याचे पक्षप्रतिनिधी हजर असतात. प्रत्येक घटकराज्यातून उमेदवारासाठी नावे सुचविण्यात येतात. उमेदवारांची भाषणे होतात. नंतर पक्षप्रतिनिधींचे मतदान होते व ज्याला जास्त मते मिळतील तो त्या पक्षाचा राष्ट्राध्यक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून घोषित करण्यात येते. त्याचवेळी पक्षाचा उपराष्ट्राध्यक्षाचा उमेदवार ही निवडला जातो. अशाप्रकारे हे दोन्ही पक्ष आपापली पक्षाची स्वतंत्र व वेगगळ्या ठिकाणी अधिवेशने घेवून आपले राष्ट्राध्यक्ष व उपराष्ट्राध्यक्षाचे उमेदवार बहुमताने निवडतात.

**२) अध्यक्षीय मतदारांची (निर्वाचक गणातील सदस्यांची) निवड :**

अमेरिकन राष्ट्राध्यक्षाची निवडणूक अप्रत्यक्षपद्धतीने होते. म्हणजेच या निवडणूकीसाठी खास 'निर्वाचक मंडळाची' निर्मिती केली जाते. या निर्वाचक गणातील सदस्यांची निवड प्रत्यक्ष जनतेकडून केली जाते. आणि हे निर्वाचक राष्ट्राध्यक्षाच्या निवडणूकीत प्रत्यक्ष मतदान करतात. म्हणजेच राष्ट्राध्यक्षाच्या निवडणूकीत प्रत्यक्ष मतदान करण्यासाठी जनतेकडून जे खास प्रतिनिधी (निर्वाचक) निवडले जातात, त्यांना अध्यक्षीय मतदार असे म्हणतात. प्रत्येक घटकराज्यातून जेवढे प्रतिनिधी सिनेट व प्रतिनिधीगृहामध्ये निवडलेले असतात, तेवढेच दुसरे प्रतिनिधी जनतेकडून 'अध्यक्षीय मतदार म्हणून निवडले जातात. सध्या सिनेटमध्ये १०० व प्रतिनिधीगृहात ४३५ असे एकूण काँग्रेसमध्ये ५३५ प्रतिनिधी आहेत. त्यामुळे तेवढेच दुसरे ५३५ अध्यक्षीय मतदार म्हणून सर्व घटकराज्यातून निवडले जातात. त्याच बरोबर डिस्ट्रीक्ट ऑफ कोलंबिया (वॉशिंग्टन डी.सी.) यामधून ३ जादा प्रतिनिधी निर्वाचक मंडळावर पाठविले जातात. त्यामुळे निर्वाचक मंडळाची सध्याची सदस्य संख्या ५३८ एवढी आहे. रिपब्लिकन व डेमोक्रटिक हे दोन्ही पक्ष या निवडणुकीत प्रत्येक घटकराज्यात आपले अध्यक्षीय मतदाराचे उमेदवार उभे करतात. घटकराज्यात ज्या पक्षाला सर्वात जास्त मते मिळतील त्या पक्षाचे उमेदवार त्या घटकराज्यातून येतात. अशाप्रकारे सर्व घटकराज्यातून ज्या पक्षाचे जास्त उमेदवार (अध्यक्षीय मतदार) निवडून येतील त्या पक्षाच्या राष्ट्राध्यक्षाचा विजय येथेच निश्चित होतो. अध्यक्षीय मतदाराची ही निवड लीप वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यातील पहिल्या सोमवारनंतर येणाऱ्या मंगळवारी करण्यात येते.

राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीत अध्यक्षीय मतदारांची निवड अत्यंत महत्त्वाची असते. कारण या निवडणुकीत जे एकूण ५३८ अध्यक्षीय मतदार निवडले जातात त्यापैकी ज्या पक्षाला बहुमत मिळळते. त्या पक्षाचा उमेदवार राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडला जातो हे सर्वांना माहित असते. म्हणजेच नोव्हेंबर महिन्यात अध्यक्षीय मतदारांच्या निवडणुकीचे निकाल जाहीर होताच राष्ट्राध्यक्षाची निवड अप्रत्यक्षपणे निश्चित होत असते. त्यामुळे पुढे अध्यक्षीय मतदारांनी राष्ट्राध्यक्षाची केलेली निवड औपचारिक स्वरूपाची असते.

**३) अध्यक्षीय मतदारांकडून राष्ट्राध्यक्षाची निवड :**

नोव्हेंबरमध्ये जनतेने निवडून दिलेले अध्यक्षीय मतदार राष्ट्राध्यक्षाच्या निवडणूकीसाठी डिसेंबर महिन्यात मतदान करतात. राष्ट्राध्यक्षपदासाठीचे मतदान डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारनंतर येणाऱ्या पहिल्या सोमवारी घेतले जाते. प्रत्येक घटकराज्यात राजधानीच्या ठिकाणी मतदान केंद्र असते. तेथे त्या घटकराज्यातील अध्यक्षीय मतदार आपल्या पक्षाच्या उमेदवाराला मतदान करतात. या निवडणूकीचे वैशिष्ट्य म्हणजे तेथे

जबरदस्त पक्षनिष्ठा असल्यामुळे अध्यक्षीय मतदार ज्या पक्षाकडून निवडून आलेले असतात. त्याच पक्षाच्या उमेदवाराला मतदान करतात.

मतदानानंतर सर्व पेट्या वॉशिंग्टनला आणल्या जातात. ६ जानेवारी रोजी सिनेटचा अध्यक्ष दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीत मतमोजणी करतो. ज्या उमेदवाराला निवडून येण्यासाठी आवश्यक असणारी २७० इतकी मते म्हणजेच एकूण मतदारांच्या अर्ध्याहून अधिक मते मिळाली असतील त्याची राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली असे जाहीर करतो. परंतु या निवडणूकीत कोणत्याच उमेदवाराला आवश्यक एवढी मते मिळाली नसल्यास, प्रतिनिधीगृहा या निवडणूकीत सर्वात जास्त मते मिळालेल्या पहिल्या तीन उमेदवारातून एकाची राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड करते. निवडून आलेला उमेदवार २० जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशाकडून वॉशिंग्टन येथे अधिकार व पदग्रहणाची शपथ घेऊन राष्ट्राध्यक्षपदाचा स्वीकार करतो.

- **राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाल :**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाली चार वर्षाचा असतो (कलम २ नुसार) तसेच सन १९५१ च्या २२ व्या घटनादुरुस्तीनुसार एकाच व्यक्तीला दोन पेक्षा जास्तवेळा राष्ट्राध्यक्ष होता येत नाही.

- **राष्ट्राध्यक्षाची बडतर्फी (महाभियोग पद्धती) :**

राज्यघटनेनुसार राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाल चार वर्षाचा असला तरी त्याने देशद्रोह, लाचलुचपत, भ्रष्टाचार किंवा अध्यक्षपदाची व राष्ट्राची प्रतिष्ठा धुळीस मिळविणारी गंभीर स्वरूपाची कृती, गुन्हा केल्यास त्याला महाभियोगाचा खटला चालवून त्याला काँग्रेस पदच्युत करू शकते. (कलम २ विभाग ४ नुसार). वरीलप्रकारच्या एखाद्या कृतीबद्दल प्रतिनिधीगृह, राष्ट्राध्यक्षावर आरोपपत्र दाखल करू शकते. हे आरोपपत्र चौकशी करून प्रतिनिधी गृहाने बहुमताने मंजूर केल्यानंतर यावेळी सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधिश सिनेटचे अध्यक्षपद स्वीकारतो. चौकशी दरम्यान आरोपी राष्ट्राध्यक्षाला आपली बाजू मांडता येते. त्यासाठी वकीलाचा सल्ला घेता येतो. तसेच बचावासाठी साक्षीदारही घेता येतात. शेवटी चौकशी पूर्ण झाल्यानंतर अध्यक्षावरील आरोप सिनेटने २/३ बहुमताने संमत केल्यास, राष्ट्राध्यक्षाला त्याच्या पदावरून कमी केले जाते. या प्रक्रियेला 'महाभियोगाची' किंवा 'प्रभियोगाची पद्धती' असे म्हणतात. थोडक्यात अमेरिकेच्या काँग्रेसला राष्ट्राध्यक्षाची नियुक्ती करण्याचा अधिकार नसला तरीही त्याच्या गैरवर्तनाबद्दल त्याला पदच्युत करण्याचा अधिकार आहे. आजपर्यंत अॅंड्र्यु जॉन्सन, प्रे-रिचर्ड निक्सन, बिल क्लिंटन या अध्यक्षांच्यावर अशाप्रकारचे आरोपपत्र दाखल झाले होते. परंतु सिनेटमध्ये बहुमताच्या अभावामुळे ते मंजूर न झाल्यामुळे एकाही राष्ट्राध्यक्षाला महाभियोगाच्या प्रक्रियेद्वारे पदच्युत्त करता आले नाही.

- **राष्ट्राध्यक्षाचा वारसा :**

राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी त्याचा मृत्यू, राजीनामा, महाभियोग यापैकी कोणत्याही कारणाने अध्यक्षपद रिकामे झाल्यास उपाध्यक्ष त्या पदाची सुत्रे हाती घेईल अशी तरतूद राज्यघटनेत केली आहे. सन १९७४ मध्ये काँग्रेसने अध्यक्षपदाचा वारसाक्रम पुढीलप्रमाणे ठरविला. राष्ट्राध्यक्षपद रिकामे झाले तर उपराष्ट्राध्यक्ष, प्रतिनिधीगृहाचा सभापती, सिनेटचा सभापती आणि त्यानंतर अध्यक्षीय मंत्रिमंडळातील ज्येष्ठ

मंत्री असा क्रम विचारात घेण्यात येतो. आतापर्यंत आठ वेळा राष्ट्राध्यक्ष पद रिकामे झाले व उपाध्यक्षाला अध्यक्षपदाची संधी मिळाली आहे. कोणत्याही कारणाने राष्ट्राध्यक्षाचे पद रिकामे झाल्यास ताबडतोब उपाध्यक्षपदाला ते पद स्वीकारावे लागते. म्हणजेच अध्यक्षपद कधीच रिकामे ठेवले जात नाही.

- **राष्ट्राध्यक्षाचे वेतन व भत्ते :**

सध्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला चार लाख डॉलर्स वार्षिक वेतन आणि इतर खर्चासाठी पन्नास हजार डॉलर्स मिळतात. तसेच प्रवासखर्च व अतिथ्यखर्चही दिला जातो. याशिवाय त्याला राहण्यासाठी 'व्हाईट हाऊस' हे सरकारी निवासस्थान दिले जाते. त्यावरील सर्व खर्च (अंदाजे वार्षिक दोन लाख डॉलर्स) सरकारी खजिन्यातून केला जातो. त्याच्या कार्यकालात वेतन कमी केले जात नाही. निवृत्तीनंतर त्याला वार्षिक ६३,०००/- डॉलर्स निवृत्तीवेतन दिले जाते. राष्ट्राध्यक्षाचे वेतन व भत्ते काँग्रेस ठरवित असते.

- **राष्ट्राध्यक्षाचे अधिकार व कार्ये :**

अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा घटनात्मक व वास्तव कार्यकारी प्रमुख असून त्याच्या नावाने संघराज्याचा कारभार चालतो. अमेरिकेच्या राज्यघटनेने त्याला व्यापक प्रमाणात अधिकार दिलेले आहेत. तो अमेरिकन संघराज्याचा प्रमुख व अमेरिकेचा प्रथम नागरिक असतो. राज्यघटनेनेच त्याला व्यापक अधिकार व सत्ता देवून राष्ट्राध्यक्ष हे पद प्रभावी व शक्तीशाली बनविले आहे. मन्रो या विचारवंताच्या मते, 'आजपर्यंत लोकशाही राज्यात कोणत्याही व्यक्तीला इतकी व्यापक सत्ता नव्हती की, जितकी अमेरिकन अध्यक्षाला आहे'. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा वास्तव शासक असून त्याचे अधिकार सर्वात अधिक आहेत. तथापि तो हुकूमशहा नाही. कारण त्याला जे अधिकार मिळालेले आहेत, ते अमेरिकन राज्यघटना, काँग्रेसचे कायदे, न्यायालयीन निर्णय व संकेत यानुसार मिळालेले आहेत. त्यामुळे तो अधिकारांचा वापर योग्य रित्या करीत असतो. त्याच्या या अधिकाराबाबत लॉर्ड ब्राईस म्हणतो, 'राज्य चालविणारा आणि शासनकारभार करणारा अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा एक निर्वाचित सम्राट होय.' थोडक्यात अमेरिकन राष्ट्राध्यक्षपद हे जगातील लोकशाही राष्ट्रामधील सर्वात प्रभावी व महत्त्वाचे पद आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे -

**१) कार्यकारी (शासन) विषयक अधिकार :**

अमेरिकन संघराज्याची संपूर्ण सत्ता राष्ट्राध्यक्षाच्या हाती असते. अमेरिकेचा कार्यकारी प्रमुख व सर्वश्रेष्ठ प्रमुख प्रशासक म्हणून त्याला पुढील अधिकार प्राप्त झालेले आहेत.

**अ) कायद्याची अंमलबजावणी :** अमेरिकेचा कार्यकारी प्रमुख व प्रशासक या नात्याने राज्यघटना, काँग्रेसचे कायदे, न्यायालयीन निर्णय, परराष्ट्राशी केलेले करार यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्याचा अधिकार त्याला आहे. अशा कायद्यांची व करारासंबंधी नियम, अधिनियम करून, प्रशासकीय यंत्रणेला अंमलबजावणी विषयक आदेश देण्याचे व त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य राष्ट्राध्यक्षाला करावे लागते. विविध खात्यांच्या प्रशासनावर नियंत्रण ठेवून योग्य मार्गदर्शन करण्याचे कार्य तो करतो. कोणत्याही खातेप्रमुखाला त्याच्या खात्याची माहिती तो विचारू शकतो. कोणताही अधिकारी गैरमार्गाचा अवलंब करीत असेल तर

त्याला राष्ट्राध्यक्ष पदच्युत करू शकतो. थोडक्यात अमेरिकन संघराज्याच्या संपूर्ण प्रशासनावर देखरेख ठेवणे, राज्यात शांतता व सुव्यवस्था ठेवणे, कायद्यांची अंमलबजावणी करणे इ. कार्ये राष्ट्राध्यक्षाला करावी लागतात.

**ब) वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नेमणूका करणे :** अमेरिकेच्या प्रशासनातील महत्त्वाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाला आहे. यानुसार मंत्रीमंडळातील मंत्री, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिश, परराष्ट्रात पाठवावयाचे राजदूत, वरिष्ठ सैन्याधिकारी, राज्यप्रतिनिधी, सार्वजनिक महामंडळाचे सदस्य यांच्या नेमणूका राष्ट्राध्यक्ष करीत असतो. मात्र अशा नेमणूकांना त्याला सिनेटची मान्यता घ्यावी लागते. यालाच 'सिनेटर संबंधी शिष्टाचार' असे म्हणतात. याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना पदच्युत करण्याचा अधिकारही त्याला आहे. परंतु अशाप्रकारची पदच्युती करताना त्याला चौकशी समिती नेमावी लागते. आणि या चौकशीअंती अधिकाऱ्यांना त्याला बडतर्फ करता येते.

**२) कायदेविषयक अधिकार :**

अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष घटनात्मक प्रमुख असल्यामुळे त्याला कांही कायदेविषयक अधिकारही प्राप्त झालेले आहेत. अमेरिकेच्या राज्यघटनेने सत्ताविभाजन तत्त्वाचा अवलंब करून काँग्रेस, राष्ट्राध्यक्ष व न्यायमंडळ यांच्यात सत्ताविभाजन करून हे तिन्ही विभाग आपापल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र केलेले आहेत. तरी परंतु या तिन्ही विभागात सत्तेचा समतोल व नियंत्रण राहण्यासाठी घटनेने 'नियंत्रण व संतुलन' हे तत्त्वही स्वीकारले आहे. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष हा कार्यकारी मंडळाचा प्रमुख असूनही त्याला कायदेविषयक अधिकारही प्राप्त झाले आहेत. राष्ट्राध्यक्ष काँग्रेसचा सदस्य नसला नरीही घटनात्मक राष्ट्रप्रमुख म्हणून त्याचा कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेत महत्त्वाचा सहभाग असतो. राष्ट्राध्यक्षाला कायदेविषयक अधिकार पुढीलप्रमाणे प्राप्त झालेले आहेत.

**अ) काँग्रेसचे अधिवेशन बोलावणे :** काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांची अधिवेशने बोलावणे, ती स्थगित किंवा तहकुब करणे, वेळप्रसंगी आवश्यकता वाटल्यास दोन्ही सभागृहाची खास अधिवेशने बोलाविण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाला आहे.

**ब) काँग्रेसकडे संदेश पाठविणे :** काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांना राज्यातील एकंदर परिस्थिती संबंधी अहवाल संदेश पाठविणे, सूचना करणे असा अधिकार त्याला आहे. अशा प्रकारचा लिखित किंवा तोंडी संदेश किंवा राष्ट्राध्यक्ष स्वतः काँग्रेसमध्ये उपस्थित राहून देवू शकतो. या संदेशामध्ये राष्ट्राची धोरणे, कृती व त्यांची साधने यांचा समावेश असतो. राष्ट्राध्यक्षाचा संदेश म्हणजे विधिनियमांची चौकट व मागणी असते. त्यामुळे या संदेशाना महत्त्व असल्यामुळे काँग्रेसला त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

**क) वटहुकूम काढण्याचा अधिकार :** काँग्रेसचे अधिवेशन चालू नसताना राष्ट्राध्यक्षाला नवीन कायद्याची आवश्यकता वाटल्यास त्यासंबंधी वटहुकूम काढण्याचा अधिकार त्याला आहे. या वटहुकूमाचे महत्त्व कायद्याएवढेच असते. या वटहुकूमाला नंतर काँग्रेस कायद्याचे रूप देत असते.

**ड) विधिनियमांना मंजूरी देणे :** काँग्रेसने मंजूर केलेल्या प्रत्येक विधेयकाचे कायद्यात रुपांतर होण्यासाठी त्या विधेयकावर राष्ट्राध्यक्षाची स्वाक्षरी आवश्यक असते. म्हणजेच राष्ट्राध्यक्षाच्या मंजूरीशिवाय काँग्रेसने संमत केलेल्या कोणत्याही विधेयकाचे कायद्यात रुपांतर होत नाही. सभागृहातील विधेयकाचे

कायद्यात रुपांतर करण्यासंबंधी तो काही सूचना करू शकतो. काँग्रेसने मंजूर केलेले विधेयक त्याला मंजूर नसेल तर तो त्या विधेकास नकार देवू शकतो. यालाच राष्ट्राध्यक्षाचा नकाराधिकार (Veto Power) असे म्हणतात. राष्ट्राध्यक्षाची इच्छा नसल्यास त्या विधेयकाला नकार देण्याचा, त्यात दुरुस्त्या सुचविण्याचा त्याला अधिकार आहे. परंतु हा मर्यादित नकाराधिकार आहे. कारण राष्ट्राध्यक्षाने नकार दिलेले किंवा परत पाठविलेले विधेयक काँग्रेसने पुन्हा २/३ बहुमताने मंजूर करून दुसऱ्यांदा, राष्ट्राध्यक्षाकडे पाठविले तर त्यास त्याला संमती द्यावीच लागते. तसेच राष्ट्राध्यक्षाला एक खास खिशातला नकाराधिकार (Pocket Veto) चा अधिकार आहे. काँग्रेसने अधिवेशनाच्या शेवटच्या १० दिवसाच्या कालावधीत एखादे विधेयक संमत करून राष्ट्राध्यक्षाकडे पाठविले असेल, आणि त्यासंदर्भात त्याने कोणताच निर्णय घेतला नसेल. अशावेळी काँग्रेसचे अधिवेशन त्या दहा दिवसात समाप्त झाले असेल तर ते विधेयक आपोआप रद्द होते. या पॉकेट व्हेटोच्या वापराबाबत काँग्रेस कांहीच करू शकत नाही. त्यामुळे या नकाराधिकाराचा वापर अनेक राष्ट्राध्यक्षांनी अनेकवेळा केलेला आहे. उदा. प्रे-रुझवेल्ट यांनी २६० वेळा तर ट्रमन यांनी ७० वेळा या अधिकाराचा वापर केला आहे. थोडक्यात अमेरिकेच्या कायदेनिर्मितीत काँग्रेसच्या दोन्ही सभागृहाप्रमाणेच राष्ट्राध्यक्षाचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे.

**३) न्यायविषयक अधिकार :**

अमेरिकन संघराज्याचा प्रमुख या नात्याने राष्ट्राध्यक्षाला कांही न्यायविषयक अधिकार प्राप्त झालेले आहेत. तो सिनेटच्या संमतीने संघन्यायालयाच्या सर्व न्यायाधिशांच्या नेमणुका करतो. अमेरिकन संघराज्याच्या कायद्याचा भंग केल्यामुळे शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना दया दाखविण्याचा त्याला अधिकार आहे. गुन्हेगारांची शिक्षा माफ करण्याचा, ती कमी करण्याचा, शिक्षेचे स्वरूप बदलण्याचा किंवा शिक्षेच्या अंमलबजावणीत बदल करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाला आहे.

**४) आर्थिक अधिकार :**

अमेरिकेचा कार्यकारी प्रमुख या नात्याने राष्ट्राचे अंदाजपत्रक तयार करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाला आहे. प्रमुख्याने त्याच्या नियंत्रणाखालील 'ब्युरो ऑफ दि बजेट' हे कार्यालय अंदाजपत्रक तयार करते आणि ते तयार झाल्यानंतर राष्ट्राध्यक्षासमोर ठेवले जाते. तो त्यात आपल्याला अपेक्षित असलेले बदल करून ते संदेशासहीत काँग्रेसकडे संमतीसाठी पाठवितो. काँग्रेसने मंजूर केल्यानंतर अंदाजपत्रकाची अंमलबजावणी करण्याचा त्यालाच अधिकार आहे. थोडक्यात अमेरिकेचे अंदाजपत्रक तयार करणे, त्याची अंमलबजावणी करणे, आर्थिक बाबतीत प्रशासनाला मदत करणे, मंजूर झालेल्या धनविधेयकावर नियंत्रण ठेवणे आणि आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणे अशी आर्थिक स्वरूपाची कार्ये त्याला करावी लागतात.

**५) परराष्ट्रविषयक अधिकार :**

अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा परराष्ट्र धोरणाचा शिल्पकार असतो. तो त्या देशाच्या परराष्ट्रधोरणाचे निर्धारण व संचालन करतो. या क्षेत्रात त्याला व्यापक अधिकार आहे. परराष्ट्रीय धोरण ठरविणे, परराष्ट्राशी करार, तह, संधी किंवा युद्ध करणे, परराष्ट्रात राजदुत पाठविणे, परराष्ट्रातून आलेल्या राजदूताना मान्यता देणे, नवीन राष्ट्रांना

व तेथील शासनाना मान्यता देणे, संयुक्त राष्ट्रसंघटनेतील अमेरिकेचे धोरण निश्चित करणे, परराष्ट्राशी संबंध प्रस्थापित करणे, अमेरिकेचा प्रतिनिधी म्हणून परराष्ट्रदौरे करणे इत्यादी परराष्ट्रविषयक अधिकार त्याला प्राप्त झालेले आहेत. अर्थात त्याच्या या कृतीला सिनेटची मान्यता घ्यावी लागेल.

**६) लष्कर (सैन्य) विषयक अधिकार :**

अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा तिन्ही सनादलाचा प्रमुख असतो. अमेरिकेच्या संरक्षक सेनेचा प्रमुख सेनाधिकारी या नात्याने सैन्यातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्याचा अधिकार त्याला आहे. तसेच देशाच्या संरक्षणाच्या व शत्रूपक्षाचा पराभव करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते निर्णय घेण्याचा अधिकार त्याला असतो. अमेरिकन सैन्याला जगाच्या कोणत्याही भागात तो पाठवू शकतो. म्हणजेच कोणत्याही देशाबरोबर तो युद्ध घोषित करू शकतो, युद्ध थांबवू शकतो, या अधिकाराचा वापर करताना या सर्व घडामोडीची कल्पना त्याला सिनेटला द्यावी लागते. तसेच घटक राज्याच्या राज्यपालाच्या विनंतीवरून घटकराज्यात शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी तो सैन्य पाठवू शकतो.

**७) पक्षनेता :**

अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा त्याच्या पक्षाचा नेता असतो. काँग्रेसमध्ये जर त्याच्या पक्षाचे बहुमत असेल तर कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेवर तो आपल्या इच्छेने प्रभाव पाडू शकतो. सत्तेवर असताना आपल्या पक्षाची ध्येयधोरणे, कार्यक्रम राबविण्याचा, पक्षाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचा, पक्षाची प्रतिमा उंचावण्याचा, पक्षाची संघटना बळकट करण्याचा, पक्षाचे सदस्य साढविण्याचा तसेच पक्षाचा जास्तीत जास्त प्रचार व प्रसार करण्याचा आणि पक्षाला बहुसंख्यांकांचा पाठींबा मिळविण्याचा पक्षाला विविधक्षेत्रात सत्ता प्राप्त करून देण्याचा पक्षनेता या नात्याने तो प्रयत्न करीत असतो. तसेच पक्षनेता म्हणून पक्षाला मार्गदर्शन करणे, सल्ला देणे, जनतेला विश्वासात घेवून आपल्या पक्षाच्या कार्याची माहिती देण्याचे कार्य राष्ट्राध्यक्ष करतो.

**८) राष्ट्रनेता (जनतेचा नेता) :**

अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा जनतेकडून अप्रत्यीरित्या निवडलेला असतो. म्हणजेच जनतेकडून बहुमताने त्याची निवड झालेली असल्यामुळे तो जनतेचा नेता असतो. तसेच तो राष्ट्राचा नेता असतो. संपूर्ण जनतेच्या वतीने बोलण्याचा त्याला अधिकार असतो. म्हणजेच जनतेचा तो आवाज असतो. जनतेचा नेता या नात्याने त्याला अनेकप्रकारची लोककल्याणाची कार्ये करावी लागतात. राष्ट्राध्यक्ष राष्ट्रीय हितसंबंधाचे खरेखुरे प्रतिनिधीत्व करीत असतो. त्यामुळे देशातील विविध भागातील जनतेच्या इच्छा आकांक्षा व गरजा लक्षात घेवून, विविध आर्थिक हितसंबंधात समतोल राखून तो लोककार्याची कार्ये करतो. देशात चांगल्या सोयीसुविधा निर्माण करणे, देशात कायदा व सुव्यवस्था राखणे आणि लोकांना शांततामय जीवन प्राप्त करून देणे, नागरिकांच्या जीवनाचे व मालमत्तेचे, हक्काचे संरक्षण करणे इत्यादी कार्ये त्याला करावी लागतात.

**९) मंत्रिमंडळाचा प्रमुख :**

वरील अधिकाराशिवाय मंत्रिमंडळाची निर्मिती करणे, त्यांचे खातेवाटप करणे, मंत्रिमंडळाच्या बैठका

घेवून त्याचे अध्यक्षस्थान स्वीकारणे, त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांना सल्ला देणे, त्याच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, राष्ट्राला अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा निर्माण करून देणे अशी अनेकप्रकारची कार्ये राष्ट्राध्यक्षाला करावी लागतात. थोडक्यात अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा मंत्रिमंडळाचा निर्माता, मंत्रिमंडळाचा प्रमुख आणि शासन प्रमुखही असतो.

- **राष्ट्राध्यक्षाचे स्थान :**

अमेरिकेच्या राज्यघटनेने राष्ट्राध्यक्षाला वरीलप्रमाणे व्यापक सत्ता व अधिकार देवून हे प्रभावशाली पद बनविले आहे. देशाचा घटनात्मक प्रमुख असून संपूर्ण राज्यकारभार त्याच्याच नावाने चालतो. तसेच तो वास्तव कार्यकारी प्रमुख असल्यामुळे संघराज्याची संपूर्ण कार्यकारी विषयक सत्ता त्यालाच प्राप्त झालेली आहे. अमेरिकन काँग्रेस, सर्वोच्च न्यायालय, जनता राजकीय पक्ष आणि विशिष्ट परिस्थिती यांनी राष्ट्राध्यक्षाचे सामर्थ्य वाढविण्यास मदत केली आहे. प्रशासनाचा प्रमुख या नात्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणूका तो सिनेटच्या मदतीने करतो. अमेरिकन परराष्ट्रधोरणाचा शिल्पकार या नात्याने तो परराष्ट्रधोरण निश्चित करतो. तो मंत्रिमंहळाचा प्रमुख असून राष्ट्राचे धोरण ठरविणे व त्याची अंमलबजावणी ही करण्याचा त्याला अधिकार आहे. तसेच अमेरिकन संघराज्याचा प्रमुख, शासनप्रमुख, संरक्षणदलाचा प्रमुख, अमेरिकेचा पहिला नागरिक, प्रमुख प्रशासक, कायदेमंडळाचा मार्गदर्शक, परराष्ट्रधोरणाचा निर्माता, राष्ट्र नेता, पक्षनेता, जनतेचा नेता, आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रमुख नेता अशाप्रकारच्या अनेक भूमिका तोपार पाडतो. तसेच अमेरिका ही जगातील आर्थिक महासत्ता असल्याने जगानेही त्याचे नेतृत्व मान्य केले आहे. यावरून अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष पद हे जगातील एक प्रभावशाली, बलशाली व महत्त्वाचे पद आहे असे म्हणता येईल. यासंदर्भात राष्ट्राध्यक्षाचे महत्त्व सांगताना मन्रो म्हणतो, ''जगात आजपर्यंत इतर कोणत्याही व्यक्तीने इतक्या विस्तृत सत्तेचा उपयोग केलेला नाही की जितका अमेरिकन राष्ट्राध्यक्ष करतो.

**३.२.१.१ स्वयं अध्ययन प्रश्न – १**

१) अमेरिकेत ................. शासन पद्धती आहे.

(अध्यक्षीय, संसदीय, एकात्म)

२) अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाची निवडणूक लढविण्यासाठी व्यक्तीचे वय ......... वर्षे असले पाहिजे.

(५०, ३५, ३०)

३) अमेरिकन राष्ट्राध्यक्षाला राहण्यासाठी ............ हे सरकारी निवासस्थान दिले जाते.

(राष्ट्रपतीभवन, राजभवन, व्हाईट हाऊस)

४) अमेरिकन राष्ट्राध्यक्षाला सध्या ........... लाख डॉलर्स वार्षिक वेतन दिले जाते.

(२, ३, ४)

### ३.२.२ अमेरिकेचा उपराष्ट्राध्यक्ष :

अमेरिकेच्या राज्यघटनेने राष्ट्राध्यक्षाच्या बरोबर उपराष्ट्राध्यक्षाचे पदही निर्माण केले आहे. राज्यघटना तयार करतेवेळी उपराष्ट्राध्यक्ष पदाविषयी अनुकूल व प्रतिकूल चर्चा झाली होती. तरीही घयनाकारांनी हे पद निर्माण केले आहे. कारण राष्ट्राध्यक्षाचे पद मृत्यू, राजीनााम किंवा पदच्युतीमुळे रिकामे झाल्यास त्याचे कामकाज पाहण्यासाठी हे पर्यायी पद म्हणून निर्माण केले आहे.

- **उपराष्ट्राध्यक्षपदाची निवड :**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाच्या निवडणूकी बरोबरच व त्याच पद्धतीने उपराष्ट्राध्यक्षाची निवड निर्वाचक मंडळाकडून केली जाते. राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवारासोबत डेमोकॉटिक व रिपब्लिकन हे दोन्ही पक्ष स्वतंत्र आपले उपराष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार पक्ष मेळाव्यात निश्चित करतात. अध्यक्षीय मतदार नोव्हेंबर महिन्यात राष्ट्राध्यक्षाप्रमाणेच उपराष्ट्राध्यक्षपदाच्या आपल्या पक्षाच्या उमेदवाराला स्वतंत्रपणे मतदान करतात. अध्यक्षाच्या मतमोजणीवेळीच सिनेटचा अध्यक्ष, उपाध्यक्षपदासाठी मतमोजणी करतो. या निवडणुकीत निवडून येण्यास आवश्यक तेवढी म्हणजे एकूण मताच्या अर्ध्याहून अधिक मते ज्या उमेदवारास मिळतात तो निवडून आल्याचे सिनेटचा अध्यक्ष जाहीर करतो. परंतु कोणालाच निर्णायक मते (बहुमा) मिळाली नसल्यास सर्वात जास्त मते मिळालेल्या पहिल्या दोन उमेदवारातून सिनेट एकाची उपराष्ट्राध्यक्षपदी निवड करतो. (१२ वी घटना दुरुस्ती). थोडक्यात राष्ट्राध्यक्ष व उपराष्ट्राध्यक्षाची निवडणूक लिप वर्षात एकाच वेळी व एकाच पद्धतीने होत असते.

**उपराष्ट्राध्यक्षपदासाठी पात्रता :**

राष्ट्राध्यक्षपदासाठी जी पात्रता आवश्यक असते तीच उपराष्ट्राध्यक्षपदासाठी आवश्यक असते.

१) तो अमेरिकेचा जन्मजात नागरीक असावा.

२) त्याचे वय ३५ वर्षे पूर्ण झालेले असावे.

३) त्याचे अमेरिकेत कमीत कमी १४ वर्षे वास्तव्य असले पाहिजे.

अशा अटी पूर्ण करणारी व्यक्तीच उपाध्यक्षपदासाठी पात्र समजली जाते.

- **कार्यकाल :**

उपराष्ट्राध्यक्षाचा कार्यकाल चार वर्षाचा असतो. परंतू मृत्यू, राजीनामा किंवा पदच्युती इत्यादी कारणामुळे हे रिकामे झाल्यास, २५ व्या घटना दुरुस्तीनुसार राष्ट्राध्यक्ष नव्या उपराष्ट्राध्यक्षाची निवड करू शकतो. मात्र या निवडीला काँग्रेसच्या दोन्ही सभागृहाची बहुमताने मंजूरी मिळणे आवश्यक असते.

- **उपराष्ट्राध्यक्षाची पदच्युती :**

अमरिकेच्या राष्ट्राध्यक्षाप्रमाणेच काँग्रेस उपराष्ट्राध्यक्षावर महाभियोगाचा खटला चालवून पदच्युत करू शकते. अध्यक्षाप्रमाणेच उपाध्यक्षाला वेतन व भत्ते मिळतात.

- **उपराष्ट्राध्यक्षाचे अधिकार व कार्ये :**

अमेरिकन राज्यघटनेने उपाध्यक्षाला फारसे मत्त्वाचे अधिकार दिलेले नाहीत. कांही कारणाने राष्ट्राध्यक्षाचे पद रिकामे झाले तर तो अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेता आणि अध्यक्षाचे सर्व अधिकार व कार्ये पार पाडतो. परंतु इतरवेळी मात्र तो सिनेटचा पदसिद्ध अध्यक्ष म्हणून कार्य करतो. सिनेटचा अध्यक्ष म्हणून त्याला पुढील अधिकार प्राप्त होतात.

१) सिनेटचे अध्यक्षपद स्वीकारणे, २) नियमानुसार सिनेटचे नियमन व संचालन करणे, ३) सिनेटमध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे, ४) सभागृहात विधेयकावर चर्चा घडवून आणणे, ५) विधायकावर मतदान घेणे, ६) बहुमताचा निर्णय जाहीर करणे, ७) एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास स्वत:चे निर्णायक मत देणे, ८) सदस्य व सभागृहाच्या प्रतिष्ठेचे व विशेषाधिकाराचे जतन करणे, ९) राष्ट्रीय सुरक्षा मंडळाचे सभासत्व स्वीकारणे. अशाप्रकारची कार्ये उपाध्यक्षाला करावी लागतात.

- **उपराष्ट्राध्यक्षाचे स्थान :**

वरीलप्रमाणे सिनेटचा पदसिद्ध अध्यक्ष म्हणून उपराष्ट्राध्यक्ष कार्य करतो. परंतु सिनेटच्या कामकाजाबाबतही त्याला फारसे अधिकार नाहीत. कारण या सभागृहाचे बहुतांशी कार्य त्याच्या रूढी व परंपरानुसार चालते. म्हणजेच अमेरिकेत उपराष्ट्राध्यक्ष हे पद अत्यंत कमी महत्त्वाचे आहे.या संदर्भात वुड्रो विल्सन यांनी असे म्हटले आहे की, ''या पदाचे वर्णन करताना मुख्य घोटाळा होतो तो हा की, या पदाविषयी किती थोडे बोलता येते हे सांगतानाच त्या पदाचे वर्णन सांगून संपते.'' यावरून अमेरिकेच्या शासनात उपराष्ट्राध्यक्षपद किती कमी दर्जाचे आहे हे समजून येते.

वरीलप्रमाणे उपाध्यक्षपद कमी महत्त्वाचे असले तरी, राष्ट्राध्यक्षाच्या निवडणूकीत पक्षातील एखाद्या गटाला संतुष्ट करण्यासाठी किंवा एखाद्या प्रदेशाचा पाठींबा मिळविण्यासाठी हे पद दिले जाते. अलिकडच्या काळात कांही अध्यक्षांनी कांही राजकीय व शासकीय स्वरूपाची जबाबदारी उपराष्ट्राध्यक्षाकडे सोपविली होती. उपाध्यक्षाला मंत्रिमंहळाच्या बैठकीत उपस्थित राहण्यास संधी देणे, त्याला राष्ट्रीय सुरक्षा समितीचे सदस्यत्व देणे, आपला प्रतिनिधी म्हणून परराष्ट्रात पाठविणे. अशाप्रकारची कामे काही राष्ट्राध्यक्ष त्याच्याकडे सोपविताना दिसतात. परंतु हे राष्ट्राध्यक्षाच्या स्वभावावर व दृष्टिकोनावर अवलंबून असते. तसेच आकस्मिक कारणाने राष्ट्राध्यक्षपद रिकामे झाल्यास किंवा शारीरिकदृष्ट्या एखादा राष्ट्राध्यक्ष हे पद सांभाळण्यास सक्षम नसल्यास राष्ट्राध्यक्षपदाची जबाबदारी उपराष्ट्राध्यक्षाला सांभाळावी लागते. अशाप्रकारे अलिकडच्या काळात उपराष्ट्राध्यक्षाचे पद कांहीसे महत्त्वाचे होवू शकले आहे.

**३.२.२.१ स्वयं अध्ययन प्रश्न – २**

१) अमेरिकेच्या उपाध्यक्षाची निवड ............ करतात.

(सरन्यायाधीश, राष्ट्राध्यक्ष, अध्यक्षीय मतदार)

२) उपराष्ट्राध्यक्षाचा कार्यकाल .......... वर्षाचा असतो.
(५, ६, ४)

३) अमेरिकेचा उपराष्ट्राध्यक्ष .......... या गृहाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.
(प्रतिनिधी, सिनेट, लोकसभा)

४) उपराष्ट्राध्यक्षाला महाभियोग पद्धतीने ........... हे पदच्युत करू शकते.
(सर्वोच्च न्यायालय, काँग्रेस, राष्ट्राध्यक्ष)

## ३.२.३ अमेरिकन अध्यक्षीय मंत्रिमंडळ (चिटणीस मंडळ)

अमेरिकेच्या राज्यघटनेत मंत्रिमंडळाची तरतूद नाही. परंतु 'अध्यक्षाला सरकारी खाते प्रमुखाकडून त्या त्या खात्याच्या कारभाराच्या संबंधात लेखी सल्ला घेता येईल असे उल्लेख राज्यघटनेच्या कलम २ च्या धारा २(१) मध्ये आढळते. त्यानुसार गेल्या २०० वर्षाच्या काळातील प्रथेनुसार मंत्रिमंडळाचा विकास होऊन आजचे मंत्रिमंडळ निर्माण झालेले आहे. सुरूवातीच्या काळात अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांनी सिनेट व सर्वोच्च न्यायालय यांना राज्यकारभाराबाबत सल्ला देण्याची विनंती केली. परंतु त्यांनी त्यास नकार दिला. म्हणून त्याने खातेप्रमुखानाच सल्ला विचारण्यास सुरूवात केली. जॉर्ज वॉशिंग्टन यांनी आपल्या कार्यकारी धोरणात व कार्यात आवश्यकता वाटल्यास संबंधित खातेप्रमुखाच्या बैठकी घेण्यास सुरूवात केली. परंतु पुढे या बैठकी वारंवार होवू लागल्या. त्यामुळे त्याला सल्लागाराचे स्वरूप प्राप्त झाले. राज्यकारभार करीत असताना राष्ट्राध्यक्षाला या सल्लागार मंडळाची सतत आवश्यकता वाटू लागल्याने त्याचे १७९३ पासून मंत्रिमंडळात रूपांतर झाले. अशाप्रकारे राष्ट्राध्यक्षाला सल्ला देण्याच्या मंत्रिमंहळाची निर्मिती, विकास हा राजकीय गरज व संकेतातून झालेला आहे. वास्तविक राष्ट्राध्यक्षाच्या मंत्रिमंडळाला 'अध्यक्षीय मंत्रिमंडळ' म्हणण्याऐवजी 'अध्यक्षाचे चिटणीस मंडळ किंवा सचिव मंडळ' म्हणजे अधिक योग्य ठरेल. कारण संसदीय पद्धती प्रमाणे हे अध्यक्षीय मंत्रिमंडळ नसते. तर ते राष्ट्राध्यक्षाच्या मर्जीनुसारत त्याला जबाबदार राहणारे असे मंत्रिमंडळ असते.

- **मंत्रिमंडळाची निवड :**

राष्ट्राध्यक्षाने सत्ताग्रहण केल्यानंतर तो आपल्या मंत्रिमंडळातील सदस्यांची नावे घोषित करतो. त्याने आपले जे सल्लागार, सहकारी निवडलेले आहेत. त्यालाच राष्ट्राध्यक्षाचे मंत्रिमंडळ किंवा सचिव मंडळ असे म्हणतात. मंत्रिमंडळातील मंत्र्याची नेमणूक राष्ट्राध्यक्ष स्वमर्जीने करतो. साधारणत: मंत्री किंवा चिटणीस यांच्या नेमणुका करताना राष्ट्राध्यक्ष पुढील बाबी विचारात घेतो.

१) देशातील विविध भागांचे प्रतिनिधीत्व मंत्रिमंडळात असावे.

२) आपल्या पक्षातील विविध गटांना पुरेसे प्रतिनिधीत्व देवून समतोल राखणे.

३) देशातील तज्ज्ञ, हुशार व्यक्तींची नेमणूक करणे.

४) विशिष्ट प्रभावी गटाला प्रतिनिधीत्व देणे.

५) आवश्यकता वाटल्यास विरोधीपक्षातील व्यक्तीना मंत्रिपद देणे.

अशाप्रकारे विविध दृष्टिकोणातून राष्ट्राध्यक्ष मंत्र्यांच्या नेमणुका करतो. अर्थात मंत्रिमंडळाची निवड हा राष्ट्राध्यक्षाचा सर्वस्वी अधिकार आहे. त्यामुळे तो आपल्या धोरणाला अनुकूल व सहाय्यभूत ठरतील अशाच व्यक्तींची नेमणूक करतो. त्याने केलेल्या मंत्र्यांच्या नेमणुकीला सिनेटची मान्यता घ्यावी लागते. परंतु सहसा सिनेट त्याच्या नेमणुकीना विरोध करीत नाही. म्हणजेच मंत्र्यांच्या नेमणुकीबाबत राष्ट्राध्यक्षाला पूर्ण स्वातंत्र्य असते.

- **मंत्रिमंडळाचा कार्यकाल व मंत्र्यांची पदच्युती :**

अमेरिकेच्या मंत्रिमंडळाचा कार्यकाल चार वर्षाचा असतो. परंतू मंत्रिमंडळातील मंत्र्यांचे अस्तित्व राष्ट्राध्यक्षाच्या मर्जीवर अवलंबून असते. कारण राष्ट्राध्यक्षाला मंत्री नेमण्याचा अधिकार आहे. तसाच त्यांना बडतर्फ करण्याचाही अधिकार आहे. एखाद्या मंत्र्याचे राष्ट्राध्यक्षाशी मतभेद झाले तर त्याला राजीनामा द्यावा लागतो. मंत्रिमंडळातील मंत्री हे नेहमी राष्ट्राध्यक्षाला जबाबदार असतात किंवा राष्ट्राध्यक्षाच्या इच्छेनुसार ते पदावर राहतात. यासंदर्भात ऑग हा विचारवंत म्हणतो, ''मंत्रिमंडळाच्या सदस्यांनी हे नेहमी लक्षात ठेवायला पाहिजे की, त्याचे मंत्रिमंडळातील अस्तित्व अध्यक्षाच्या इच्छेवर आधारित आहे. ते अध्यक्षाच्या कृपाछत्रातच कार्य करू शकतात.''

- **अध्यक्षीय मंत्रिमंडळाचे स्वरूप :**

अमेरिकेच्या अध्यक्षीय मंत्रिमंडळातील मंत्री हे कायदेमंडळाचे (काँग्रेसचे) सदस्य नसतात. आणि असल्यास मंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी त्याला काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागतो. म्हणजेच मंत्रिमंडळ हे पूर्णत: कायदेमंडळामार्फत अलिप्त असते. ते काँग्रेसच्या कामकाजात सहभागी होऊ शकत नाहीत. तसेच ते काँग्रेसमध्ये कोणतेही विधेयक मांडू शकत नाही. काँग्रेस मंत्रिमंडळावर अविश्वास ठराव आणू शकत नाही. थोडक्यात मंत्रिमंडळ व काँग्रेस एकमेकांपासून स्वतंत्र राहून कार्य करतात. त्यामुळे मंत्रिमंडळ हे कायदे मंडळाला जबाबदार नसून राष्ट्राध्यक्षाला पूर्णपणे जबाबदार असते. म्हणजे मंत्रिमंडळ हे राष्ट्राध्यक्षाचे वैयक्तिक सल्लागार म्हणून कार्य करतात. परंतु त्याचा सल्ला राष्ट्राध्यक्षावर बंधनकारक नसतो.

- **अध्यक्षीय मंत्रिमंडळाची रचना :**

अमेरिकन प्रशासनात जेवढे विभाग (खाती) असतात तेवढेच सभासद मंत्रिमंडळात असतात. अमेरिकेच्या प्रशासनात सध्या (डिसेंबर २०१२ अखेरीस) एकूण १५ खाती आहेत. त्यामुळे तेथील मंत्रिमंहळातील सदस्याची एकूण संख्या १५ आहे. प्रशासनातील वेगवेगळी खाती निर्माण करण्याचा, त्यांची रचना व कार्यक्षेत्र इत्यादी निश्चित करण्याचा अधिकार काँग्रेसला आहे. या खातेप्रमुखाची म्हणजेच मंत्र्याची नेमणूक राष्ट्राध्यक्ष सिनेटच्या संमतीने करतो. हल्ली अमेरिकेच्या मंत्रिमंडळात असणारी मंत्रीपदे व खाती पुढीलप्रमाणे–

१) परराष्ट्र व्यवहारमंत्री (परराष्ट्र खाते), २) अर्थमंत्री (अर्थ खाते), ३) संरक्षणमंत्री (संरक्षण खाते), ४) न्यायमंत्री (न्यायखाते), ५) टपाल मंत्री (टपाल खाते), ६) गृहमंत्री (गृह खाते), ७) व्यापार मंत्री (वाणिज्य खाते), ८) कृषीमंत्री (कृषी खाते), ९) मजूर मंत्री (मजूर खाते), १०) वाहतूक मंत्री (वाहतूक खाते), ११) आरोग्य मंत्री (आरोग्य, शिक्षण व समाजकल्याण खाते), १२) गृहनिर्माण व नागरी विकास मंत्री (गृहनिर्माण व शहर विकास खाते), १४) ऊर्जा मंत्री (ऊर्जा खाते), १४) निवृत्त सैनिकांबाबतचे मंत्री (निवृत्त सैनिकांबाबतचे व्यवहार खाते) १५) आंतरिक/गृहभूमी सुरक्षा मंत्री (आंतरिक / गृहभूमी सुरक्षा खाते)

अशाप्रकारे अमेरिकन अध्यक्षीय मंत्रिमंडळाची रचना आहे.

- **मंत्रिमंडळाची कार्ये :**

अध्यक्षीय शासन पद्धतीमुळे अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा संघराज्याचा घटनात्मक व वास्तव कार्यकारी प्रमुख आहे. देशाचा संपूर्ण राज्यकारभार त्याच्या नावाने चालतो. राज्यघटनेने संघराज्याची संपूर्ण कार्यकारी सत्ता एकट्या राष्ट्राध्यक्षाला दिलेली आहे. त्याला मिळालेल्या या अधिकाराची व्याप्ती लक्षात घेता आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी इतर कांहीजणांचे सहकार्य, मदत घेणे आवश्यक होते. आणि या गरजेतूनच मंत्रिमंडळाची निर्मिती व विकास झालेला आहे. थोडक्यात अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष मंत्रिमंडळाच्या सहकार्याने आपल्या कार्यकारी सत्तेचा वापर करीत असतो. साधारणतः अध्यक्षीय मंत्रिमंडळ पुढील दोन प्रकारची महत्त्वाची कार्ये करीत असते.

**१) सल्लाविषयक कार्ये :** राष्ट्राध्यक्षाला सल्ला देणे हे मंत्रिमंडळाचे प्रमुख कर्तव्य असते. राष्ट्राध्यक्ष गरज पडल्यास मंत्रिमंडळाची बैठक बोलावतो. आणि आवश्यक त्या प्रश्नासंबंधी मंत्र्यांचा सल्ला घेऊ शकतो. पण अशा प्रकारचा सल्ला विचारात घ्यावा की नाही हे राष्ट्राध्यक्षावर अवलंबून असते. मंत्रिमंडळाच्या बैठकीत विषय ठरविणे, त्यावर चर्चा घडवून आणणे व मंत्र्यांचा सल्ला घेणे इत्यादी गोष्टी या राष्ट्राध्यावर अवलंबून असतात. जर मंत्र्यांचा सल्ला योग्य असेल व राष्ट्राच्या दृष्टीने फायद्याचा असेल तर तो सल्ला मान्य करतो. थोडक्यात मंत्रिमंडळ हे राष्ट्राध्यक्षाची एक सल्लागार समिती म्हणून कार्य करते.

**२) वैयक्तिक जबाबदारीची कार्ये :** मंत्रिमंडळातील मंत्र्यांना आपल्या खात्याचे प्रमुख या नात्याने काही वैयक्तिक स्वरूपाची कार्ये करावी लागतात. खात्याच्या कारभाराबद्दल तो अध्यक्षाला जबाबदार असतो. मात्र खात्याचे कार्य ही त्याची वैयक्तिक जबाबदारी असते व त्यासाठी त्याला कार्य करण्याचे स्वातंत्र्य असते. अध्यक्ष त्यात हस्तक्षेप करीत नाही. आपाल्या खात्यासंबंधीच्या कामकाजाचे नियम करणे, आपल्या खात्यासंबंधी राष्ट्राध्यक्षाला माहिती पुरविणे, विविध धोरणाच्या व कायद्या बाबतीत अध्यक्षाला माहिती मिळवून देणे, आपल्या खात्यासंदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा करून राष्ट्राध्यक्षाला सल्ला देणे, आपल्या खात्याच्या प्रशासनाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रशासकीय नियम निर्माण करणे, खात्यातील कांही अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करणे, त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन व सूचना करणे, खात्यांतर्गत अधिकाऱ्याविरुद्ध आलेल्या तक्रार अर्जावर विचार करून निर्णय देणे, प्रशासनातील निर्माण झालेले संघर्ष, तंटे, मतभेद मिटविणे, प्रशासनावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, कामकाजासंबंधी अहवाल तयार करणे, शासनाची

धोरणे लोकांना पटवून देणे इत्यादी कार्ये मंत्री करतात. अलीकडच्या काळात मंत्री आपल्या खात्याच्या कार्याचा अहवाल तयार करून तो काँग्रेसकडे पाठवितो, काँग्रेसच्या समित्यासमोर हजर राहून खात्याची बाजू स्पष्ट करतो. काही खाते प्रमुखांना म्हणजेच मंत्र्यांना चौकशी करून निर्णय देण्याचे कार्यही करावे लगाते. उदा. स्थलांतर, वाहतूक, शेती, उद्योगधंदे, टपाल, कर आकारणी इ. गोष्टीच्याबाबतीत असा अधिकार आहे. अशाप्रकारे मंत्रिमंडळाची कार्ये आहेत.

- **मंत्रिमंडळाची कामकाजपद्धती :**

राष्ट्राध्यक्ष हा मंत्रिमंहळाचा प्रमुख किंवा स्वामी असतो. तो मंत्रिमंडळाची बैठक बोलावितो आणि तिचे अध्यक्षस्तान स्वीकारतो. सामान्यत: आठवड्यातून दोनदा म्हणजे मंगळवार व शुक्रवार या दिवशी मंत्रिमंडळाची बैठक वॉशिंग्टन येथील व्हाईट हाऊस मध्ये होत असते. आठवड्यातून किमान एकतरी बैठक भरलीच पाहिजे अशी प्रथा आहे. परंतु अशी बैठक बोलविण्याचे त्याच्यावर बंधन असते. बैठकीबाबत कोणतीही विशिष्ट पद्धती किंवा नियम नसतो. बैठकीतील कामकाजाची नोंद ठेवली जात नाही किंवा त्यातील वृत्तांत प्रसिद्धीस दिला जाता नाही. अशा बैठकीत मंत्र्यांनी चर्चा करणे, आपली मते मांडणे, अध्यक्षाला सल्ला देणे अशा स्वरूपाचे कार्य चालते. परंतु ही बैठक केवळ औपचारिक स्वरूपाची असते. कारण बैठकीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाचा असतो. बैठकीचे कामकाज हे सर्वस्वी अध्यक्षावर अवलंबून असते. कांही अध्यक्षांनी बैठकी विनोदबुद्धीने खेळीमेळीच्या वातावरणात घेतल्या आहेत. तर काही राष्ट्राध्यक्ष आधी निर्णय घेत व नंतर ते मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगत असत. अध्यक्ष जॉक्सन मंत्रिमंडळाची बैठक न घेता आपल्या मित्रांचाच सल्ला घेत असे. आयसेन हॉवरनी या सल्लागार मित्रांचे 'मित्रमंडळ' तयार केले होते. अशाप्रकारे अमेरिकेच्या अध्यक्षीय मंत्रिमंहळाचे कामकाज चालत असते.

- **अध्यक्षीय मंत्रिमंडळाचे स्थान :**

वरीलप्रमाणे राष्ट्राध्यक्षाला प्रशासनात बहुमोल सहकार्य करण्याचे कार्य मंत्रिमंडळ करीत असते. परंतु मंत्रिमंडळाच्या कार्याचे सुकाणू अध्यक्षाच्या हाती असल्यामुळे त्याच्या मर्जीप्रमाणे मंत्रिमंडळाला कार्य करावे लागते. मंत्री हे राष्ट्राध्यक्षाचे केवळ सल्लागार असतात. राष्ट्राध्यक्ष हा मंत्रिमंडळाचा निर्माता व प्रमुख असतो. तो आपल्या मर्जीप्रमाणे मंत्र्यांची नियुक्ती करतो व त्यांना पदच्युतही करू शकतो. मंत्र्याचे मंत्रिमंडळातील वर्चस्वी त्याच्यावर अवलंबून असते. मंत्री त्याला कनिष्ठ असतात. म्हणजेच त्याच्या बरोबरीचे, समानतेचे मंत्री नसतात. राष्ट्राध्यक्षाच्या तुलनेत मंत्रिमंडळाचे स्थान दुय्यम दर्जाचे असते. अध्यक्षाने सोपविलेली जबाबदारी पार पाडणे एवढेच कार्य मंत्र्याचे असते. म्हणजेच मंत्री हे अध्यक्षाचे एक प्रकारे व्यक्तीगत किंवा खाजगी सचिव म्हणून कार्य करतात. या मंत्रिमंडळाला शासनात महत्त्वाचे स्थान नाही. किंवा ते प्रत्यक्ष सरकारही नाही. मंत्रिमंडळाच्या स्थानाविषयी प्रो. ए. सी. फायनर म्हणतो, ''मंत्रिमंडळ हे अध्यक्षाला जोडलेला केवळ एक भाग आहे.'' मंत्री त्याच्या बरोबरीचे नाहीत, सहकारीही नाहीत. त्याचा सल्ला घेणे किंवा घेतलेला सल्ला स्वीकारणे हे त्याला बंधनकारक नाही. म्हणून ते अध्यक्षाचे नोकर आहेत असे म्हटले जाते. असे असलेतरी आपआपल्या खात्याचे प्रमुख व्यवस्थापक म्हणून मंत्र्यांची जबाबदारी फार मोठी आहे. थोडक्यात अमेरिकेतील मंत्रिमंडळ हे राष्ट्राध्यक्षाच्या हातातील एक साधन आहे असे म्हणता येईल.

### ३.२.३.१ स्वयं अध्ययन प्रश्न - ३

१) अमेरिकन मंत्रिमंडळाची निवड ........... करतो.

(ॲटर्नी जनरल, राष्ट्राध्यक्ष, उपराष्ट्राध्यक्ष)

२) अमेरिकन मंत्रिमंडळ ............ ला जबाबदार असते.

(प्रतिनिधी सभा, सिनेट, राष्ट्राध्यक्ष)

३) सध्या अमेरिकेच्या प्रशासनात ............ खाती आहेत.

(८, १०, १५)

४) अमेरिकन मंत्रिमंडळाची बैठक ............. या ठिकाणी भरते.

(न्यूयार्क, फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन)

## ३.३ सारांश :

अमेरिकन शासन पद्धतीचा अभ्यास करता असे दिसून येते की, तेथे शासनाच्या कायदेमंडळ (कॉंग्रेस), कार्यकारी मंडळ (राष्ट्राध्यक्ष) व न्यायमंडळ या तीन शाखा अस्तित्वात आहेत. राज्यघटनेने सत्ताविभाजन तत्त्वाचा अवलंब केला असल्यामुळे या तिन्ही शाखा आपापल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्रपणे कार्य करीत आहेत. तसेच घटनाकारानी राज्यघटनेत नियंत्रण व संतुलनाची पद्धतीचा स्वीकार केला असल्यामुळे या तिन्ही शाखा एकमेकांच्या सहकार्याने व एकमेकांच्यावर कांहीचे नियंत्रण ठेवून कार्य करताना दिसतात. यामुळे शासनाचा कोणताही विभाग शक्तिशाली किंवा वरचढ झालेला दिसत नाही. वरील प्रकरणामध्ये आपण अमेरिकन कार्यकारी मंडळातील राष्ट्राध्यक्ष, उपराष्ट्राध्यक्ष आणि अध्यक्षीय मंत्रिमंडळ या तीन प्रमुख घटकांचा सविस्तर अभ्यास केलेला आहे.

### १) राष्ट्राध्यक्ष :

अमेरिकेत अध्यक्षीय शासन पद्धती अस्तित्वात असल्यामुले राष्ट्राध्यक्ष हा घटनात्मक व वास्तव कार्यकारी प्रमुख आहे. तसेच तो संघराज्य प्रमुख व शासनप्रमुख आहे. त्याची निवड जनतेकडून अप्रत्यक्ष पद्धतीने चार वर्षासाठी केली जाते. राष्ट्राध्यक्षाच्या निवडीसाठी एक खास निर्वाचक मंडळ, निर्माण केले जाते. या मंत्रिमंडळातील प्रतिनिधीची संख्या कॉंग्रेसच्या दोन्ही सभागृहा एवढी म्हणजेच ५३५ इतकी असते. त्यांची निवड जनतेकडून केली जाते. म्हणजेच अमेरिकन जनतेकडून कॉंग्रेसच्या दोन्ही सभागृहाच्या सदस्य संख्येएवढेच दुसरे प्रतिनिधी प्रत्यक्ष निवडणूकीद्वारे निवडले जातात. आणि हे प्रतिनिधी राष्ट्राध्यक्षाच्या निवडणूकीत मतदान करतात. आणि हे प्रतिनिधी राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीत मतदान करतात. या जनतेने निवडलेल्या या प्रतिनिधीना 'अध्यक्षीय मतदार' असे म्हणतात. राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीत मतदान करणे एवढेच त्याचे कार्य असते. राष्ट्राध्यक्षाची निवडणूक दर चार वर्षानी येणाऱ्या लीप वर्षात होते. राष्ट्राध्यक्षाच्या

निवडणूक प्रक्रियेत एकूण चार टप्पे असतात. (१) निवडणूक वर्षाच्या सुरूवातीस दोन्ही राजकीय पक्षाकडून आपल्या पक्षाचे राष्ट्रीय मेळावे भरवून आपले अध्यक्षपदाचे उमेदवार निश्चित करतात. (२) नोव्हेंबर महिन्यात प्रत्यक्ष जनतेकडून अध्यक्षीय मतदारांची निवड केली जाते. (३) डिसेंबर महिन्यात अध्यक्षीय मतदाराकडून राष्ट्राध्यक्षपदासाठी मतदान केले जाते. (४) ४ जानेवारी रोजी सिनेटचा अध्यक्ष दोन्ही सभागृहाच्या उपस्थित मतमोजणी करून सर्वाधिकार मते मिळणाऱ्या उमेदवारास विजयी घाषित करतो. अशाप्रकारे निवडून आलेला उमेदवार वॉशिंग्टन येथे २० जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाकडून राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेवून अधिकार ग्रहण करतो. राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाल चार वर्षाचा असतो. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याबद्दल काँग्रेस राष्ट्राध्यक्षावर महाभियोगाचा खटला चालवून त्याला मुदतीपूर्वी पदच्युत करू शकते. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला कार्यकारी विषयक, कायदेविषयक, न्यायविषयक, परराष्ट्रधोरण व लष्कर विषयक असे महत्त्वपूर्ण अधिकार प्राप्त झाले आहेत. तसेच राष्ट्रनेता, जनतेचा नेता, पक्षनेता आणि मंत्रिमंहळाच्या प्रमुख या नात्याने त्याला महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडावी लागते. थोडक्यात वरील सर्व अधिकार पाहिले असता राष्ट्राध्यक्ष हा अमेरिकेतील शक्तीशाली व्यक्ती तर आहेच परंतु जगातील लोकशाही राष्ट्रातील सर्वात प्रभावी अधिकार संपन्न व महत्त्वाचे पद आहे.

- **उपराष्ट्राध्यक्ष :**

अमेरिकन राज्यघटनेने राष्ट्राध्यक्ष पदाबरोबरच उपराष्ट्राध्यक्षाचे पदही निर्माण केले आहे. अर्थात अध्यक्षाला घटनात्मक स्थान असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात हे पद विशेष महत्त्वाचे समजले. जात नाही. कांही कारणाने राष्ट्राध्यक्षाचे पद रिकामे झाल्यास त्या पदावर कार्य करण्यासाठी उपराष्ट्राध्यक्षपद निर्माण केले आहे. इतर वेळी उपराष्ट्राध्यक्ष हा सिनेटचा पदसिद्ध अध्यक्ष म्हणून कार्य करतो. उपाध्यक्षाची निवड अध्यक्षाच्या बरोबरीने व त्याच पद्धतीने केली जाते. निवडणूक वर्षात राष्ट्राध्यक्षाबरोबरच उपराष्ट्राध्यक्षाचा उमेदवार दोन्ही राजकीय पक्षाकडून निश्चित केला जातो. तसेच अध्यक्षीय मतदारांच्याकडून अध्यक्षाच्या निवडणुकीच्यावेळी उपाध्यक्षाची ही निवड केली जाते. उपाध्यक्षाचा कार्यकाल चार वर्षाचा असतो. काँग्रेस महाभियोगाच्याद्वारे त्याला मुदतपूर्वी पदच्युत करू शकते. संघराज्याची सत्ता एकट्या राष्ट्राध्यक्षाच्या हाती एकवटली असल्यामुळे उपराष्ट्राध्यक्षपद प्रभावहिन बनले आहे. सिनेटचा पदसिद्ध अध्यक्ष म्हणून त्याच्या अध्यक्षतेखाली सभागृहाचे कामकाज चालते. सिनेटच्या कामकाजाचे नियम व नियंत्रण करणे, सभागृहात एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास निर्णायक मत देणे व इतर अनेक अधिकार सिनेटबाबत प्राप्त झालेले आहेत. थोडक्यात राष्ट्राध्यक्षपद रिकामे झाल्यास त्या पदावर काम करीत असताना त्यास अध्यक्षपदाचे सर्व अधिकार प्राप्त होतात. मात्र इतरवेळी तो सिनेटचा अध्यक्ष म्हणून कार्य करीत असतो.

### ३) राष्ट्राध्यक्षाचे मंत्रिमंडळ (चिटणीस मंडळ)

अमेरिकेच्या कार्यकारी मंडळात राष्ट्राध्यक्ष व त्याचे मंत्रिमंडळ हे दोन महत्त्वाचे घटक आहेत. अमेरिकन राज्यघटनेत मंत्रिमंडळासंबंधी स्पष्ट तरतूद नाही. परंतु राष्ट्राध्यक्षाला राज्यकारभाराबाबत खातेप्रमुखांचा सल्ला गेता येईल अशी तरतूद आहे. त्यामुळे राजकीय गरज व संकेतानुसार राष्ट्राध्यक्षाला सल्ला देण्यासाठी मंत्रिमंडळाची निर्मिती व विकास झालेला आहे. परंतु संसदीय शासन पद्धतीप्रमाणे अध्यक्षीय मंत्रिमंडळाचे

शासनात स्थान नाही किंवा याचे राजकीय स्वरूप नाही. तर 'अध्यक्षाचे चिटणीस मंडळ' म्हणून त्याचे दुय्यम स्वरूपाचे स्थान आहे. राष्ट्राध्यक्ष आपल्या स्वमर्जीने मंत्र्याची नेमणूक करतो. म्हणजेच मंत्रिमंहळाची निवड करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य अध्यक्षाला आहे. मंत्रिमंडळ हे राष्ट्राध्यक्षाला जबाबदार असते. मंत्र्यांचे मंत्रिमंडळातील स्थान व अस्तित्व अध्यक्षावर अवलंबून असते. त्यामुळे ते अध्यक्षाचे खाजगी सचिव असल्यासारखे वागतात. अमेरिकेच्या मंत्रिमंडळात सध्या १५ खाती व १५ मंत्री आहेत. राष्ट्राध्यक्षाला राज्यकारभाराबाबत सल्ला देण्याचे व मदत करण्याचे कार्य ते करते. राष्ट्राध्यक्ष शासनाने संपूर्ण धोरण ठरवित असतो. मंत्रिमंडळ बैठकीत त्याचाच निर्णय अंतिम असतो. त्यामुळे मंत्रिमंडळ हे कनिष्ठ दर्जाचे बनले आहे.

## ३.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इत्यादी :

**काँग्रेस – अमेरिकेचे कायदेमंडळ :** प्रतिनिधीसभा व सिनेट या कायदे मंडळाच्या दोन्ही सभागृहांना मिळून काँग्रेस म्हटले जाते.

**प्रतिनिधीसभा :** काँग्रेस कनिष्ठ व जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह.

**सिनेट :** अमेरिकन काँग्रेसमधील घटकराज्यांचे प्रतिनधीत्व करणारे वरिष्ठ सभागृह.

**निर्वाचन गण :** अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाची निवड करण्यासाठी खास निर्मार केलेले मंडळ.

**चिटणीसमंडळ :** राष्ट्राध्यक्षाच्या मंत्रिमंडळाला चिटणीस मंडल किंवा सचिवमंडळ असेही म्हणतात.

**लीप वर्ष :** ज्या संपूर्ण वर्षाला चार ने भाग जातो व ज्या वर्षात फेब्रुवारी महिना २९ दिवसाचा असतो. त्याला लीप वर्ष असे म्हणतात. लीपवर्ष दर चार वर्षांनी येते.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न –१ ची उत्तरे.**

१) अध्यक्षीय २) ३५ ३) व्हाईट हाऊस.

**स्वयं अध्ययन प्रश्न –२ ची उत्तरे.**

१) अध्यक्षीय मतदार २) ४ ३) सिनेट ४) काँग्रेस

**स्वयं अध्ययन प्रश्न –३ ची उत्तरे.**

१) राष्ट्राध्यक्ष २) राष्ट्राध्यक्ष ३) १५ ४) वॉशिंग्टन.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाची निवडणूक प्रक्रिया थोडक्यात सांगा.

२) अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचे अधिकार, कार्ये व स्थान थोडक्यात स्पष्ट करा.

३) अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षाची निवड, अधिकार व कार्ये थोडक्यात सांगा.

४) अमेरिकन अध्यक्षीय मंत्रिमंडळाचे स्वरूप, अधिकार व कार्ये थोडक्यात विशद करा.

५) 'अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा जगातील सर्वात प्रभावशाली कार्यकारी प्रमुख आहे.' यावर भाष्य करा.

६) 'अध्यक्षीय मंत्रिमंडळ हे राष्ट्राध्यक्षाच्या हातातील साधन आहे' यावर भाष्य करा.

**ब) टिपा लिहा.**

१) अमेरिकन राष्ट्राध्यक्षाची निवडणूक प्रक्रिया

२) राष्ट्राध्यक्षाचे स्थान

३) उपराष्ट्राध्यक्ष.

४) अध्यक्षीय मंत्रिमंडळ

५) अध्यक्षीय मतदार

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) देवगांवकर एस. जी. - पाच देशांची संविधाने, श्री साईनाथ प्रकाशन, नगापूर.

२) पाटील भा. भि. - राज्यघटनांचा तौलनिक अभ्यास, श्री. मंगेश प्रकाशन, नगापूर.

३) पाटील विलास भ. - निवडक राज्यघटना, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे - ३०

४) पाटील बी. बी. - अमेरिका आणि फ्रान्सची राज्यघटना, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५) तिजारे रा. अ., कुलकर्णी मं. पा. - तुलनात्मक प्रशासन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) येरणकर श्रीराम - तुलनात्मक शासन आणि राजकारण, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

७) लोटे रा. ज. - आधुनिक राजकीय व्यवस्था, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

८) शास्त्री चंद्रशेखर य. - प्रमुख देशांची शासनप्रणाली, पायल प्रकाशन, लक्ष्मीनगर, नागपूर.

९) देशमुख अलका - तौलनिक शासन आणि राजनिती, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

१०) घांगरेकर चिं. ग. - तुलनात्मक राजकीय विश्लेषण, कॉन्टिनेनन्टल प्रकाशन, पुणे.

११) Khanna V. N. – Major Political system, Chand and Company, Delhi.

१२) Bhushan Vidya – Comparative Politics, Atlantic Publication and Distributors.


❖ ❖ ❖

**घटक – ४**

# अ) न्यायमंडळ – रचना व कार्ये

# ब) राजकीय पक्षपद्धती

**घटक संरचना :**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ अमेरिकन न्यायमंडळ

 ४.२.२ राजकीय पक्ष

४.३ सारांश

४.४ पारिषाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं: अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठीचे प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठीची संदर्भ ग्रंथ

**४.० उद्दिष्टे :**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

- अमेरिकन न्यायमंडळाची रचना, अधिकारक्षेत्र व कार्यपद्धतीचा परामर्श घेता येईल.
- अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार स्पष्ट करता येईल.
- अमेरिकेतील राजकीय पक्षपद्धतीचे स्वरूप विशद करता येईल.
- अमेरिकेतील राजकीय पक्षाची वैशिष्ट्ये व दबाव गटांची भूमिका लक्षात येईल.

**४:१ प्रस्तावना :**

**अ) अमेरिकेचे न्यायमंडळ :**

न्यायमंडळ हा शासनसंस्थेचा तिसरा महत्त्वाचा विभाग होय. खाजगी व्यक्तिमधील खटले सोडविण्याबरोबरच

कायद्याचा अर्थ लावणे आणि न्यायदान करणे ही न्यायमंडळाची महत्त्वाची कार्ये होत. व्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण करणे. देशात कायद्याचे राज्य प्रस्थापित करून शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवणे इत्यादी महत्त्वपूर्ण भूमिका न्यायमंडळाची आहे. कोणत्याही चांगल्या राजकीय व्यवस्थेत कार्यक्षम व नि:पक्षपाती न्यायमंडळाला महत्त्वाचे स्थान असते. कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ यांच्या हस्तक्षेपापासून व नियंत्रणापासून मुक्त किंवा स्वतंत्र असणारे नि:पक्ष न्यायमंडळ हे आदर्श न्यायव्यवस्थेचे लक्षण होय. अशाप्रकारे न्यायमंडळ हे शासनाचे अत्यंत महत्त्वपूर्ण अंग आहे. लॉर्ड ब्राईस यांच्या मते 'कार्यक्षम न्यायव्यवस्था ही उत्कृष्ट शासनसंस्था निर्माण करून नागरिकांना कायद्याच्या राज्याची हमी देऊ शकते. न्यायसंस्था केवळ राज्यघटनेतील कलमांचा, तत्त्वांचा अर्थ लावीत असते असे नाही तर त्याबरोबरच त्या कलमांच्या, तत्त्वांच्या संरक्षणाची जबाबदारी न्यायसंस्थेवर असते. न्यायमंडळ आपल्या पुनर्विलोकनाच्या अधिकाराद्वारे कायद्यांची घटनात्मकता पडताळून पाहते. व्यक्तिस्वातंत्र्याबरोबरच संघराज्याची स्वायत्तता आणि अधिकार सुरक्षित ठेवण्याचे कार्य न्यायमंडळाला करावे लागते. मध्यवर्ती सत्ता व घटकराज्यांची सत्ता यामध्ये संघर्ष उद्भवल्यास त्यासंबंधी न्यायनिवाडा करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका न्यायसंस्थेला पार पाडावी लागते.

**अमेरिकेचे न्यायमंडळ :** अमेरिकेत दुहेरी स्वरूपाची न्यायदान व्यवस्था आहे. अमेरिकन राज्यघटनेच्या तिसऱ्या कलमानुसार संघीय न्यायालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. घटकराज्याची न्यायालये व संघीय न्यायालये अशी दुहेरी न्यायव्यवस्था अमेरिकेत आहे. अमेरिकेत सर्वोच्च न्यायालयाची स्थापना १७८९ मध्ये झाली. सांघीक न्यायशाखेची श्रेणीबद्ध रचना असून तिच्या शिरोभागी एक सर्वोच्च न्यायालय त्याखाली प्रादेशिक स्तरावर अपीलाची न्यायालये आणि त्याखालील जिल्हा न्यायालये आहेत. तसेच अपिलाची न्यायालये व जिल्हा न्यायालये यांची स्थापना करण्याचा अधिकार संविधानाने काँग्रेसला दिला आहे. अमेरिकन राज्यघटनेने सत्ताविभाजन तत्त्वाचा स्वीकार केल्यामुळे न्यायमंडळाचे स्वातंत्र्य सुरक्षित आहे. तसेच संघराज्याचा स्विकार केलेला असल्यामुळे तेथे सर्वश्रेष्ठ सांघिक न्यायालय निर्माण झाले आहे.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ अमेरिकन न्यायमंडळ :

- **सर्वोच्च न्यायालय :**

अमेरिकेत सर्वोच्च न्यायालय हे एकच घटनानिर्मित संघराज्य न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयाची ओळख करून घेतल्याशिवाय अमेरिकन राजकारणाचे स्वरूप स्पष्ट होऊ शकत नाही. घटनानिर्मात्यानी त्यांना पूज्य असणाऱ्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती केली.

- **रचना :**

सर्वोच्च न्यायालयात एक सरन्यायाधिश व इतर आठ न्यायाधीश असे एकूण नऊ न्यायाधीश असतात. ही संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार काँग्रेसला आहे. जॉन जे हे अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाचे पहिले न्यायाधीश होत.

- **नियुक्ती :**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक करण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे. मात्र अध्यक्षाने केलेल्या नेमणूकींना सिनेटची संमती मिळणे आवश्यक असते. कायदा आणि न्यायक्षेत्रात पारंगत असणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली जाते.

- **कार्यकाल :**

घटनेप्रमाणे चांगली वर्तणूक असेपर्यंत न्यायाधीश आपल्या पदावर राहू शकतो. १९३७ च्या कायद्याप्रमाणे सत्तराव्या वर्षानंतर त्यांना निवृत्त होता येते.

- **पदच्युती :**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाला महाभियोगाच्या पद्धतीने पदच्युत करण्याची तरतूद संविधानात आहे. न्यायाधिशावर राष्ट्रद्रोह, लाचलुचपत, भ्रष्टाचार किंवा इतर एखाद्या गंभीर स्वरूपाचा गुन्हा केला असेल तर महाभियोगाच्या पद्धतीने त्याला पदच्युत करता येते. यासाठी प्रतिनिधीगृहाने साध्या बहुमताने संबंधित न्यायाधिशाविरुद्ध आरोपपत्र मंजूर केल्यास व त्या आरोपपत्रांची सिनेटकडून चौकशी होऊन त्या आरोपपत्रास २/३ बहुमताने मंजूरी दिल्यास त्या दिवसापासून न्यायाधिशाला पदमुक्त केले जाते. अशा प्रकारचा महाभियोग १८०५ साली न्यायमूर्ती सॅम्युअल चेजच्या विरुद्ध चालविला होता. परंतु आरोप सिद्ध न झाल्याने त्याला पदच्युत करता आले नाही. १९८६ मध्ये न्यायाधिश ॲलसी हेस्टींग्ज यांना मात्र महाभियोगाद्वारे कॉंग्रेसने पदच्युत केले होते.

- **वेतन :**

न्यायाधिशांचे वेतन ठरविण्याचा अधिकार कॉंग्रेसला आहे. न्यायाधिशांना उच्च वेतन दिले जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशाला वार्षिक ३५,५०० डॉलर्स आणि सहन्यायाधीशांना ३५,००० डॉलर्स वार्षिक वेतन देण्यात येते. याशिवाय राहण्यास मोफत निवासस्थान व इतर सुविधा, निवृत्तीनंतर निवृत्तीवेतन दिले जाते.

- **कार्यपद्धती :**

सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज विशिष्ट क्रमाने व विशिष्ट पद्धतीने चालते. वर्षातून फक्त नऊ महिने म्हणजेच ऑक्टोबर ते जूनपर्यंत चालते. प्रत्येक खटल्याच्या सुनावणीच्या वेळी सर्व न्यायाधिश उपस्थित असतात व निर्णय जाहीर करण्याच्यावेळी कमीतकमी सहा न्यायाधीश एकत्र बसून बहुमताने निर्णय घेतात व सोमवारी तो जाहीर केला जातो. खटल्याच्या सुनावणीच्या वेळी सरन्यायाधीश हा व्यासपिठाच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतो. समान मते पडल्यास खटल्याची पुन्हा सुनावणी होते.

- **सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र :**

अमेरिकन घटनेने सर्वोच्च न्यायालयाला व्यापक अधिकार दिले आहेत. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे

करता येईल.

१) प्रारंभिक अधिकारक्षेत्र

२) पुनर्विचाराचे अधिकारक्षेत्र

३) घटनेचा अर्थ लावण्याचा अधिकार

४) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार.

**१) प्रारंभिक अधिकारक्षेत्र :**

ज्या खटल्याचा प्रारंभ फक्त सर्वोच्च न्यायालयात होऊ शकतो. अशा सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकाराला प्रारंभिक अधिकार क्षेत्र असे म्हणतात. या अधिकारक्षेत्रात पुढील प्रकारचे खटले किंवा वाद येतात.

अ) संघसरकार आणि एक किंवा अनेक घटकराज्ये यांच्यामधील वाद, एक किंवा एकापेक्षा जास्त घटक राज्ये एका बाजूला विरुद्ध एक किंवा एकापेक्षा जास्त घटक राज्य यांच्यातील वाद या बाबतचा खटला प्रथम सर्वोच्च न्यायालयातच दाखल करता येतो.

ब) राजदूत, व्यापारी, प्रतिनिधी, संधी, नौसेना आणि सामुद्रिक दळणवळण ज्यात संयुक्त राज्य अमेरिका एक पक्ष असेल असे खटले प्रथम सर्वोच्च न्यायालयातच दाखल करता येतात.

क) नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही सुद्धा सर्वोच्च न्यायालयाला पार पाडावी लागते. या संदर्भातील खटले सुद्धा या न्यायालयात प्रथम येतात व त्यासाठी सर्वोच्च न्यायालय आवश्यकतेनुसार बंदी प्रत्यक्षीकरण प्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिषेध अशा स्वरूपाच्या आज्ञा काढू शकते.

**२) पुनर्निर्णयात्मक अधिकार क्षेत्र :**

सर्वोच्च न्यायालयाच्या पुनर्निर्णयात्मक अधिकारक्षेत्रात येणारे खटले म्हणजे असे खटले असतात की जे संघराज्याची कनिष्ठ न्यायालये किंवा घटक राज्याची उच्च न्यायालये यांनी दिलेल्या निकालाविरुद्ध पुनर्विचारासाठी या न्यायालयापुढे येतात. सामान्यत: पुढील प्रकारचे खटले या न्यायालयाकडे पुनर्निर्णयासाठी येतात.

अ) ज्या वादात घटक राज्याच्या न्यायालयाने एखाद्या घटक राज्याचा कायदा, संघराज्याची घटना, कायदा किंवा तह यांना विसंगत असूनही वैध ठरविला असेल.

ब) संघराज्याचा कायदा आंतरराष्ट्रीय करार किंवा तह अवैध ठरविला असेल.

क) संघराज्याच्या अपिलीय सर्किट न्यायालयाने घटक राज्याचा कायदा अवैध ठरविला असेल आणि उच्च न्यायालय ते मानण्यास तयार नसेल तर अशा प्रकारचे खटले सर्वोच्च न्यायालयाकडे फेरविचारासाठी येतात.

ड) घटकराज्यातील न्यायालया समोर किंवा इतर कनिष्ठ सांघिक खटले कनिष्ठ न्यायालयात चालू असतील तर ते खटले सर्वोच्च न्यायालयच स्वत:कडे वर्ग करून घेवू शकते.

इ) जिल्हा न्यायालयात चालू असलेल्या खटल्यात घटनात्मक प्रश्न निर्माण झाला असेल आणि तसे प्रमाणपत्र संबंधित न्यायालयाने दिले असल्यास अशा खटल्याचा फेरविचार या न्यायालयाकडून केला जातो. या प्रकारचे खटले पुनर्निर्णयासाठी सर्वोच्च न्यायालयात येतात. सर्वोच्च न्यायालय अशा खटल्यांची संपूर्ण चौकशी करून निर्णय देते.

**३) संविधानाचा अर्थ लावण्याचा अधिकार :**

लिखीत संविधानातील तरतुदीच्या अर्थावरून विवाद निर्माण होतात. घटनातज्ञांनी राज्य प्रशासनाची निश्चित रुपरेषा तयार केली. परंतु ती संक्षिप्त स्वरूपाची होती. त्यामुळे तिचा अर्थ लावण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाकडे सोपविलेली आहे. राज्यघटनेत निरनिराळ्या शासन विषयक संस्थांची रचना दिलेली आहे. त्यांच्या अधिकारासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या व्याख्या सर्वांवर बंधनकाकर असतात. तसेच त्या सर्वांना मान्य असतात. संविधानातील शब्दांचा अर्थ विशिष्ट काळातील परिस्थिती लक्षात घेऊन न्यायालयांनी लावला तरच प्रत्येक गोष्टीसाठी घटनादुरुस्ती करून मूळ घटनेत बदल करण्याची गरज राहत नाही. म्हणून सर्वोच्च न्यायालयाचा हा अधिकार महत्त्वाचा आहे.

**४) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार :**

कायदेमंडळाने केलेले कायदे, कार्यकारी मंडळाचे अध्यादेश घटनेतील मूळ नियमांशी सुसंगत आहेत की विसंगत आहेत यासंबंधी निर्णय देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकाराला पुनर्विलोकनाचा अधिकार असे म्हणतात. न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार ही अमेरीकेच्या राज्यघटनेची देणगी मानली जाते. मात्र अमेरिकन राज्यघटनेत तसा स्पष्ट उल्लेख नाही. तथापी राज्यघटना आणि तिच्याशी सुसंगत असलेले संघराज्य कायदे राष्ट्राचा सर्वनेष्ठ कायदा होय असे स्पष्टपणे संविधानात म्हटले आहे. याचा आधार घेऊन सरन्यायाधिशांनी न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या तत्त्वाची प्रतिष्ठापना केली. अमेरिकेच्या घटनेतील कलम ३ व कलम ६ मध्ये घटनात्मक कायद्याचे श्रेष्ठत्व स्पष्ट केले असून न्यायालयाचे अधिकार सर्व घटनात्मक तरतुदी संबंधीच्या खटल्यांना बंधनकारक असतील असे म्हटले आहे.

अध्यक्ष जेफरसन यांनी असे मत मांडले होते की, केंद्र सरकारच्या कायद्याची घटनात्मकता ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला नाही असा अधिकार न्यायमंडळाला देणे म्हणजे सत्ताविभाजनाच्या तत्त्वाला हरताळ फासण्यासारखे होय. परंतु सरन्यायाधीश मार्शल यांनी मारबारी विरुद्ध मेडिसन व मॅकलॉक वि. मेरिलॅड या खटल्याचा निर्णय देताना नि:संदिग्धपणे स्पष्ट केले की, सर्वाच्च न्यायालयाला हा अधिकार आहे. इ.स. १८०० साली अध्यक्षीय निवडणूकीत अध्यक्ष जॉन ॲडम्स पराभूत झाले व जेफरसन अध्यक्ष म्हणून निवडले गेले. जेम्स मॅडीसन हा अध्यक्ष जेफरसन याचा सेक्रेटरी ऑफ स्टेट होता. त्याच्या विरुद्ध विल्यम मारबरी याने मँडॅमसचा अर्ज करून मॅडीसनने मारबरीच्या नेमणूकीचा अडवणूक ठेवलेला आदेश काढण्यास

सांगावे अशी विनंती केली होती. सर्वोच्च न्यायालयाने कोणताही आदेश दिला तरी तो मानायचा नाही असे अध्यक्ष जेफरसन आणि मॅडिसन यांनी ठरविले होते. याची पूर्ण कल्पना न्यायाधिश जॉन मार्शल यांना होती. २४ फेब्रुवारी १८०३ रोजी सरन्यायाधिश मार्शल यांनी निर्णय दिला की, सेक्रेटरी ऑफ स्टेट विरुद्ध सुद्धा मँडॅमसचा आदेश देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहे. मात्र काँग्रेसच्या ज्या कायद्यानुसार हा हक्क वापरावयाचा आहे. तो कायदा संविधानाच्या तिसऱ्या कलमांशी विसंगत आहे म्हणून हा हक्क अवैध आहे. आणि त्यामुळे सेक्रेटरी ऑफ स्टेटला असा आदेश देता येत नाही. या निर्णयाने न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार प्रस्थापित झाला. हा निर्णय देताना जॉन मार्शल यांनी स्पष्ट सांगितले की, सर्वोच्च न्यायालयास कायदेमंडळाच्या कायद्याची घटनात्मकता तपासून पाहण्याचा अधिकार आहे. अमेरिकेचे संविधान लिखित असून तिने कायदेमंहळाच्या अधिकारांवर काही मर्यादा घातल्या आहेत. तसेच संविधान हा सर्वश्रेष्ठ कायदा आहे. म्हणून कायदेमंडळाच्या कायद्यापेक्षा घटनात्मक कायदा श्रेष्ठ ठरतो. अशा परिस्थितीत संविधानाचे संरक्षण करण्यासाठी काँग्रेसने केलेला कायदा संविधानाशी सुसंगत आहे की नाही याची तपासणी करण्याचा अधिकार न्यायालयाचा निश्चित आहे. जॉन मार्शलच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे सर्वोच्च न्यायालयाला 'पुनर्विलोकनाचा अधिकार प्राप्त झाला. जॉन मार्शलच्या या निर्णयात पुढील चार निष्कर्ष अंतर्भूत होते.

१) लिखित संविधानानुसार शासनाच्या अधिकार कक्षा निश्चित आहेत.

२) संविधान मूलभूत कायदा असल्याने कायदेमंडळाच्या कायद्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

३) राज्यघटनेशी विसंगत असणारा काँग्रेसचा कोणताही कायदा घटनाबाह्य असून तो न्यायालयावर बंधनकारक नसतो.

४) न्यायाधीशांचे घटनादत्त न्यायालयीन अधिकार व घटनेच्या संरक्षणाची न्यायाधिशांना घ्यावी लागणारी शपथ या संदर्भात काँग्रेसने केलेले घटनेशी विसंगत कायदे घटनाबाह्य आहेत. असे न्यायाधिशांनी जाहीर केले पाहिजे.

न्यायमूर्ती ह्यूज म्हणतात ''आम्ही घटनेच्या चौकटीत आहोत. परंतु न्यायाधीश म्हणतात तीच अमेरिकेची घटना असते. अर्थात असे असले तरी आतापर्यंत अतिशय काळजीपूर्वक अभ्यास करूनच सर्वोच न्यायालयाने या अधिकाराचा उपयोग केला आहे. या अधिकाराचा वापर करून अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचा वापर करून अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने अनेक कायदे व अध्यादेश घटनाबाह्य ठरवून रद्द केलेले आहेत. उदा. १८५७ मध्ये मिसुरी करार, १८९५ मध्ये राष्ट्रीय आयकर कायदा इ. अमेरिकेच्या न्यायालयीन पुनर्विलोकन अधिकारामुळे सर्वोच्च न्यायालयाला राज्यघटनेचे संरक्षण करता आले. नागरिकांचे रक्षण करून सर्वोच्च न्यायालयाने आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित केले आहे.

- **सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्व :**

अमेरिकेच्या शासनपद्धतीत या न्यायालयास महत्त्वाचे स्थान आहे. न्यायमूर्ती हॅस्कीन यांनी शासकीय यंत्रणेतील समतोल राखणारे चक्र असे त्याचे वर्णन केले आहे. तर डॉ. फायनर यांनी अमेरिकन सांघिक

संरचनेला मजबूत करणारे सिमेंट असे म्हटले आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने संविधानाचे, संघराज्य पद्धतीचे व नागरिकांचे स्वातंत्र्याचे संरक्षक या नात्याने केलेले कार्य उल्लेखनीय आहे. म्हणजेच संविधानातील ज्या गोष्टी सर्वसामान्यांना दिसत नाहीत. त्या गोष्टी सर्वोच्च न्यायालय वाचवू शकते. आधूनिक काळातील राजकीय अभ्यासकांना धोरण निर्धारित करण्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे असे वाटते.

- **राजकीय पक्षपद्धती :**

आधुनिक काळातील शासनपद्धतीमध्ये राजकीय पक्षांना स्थान आहे. राजकीय पक्षपद्धतीशिवाय लोकशाहीची कल्पना अव्यवहार्य आहे. मॅक आयव्हर यांच्या मते राजकीय पक्ष ही विशिष्ट तत्त्व व धोरण यावर अधिष्ठीत अशी जनतेची संघटना आहे की जी घटनात्मक मार्गाने शासनाची सत्ता आपल्या हाती यावी यासाठी प्रयत्नशील असते. आधुनिक काळात खुल्या आणि बंदिस्त अशा दोन्ही प्रकारच्या राज्यव्यवस्थे मध्ये राजकीय पक्ष हे समाजाने ठरवून दिलेल्या मार्गानी सत्तेपर्यंत पोहचण्याची गुरुकिल्ली आहे. राजकीय पक्षामुळे शासनाला नेतृत्व मार्गदर्शन, दिशा व कार्यप्रेरणा मिळते. जनता राजकीयदृष्ट्या संघटित व जागृत होते. प्रा. मन्रो यांच्या शब्दात 'लोकशाही शासन' हे पक्षीय शासनाचे दुसरे नाव आहे. राजकीय पक्षपद्धती शिवाय कोणतीही लोकशाही शासन प्रणाली कार्य करू शकत नाही. राजकीय पक्ष देशातील जनतेला राजकीय शिक्षण प्रदान करताना लोकशाहीमध्ये कायदेशीर आणि शांततेच्या मार्गाने सत्ता प्रस्थापित करण्याचे कार्य राजकीय पक्षानाच करावे लागते. राजकीय समाजीकरणाचे कामही राजकीय पक्षानाच करावे लागते. ज्या राजकीय पक्षाला बहुमत प्राप्त होते. तो पक्ष सत्ताधारी बनतो तर ज्या पक्षाना अल्पमत प्राप्त होते ते पक्ष विरोधी पक्षाची भूमिका बजावतात. थोडक्यात प्रजातंत्रामध्ये शासनाच्या विविध घटकांमध्ये समन्वय निर्माण करण्याचे कार्य राजकीय पक्ष करीत असतात. या प्रकरणात अमेरिकेतील राजकीय पक्ष पद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**अमेरिकेतील राजकीय पक्षपद्धतीचे स्वरूप :** अमेरिका हे द्विपक्ष पद्धतीचे ठळक उदाहरण मानले जाते. तेथे डेमॉक्रॅटीक व रिपब्लिकन पक्ष हे दोन प्रमुख पक्ष आहेत. अमेरिकेच्या शासनव्यवस्थेवर प्रामुख्याने याच दोन पक्षांचा प्रभाव आढळून येतो. अध्यक्ष आणि राज्यपालांच्या निवडणूक पद्धतीमुळे द्विपक्ष पद्धती अमेरिकेत विकसित झाली. आणि एक सदस्य निर्वाचन क्षेत्र मान्य करण्यात आल्यामुळे द्विपक्षपद्धतीला प्रोत्साहन मिळाले. अमेरिकेत राजकीय पक्षांची बीजे अमेरिकन घटना तयार करण्यासाठी आयोजित केलेल्या फिलाडेल्फिया संमेलनात रोवली गेली. या सम्मेलनात हेमिल्टनच्या नेतृत्वाखाली शक्तिशाली केंद्र सरकारचे समर्थन करणारा एक गट होता. तर दुसरा गट जेफरसनच्या नेतृत्वात राज्यांची स्वायत्तता आणि नागरी स्वतंत्रता समर्थकांचा होता. या दोन्ही गटांना अनुक्रमे संघवादी (Federalists) आणि संघविरोधी (Antifederalists) म्हटले जात होते. अशा परस्परविरोधी विचारसरणीतून अमेरिकेत राजकीय पक्षाचा उदय व विकास झाला.

इ.स. १७९६ च्या अध्यक्षीय निवडणूकीत राजकीय पक्षांनी उघडपणे भाग घेतला. जॉन ॲडम्सच्या

नेतृत्वाखाली फेडरॅलिस्ट पक्ष तर जेफरसनच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्ष असे दोन पक्ष या निवडणूकीत उतरले. यावेळी रिपब्लिकन ॲडम्स हे अध्यक्षपदी निवडून आले. तर १८०० च्या निवडणूकीत रिपब्लिकन नेते जेफरसन अध्यक्ष म्हणून निवडून आले. इ.स. १८०० नंतर फेडरॅलिस्ट पक्षाचा प्रभाव कमी होत गेला. जेफरसनच्या नेतृत्वाखाली पक्षाला डेमॉक्रेटीक-रिपब्लिकन या नावाने ओळखले जाऊ लागले व इ.स. १८२४ च्या अध्यक्षीय निवडणुकीच्यावेळी या पक्षात फूट पडून जॉन ॲडम्सच्या नेतृत्वाखालील नॅशनल रिपब्लिकन पक्ष व ॲड्र्यू जॅक्सनच्या नेतृत्वाखालील डेमॉक्रॅटीक पक्ष असे दोन वेगवेगळे पक्ष अस्तित्वात आले. इ.स. १८३४ मध्ये नॅशनल रिपब्लिकन पक्षाने व्हिग पक्ष हे नाव धारण केले. पुढे अमेरिकेत गुलामगिरीच्या प्रश्नाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. गुलामगिरीच्याप्रथेला विरोध करणारा एक नवा राजकीय पक्ष स्थापन झाला. हा पक्ष रिपब्लिकन पक्ष या नावाने ओळखला जाऊ लागला. पूर्वीच्या व्हीग पक्ष या नव्या पक्षात विलीन झाला. यानंतरच्या काळात अमेरीकेच्या राजकारणात रिपब्लिकन पक्ष व डेमॉक्रॅटिक पक्ष हे दोनच पक्ष स्थिर झाले. अध्यक्षीय निवडणूकीत याच दोन पक्षांचे उमेदवार आलटून पालटून निवडून येत राहिले.या दोन पक्षाशिवाय आणखीही काही लहान पक्ष अमेरिकेत आहेत, परंतु ते प्रभावी नाहीत.

- **अमेरिकेतील राज पक्षपद्धतीची वैशिष्ट्ये :**

रिपब्लीकन व डेमॉक्रॅटीक या दोन राजकीय पक्षांना महत्त्वाचे स्थान आहे. अमेरिकन राजकीय पक्षपद्धतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) द्विपक्षपद्धती :**

अमेरिकन पक्षपद्धतीचे ठळक वैशिष्ट म्हणजे द्विपक्ष पद्धत होय. अमेरिकेतील जनतेनेही या दोनच पक्षांना समर्थन दिले आहे. या दोनच पक्षांचे कॉंग्रेसवर वर्चस्व राहिले आहे. याला अमेरिकेची निवडणूक पद्धती राजकीय पक्षांची विकेंद्रीत रचना आणि अध्यक्षीय शासन पद्धती ही महत्त्वाची कारणे आहेत.

**२) तत्त्व किंवा सिद्धांतामधील समानता :**

परस्परविरोधी राजकीय सिद्धांतावर आधारित असे राजकीय पक्ष अमेरिकेत निर्माण झाले नाहीत. दोन्हीही पक्ष अमेरिकेतील सर्व वर्गाचे प्रतिनिधीत्व करतात. कमी जास्त फरकाने दोहोही भांडवलशाहीचा पुरस्कार करतात. परराष्ट्रधोरण, आर्थिक धोरण सामाजिक सुरक्षितता, बेकारी भत्ता, मजूरांचा आर्थिक दर्जा या बाबत दोन्ही पक्षांमध्ये फार मोठे मतभेद नाहीत.

**३) स्थानिक गट प्रभावी :**

रिपब्लिकन व डेमोक्रॅटिक हे दोन्ही राजकीय पक्ष अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या निवडणूकीत सक्रिय सहभागी असतात. परंतु दोन्ही पक्ष स्थानिक गटांना अधिक महत्त्व देतात. स्थानिक गटांचा प्रभाव दोन्ही राजकीय पक्षावर एवढा असतो की, त्यांना स्थानिक व घटकराज्यांशी संबंधित विविध पदांसाठी होणाऱ्या निवडणुकीमध्ये अधिक लक्ष घालावे लागते. राष्ट्रीय स्तरावरील राजकारण करताना पाया मजबूत करण्यासाठी स्थानिक गटांना महत्त्व द्यावे लागते.

**४) पक्षशिस्तीचा अभाव :**

अमेरिकेतील जनता पक्षनिष्ठ असण्याऐवजी देशनिष्ठ आहे. रिपब्लिकन आणि डेमॉक्रॅटिक पक्षाचे सिनेटसदस्य आपआपल्या पक्षाच्या आदेशानुसारच सभागृहात मतदान करतील अशी खात्री सदस्यांनी पक्षशिस्तीचे काटेकारेरपणे पालन केलेच पाहिजे असे नाही. वरिष्ठ पातळीवरील नेते कनिष्ठ पातळीवरील नेत्यांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवू शकत नाहीत. पक्षशिस्त मोडल्यास कडक शिस्तभंगाची कारवाई केली जात नाही. पक्षशिस्तीचा अभाव आढळतो.

**५) पक्षसंघटन :**

अमेरिकेतील राजकीय पक्षांची पाळेमुळे वैचारिक किंवा तात्त्विक स्वरूपाची नसून संघटनात्मक आहेत. दोन्ही पक्षांची संघटना देशव्यापी आहे. प्रत्येक खेड्यात व शहरात पक्षांच्या शाखा असून त्या वरील पातळीवरील घटकांशी संलग्न आहेत. पक्षाचे सदस्यपक्षाचा कार्यक्रम लोकांच्यापर्यंत पोहचविताना दिसतात. दोन्ही पक्षात नियमित वेतन घेऊन पक्षकार्य करणारे कार्यकर्ते आहेत. राष्ट्रीय प्रादेशिक व स्थानिक अशा तीनही स्तरावर पक्षाची मजबूत संघटना कार्यरत आहेत.

**६) विविध वर्गाचे प्रतिनिधीत्व :**

अमेरिकेतील राजकीय पक्ष हे समाजातील विविध गटांचे प्रतिनिधीत्व करतात. समाजातील विविध गटांचे हितसंबंध जोपासताना दिसतात. प्रादेशिकता, धार्मिकता, सामाजिकता, वांशिकता, उद्योजक, कामगार व्यवसायीक संघटना इ. आधारावर निर्माण झालेले जे गट आहेत त्यांचे हितसंबंध जोपासण्यावर भर दिला जातो.

**६) दबावगटांचा प्रभाव :**

अमेरिकेच्या राजकारणात विविध प्रकारचे दबावगट आपला प्रभाव पाडताना दिसतात. अनेक खाजगी संस्था, संघटना आपले हितसंबंध जोपासण्यासाठी सरकारवर दबाव आणून आपले प्रश्न सोडवून घेतात. उदा. उद्योगपतींचा गट, कामगार, संघटना शेतकरी, शिक्षक, मजूर, स्त्रियांचा गट इ. दबावगट राजकीय दबाव पाडतात व याची दखल राजकीय पक्षांना घ्यावीच लागते.

## ४.२.२ राजकीय पक्षांच्या संघटना :

अमेरिकेच्या राजकीय पक्षांच्या संघटनेचे दोन भाग आहे.

१) काँग्रेसमधील संघटना

२) काँग्रेस बाहेरील संघटना.

**१) काँग्रेसमधील संघटना :**

काँग्रेसच्या दोन्ही सभागृहापैकी प्रतिनिधीगृहातील संघटना जास्त महत्त्वाची असते. प्रतिनिधीगृहात

प्रत्येक पक्षाचे जितके सदस्य असतात त्या सर्वांची एक पक्षपरिषद असते. या पक्षपरिषदेला 'कॉकस' असे म्हणतात. या परिषदेमधून एक मार्गदर्शक समिती निवडली जाते. प्रतिनिधीगृहातील पक्षनेता ह्या समितीचा अध्यक्ष असतो. तो पक्षप्रतोद व इतर अधिकारी यांची निवड करण्याचे कार्य करीत असतो. पक्ष प्रतोदाच्या सहकार्याने तो प्रतिनिधी गृहातील कामकाजासंबंधी आपल्या पक्षाचे ध्येयधोरण ठरवितो. तसेच आपल्या पक्षाच्या सदस्यांना मार्गदर्शन करीत असतो.

**२) काँग्रेसबाहेरील संघटना :**

काँग्रेस बाहेरील दोन्ही पक्षाचे संघटन खालीलप्रमाणे असते.

**अ) राष्ट्रीय परिषद :** राष्ट्रीय स्तरावर प्रत्येक राजकीय पक्षाची एक राष्ट्रीय परिषद असते. तिचे अधिवेशन अध्यक्षीय निवडणूकीच्या दरम्यान म्हणजे दर चार वर्षांनी भरते. या अधिवेशनाला सर्व घटक राज्यांतील पक्षप्रतिनिधी उपस्थित राहतात. त्यांची संख्या सुमारे दोन हजार असते. राष्ट्रीय परिषदेच्या अधिवेशनात अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदासाठी उमेदवारांची निवड केली जाते. याशिवाय पक्षाचे धोरण ठरविणे व राष्ट्रीय समितीची निवड करणे इ. कार्ये ही परिषद करते.

**ब) राष्ट्रीय समिती :** राष्ट्रीय समितीने प्रत्येक राज्यातील एक स्त्री व एक पुरुष यांचा समावेश असतो. त्यांचा कार्यकाळ चार वर्षाचा असतो. या समितीच्या अध्यक्षाची निवड पक्षाच्या अध्यक्षीय उमेदवाराकडून केली जाते. अध्यक्षीय निवडणूक मोहिमेचे सूत्र संचालन करणे, राष्ट्रीय अधिवेशनाचे व्यवस्थापन करणे इ. कामे ही समिती करीत असते. ही समिती दोन उपसमित्यांची नियुक्ती करते. (i) सिनेट निवडणूक मोहिम समिती, (ii) काँग्रेस निवडणूक मोहिम समिती.

**क) राज्यपरिषद व मध्यवर्ती समिती :** राजकीय पक्षांची राज्यस्तरावरील संघटना राज्यपरिषद व मध्यवर्ती समिती यांनी मिळून बनलेली असते. तथापी मध्यवर्ती समितीलाच अधिक महत्त्व असते. घटकराज्यातील पक्षयंत्रणेवर देखरेख ठेवण्याचे कार्य मध्यवर्ती समिती करते. मध्यवर्ती समितीच्या अध्यक्षाला पक्ष संघटनेत महत्त्वाचे स्थान असते.

**ड) स्थानिक पक्षसंघटना :** स्थानिक पक्षसंघटनेत जिल्हा, कौंटी, शहर, वॉर्ड इ. स्तरावर कार्य करणाऱ्या समित्यांचा अंतर्भाव होतो. स्थानिक पातळीवर सर्वात तळाची संघटना **'प्रिसिंट समिती'** ही असते. या समितीच्या अध्यक्षावर त्याच्या भागातील मतदारांशी सतत संपर्क ठेवण्याची महत्त्वाची जबाबदारी अते. या समितीच्यावर वॉर्ड समिती, शहर समिती, कौटी समिती अशा समित्या असतात.

**४.२.१ स्वयं अध्ययन प्रश्न -१**

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१) अमेरिकेमध्ये .............. स्वरूपाची न्यायव्यवस्था आहे.

१) एकेरी  २) दुहेरी  ३) तिहेरी

२) अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाची स्थापना ............. साली झाली.

१) १७८९ २) १८८९ ३) १९८९

३) ............. हे अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाचे पहिले न्यायाधिश होत.

१) जॉन जे २) अब्राहम लिंकन ३) सॅम्युअल चेज्

४) ............. न्यायाधिशास अमेरिकन काँग्रेस पदच्युत केले होते.

१) ब्राईस २) ॲलसी हेस्टींग्ज ३) सॅम्यअर चेज

- **स्वयं अध्ययन प्रश्न – २**

१) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाला पदच्युत करण्याचा अधिकार ........... आहे.

१) अध्यक्ष २) सिनेट ३) मंत्रीमंडळ

२) न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराची प्रतिष्ठापना ........... या खटल्याने झाली.

१) मारबरी विरुद्ध मॅडीन २) मारबरी विरुद्ध मेरिलँड ३) मारबरी विरुद्ध जेफरसन

३) संविदानाचा अर्थ लवाण्याचा अधिकार अमेरिकेतील ............. न्यायालयाला आहे.

१) जिल्हा न्यायालये २) उच्च न्यायालयाचे ३) सर्वोच्च न्यायालयेङ

४) न्यायालय म्हणतील तीच अमेरिकेची राज्यघटना असते ........... यांनी म्हटले आहे.

१) न्या. ह्यूज २) न्या. मार्शल ३) न्या. फायनर

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

१) सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राची तरतुद घटनेच्या कलम .......... मध्ये केली आहे.

१) कलम–३ २) कलम–२ ३) कलम–४

२) अमेरिकन ............. पक्षपद्धती अ ाहे.

१) हिवपक्षपद्धती २) डाकपक्षपद्धती ३) बहूपक्षपद्धती

३) सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशाची संख्या ............ आहे.

१) नऊ २) सहा ३) दहा

४) अमेरिकेचा सरन्यायाधिश .......... वर्षापर्यंत पदावर राहू शकतो.

१) ७० २) ८० ३) ६५

**४.१.१ स्वयं:अध्ययन भाग -१**

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१) अमेरिकेतील डेमॉक्रॉटीक व रिपब्लिकन हे दोन्ही पक्ष ........ समाजव्यवस्थेचा पुरस्कार करतात.

१) लोकशाही २) लोकशाही समाजवाद ३) उदारमतवादी भांडवलशाही

२) अमेरिकेत ........... च्या नेतृत्वाखाली डेमॉक्रेटिक रिपब्लिकन पक्ष स्थापन होऊन १८०० साली ते राष्ट्राध्यक्ष झाले.

१) हॅमिल्टन २) जेफरसन ३) मॅडिसन मन्टो

३) ............. अमेरिकेत रिपब्लिकन नावाच नवा पक्ष उदयास आला.

१) १८४० २) १८५५ ३) १८६०

**स्वयं अध्ययन प्रश्न -२**

१) ........... यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला फेडरॅलिस्ट गट म्हटले जाते.

१) हॅमिल्टन २) जॉन्सन ३) वॉशिंग्टन

२) अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष ........ आहेत.

१) जॉर्ज वॉशिंग्टन २) अब्राहमलिंकन ३) जॉर्ज बुश

३) ............ च्या अध्यक्षीय निवमडणूकीत अमेरिकेतील राजपक्षानी प्रथम भाग घेतला.

१) १७९६ २) १७९८ ३) १८९६

**४.३ सारांश :**

**अ) अमेरिकेचे न्यायमंडळ :**

सर्वोच्च न्यायालय - रचना-नियुक्ती- कार्यकाल

पात्रता - पदच्युती - वेतन - कार्यपद्धती

सर्वोच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र

१) प्रारंभीक अधिकारक्षेत्र

२) पुनर्विचाराचे अधिकारक्षेत्र

३) घटनेचा अर्थ लावण्याचा अधिकार

४) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार

- **सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्व :**

याबाबतची सर्व माहिती या उपघटकात उपलब्ध होते.

१) न्यायमंडळ हा शासन/संस्थेचा तिसरा महत्त्वाचा विभाग होय. कायद्याचा अर्थ लावणे आणि न्यायदान करणे ही न्यायमंडळाची महत्त्वाची कार्ये आहेत. लॉर्ड ब्राईस यांच्यामते, कार्यक्षम, न्यायव्यवस्था ही उत्कृष्ट शासन व्यवस्था निर्माण करून नागरिकांना कायद्याच्या राज्याची हमी देऊ शकते. न्यायमंडळ आपल्या पुनर्विलोकनाच्या अधिकारामुळे कायद्याची घटनात्मकता तपासून पाहते. त्यामुळे कायद्याचे राज्य प्रस्थापित होण्यास मदत होते.

२) अमेरिकेत दुहेरी न्यायव्यवस्था आहे. अमेरिकन राज्यघटनेच्या तिसऱ्या कलमानुसार संघीच न्यायालयाची व्यवस्था करण्यात आली. (१७८९) अमेरिकन राज्यघटनेने सत्ताविभाजन तत्त्वाचा स्वीकार केल्यामुळे न्यायमंडळाचे स्वातंत्र्य सुरक्षित आहे.

३) सर्वोच्च न्यायालयात एकूण नऊ न्यायाधिश असतात. त्यांची नेमणूक राष्ट्राध्यक्ष करतो. वयाच्या ७० वर्षापर्यंत ते पदावर राहू शकतात. महाभियोगाद्वारे त्यांना पदमुक्त करता येते.

४) मारबाटी विरुद्ध मॅडीसन या खटल्यात इ.स. १८०३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा पुनर्विलोकनाचा अधिकार प्रस्थापित झाला हा निर्णय न्या. मार्शल यांनी दिला.

**ब) पक्षपद्धती :**

अमेरिकेत द्विपक्षपद्धती आहे. रिपब्लिकन व डेमोक्रॅटीक हे दोन प्रमुख पक्ष आहेत.

१) द्विपक्षपद्धती.

२) शक्तिशाली विरोधी पक्ष

३) पक्षशिस्तीचा अभाव

४) राष्ट्रव्यापी संघटन

५) तत्त्व आणि कृती यामध्ये सुसंगती

६) लोकशाही तव संविधानावर विश्वास.

७) विविध वर्गाचे प्रतिनिधीत्व

८) दबाव गटांचा प्रभाव.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

**प्रशासकीय न्यायालय :** लोकशाही व्यवस्थेत प्रशासनाच्या व्याप्तीमुळे आणि कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमुळे प्रशासनाचे कार्यक्षेत्र वाढत आहे. प्रशासनातील वाढत्या गुंतागुंतीमुळे निर्माण होणारे वाद मिटविण्यासाठी प्रशासकीय न्यायालये स्थापन केली जातात.

**महाभियोग :** शासनातील उच्चपदस्त अधिकारी, राष्ट्राध्यक्ष, सरन्यायाधिश, यांनी घटनात्मक गुन्हा, गैरवर्तन, देशदोह केला असेल तर कायदेमंडळामध्ये त्यांच्या विरुद्ध खटला चालविला जातो त्याला महाभियोग म्हणतात.

**न्यायालयीन पुनर्विलोकन :** कायदेमंहळाने तयार केलेले कायदे राज्यघटनेशी सुसंगत नसतील तर ते घटनाबाह्य ठरविण्याचा न्यायालयाच्या अधिकारास न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार असे म्हणतात.

**राजकीय पक्ष :** एखादी विचारप्रणाली स्विकारून तिला प्रत्यक्षात आणण्यासाठी संघटितपणे राजकीय सत्ता संपादन करणाऱ्या संस्था म्हणजे राजकीय पक्ष.

**हितसंबंधीगट :** समाज हितसंबंधावर आधारीत राजकीय पक्ष विशेषत: सत्तारूढ पक्षावर दबाव टाकून आपली उद्दिष्टे साध्य करणारी संघटन किंवा समूह म्हणजे हितसंबंध गट होय.

**४.५.१ स्वयं अध्ययन उत्तरे :**

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – १**

१) दुहेरी २) १७८९ ३) जॉन जे ४) ॲलसी हेस्टिंग्ज

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – २**

१) सिनेट २) मारवरी विरुद्ध मॅडिसन ३) सर्वोच्च न्यायालय ४) न्या. ह्यूज

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – ३**

१) कलम ३ २) द्विपक्षपद्धती ३) नऊ ४) ७०

**४.५.२ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – १**

१) उदारमतवादी भांडवलशाही २) जेफरसन ३) १८५५

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – २**

१) हॅमिल्टन २) जॉर्ज वॉशिंग्टन ३) १७९६

**४.६ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाची रचना, अधिकारक्षेत्र स्पष्ट करा.

२) अमेरिकेतील राजकीय पद्धतींची वैशिष्टे स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१) न्यायालयीन पुनर्विलोकानाचा अधिकार

२) पुनर्निर्णयाचे अधिकारक्षेत्र

३) अमेरिकेतील राजकीय पक्षांचा विकास

४) अमेरिकेतील द्विपक्षपद्धती.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) पाटील बी. बी. - शासकीय यंत्रण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२) देशमुख अलका - दौलनिक शासन आणि राजनिती, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३) डॉ. येरणकर श्रीराम - तुलनात्मक शासन आणि राजकारण, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४) घांगरेकर चिं. ग. - तुलनात्मक राजकीय विश्लेषण, कॉन्टनेन्टल प्रकाशन, पुणे.

५) देशपांडे म. द. - शासनसंस्था - राज्यपद्धती, तौलनिक विचार, महाराष्ट्र विद्यापीठ दि कोल्हापूर रायटर्स को-ऑप. सोसायटी, लि., कोल्हापूर.

६) Mahajan V. D. - Shet Modern Government S. S., Chand & Co. Ltd., New Delhi.:


❖ ❖ ❖

* **बॉक्सर उठाव (१९००) :**

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी चीनमध्ये मष्ठी युद्धाची लढावू दले तयार झाली. त्यांनी बॉक्स उठाव घडवून आणला. त्याला अनेक कारणे आहेत. विशेषत: शेतकरी कामगाराचा असंतोष प्रजेवरील कराचा बोजा, पूर, दुष्काळाचे संकट, शासन कर्त्याचा सुधारणेला विरोध, परकीयाचे आर्थिक शोषण यामुळे चीनी समाजाच्या मनात प्रचंड असंतोष निर्माण झाला. १८९९ मध्ये शांटुग प्रांतात पहिला उठाव झाला. तेथील राज्यपालाने क्रांतिकारकाना पाठींबा दिला. त्याचे लोन पेकींग पर्यंत पोहोचले. सम्राट कुआंगत्सु व राणी झुत्सीने सिहासनाचा त्याग केला. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, रशिया यांनी उठाव दडपून टाकण्यास सुरूवात केली. मांचू सैन्याचा पराभव केला. शांतता प्रस्थापित झाली. पण त्याची किंमत बॉक्सर तहातून चीनवर लादली. चीनी सम्राटानी ४५ कोटी तैल एवढी प्रचंड खंडणी परकीयांना दिली. मात्र जनतेच्या या अपयशातूनच १९११ च्या प्रजासत्ताक क्रांतीचा जन्म झाला.

* **डॉ. सन् यतसेन आणि केमिटांग पक्ष (१९११ ची प्रजासत्ताक क्रांती) :**

चीनच्या राष्ट्रवादी इतिहासातील ही पहिली यशस्वी क्रांती होती. तीने शतकानुशतकाची मांचू राजेशाही संपुष्टात आणली आणि प्रजासत्ताकाची स्थापना केली. १९०५ मध्ये जपान सारख्या छोट्या राष्ट्राने रशियाचा पराभव केला. यातून चीनच्या लोकांना प्रेरणा मिळाली. पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव पडला. परकीय देशाकडून होणारी लूट पिळवणूक थोपविण्यास माचू राजवट अशस्वी झाली. याचा परिणाम मांचू राजवटी विरुद्ध गुप्त संघटना स्थापन झाल्या. १९१० मध्ये डॉ. सन्मतसेन यांनी पिपल्स नॅशनल पार्टी स्थापन केली. पुढे याच पक्षाला कोमिंशग हे नांव देण्यात आले. १९११ मध्ये सन्एतसेन यांच्या नेतृत्वाखाली नॅशनल पार्टीने क्रांती करून मांचू राजवटीचा शेवट केला. यातून डॉ. सन्यतसेन चीनचे अध्यक्ष झाले व त्यांनी चीन प्रजासत्ताक झाल्याची घोषणा केली.

डॉ. सन्मतसेन यांनी पिपल्स नॅशनल पार्टीची तीन महत्त्वाची उद्दष्टे सांगितली. जी सामाजिक क्रांतीस उपयुक्त होती. त्यातील पहिले उद्दिष्ट राष्ट्रवाद यांतून राष्ट्रीय जागृती निर्माण करणे आणि स्वदेशभिमान वाढविने. विशेषत: चीन, मांचू, मंगोलियन, तुर्की, तिबेटीयन, हान यांचे एक राज्य निर्माण करणे. परकीयांचे वर्चस्व, प्रभाव झुगारून देणे. अंतर्गत दुही कमी करणे. दुसरे उद्दीष्ठ जनतेचे हक्क स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्याना महत्त्व देणे. शासनकर्त्यांची निवड जनतेकडून करणे. त्याच्यावर जनतेचे नियंत्रण असावे. डॉ. सन्यतसेन यांनी हे लोकशाही पाच प्रमुख खांब मानले होते. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका, परीक्षा विभाग, आणि नियंत्रण विभाग निर्माण करण्यात यावा. तिसरे उद्दीष्ट समाजवादी व्यवस्था, लोकांचा उदरनिर्वाह, भूमिचे पुर्नविभाजन, उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण एकूणच हे उद्दीष्ट सार्वजनिक जीवनासंबंधी होते. या उद्दीष्ठावर मार्क्स लेनिनचा प्रभाव होता. राजकीय लोकशाही व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करणे हे तिचे उद्दीष्ठ होते. कोमिंटाग पक्षाची पुर्नरबांधणी करून राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी चीनी साम्यवादी पक्षाचा सहयोग घडून आणने हे उद्दीष्ट होते. रशियाच्या साम्यवादी व्यवस्थेचा अध्यक्ष करण्यास डॉ. सन्मतसेन यांनी चँक-कै-शेकला रशियाला पाठविले. चँग-कै-शेक रशियाला गेले. त्यांनी अभ्यास करून मिलटरी ॲकॅडमी स्थापन केली. आणि १९२१

मध्ये चीन मध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. माओत्सेतुंग हे तीचे संस्थापक सदस्य होते. १२ मार्च १९२५ रोजी डॉ. सन्मतसेन यांचा मृत्यू झाला.

- **चँग-कै-शेकचे नेतृत्व :**

डॉ. सन्मतसेन यांच्या मृत्यूनंतर कोमिंटाग पक्षाची सर्व जबाबदारी चँग वर येवून पडली. रशियाचा वाढता प्रभाव लक्षात घेवून चँगने कम्युनिष्ट कोमिंटाग युतीला विरोध केला. १९२५ च्या सुमारास चीनी राष्ट्रवादाची स्थिती केविलवाणी होती. डॉ. सन्मतसेनचा मृत्यू, लष्कराचे अराजक व साम्यवादी रशियाचा प्रभाव या कारणामुळे चँग अस्वस्थ झाला. त्याने परिस्थितीशी धैर्याने तोंड दिले. स्टॅलिन व लेनिने मोठ्या धूर्तपणे चँगला विरोध केला नाही. चिन मध्ये साम्यवादी प्रभाव वाढविण्यास सुरूवात केली. त्यासाठी चँगला जपान विरोधी कारवाईत लष्करी व आर्थिक मदत केली. चँगला पाठींबा दिला. १९२५-२६ मध्ये चँगने ठिकठिकाणाची लष्करी उठाव करून सर्व प्रांतात आपली सत्ता स्थापन केली. आणि कोमिंटागचे सरकार स्थापन केले. १९२८-४९ पर्यंत तो चीनच्या राष्ट्रीय सरकारचा अध्यक्ष होता. चीनमधील राजकीय अराजक नष्ट करून चँगने स्थिर राष्ट्रीय सरकारची स्थापना केली. या कामी त्याला पक्षाने व अनेक लष्कर शहाजी मदत केली. ह्या दोन घराण्याच्या कारकिर्दीत त्याने कार्यक्षम प्रशासनाची निर्मिती करून व्यापार, उद्योग, दळणवळण, चलन व शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. चीनी संस्कृतीने पुनरुज्जीवन केले. जर्मनीच्या मार्गदर्शनाखाली ३०,००० सैन्याची निर्मिती केली. चीनमध्ये कम्युनिष्ट पक्षाचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी ''चँक-कै-शेक शुद्धीकरण मोहिम'' सुरू केली. कम्युनिष्ट कामगार, कार्यकर्ते, शेतकरी अशा कम्युनिष्ठ विचाराशी संबंधीत असणाऱ्या अडीच लाख लोकांची हत्या करण्यात आली. चँक-कै-शेकच्या कम्युनिष्ठ विरोधी कारवायामुळे कोमिंटाग पक्ष आणि कम्युनिष्ट पक्ष यांच्यात मतभेद निर्माण झाले.

- **चीनमधील साम्यवाद व माओ :**

डॉ. सनमत सेन यांच्या त्रिसूत्री कार्यक्रम राबविण्यात चॅग-कै-शेक यांना अपयश आले. लोकांच्या मनात असंतोष वाढत गेला. दरम्यान १९२१ मध्ये कम्युनिष्ट पक्षाची स्थापना झाली होती. माओ त्याचे संस्थापक सदस्य होते. १९२२ मध्ये चिनी समाजवादी पक्षाने 'कम्युनिष्ट इंटरनॅशनल' चे सभासदत्व स्वीकारले. चँग-के-शेक च्या कम्युनिष्ठ विरोधी धोरणामुळे माओ त्से तुंग यांनी हुनान प्रांतात शेत मजूराचे संघटन करून मोठा उठाव घडवून आणला. त्यानंतर माओ-त्से-तुंग हे साम्यवादी पक्षाचे मोठे नेते झाले

माओ त्से तुंग यांच्यावर कमन्फ्युशिअसच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. मार्क्सच्या विचाराने ते प्रभावीत झाले होते. मार्क्सच्या सर्व ग्रंथाचे त्याने वाचन केले होते. विशेषत: मार्क्सच्या 'कम्युनिष्ट मॅनिफेस्टो' या त्याच्या जीवनावर खोल प्रभाव पडला होता. मार्क्सवादावरील त्याची निष्ठा पक्की झाली होती. कोमिटांगशी संघर्ष करून माओने लाल सेनेच्या साह्याने साम्यवादी व्यवस्था निर्माण केली. हुनान प्रांतात कोमिंगटांग व चॅक-कै-शेक यांच्याशी संपर्क करताना तिथल्या परिस्थितीचा त्यांच्या जवळून संबंध आला. त्यावर त्याने 'हुनान प्रबंध' लिहिला. त्यात त्याने शेतमजूराना एकत्र करून त्याच्या असंतोषाला संघटीत केले. गनिमी काव्याने लढण्याचे तंत्र

विकसित केले. १९३१ आखिव चिनी सेव्हिएट कॉंग्रेसचा तो प्रमुख म्हणून लोकांनी त्याची निवड केली. १९३५ च्या साम्यवादी पक्षाच्या संमेलनात त्याची लाल सेनेचा (लष्करी) सेनाधिकारी म्हणून निवड करण्यात आल.ी कियांगसी प्रांतातील शेतकऱ्याना त्याने एकत्र केले. त्याचे जमिनीचे वाटप आणि त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. माओचा प्रभाव रोखण्यासाी चँग-कै-शेक ने कियांगसी प्रांताला वेढा घातला. माओने 'लाँग मार्च' काढून कियांगसी प्रांतातून बाहेर पडले. साम्यवादाचा प्रचार आणि प्रसार करण्यास सुरूवात केली. चीनी जनतेने कम्युनिष्ट पक्षाला पाठिंबा दिला. १९३५ मध्ये कम्युनिष्ट पक्षाच्या बैठकीत माओला पक्षाचे अध्यक्ष म्हणून नियुक्त केले. लाँग मार्चद्वारे माओने चिनी कम्युनिष्ट पक्षाला वेगळी ओळख दिली.

१८३७ मध्ये जपानने चिनवर आक्रमण केले. या आक्रमणाला तोंड देणे चिनी सरकारला भाग पडले. चीन मधून जपानला हाकलले. हा चँग-कै-शेकचा त्या काळात एकमेव उद्देश होतो. परंतु जपानला चीन बाहेर घालवणे आणि चैक-कै-शेकला सत्तेतून घालवणे असे दोन उद्देश चिनी कम्युनिष्ट पक्षापुढे होते. माओने-लॉग मार्च द्वारे चीनचा प्रदेश कम्युनिष्ट पक्षाच्या नियंत्रणाखाली आणला. १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धात जपानने शरणागती स्वीकारली. त्यामुळे जपानला चीनमधून हुसकावून लावण्याची संधी चीनी नेत्यांना मिळाली. जपानने काबीज केलेल्या प्रदेशावर ताबा मिळविण्यास कम्युनिष्ट पक्ष पुढे सरसावला. यातून माओचा कम्युनिष्ट पक्ष व चँग-कै-शेक यांचा कोमिंटाग पक्ष याच्यात संघर्ष सुरू झाला.

रशियाचा पाठिंबा कम्युनिष्ट पक्षाला होता. तर चँग-कै-शेक यांना अमेरिकेचा पाठिंबा होता. या संघर्षात चँग-कै-शेक व त्यांचा कोमिटांग पक्ष याचा पराभव झाला. चँग-कै-शेक यांना तैवान बरोबर चीनची भूमिका सोडून जावे लागले. तिथे जावून चँग कै यांनी राष्ट्रीय चीन हे राज्य व सरकार स्थापित केले. तर माओ यांनी १ ऑक्टोबर १९४९ रोजी चीन हे कम्युनिष्ट प्रजासत्ताक राष्ट्र बनल्याचे घोषित केले. अशाप्रकारे जगाच्या राजकीय नकाशावर दोन चीन अस्तित्वात आले. माओ हे चिनचे सर्वोच्च नेते ठरले. कम्युनिष्ट पक्षाने माओची राष्ट्राध्यक्ष व चौन-ए-लॉय याची पंतप्रधान म्हणून निवड केली. चिन हे प्रजासत्ताक राज्य असल्याचे घोषित केले.

- **चीनच्या संविधानाचे स्वरूप** Nature of Constitution :

चीन मधील गृहयुद्धात माओ-त्से-तुंग यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी पक्षाला विजय प्राप्त झाला. १९४९ मध्ये मोओच्या नेतृत्वाखाली साम्यवादी शासनास सुरवात झाली. परंतु रशियाच्या धर्तीवर साम्यवादी क्रांती माओला अपेक्षित नव्हती. त्याच्या मतानुसार ''आपल्या देशातील वास्तव क्रांतीचा आणि क्रांतीनंतर परिस्थितीचा मेळ घालावयास हवा'' असा माओ याचा दृष्टीकोन होता. जमिनदाराकडील जमिन हिसकावून घेवून तिचे गरीब शेतकऱ्यांना वाटप अशी लेनिन प्रणित रशियातील क्रांतीची दिशा होती. तर माओने चीन मध्ये शेतकऱ्यांचे संघटन, सैन्याची गनिमी काव्याने लढाई, शेतकरी आणि जमिनदार यांच्यात सगळ्या जमिनीचे सारखे वाटप यातून क्रांती पुढे नेली व यशस्वी करून दाखवली. ''जो शेतकऱ्यांना जिंकतो तो चिनी राष्ट्र जिंकतो'' हे माओचे ब्रिदवाक्य होते. थोडक्यात रशियात कामगाराच्या साम्यवादी क्रांतीवर भर होता तर चिनमध्ये शेतकरी कामगार यांना बरोबर घेवून साम्यवादी क्रांती करण्यावर भर दिला होता. माओने 'पिपल्स डेमॉक्रसी' असे नांव दिले असले

तरी कम्युनिष्ट पक्षाची हुकूमशाही निर्माण केली. चीनची आर्थिक समतेवर रचनात्मक पुर्नबांधणी करण्यावर भर दिला. माओने सर्व जमिनी शासनाच्या मालकीच्या केल्या. त्या साठी कृषी सुधारणा कायदा करून पंचवार्षिक योजनाना प्राधान्य देण्यात आले. औद्योगिक विचारावर भर देण्यात आला. देशात २५ हजार कम्युन्सची स्थापना केली. त्याच्याकडे अंमलबजावणीची जबाबदारी सोपवली. अशा विचारसरणीच्या पार्श्वभूमीतून माओ यांनी कम्युनिष्ट प्रजासत्ताक चीनची राज्यव्यवस्था बांधावयास सुरूवात केली. १९४९ नंतर प्रथम 'राजकीय सल्लागार मंडळ' Political Consultative Conference उभारले गेले. यात राजकीय पक्ष सैन्य, विविध प्रदेश, अल्पसंख्यांक लोक, लोकप्रिय संस्था या सर्वांचे ५८५ प्रतिनिधी होते. याच मंडळात मताधिकार नसणाऱ्या ७७ सभासदांचाही समावेश करण्यात आला होता. अशी एकूर ६६२ सदस्य संख्या असणाऱ्या मंहळाने कम्युनिष्ट चीनसाठी तात्पुरते संविधान तयार केले ते५ वर्षासाठी होते.

## • १९५४ चे पहिले संविधान :

जानेवारी १९५३ मध्ये 'केंद्रिय जन प्रशासन परिषदेने' ३३ सभासदांची एक संविधान समिती नियुक्त केली. त्याचे अध्यक्षस्थान माओ-त्से-तुंग यांच्याकडे होते. मार्च १९५४ ला संविधान समितीचा मसुदा तयार झाला. तो जनमान्यतेसाठी ठेवण्यात आला. या मसुद्याचा सुधारित तिसरा प्रस्ताव ९ सप्टेंबर १९५४ ला केंद्रिय जन प्रशासन परिषदेने मान्य केला. या प्रस्तावाला राष्ट्रीय जन काँग्रेसने २० सप्टेंबर १९५४ ला मान्यता दिली. साम्यवादी चीनचे पहिले संविधान ४ नोव्हेंबर १९५४ पासून अंमलात आले. १९५४ च्या सार्वत्रिक निवडणूका होवून १२०० राष्ट्रीय लोकसभेतील सद्स्यांनी तीला मान्यता दिली.

संपूर्ण चिनची एकविस प्रांतात व दोन हजार जिल्ह्यात विभागणी केली. या राज्यघटनेची काही वैशिष्ट्ये आहेत ती पुढीलप्रमाणे

### १) लिखित संविधान :

१९५४ चे संविधान हे लिखित असून ते केवळ १०६ अनुच्छेदात लिहिले आहे. अनुच्छेद १ प्रमाणे चिन हे श्रमिक कामगार, शेतमजूर यांचे राज्य असेल असे स्पष्ट केले आहे. साम्राज्यशाही, सरंजामशाही, भांडवलशाही यापासून चिन हे राष्ट्र मुक्त झाले असे स्पष्ट केले. समाजवादी समाजरचना निर्माण करणे हे तिचे उद्दीष्ट असेल. चीनी भाषेत सामान्य माणसाला समजेल अशा सोप्या शब्दात ते लिहिले आहे.

### २) समाजवादी अर्थव्यवस्था :

माओने आपल्या लोकशाही शासनाचे स्वरूप युरोपीय भांडवलाशी आणि रशियन साम्यवाद यांच्या पेक्षा वेगळे ठेवले. युरोपीय लोकशाहीत श्रमिकाचा वाटा कमी आहे. आणि रशियन शासनात शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व नाही. चीन मध्ये श्रमिक शेतकरी हाच राष्ट्राचा कणा असल्याने कम्युनिष्ट पक्षाची सूत्रे शेतकऱ्यांच्या हाती असावीत. त्यातून प्रजासत्ताक शेतकऱ्यांची हुकूमशाही निर्माण होईल. या शासनात जमिनदार भांडवलदार व एकाधिकारशहाना स्थान नसेल. केवळ कामगार शेतकऱ्यांना भाषण आणि विचार स्वातंत्र्याचा व मतदानाचा अधिकार असेल इतर समाज घटक क्रांतीचे व या प्रजासत्ताक शासनाचे विरोधक समूजन कालौघात नष्ट केले

जातील. प्रारंभी कम्युनिष्ट पक्षाचे प्रभुत्स असेल. कालांतराने अशा शासनाची गरज भासणार नाही. सर्व सामान्य शेतकरी प्रतिनिधीची परिषद राज्यकारभार सांभाळेल. माओने याला जनतेची लोकशाही People Democracy असे नाव दिले.

**३) लोकसत्ताक केंद्रवाद :**

चीनचे गणराज्य लोकसत्ताक केंद्रिकरणाच्या तत्त्वावर उभे आहे. लोकांचे प्रतिनिधी असणारी राष्ट्रीय जन काँग्रेस निर्माण केली. तीचा कालावधी चार वर्षाचा करण्यात आला. वर्षातून दोनदा अधिवेशन भरविण्याची तरतूद केली. सदस्य, अध्यक्ष, उपाध्यक्षाची निवड करतील. दैनंदिन कामकाज पाहाण्यास मंत्रीमंडळ आणि त्याची समिती निर्मिती केली जाईल. त्यावर प्रजासत्ताकचा अध्यक्ष, मंत्रीमंडळाचा अध्यक्ष, पंतप्रधान, उपपंतप्रधान यांचे नियंत्रण होते. लष्कर व संरक्षणासाठी राष्ट्रीय सुरक्षा समिती आणि न्यायदानासाठी सर्वोच्च न्याय पालिकेची निर्मिती केली. ह्याशिवाय सर्वोच्च राज्यपरिषद व कम्युनिष्ट पॉलिट ब्युरो या शिखर संस्था स्थापन केल्या. या दोन्ही संस्थाचा अध्यक्ष माओ होता. माओ स्वतः राष्ट्रप्रमुख, पक्ष प्रमुख, प्रजासत्ताकाचा अध्यक्ष, संरक्षण समितीचा अध्यक्ष व राज्य परिषदेचा अध्यक्ष होता. हा लोकशाहीचा सांगाडा उभा केला असला तरी प्रत्यक्षात साम्यवादी पॉलिट ब्युरो आणि माओ यांच्या हातात सत्ता होती. विरोधकाचे अस्तीत्व नष्ट केले. राष्ट्राच्या उन्नतीसाठी कम्युनिष्ट पक्षाची कठोर हुकूमशाही निर्माण केली.

**४) मूलभूत अधिकार व कर्तव्ये :**

चीन मध्ये अनेक वंशिय लोक राहात असल्यामुळे वंशिय सलोख्याचे सर्वांना आश्वासन दिले आहे. सर्वांना आपली संस्कृती, लिपी, भाषा जपण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार दिला आहे. सर्वांना समान विकासाची संधी दिली आहे. त्याच प्रमाणे सामाजिक, आर्थिक, राजकीय सत्तेला महत्त्व दिले आहे. अधिकारात स्त्री-पुरुष समानता, धार्मिक स्वातंत्र्य, शिक्षण, काम करण्याचा अधिकार समाविष्ट केला आहे. कर्तव्यात देशाचे संरक्षण, कायदा पालन, कर देणे, सार्वजनिक संपत्तीची सुरक्षा, अल्पसंख्यांकाचे संरक्षण याचा समावेश केला आहे. थोडक्यता या राज्य घटनेनुसार (१९५८ ते १९७५) पर्यंत या काळात राज्यकारभार, प्रशासन चालले हे संक्रमणकालीन संविधान मानले. साम्यवादी व्यवस्था प्रस्थापित झाल्यावर नव्या संविधानाची आवश्यकता वाटू लागली. म्हणून १९७५ मध्ये दुसरे संविधान तयार केले.

- **१८७५ चे दुसरे संविधान :**

माओने साम्यवादाचा प्रसार होण्यासाठी आर्थिक पुनर्वसन, पंचवार्षिक योजना, कम्युन्सचा प्रयोग असे कार्यक्रम राबविले. १९६०-६४ च्या कालात चिनी अर्थव्यवस्तेवर उजव्या प्रवृत्तीच्या लिन मिओ, लिओ शाओची सारख्याचे प्राबल्य निर्माण झाले होते. पक्षात वैचारिक संघर्षही वाढीस लागला होता. 'माओने ''शंभर फुले फूल द्या'' तसेच 'ताराई पोसून शिका' येथील कामगाराचे उत्पादन भरीव स्वरूपाचे निष्काम कर्म असल्यामुळे या घोषणा देवून समाजवादी व्यवस्था दृढमूल करण्याचा प्रयत्न केला. १९६५ ते १८७० या काळात सांस्कृतिक क्रांती घडून आली. चीनची विचारसरणी माओवादी बनली. सांस्कृतिक क्रांतिमुळे झालेल्या परिवर्तनाची दखल

घेवून नव्या संविधानाची आवश्यकता वाटू लागली. परिणामता १९७५ च्या जानेवारीत साम्यवादी पक्षाच्या केंद्रिय समितीच्या अधिवेशनात सुधारीत संविधानाचा विचार झाला. राष्ट्रीय जन काँग्रेसपुढे प्रस्ताव ठेवून १९७५ मध्ये त्यास मान्यता मिळाली. म्हणून त्यास १९७५ चे संविधान असे म्हटले जाते. त्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

- **१९७५ चे संविधान :**

**१) प्रास्ताविक :** संविधानाच्या प्रस्ताविकास साम्यवादी क्रांतीने काय साध्य केले याची मांडणी करण्यात आली. समाजवाद प्रस्तापित झाला असला तरी भांडवलाही व साम्राज्यवादाकडून धोका आहे. त्यासाठी कामगाराची अखेर एकजूट महत्त्वाची आहे.

**२) लिखित व संक्षिप्त राज्यघटना :** नव्या प्रस्तावनेस अवघ्या चार प्रकल्पात हे संविधान राहिले आहे. यात एकूण तीस कलमे आहेत.

**३) पंतप्रधानाचे महत्त्व :** या नव्या संविधानानुसार चिनी प्रजासत्ताकाच्या अध्यक्षपदाची समाप्ती करण्यात आली. आणि पंतप्रधानाचे महत्त्व वाढविले.

**४) साम्यवादी पक्षाचा प्रभाव वाढवला :** साम्यवादी पक्ष हा चीनी जनतेचा मानबिंदू समजला जावू लागला. कामगाराचे नेतृत्व शासनसंस्थेवर राहिल. साम्यवादी पक्षाचे नियंत्रण शासनावर राहील. समाजवादी व्यवस्थेला पोषक आणि पूरक न्यायव्यवस्था निर्माण केली. एकात्म शसान पद्धती, निर्माण करून व प्रांताना राज्यातून फुटून निघण्यावर बंदी घातली.

**१९७८ चे संविधान :**

१९७८ चे संविधान संक्षिप्त असल्यामुळे राज्यकारभार करत असताना साम्यवादी पक्षाची वारंवार मदत घ्यावी लागली. पक्षश्रेष्ठींचा सल्ला घ्यावा लागला. या त्रुटीचा विचार करण्यास राष्ट्रीय जनपरिषदेने एक समिती नियुक्ती केली. या समितीने नवे संविधान तयार केले. १९७६ मध्ये माओ-त्से-तुंग यांचे निधन झाले. आणि चीनची सत्ता सूत्रे हुआ-कुओ-फेंग यांच्याकडे आली. त्याच्या नेतृषत्वाखाली नवी राज्यघटना तयार करण्यात आली.

५ मार्च १९७८ ला नव्या संविधानास मान्यता मिळाली. या संविधानात प्रस्तावनेसह चार भागात आणि केवळ आठ कलमांत लिहिले गेले. १९५४ च्या संविधानापेक्षा कलम १९७५ च्या संविधानापेक्षा मोठे व विस्तारीत थोडी सुधारणा स्वरूपाची आवृत्ती होय.

या संविधानाने पुन्हा समाजवादाचा पुर्नउच्चार केला. कामगार वर्गाची हुकूमशाही अधिक दृढ केली. 'जो काम करणार नाही त्याला भाकरी नाही.' हे तत्त्व मान्य केले ज्याच्या त्याच्या पात्रतेनुसार त्याच्या कार्याची सांगड घातली. कामगाराच्या सामूहिक मालकीचे तत्व मान्य करण्यात आले. प्रत्येकाने प्रामाणिक काम करून उत्पन्नात वाढ केली पाहिजे. एकगृही कायदे मंडळास मान्यता देवून त्याचे अधिकार वाढविले. राष्ट्रीय जन काँग्रेसला (कायदेमंडळास) संविधानात दुरुस्ती करण्याचा अधिकार देण्यात आला.

मलभूत अधिकार कर्तव्य याची तरतूद केली. तसेच वैयक्तिक मालमत्तेची तरतूद केली आहे. कामातून झालेली कायदेशीर कमाई, बचत, घट व इतर जीवन जगण्याची साधने ही वैयक्तिक मालमत्ता होय. या संपत्तीच्या आधारावर इतराची पिळवणूक करता येणार नाही. १९७८ चे संविधान सुद्धा लहान वाटू लागले. त्यात त्रूटी होत्या. त्यातून नव्या संविधानाचा विचार होवू लागला.

**ब) चीनच्या राज्यघटनेची वैशिष्ट्ये :**

- **प्रास्ताविक :**

१९५४, १९७५, १९७८ असे तीन वेळा चिनच्या संविधानात बदल करण्यात आला. माओत्से तुंग, चौन-एन्-लाय यांच्या निधनानंतर चीनमध्ये एक पोकळी निर्माण झाली. तसेच चिनच्या आधुनिकीकरणासाठी आणि उत्पादन वाढविण्यासाठी आणि अधिकाराचे केंद्रिकरण टाळण्यासाठी नव्या संविधानाची आवश्यकता वा लागली. २१ एप्रिल १९८२ रोजी राष्ट्रीय घटनात्मक समितीने चीन प्रजासत्ताक गणराज्याचा नवा मसुदा तयार केला. त्याला जनतेची मान्यता घेण्यात आली. ४ डिसेंबर १९८२ रोजी पाचव्या राष्ट्रीय जनकाँग्रेसने त्याला मान्यता दिली. १९८२ चे चीनी प्रजासत्ताक हे चौथे संविधान आहे.

**१) लिखित आणि सुधारीत संविधान :**

माओ-त्से-तुंग यांच्या नेतृत्वाखाली क्रांती घडून आल्यानंतर १९५४, १९७५,, १९७८ अशा तीन वेळा राज्यघटनेची पुनर्रचना करण्यात आली. धोरणाची अंमलबजावणी प्रभावी व्हावी म्हणून ४ डिसेंबर १९८२ रोजी चौथ्या राज्यघटनेला पाचव्या राष्ट्रीय जन काँग्रेसने मान्यता दिली.. पहिल्या तीन संविधानाचा विचार करून त्यातील त्रुटी दूर करून नव्या परिस्थितीशी अनुरूप असे चौथे संविधान तयार करण्यात आले.

नव्या संविधानात एकूण चार प्रकरणे आहेत. आणि १३८ कलमे आहेत. जुन्या संविधानाच्या तुलनेत हे संविधान विस्तृत स्वरुपाचे आहे. पहिल्या प्रकरणात राज्यव्यवस्थेची सैद्धांतीक तत्वे सांगितली आहेत. दुसऱ्या प्रकरणात नागरिकाचे असणारे मुलभूत अधिकार आणि कर्तव्य सांगितली आहेत. तिसऱ्या प्रकरणात शासकीय संस्था केंद्रशासन स्थानिक स्वराज्य संस्था त्याची रचना सबंध स्पष्ट केले आहेत. चौथ्या प्रकरणात राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, राष्ट्रीय चिन्ह, राजधानी संबंधीचा उल्लेख आहे. थोडक्यता मार्क्सचे विचार डॉ. सनमतसेन आणि माओच्या विचाराचा त्रिवेणी संगम म्हणजे चिनची राज्यघटना होय.

**२) सरनामा :**

चौथ्या राज्यघटनेत समाजवादी समाज रचना निर्माण करण्यास राज्यघटनेचे स्वरूप कसे असेल. शासन व्यवस्था कशी असेल आणि तिचे अंतिम उद्दीष्ट, आर्थिक समता, प्रस्थापित करणे हे असेल असे स्पष्ट केले आहे. यासाठी मार्क्सवाद, लेनिनवाद, माओवाद याचा समन्वय चिनच्या सरनाम्यात करण्यात आला आहे. सरनाम्यात स्पष्ट केले आहे. मार्क्सचे विचार, लेनिनचा व माओचा समाजवाद (साम्यवाद) प्रस्थापित करण्यासाठी चिन मधील सर्व शासकीय संस्था, कम्युनिष्ट पक्ष, चिन मधील प्रजासत्ताकांचे नागरिक सतत प्रयत्नशील असतील. शेतकरी कामगार वर्गाचे नेतृत्व असेल. कम्युनिष्ट पक्षाची हुकूमशाही (लोकतंत्रात्मक)

पद्धतीची असेल. गणराज्य प्रस्थापित केले जाईल. चीन शांततेच्या मार्गाने आंतरराष्ट्रीय राजकारणात शांतता प्रस्तापित करण्याचा प्रयत्न करील. साम्राज्यवाद, वसाहतवाद, भांडवलाहीला चिनचा विरोध असेल. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या राष्ट्रास चिनचा पाठींबा राहील. स्वतंत्र देशाचा परस्पर सन्मान, समानता, प्रारंभिक अखंडत्व, अहस्तक्षेप, अनाक्रमण, समान कायदा, शांततामय सहजीवन हे चीनच्या परराष्ट्रीय धोरणाचे सूत्र असेल.

### ३) परिदृढ राज्यघटना :

राज्यघटनेत बदलत्या परिस्थितीचे प्रतिबिंब असले पाहिजे. त्या सर्व राज्यघटनेत बदल करण्याची प्रक्रिया असावी. राज्यघटनेत सहज बदल होत असेल तर तिला लवचिक राज्यघटना असे म्हणतात. ज्या राज्यघटनेत सहज बदल होत नाही. तिला परिदृषढ राज्य घटना म्हणतात. साम्यवाद हे चिनचे उद्दिष्ट निश्चित झाल्यामुळे संविधानात स्थिरता असल्याशिवाय त्यातील उद्दिष्टांची पूर्तता होणार नाही. मात्र आवश्यकतेनुसार परिवर्तनाची गरज लक्षात घेवून संविधान दुरुस्तीची प्रक्रिया कठीण स्वरूपाची केली आहे. चिनच्या ६४ व्या कलमात घटना दुरुस्तीची पद्धत सांगितली आहे. राष्ट्रीय जन काँग्रेसच्या एकूण सभासद संख्येच्या एकपंचमांश सदस्यांनी किंवा राष्ट्रीय जन काँग्रेसच्या स्थायी समितीने घटना दुरुस्तीचा प्रस्ताव मांडला. आणि राष्ट्रीय जन काँग्रेसच्या २/३ बहुमताने तो प्रस्ताव मंजूर झाल्यास घटना दुरुस्ती होते.

अशा प्रकारची पद्धत परिदृढ वाटत असली तरी चीन मध्ये कम्युनिष्ट पक्षाचे वर्चस्व आहे. कायदेमंडळात विरोधी पक्ष नाही. त्यामुळे विरोध होत नाही. साम्यवादी पक्ष सहज बदल करून आणतो.

### ४) प्रजासत्ताक गणराज्य :

ज्या राज्य व्यवस्थेत देशाचा सर्वोच्च जनतेकडून निवडला जातो. त्याला प्रजासत्ताक गणराज्य असे म्हणतात. चीनमध्ये राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान राष्ट्रीय जनकाँग्रेसचे सदस्य जनतेकडून निवडले जातात. चीनच्या १९८२ च्या राज्यघटनेतील कलम २ नुसार शासनाची सत्ता लोकामध्ये निश्चित केली आहे असे स्पष्ट केले आहे. राज्यकारभार प्रशासनावर लोकाचे आणि लोक प्रतिनिधीचे नियंत्रण राहील. आणि खऱ्या अर्थाने जन लोकशाही, लोकाच्या इच्छेवर उभी असेल आणि आर्थिक समता प्रस्थापित करणे हे तीचे उद्दीष्ट राहील.

### ५) एकात्म शासन व्यवस्था :

चीनमध्ये बहुवंशीय व बहुधर्मिय लोक एकत्र राहतात. चीनचा आकार व लोकसंख्या मोठी असली तरी देशात एकात्म शासन व्यवस्था आहे. चीनच्या राज्यघटनेत चीन हे अनेकंवशीय गटाचे एकात्म राज्य असल्याचे नमूद केले आहे. वंशिक गटात कोणत्याही कारणाने फरक करता येणार नाही. संविधानाने सर्व अधिकार केंद्रिय शासन व्यवस्थेकडे सोपविले आहेत. प्रशासकीय सोईकरीता आवश्यकतेनुसार प्रांताना, स्थानिक संस्थाना केंद्राने अधिकार दिले आहेत. ते केंद्राच्या इच्छेवर अवलंबून आहेत. राष्ट्रीय जन काँग्रेसने (स्थायी समितीने) केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्रांत स्वायत प्रदेश, नगरपरिषदा, स्थानिक संस्था यांना स्वतंत्र अधिकार नाहीत व कायद्यातही बदल करण्याचा अधिकार नाही.

बदल करण्याचे अधिकार राष्ट्रीय जन काँग्रेसला आहेत.

**६) समाजवादी संस्कृती :**

चीनची राज्यघटना ही समाजवादी राहील हे चीनच्या पहिल्या कलमात स्पष्ट केले आहे. मार्क्सवाद, लेनिनवाद आणि माओचा केंद्रात्मक लोकशाहीचा प्रत्यय चीनच्या राज्यघटनेत येतो. समाजवादी समाज रचना निर्माण करणे हे तिचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे साम्यवादी पक्षाची निर्मिती, साम्यवादी पक्षाचे प्रभावी वैचारिक तत्त्वज्ञान, जनसामान्य माणसावर तिचा प्रभाव निर्माण करण्यात आला आहे. सार्वजनिक हितात वैयक्तिक हित सामावले आहे हे समजावादाचे सूत्र सर्वांच्या मनावर बिंबवण्यात आले आहे. यासाठी शिक्षण पद्धतीत अमूलाग्र बदल करण्यात आला आहे. पारंपारिक शिक्षण पद्धतीचा त्याग केला आहे. देशाची भौतिक व आर्थिक उन्नती साधणारे शिक्षण द्यावे. शिक्षणाची श्रमाशी सांगड घालावी. शेतकरी शेत मजूराना शिक्षण द्यावे. चीनच्या नव्या संविधानाने समाजवाद, आध्यात्मिक संस्कृतीच्या लोकशाही सिद्धांताचा पुरस्कार केला. समाजवादी अध्यात्मिक संस्कृतीच्या निर्मितीसठी नैतिक शिक्षणाचा प्रसार, वैज्ञानिक आदर्शवाद आणि सांस्कृतिक पातळी वाढविणाऱ्या नव्या शिक्षणाचा समावेश असेल. सर्व उद्योग व्यवसाय व उत्पादन साधने समाजाच्या मालकीची असतील. योग्यते प्रमाणे काम व कामाप्रमाणे दाम मिळेल. नियोजनबद्ध विकासास मान्यता दिली आहे. त्याच प्रमाणे समाजवादी व्यवस्थेच्या विरोधी, भांडवलशाहीचे समर्थन करणारे, प्रतिक्रियावादी देशद्रोही यांना राजकीय अधिकार कोणतेही मिळणार नाहीत. त्याच्यावर अधिक निंत्रण ठेवून समाजवादी विचाराचे त्यांना समर्थन देण्यास भाग पाडले जाईल. अलिकडच्या काळात खाजगी मालकीला काही प्रमाणात मान्यता देण्यात आली आहे. मात्र उद्योग, खाणी, जलसंपत्ती, व्यापार यावर देशाची मालकी असेल. मात्र सामुहिक तत्त्वावर आधारीत सहकारी लहान व्यवसाय, उद्योग करता येतील मात्र त्यावर शासनाचे नियंत्रण असेल. व्यक्तीला, संस्थेला दुसऱ्या व्यक्तीचे शोषण करणारे उद्योग करता येणार नाहीत हे स्पष्ट केले. थोडक्यात आर्थिक समतेवर आधारीत शोषणमुक्त समाजाचे धोरण चीनच्या संविधानाचे आहे.

**७) लोकशाही केंद्रवाद :**

१९८२ च्या राज्यघटनेत कलम तीन स्पष्ट उल्लेख केला आहे. शासनाच्या सर्व संस्था आणि विभागात लोकशाही केंद्रवादाचा पुरस्कार केला जाईल. शासनाच्या केंद्र व स्थानिक पातळीवर असणाऱ्या संस्थांच्या मध्ये लोकशाही पद्धतीने प्रतिनिधीची निवड होईल. मात्र स्थानिक संस्था केंद्रीय शासन व्यवस्थेशी जबाबदार राहून कार्य करतील. केंद्रीय स्तरावर घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक पातळीपर्यंत सर्वांची राहील. हे प्रत्येकाचे कर्तव्य राहील. चीनी नागरिकास १८ वर्ष पूर्ण असणाऱ्या प्रत्येकास मतदानाचा अधिकार राहील. प्रत्येक लोकशाही संस्थेतील प्रतिनिधी खुल्या चर्चेद्वारे निर्णय घेतात. आणि टप्प्याटप्प्याने केंद्रीय पातळीवर कळवले जातात. राष्ट्रीय स्तरावरील निर्णयाचे पालन सर्वांच्यावर बंधनकाकर असते. केंद्रीय पातळीवरील घेतलेल्या निर्णयाच्या विरुद्ध कृती किंवा विरोधी मत व्यक्त करता येत नाही. तो देशद्रोह समजला जातो. त्याला कठोर शिक्षा होते. साम्यवादी पक्षाची एकपक्षीय हुकूमशाही असल्यामुळे विरोधी पक्ष असत नाही. विरोधक असत नाही. साम्यवादी पक्षाच्या पॉलीटी ब्युरोमध्ये सत्तेचे केंद्रीकरण

झालेले असते. व्यवहारात लोशाही दिसत असली तरी त्याच्या पडद्यआड कठोर साम्यवादी पक्षाचे जाळे असते. त्यातून पॉलीटी ब्युरो, राष्ट्रीय जनकाँग्रेसची स्थायी समिती याच्या हातात सत्ता एकवटलेली असते. यालाच केंद्रीय लोकशाही वाद असे म्हटले आहे.

**८) साम्यवादी पक्ष :**

मार्क्सने आपल्या दास कॅपिटल आणि कम्युनिष्ट मॅनिफेस्टो या ग्रंथात साम्यवादी क्रांतीचे चित्र रेखाटले आहे. साम्यवादी क्रांती होण्यास कामगारानी एकत्र आले पाहिजे. त्याच्यात एकजूट असली पाहिजे. आर्थिक समता प्रस्थापित करण्यास साम्यवादी विचारावर आधारीत कम्युनिष्ट पक्षाची निर्मिती केली आहे. लेनिन आणि स्टॅलिन यांच्या काळात कम्युनिष्ठ पक्षाला साम्यवादाचे वैचारिक अधिष्ठान दिले. माओ-त्से-तुंग यांच्या काळात कम्युनिष्ठ पक्ष हा सामान्य शेतकरी कामगार यांच्यापर्यंत पोहोचला. साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली चीन मध्ये क्रांती झाली. आणि प्रजासत्ताक गणराज्य स्थापन झाले. म्हणून १९८२ च्या राज्यघटनेत समाजवादी पक्षाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. आणि इतर पक्षाचे अस्तित्व नाकारले आहे. कारण साम्यवादी समाजरचना करत असताना इतर असणारे पक्ष प्रतिगामी असतात. साम्यवादी समाज रचनेत ते अडथळा निर्माण करतात. त्यामुळे साम्यवाद विचारावर ज्याची अढळ श्रद्धा आहे अशा लोकांना साम्यवादी पक्षाचे सद्स्यत्व दिले जाते. मार्क्सवादी, लेनिनवाद, माओवादी विचाराचे वैचारिक प्रशिक्षण देण्याचे काम कम्युनिष्ट पक्ष करतो. म्हणून चीनच्या राजकीय जीवनात कम्युनिष्ठ पक्षाचे स्थान अढळ आहे. हा पक्ष राजकीय आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक दिशा देण्याचे काम करतो. साम्यवादी समाज निर्माण होईपर्यंत या पक्षाचे अस्तीत्व राहील. साम्यवाद प्रस्थापित झाल्यानंतर कम्युनिष्ठपक्ष आपोआप विरुन जाईल परंतु साम्यवाद प्रस्थाति होईपर्यंत या पक्षाला महत्त्वपूर्ण स्थान असणार आहे.

**९) विधिमंडळाचे एकच समागृह :**

१९८२ च्या राज्यघटनेने एक गृही कायदे मंडळाचा पुरस्कार केला आहे. घटना कलम ५८ नुसार राष्ट्रीय जनकाँग्रेस एक गृही असेल असे स्पष्ट केले आहे. या गृहातील सदस्यांची निवड जनतेकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पद्धतीने पाच वर्षासाठी केली जाते. चीनच्या राज्यघटनेने प्रांत, स्वायत्त प्रदेश यांच्या प्रतिनिधीसाठी वरिष्ठ गृहाची तरतूद केली नाही. १८ वर्ष पूर्ण असणाऱ्या नागरिकाना निवडणूक लढविण्याचा, नागरिकांना मतदान करण्याचा अधिकार आहे. प्रांतातून आठ लाख लोकसंख्येला एक व स्वायत क्षेत्र व नगरपालिका यातून पाच लाख लोक संख्येला एक या प्रमाणात प्रतिनिधी निवडले जातात. विदेशी चिनी नागरिक, अल्पसंख्यांक जाती सशस्त्र सेना यातून काही सदस्य निवडले जातात. चिनची लोकसंख्या १३३ कोटीच्यावर आहे. त्यामुळे ३०००० हजाराच्या आसपास राष्ट्रीय जन काँग्रेस मधील सदस्यांची संख्या राहाते. परंतु कामकाज पाहण्यासाठी स्थायी समितीची नियुक्ती केली जाते. संबंधित स्थायी समिती निर्णय घेते. विशेषत: कायदा निर्मिती, कायदे दुरुस्ती, कार्यकारी प्रमुखच्या नियुक्त्यांना मंजूरी देणे या सर्व बाबीना राष्ट्रीय जन काँग्रसकडून मंजूरी घेतली जाते.

**१०) केंद्रीय लष्कर आयोगाचे संविधानातील स्थान :**

नव्या संविधानाने लष्करी आयोग निर्माण केला आहे. या आयोगामुळे चीनी लष्कर केंद्रीय शासनाच्या नियंत्रणाखाली आले. पूर्वी लष्कर साम्यवादी पक्षाच्या नियंत्रणाखाली होते. राष्ट्रीय जन काँग्रेस (कायदे मंडळ) केंद्रीय आयोगाच्या अध्यक्षाची निवड करते. तो आपल्या कार्याबद्दल राष्ट्रीय जन काँग्रेसला व विश्रांतीच्या काळात स्थायी समितीला जबादार राहून कार्य करतो. सैन्य प्रमुख आणि राष्ट्रीय सुरक्षितता परिषदेचा अध्यक्ष असतो. एकूण शासन व्यवस्थेत आयोगाच्या अध्यक्षाचे स्थान महत्त्वपूर्ण असते.

**१) मुलभूत अधिकार व कर्तव्य :**

घटना कलम ३३ ते ५६ मध्ये नागरिकांच्या मूलभूत अधिकार व कर्तव्याची तरतूद केली आहे. कायद्याचे सर्वांना समान संरक्षण देण्यात आले आहे. मूलभूत हक्काबरोबर कर्तव्याची कठोर जाणिव चीनच्या राज्यघटनेत घालून दिली आहे. आर्थिक अधिकार सर्वांना दिले आहेत. मात्र दुसऱ्याचे शोषण होईल अशा स्वरूपाचे अधिकार कुणालाही दिले नाहीत. प्रत्येकाला काम करण्याचा अधिकार आहे. त्याच प्रमाणे विश्रांतीचाही हक्क दिला आहे. वृद्धत्व शारीरिक अपात्रता असणाऱ्या व्यक्तीला सुरक्षिततेची हमी दिली आहे. काही प्रमाणात खाजगी संपत्ती ठेवण्यास संम्मती देण्यात आली आहे.

राजकीय अधिकारामध्ये ज्यांची वयाची १८ वर्षे पूर्ण झाली आहेत अशाना निवडणूकीला उभे राहाण्याचा मतदान करण्याचा अधिकार दिला आहे. शासकीय धोरणांना साम्यवादी विचाराच्या चौकटीत राहून टिका करण्याचा अधिकार नागरिकांना आहे. शिक्षणाचा अधिकार दिला आहे. स्त्री पुरुष समानता स्विकारण्यात आली आहे. चीनी संस्कृती, भाषा लिपी जोपासण्याचा प्रत्येकास अधिकार देण्यात आला आहे.

या मूलभूत हक्काबरोबर कर्तव्याची जाणिव सुद्धा करून दिली आहे. देशाचे ऐक्य, अखंडत्व, सुरक्षितता संरक्षण करण्याची सर्वांची जबाबदारी राहील. सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे कायद्याचे पालन करणे आणि लष्करी सेवा सक्तीची केली आहे. शासकीय कर भरणे, सामाजिक मूल्याचा आदर राखणे, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज, राज्यघटना यांच्या विषयी आदर बाळगणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण व संवर्धन करणे. साम्यवादी पक्षाला पोषक वातावाण तयार करणे अशी कर्तव्ये सांगितली आहेत.

१९८२ च्या चीनी प्रजासत्ताकाच्या नव्या संविधानात समाजवादी व्यवस्थेला पुरक परंतु नव्या युगाशी व प्रागतिक उदार अर्थव्यवस्थेचा मर्यादित प्रमाणांत स्वीकार करण्यात आला आहे. हे संविधान अनेक अर्थाने महत्त्वपूर्ण आहे. समाजवादी पक्षापेक्षा राज्याचे महत्त्व, खाजगी संपत्तीचा अधिकार, संविधानाचे श्रेष्ठत्व, अधिकाराचा गैरवापर होवू नये म्हणून राष्ट्राध्यक्ष, स्थायी समितीचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंतप्रधान या सारख्या पदावर केवळ दोन वेळाच उभे राहाण्याचा अधिकार दिला आहे. नवे संविधान समाजवाद व मर्यादित उद्योग व्यवसायाचे स्वातंत्र्य देणारे आहे. म्हणूनच २१ व्या शतकात बाजारपेठेवर आधारित समाजवाद चीन मध्ये टिकून राहू शकला व जागतिक भांडवलशाहीच्या विळख्यात दिमाखदारपणे शह देवू शकला. त्याचे सारे क्षेत्र

चीन नागरिक व बदलत्या व्यवहारी साम्यवादाला दिली पाहिजे. नाहीतर रशिया सारखा पोथिनिष्ठ समाजवाद स्वीकारला असता चीन राष्ट्र टिकू शकले नसते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :-**

**अ) अचूक पर्याय निवडा.**

१) चीनच्या राज्यघटनेचे उद्दिष्ट काय आहे?

अ) लोकशाही समाजवाद २) भांडवलशाही ३) समाजवाद ४) लोकशाही

## १.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१) पॉलीटी ब्युरो - साम्यवादी पक्षाची महत्त्वाची केंद्रीय समिती.

२) लोकशाही केंद्रवाद - व्यवहारात लोकशाही दिसत असली तरी प्रत्यक्षात पॉलीटी ब्युरो मध्ये सत्तेचे केंद्रिकरण होते.

## १.४ सरावासाठी प्रश्न :

१) चीनच्या राज्यघटनेची वैश्ट्यि सांगा.

२) चीनचा घटनात्मक इतिहास सांगा.

**टीपा :**

१) कम्युनिष्ट पक्ष २) लोकशाही केंद्रवाद

♦ ♦ ♦

# ब) स्वीडनची राज्यघटना : पार्श्वभूमी व वैशिष्ट्ये

१.० प्रास्ताविक

१.१ स्विडनच्या राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी

१.२ स्विडनच्या राज्यघटनेची वैशिष्ट्ये

१.३ समारोप

१.४ सरावासाठी प्रश्न

१.५ संदर्भ ग्रंथ

## १.० प्रस्तावना :

जगातील अनेक राष्ट्रांप्रमाणे स्वीडन या लोकशाहीवादी सरकारने आपली राज्यघटना निर्माण केली आहे. स्विडनची राज्यघटना लिखित स्वरूपाची आहे. सदर राज्यघटना रिक्सडॅग (स्वीडिश संसद) आणि सरकार यांना चालविण्यासाठी नियमांचा लिखित दस्तऐवज आहे. ज्यातील तरतुदीनुसार स्वीडीश संसद (रिक्सडॅग) व शासन यंत्रणा कार्यरत आहेत. या राज्यघटनेच्या अंतर्गत नागरिकांना मत स्वातंत्र्याचा हक्क (Freedom of Opinion) त्याच बरोबर इतर अनेक मूलभूत हक्क प्रदान करण्यात आले आहेत.

राज्यघटना राजकीय सत्तेच्या संचलनाकरीताची एक संरचना व चौकट आखून देते. या संरचनेमध्ये वा चौकटीमध्ये फार विचार विमर्शानंतरच बदल संभवतात. या संदर्भातील सर्व तरतुदी घटना दुरुस्ती तत्त्वामध्ये सविस्तरपणे नमूद केल्या आहेत.

स्वीडनच्या राजकीय व्यवस्थेचा विचार करता त्याठिकाणी चार मुलभूत कायदे अस्तित्वात आहेत.

1) Instrument of Government

2) Act of Succession

3) The freedom of press

4) The fundamental law on freedom of expression.

## १.१ स्वीडनच्या राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

जगातील फार कमी सरकारे एका सर्व समावेश अशा संविधानात्मक दस्ताऐवजाची निर्मिती करण्यात कष्ट घेताना दिसतात. त्याच प्रमाणे एक अशी राजकीय व्यवस्था निर्मिती करण्याचा प्रयत्न करताना दिसतात, की ज्या व्यवस्थेमध्ये सर्वसमावेशी विकासाची भूमिका अंतर्भूत असते. औपचारीक पद्धतीने निर्माण केले गेलेले संविधान किंवा कायदा सरकार आणि नागरिक यांच्यामधील अतिशय स्पष्ट अशा स्वरूपाचा करारच असतो. जो सत्याच्या अधिक जवळ जाणारा असतो. या प्रक्रियेतूनच औपचारिक संविधान निर्मिती होत असते. स्विडनच्या संविधानाकडे

पाहिले असता त्यामध्ये औपचारिक दस्तऐवज, अधिमान्य व्यवस्था यांची व्यवस्थीत बांधणी केली असल्याचे दिसते.

**A)** A Letter of Privilage **(१३१९ – अधिकारपत्र) :**

औपचारिक दृष्टीने स्वीडनची घटनात्मक व्यवस्था व घटना ही जगातील प्राचीन मानली जाते. १३१९ मध्ये अधिकारपत्रावरील स्वाक्षरीने राजाला कायद्याप्रमाणे राज्य चालविले जाईल, सर्व बाबी कायदेशीर प्रक्रियेने पारपाडल्या जातील आणि नवीन कर प्रणाली राबविण्यापूर्वी राज्य परिषदेला विश्वासात घेतले जाईल इत्यादी बाबींची हमी द्यावी लागली. मॅग्नस इरिक्सनच्या निवडी दरम्यान घटनात्मक शासनाची संहिता लिखित स्वरूपात मान्य केली गेली.

आवश्यक तत्त्वे जी घटनात्मक शासनाचा प्रमुख भाग असतात ती वेळोवेळी संपूर्ण स्विडनच्या राजकीय व्यवस्थेमध्ये समाविष्ट होत गेली. ग्रेट ब्रिटनच्या इतिहासातील मॅग्ना कार्टा प्रमाणे काही घटना ह्या स्विडनच्या बाबतीत घडल्याचे दिसते. त्यामध्ये प्रासंगीक घटना उल्लंघनाचे काही प्रकार स्विडनमध्ये देखील घडले. परंतु मूलभूत तत्त्वे जी द्वीध्रुवी सरकार म्हणून होते ते मात्र पुढील ६ शतके टिकून राहिल्याचे दिसते. काळाच्या ओघात राजा आणि संसद यांच्यातील सत्तासंतुलनामध्ये अनेक वेळा संघर्ष निर्माण झाला. संसदीय सत्ता जेव्हा खऱ्या अर्थाने उदयाला येत होती तेव्हा औपचारिक दस्तऐवज रूपात या घटनांची नोंद झाली आहे.

१६१७ मध्ये पहिला रिक्सडॅग अॅक्ट कायदा विकसीत झाला या कायद्याने राजाने युद्ध अथवा तह करण्यापूर्वी राज्यातील घटकांशी संल्ला मसलत करावी असे ठरले. १६६० मध्ये संसदेला नियमित कामकाजाकरीता अधिवेशन बोलाविण्याचा अधिकार प्राप्त झाला. १७१९–१७७२ या पन्नास वर्षाच्या म्हणजेच अर्धशतकाच्या संसदेच्या वाटचालीने आपल्या धोरणाच्या व संसदीय व्यवस्थेच्या स्थापनेची पूर्ती केली. याच दरम्यान पहिला वृत्तपत्र स्वातंत्र्य कायदा स्विकारला गेला तो १७६६ मध्ये राजा पेक्षा राजा आणि संसद यांच्या सहमतीतून पुढील धोरण निर्धारणाचा व कार्यकारी व्यवस्थेकडे असलेल्या अधिकारांचा वापर कसा करावा याची देखील भूमिका निर्धारित करण्यात आली. पण पुढे ज्या कायद्याच्या माध्यमातून संसदेला म्हणजे रिक्सडॅगला अधिकार बहाल करण्यात आले होते, त्या अधिकारांचा संकोच पुढील काळात राजा गुस्ताह तीसरा याने करण्याचा प्रयत्न केला. १७८९ मध्ये रिक्सडॅग कडील असलेले मुलभूत कायदा विषयक अधिकार त्याने रद्द केले.

B) 1809 Instrument of Government **(१८०९ चे सरकारी धोरण) :**

संविधानिक सुधारणेची सुरूवात एक आधुनिक काळ म्हणून झाली, ती १८०९–१० मध्ये ज्यामध्ये नवीन सरकारचे धोरण म्हणून स्विकारण्यात आले. ज्याने द्वीध्रुवी सरकारची प्रस्थापना केली. धोरण निर्धारणाचा अधिकार राजा आणि चार अधिकार प्राप्त संसदेच्या अंगामध्ये औपचारिकपणे विभाजीत करण्यात आले. ज्यामध्ये राजा धोरण निर्धारणामध्ये अधिक अधिकारशाली ठेवण्यात आला तर संसदेला कर प्रणाली संदर्भात नकार अधिकार (Veto Power) प्रदान करण्यात आला. (IG : A4, AG7) संसद राजाच्या आध्यादेशाशिवाय आपले कार्य करण्याकरीता अधिवेशन घेऊ शकते. (AG - A.49) तसेच प्रत्येक कार्यकारी मंडळाची कृती ही संबंधित मंत्र्याच्या स्वाक्षरी शिवाय परित होऊ शकणार नाही. किंबहूना मंत्र्यांची स्वाक्षरी प्रत्येक निर्णयासाठी

आवश्यक असेल. संसद सदस्यांच्या अधिकारात किंवा त्यांच्या कर्तव्य बजावणीमध्ये हस्तक्षेप करणाऱ्यास शासन केले जाईल.

वरील प्रकारची पद्धती पुढील जवळ जवळ दिडशे वर्षाकरीता निरंतर कार्यरत राहिल्याचे दिसते व पुढे या द्विध्रूवी सरकार पद्धतीमध्ये बदल होत जाऊन राजा ऐवजी संसद (सिक्सडॅग) अधिकारशाली बनल्याचे दिसते. ज्यामध्ये लोकांच्या सार्वभौमत्वाच्या तत्त्वाला अनुसरून राजकीय व्यवस्था निर्माण करण्यावर अधिक भर देण्यात आला.

या प्रकारचा बदल प्रस्थापित होण्याकरीता कोणतीही क्रांतीकारी कृती अथवा नागरी संघर्ष निर्माण झाला नाही. याउलट यासंदर्भातील बदल घडून येण्याकरीता तत्कालीन राजकीय परिस्थिती अधिक सहाय्यभूत ठरल्याचे दिसते. तत्कालीन बदल घडताना निर्माण झालेली आंदोलने ही पुढे जाऊन संसदेची (रिक्सडॅग)ची वाटचाल अधिक सशक्त करण्यास महत्त्वाची ठरली. ज्यामुळे एकूणच स्वीडिश राजकीय व्यवस्था अमुलाग्र बदलली. या संदर्भात पाहिले असता असे दिसते की, इंग्लंडची १७०० नंतरची राजकीय परिस्थिती आणि स्विडनची राजकीय वाटचाल यामध्ये मोठ्या प्रमाणात साम्य स्थळे असल्याचे दिसते. तत्कालीन अमेरिका आणि फ्रान्सच्या राजकीय परिस्थितीच्या तुलनेत संसदेच्या घटना संदर्भातील प्रमुख बदल राजा आणि 'रिक्सडॅग' यांनी परस्परातील समझोत्याने मान्य केले ते १८०९ च्या (Instrument of Government (१८०९ चे सरकारी धोरण) धोरणाप्रमाणे.

वरील संसदीय प्रणालीतील सुधारणा ह्या संसदीय नेतृत्वाच्या अधिकार व अधिमान्यता वाढविणाऱ्या ठरल्या. १८६६ मध्ये संसदेची चार प्रमुख अंग असलेल्या संस्था बरखास्त होवून त्याठिकाणी द्वीगृही संसदीय रचना अस्तित्वात आली.

### C) The New Bicameral Parliament 1866 **(नविन द्वीगृही संसद)**

१८६२ मध्ये डी गीर पहिला याने नवीन रिक्सडॅगच्या निर्मितीचा प्रस्ताव मांडला. ज्यामध्ये नविन संसद ही द्विगृही असेल. संसदेचे अधिवेशन प्रत्येक वर्षी १५ जानेवारीला भरेल. नवीन संसदेच्या निर्मितीने राजाच्या अधिकारात अधिक कपात झाली नाही. त्याला नकार अधिकार आणि कायदा राजाच्या नांवे प्रसिद्ध होईल या गोष्टी तशाच राहिल्या.

जुन १८६६ मध्ये संसदेच्या चार सदनांच्या सहमतीने व बहुमताने व त्यावर झालेल्या चर्चेनंतर राजाने नवीन रिक्सडॅग कायदा पारित केला. डी. गीर ने सुचविलेल्या संसद आणि निवडणूकी संदर्भातील प्रमुख सुधारणांसह हा कायदा स्विकारण्यात आला. जुन २०, १८६६ रोजी राजाने या नवीन रिक्सडॅगच्या निर्मितीच्या घोषणेसह संसदेचे अधिवेशन समाप्त केले.

या नवीन रिक्सडॅग कायद्याने रिक्सडॅगची सदस्यता ही निवडणूकीच्या माध्यमातून मिळविता येईल अशी तरतूद केली. त्यामध्ये राजा नियुक्त सदस्य, रॉयल फॅमिली सदस्य, विशिष्ट हितसंबंध गटाचे सदस्य अशा कोणत्याच प्रकारच्या सदस्यत्वाची भूमिका स्विकारली नाही.

स्वीडिश राज्यघटनेच्या निर्मितीमधील हा एक महत्त्वपूर्ण बदल मानला जातो. ज्यामुळे पुढील मुलगामी

सुधारणांकरीता हा एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज म्हणून पाहिला गेला.

**E)** 1907 - 1920 Proportional Representation and Expanded Franchise **(प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व आणि विस्तारित मताधिकार १९०७–१९२०) :**

एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी औद्योगिकरण झालेल्या या देशातील सरकारमधील राजकीय समूह व सरकारबाहेरील राजकीय समुहांनी विस्तारीत मताधिकारा करीता मोठ्या प्रमाणात दबाव निर्माण केला. यामध्ये इतर औद्योगिकीकरण झालेल्या देशापेक्षा स्वीडन फार वेगळा होता, अथवा तेथील परिस्थिती वेगळी होती असे नव्हते. कामगार संघटना आणि उदारमतवादी जे सरकारमध्ये होते व बाहेरही होते त्यांनी अधिक जोमाने दबाव गटाच्या माध्यमातून विस्तारीत मताधिकाराकरीता प्रयत्न केले. मोठ्या प्रमाणात लोकांनी निदर्शने केली. ज्यांचा प्रामुख्याने मताधिकारात समावेश नव्हता. तत्कालीन संसदीय सरकारला व व्यवस्थेला एवढ्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या जनआंदोलनाला व लोकाहीवादी बुद्धीजिवीच्या आंदोलनाला तोंड देणे शक्य नव्हते. तेव्हा या लोकशाहीवादी विस्तारित मताधिकाराने एक नवीन निवडणूक पाया तयार केला. ज्या आधारे सोशल डेमॉक्रॅट्स सत्तेवर आले. एकूणच या विस्तारीत मताधिकाराने एक प्रकारची अधिक शिस्तबद्ध आणि विस्तारीत प्रतिनिधीत्वावर आधारीत द्विगृही संसदीय व्यवस्था निर्माण करण्यामध्ये एक भूमिका बजावली असल्याचे दिसते.

**E)** The Reform of the 1970's Unicaneral Government 1970 **ची सुधारणा एकगृही संसद :**

१९२०–१९७० च्या दरम्यान बराच काळ 'सोशल डेमॉक्रॅटस्' हाच पक्ष सत्तास्थानी राहिला होता. तो प्रामुख्याने शेतकरी पक्षाच्या सहाय्याने या कालखंडातील पहिल्या टप्प्यात सोशल डेमॉक्रॅटस्चा समर्थक वर्ग मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे दिसते. ज्यामुळे त्यांची संसदीय राजकारणावर पकड निर्माण झाली होती. त्यामध्ये एक महत्त्वपूर्ण बदल हा १९७० च्या सुधारणेमुळे झाला तो म्हणजे स्वीडीश संसदेच्या दोन गृहांची रचना असलेल्या व्यवस्था एकगृही संसदेच्या स्वरुपात करण्यात आली. हा बदल 'इन्स्ट्रुमेंट ऑफ गव्हर्नमेंट' (IG) च्या दरम्यान केल्या गेलेल्या बदलापेक्षा देखील मोठा बदल होता. प्रथम गृहाच्या १५० जागा द्वितीय गृहाच्या २३० सदस्य संख्येमध्ये समाविष्ट करण्यात आल्या व एकूण ३५० सदस्य संख्या एकाच गृहाची करण्यात आली. सर्व विधिमंडळ विषयक कायदे या एकगृही सभासदाच्या माध्यमातून करण्यात येऊ लागले.

- **स्वीडनचा युरोपीय युनियन मधील प्रवेश – १९९५ :**

स्वीडनचा १९९५ सालचा युरोपीय युनियन मधील प्रवेश हा देखील तेथील घटनात्मक वाटचालीमधील एक महत्त्वाचा टप्पा आहे. १९९४ च्या (Instrument of Government) च्या कायद्यातील तरतूदीनुसार निर्णय निर्धारण अधिकार आणि युरोपीयन संसदेच्या निवडणुकीसंदर्भातील अधिकार प्रदान करण्याचा निर्णय करण्यात आला. रिक्सडॅगला युरोपीय समाज व युरोपीयन संसद (EP) या संदर्भातील निर्णय निर्धारण व धोरण निर्धारणाचे अधिकार प्रदान करण्यात आले. यामध्ये मानवी हक्कांचे व मूलभूत अधिकारांचे रक्षण युरोपीयन संसदेकडून केले जाईल. आणि त्याच वर्षी एक नवीन समिती स्थापन करण्यात आली. जी 'युरोपीय युनियन संबंध' विषयक समिती म्हणून ओळखली जाते. सन २००२ मध्ये निर्णय निर्धारण अधिकारावर एक अतिरिक्त मर्यादा टाकण्या संदर्भातील निर्णय घेण्यात आला. ज्यामध्ये स्वीडिश सरकारच्या मुळ रचनेला ज्या निर्णयामुळे धोका निर्माण होईल तो निर्णय

EU ला घेण्याचा अधिकार असणार नाही. अशा स्वरूपाची एक अतिरिक्त तरतूद रिक्सडॅगच्या अधिकारात करण्यात आली.

१९९८ मध्ये एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. तो म्हणजे राज्य आणि चर्च यांची फारकत की जो निर्णय एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना म्हणून मानली गेली. या निर्णयाची अंमलबजावणी १ जानेवारी २००० च्या पासून सुरू झाली. याच दरम्यान रिक्सडॅग ची मूलभूत संरचनाच बदलली. ती १९९८ च्या निवडणूकी दरम्यान या निर्णामुळे IG इन्स्ट्रुमेंट ऑफ गव्हर्नमेंटने बँकांना त्यांचे पत धोरण स्वतंत्रपणे आखणची मुभा दिली.

या प्रकारचे ऐतिहासीक बदल स्वीडीश संविधानाच्या आजवरच्या वाटचालीत घडून आल्याचे दिसतात. वरील शेवटच्या बदलाने एक महत्त्वपूर्ण गोष्ट स्वीडिश शासन व्यवस्तेमध्ये स्थापन झाली ती म्हणजे स्वीडन हा एकमेव युरोपीय देश ठरला. यामध्ये त्यांनी 'सार्वजनिक लेखा शाखा' निर्माण केल्या. ज्याला त्यांनी 'संसदीय लेखापाल' म्हणून निर्माण केले. जे रिक्सडॅग आणि स्वीडीश राष्ट्रीय लेखा अधिकारी यांच्या अंतर्गत कार्यरत राहिल. पुढे बराच काळ ह्या निर्णयावर वाद होत राहिले. परंतु पुढे सन २००० मध्ये मागील दहा वर्षाच्या कार्याचे अवलोकन केले असता तीन नविन चौकशी आयोग स्थापन करून त्या माध्यमातून रिक्सडॅगने नवीन धोरण या लेखा अधिकारी विषयक राबविल्याचे ठरविले. त्यामध्ये संसदीय लेखापाल आणि स्वीडीश राष्ट्रीय लेखाअधिकारी या दोन व्यवस्थांच्या ठिकाणी नवीन व्यवस्था स्थापन करण्यात आली. एक नवीन लेखा कार्यालय स्थापन करण्यात आले जे तीन महालेखापाल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राहील. ज्यांची निवड रिक्सडॅगद्वारे केली जाईल. ही निवड सात वर्षाच्या काळाकरीता राहील. एकदा कार्यकाल पूर्ण केल्यानंतर पुन्हा त्या पदावर नियुक्ती केली जाणार नाही. २००२ च्या (IG) Instrument of Government मधील तरतुदीनुसार सदर लेखा विभागाला स्वतंत्रपणे कार्य करण्याची शाश्वती देण्यात आली आहे. स्विडीश राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी ही वरीलप्रमाणे आहेत.

### १.२ स्वीडनच्या राज्यघटनेची वैशिष्ट्ये :

स्वीडनच्या राज्यघटनेच्या निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी वरिल भागातून आपण पाहिली. या घटकामध्ये स्वीडिश राज्य घटनेची वैशिष्ट्ये आपण पाहणार आहोत. सर्वसाधारणपणे लिखित राज्यघटना ज्या देशाच्या व्यवस्थेमध्ये आहेत त्याठिकाणी घटनानिर्मिती करीता एक विशिष्ट प्रक्रिया राबविली गेली असल्याचे दिसते. या प्रक्रियेचा अभ्यास करता असे दिसते की, घटनानिर्मिती प्रक्रिया ही सर्वसमावेशी भूमिका घेऊन होत असते. स्वीडीश राज्यघटनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१) लिखित राज्यघटना** (Written Contitution) :

स्वीडनची राज्यघटना ही लिखित व निर्मित आहे. घटनेच्या दस्तऐवजाकडे पाहिले असता सर्वसाधारणपणे राज्याच्या वाटचालीकरीताची कांही मुलभूत तत्त्वे ही राज्यघटनेमध्ये समाविष्ठ असतात. राजकीय व्यवस्थेने विविध संदर्भातील निर्णय कसे घ्यावेत, याकरीताचे विविध कायदे संहिता ही राज्यघटनेच्या मुळ दस्तऐवाजामध्ये असते. याच आधारावर स्वीडनच्या राज्यघटनेमध्ये राज्यव्यवस्थेच्या संदर्भातील या तरतुदी लिखित स्वरूपात

समाविष्ट करण्यात आले आहे. वेळोवेळी तत्कालीन कायदेमंडळाने व राजाने केलेले करार कायद्यातील सुधारणा, बदल इत्यादी स्वरूपात स्वीडनच्या राज्यघटनेमध्ये लिखित स्वरूपात समाविष्ट करण्यात आले आहे.

एकाच वेळी विशिष्ट सभासदांच्या समीतीने ही घटना निर्माण केली नसून स्वीडन राज्यालाही इंग्लंडच्या उत्क्रांतीवादी राज्य घटनेप्रमाणे प्रासंगीक करारांच्या माध्यमातून त्यामध्ये वेळोवेळी विविध स्वरूपाच्या तरतुदींची भर पडली आहे.

**२) उत्क्रांतीवादी राज्यघटना** (Evolutionatory contitution) :

स्वीडनची राज्यघटना ही उत्क्रांतीवादी राज्यघटना आहे. वेळोवेळी राज्यव्यवस्थेच्या कायद्यातील बदल हे त्यात्या काळात स्वीडीश राज्य घटनेमध्ये समाविष्ट करण्यात आले. कालानुरूप एखाद्या कायदा कालबाह्य झाल्यास अथवा कालानुरूप एखादा कायदा नव्याने निर्माण करावयाचा झाल्यास त्यासंदर्भातील सर्व बदल आजवर स्वीडनच्या राज्यघटनेमध्ये करण्यात आले आहेत.

उदा. (IG) Instrument of Government, the Act of Succession (AS), The freedom of pres act (FPA) आणि Fundamnetal Law on Freedom of Expression या चलू तरतुदीच्या माध्यमातून वेळोवेली स्वीडीश राज्यघटनेमध्ये सुधारणा होत गेल्या आहेत.

यामध्ये IG - 'Instrument of Government' ही संकल्पना मध्यवर्ती असून हा स्वीडीश राज्यघटनेचा मूळ ढाचा आहे. तर इतर तरतूदी ह्या देखील काळानुरूप सुधारणा करून त्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

वरील विश्लेषणाचा विचार करता १८०९ म्हणजेच १९ व्या शतकापासून ते १९९६ ते २००२ पर्यंत काळाच्या ओघात स्वीडीश राज्यव्यवस्थेने आपल्या संरचनेत व राज्यघटनेत रचनात्मक बदल अंतर्भुत केले आहेत. म्हणून १८०९, १८६६, १९०७, १९२०, १९७० या विविध कालखंडात झालेले बदल स्वीडीश राज्यघटनेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. वरील बदल व सुधारणा पाहता स्वीडीश राज्यघटना ही निरंतर उत्क्रांत होत असल्याचे दिसते.

**३) लवचिक व परिवर्तनीय राज्यघयना** (Elastic flexible) :

स्वीडीश राज्यघटनेच्या स्वरूपाकडे पाहता ही राज्य घटना पारीवर्तनीय आहे व लवचिक आहे. एखाद्या कलमामधील बदल अथवा नव्याने केली जाणारी तरतूद ही प्रकिया सहज व सुलभ आहे. रिक्सडॅगच्या माध्यमातून बहुमताच्या आधारे एखाद्या नवीन तरतुदींचा समावेश करता येतो. त्याच प्रमाणे एखादी तरतूद वा कायदा कालबाह्य झाला असल्यास तो रद्दही करता येतो. त्याप्रमाणे घटनेतील बदल हा तत्कालीन निवडणूका मध्ये मिळालेल्या बहुमताच्या आधारावर देखील अवलंबून ठेवण्यात आला आहे.

निवडणूकीच्या माध्यमातून अथवा जनमताच्या सहाय्याने घटनात्मक बदल करण्याची व्यवस्था स्वीडीश राज्य घटनेतमध्ये स्विकारण्यात आली आहे.

१८०९ मध्ये स्थापन केलेल्या समितीने घटना दुरुस्तीच्या संदर्भात निर्णय देताना म्हटले आहे की,

सार्वजनिक निवडणूकीच्या माध्यमातून निवडून आलेले प्रतिनिधी व सार्वमत या माध्यमातून घटनात्मक बदल केले जातील.

**४) सार्वभौम राज्यघटना** (Severeign Contitution) :

स्वीडीश राज्य घटनेतील समाविष्ट तरतुदी व करार हे राज्यघटनेचा गाभा असून त्याला राज्यघटनेच्या 'सार्वभौम या तत्त्वाचा आधार आहे. राज्यघटनेत समाविष्ट सर्व कायदे हे सार्वभौम अधिकार प्राप्त संसदीय मंडळाकडून अंमलात आणले जातात. सार्वभौमत्वाचे तत्त्व हे सार्वजनिक आवकाश या घटकात समाविष्ट असलचे स्पष्टीकरण स्विडीश राज्यघटनेत नमूद करण्यात आले आहे. राज्यव्यवस्थेतील कोणताही घटक संविधानीक अधिमान्यता प्राप्त असला पाहिजे. त्याशिवाय कोणतीही भूमिका त्या घटकास घेता येत नाही. राज्य घटना व त्यातील तत्त्वे ही प्रमुख असून ते अंततः सार्वभौम आहेत.

**५) मुलभूत हक्कांचा समावेश** (Fundamental Rights) :

स्वीडीश राज्यघटनेमध्ये व्यक्तीच्या मुलभूत हक्कांचा समावेश केला आहे. स्वीडीश राज्यघटनेचे हे एक वैशिष्ट्य म्हणून आपल्याला दिसते. स्वीडीश घटनेत भाग दोन मध्ये मूलभूत हक्क आणि स्वातंत्र्ये यांचा समावेश केला आहे. त्यामध्ये मताचे स्वातंत्र्य (Freedom of Opinion), संघटना स्वातंत्र्य, व्यापार करण्याचा अधिकार, शोषणापासून मुक्त राहण्याचा अधिकार, संपत्ती व सार्वजनिक जागा वापरण्याचा हक्क, शिक्षण आणि संशोधनाचा हक्क इत्यादी स्वरूपाच्या मूलभूत हक्क व स्वातंत्र्याचा समावेश स्वीडीश राज्यघटनेच्या दुसऱ्या भागात सविस्तरपणे नमूद करण्यात आले आहेत. तेव्हा मूलभूत हक्क व स्वातंत्र्ये ही तत्त्वे स्वीडीश राज्यघटनेचे वैशिष्ट्य ठरते.

**६) कायद्याचे राज्य** (Rule of Law) :

स्वीडीश राज्यघटनेने कायद्याचे राज्य स्थापन केले आहे.

राज्यघटनेच्या आधिन राहून व्यक्तीला आपले हक्क व अधिकार उपभोगण्याचा हक्क व्यक्तीला दिला आहे. त्याच बरोबर एखाद्या व्यक्तीच्या मूलभूत हक्कावर तीच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण झाल्यास कायद्याचे राज्य या आधारावर सदर व्यक्तीला तीचे अधिकार व स्वातंत्र्य बहाल करण्याची जबाबदारी राज्य व्यवस्थेची राहील असे स्पष्ट केले आहे.

एखाद्या व्यक्तीवरील अन्याय हा कोणताही विलंब न होता व्यक्तीने तो दूर केला पाहिजे असे या कायद्याचे राज्य या तत्त्वाचा आधार आहे असे स्वीडीश राज्यघटनेत नमूद केले आहे. कलम ९, १० व ११ मध्ये दुसऱ्या भागात कायद्याचे राज्य या तत्त्वाची तरतूद केली आहे.

**७) धर्मनिरपेक्ष** (Secular) :

स्वीडीश राज्यघटनेमध्ये स्पष्टपणे कोणत्याही धर्माचा पुरस्कार केला नाही. उलट उत्क्रांतीवादी राज्यघटनेचा इतिहास असलेल्या स्वीडीश राजकीय व्यवस्थेत वेळोवेळी सकारात्मक बदल घडून आल्याचे दिसते. त्यामध्ये

१९१४ मध्ये रिक्सडॅग आणि राजा यांच्या संयुक्त विचाराने चर्च आणि राजकीय व्यवस्था यांची एकमेकांपासून फारकत करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले व १ जानेवारी २००० मध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली. तेव्हा स्वीडीश राजकीय व्यवस्था आपला असा कोणताही धर्म नसेल वा कोणत्याही धर्माच्या आधारावर आपली राजकीय व्यवस्था चालणार नाही अशी अधिकृत भूमिका काळाच्या ओघात घेतल्याचे दिसते.

तेव्हा धर्मनिरपेक्ष राजकीय व्यवस्था हे एक वैशिष्ट्य स्वीडीश राज्य घटनेचे आहे असे दिसते.

८) **राजेशाही** (Monarchy) :

स्वीडनची राज्यघटना स्वीडनच्या 'Swidish Royal Democraty Parlimenty system) (स्विडीश राजेशाही लोकशाही संसदीय व्यवस्थेला मान्यता देते त्यानुसार स्वीडनच्या राजकीय व्यवस्थेमध्ये राजेशाही व्यवस्थाही घटनात्मक आहे असे नमूद केले आहे. उत्क्रांतीवादी राज्यघटनेच्या ऐतिहासिक बदलामध्ये पाहिले असता १८०९-१९७४ पर्यंत राजेशाही ही अधिकारशाली होती. राजा हा पंतप्रधान व मंत्रीमंडळाची नेमणूक करत असे. परंतु १ जानेवारी १९७५ पासून त्याचे हे अधिकार रद्द झाले.

राजाची निवड वारसा तत्त्वानुसार करण्यात येते. १९८० पर्यंत केवळ पुरुष म्हणजेच राजा हाच त्या पदावर जात असे पण १९४४ पासून स्त्रीला म्हणजेच राणीला देखील अधिकारपदावर जाण्याची मुभा दिली गेली आहे. राजा हा नामधारी पुरुष असतो. राष्ट्रीय विविध सण समारंभामध्ये तो सहभागी होतो.

राजेशाही संदर्भातील सर्व तरतूदी घटक भाग ५ मध्ये देण्यात आलेल्या आहेत. राजा निवडीची तरतूद व पद्धती कलम ४ व ५ मध्ये देण्यात आली आहे.

९) **एकगृही संसद** (Uni Cameral Parliament) :

स्वीडीश राज्यघटनेचे पुढील वैशिष्ट्य म्हणजे त्या राजकीय व्यवस्थेला एकगृही कायदेमंडळ बहाल केले आहे. स्विडीश संसद अर्थात 'रिक्सडॅग' हे एकगृही सभागृह स्विडनची संसद म्हणून काम करते. संपूर्ण देशातून व विविध भागातून या सभागृहात प्रतिनिधी सार्वत्रिक निवडणूकीच्या माध्यमातून निवडले जातात. १९७० च्या स्विडनच्या घटनासुधारणा उपक्रमाअंतर्गत १९७० पर्यंत द्विगृही असलेल्या स्वीडीश संसदेला एकगृही करण्यात आले व एकत्र एक मध्यवर्ती संसदीय गृह निर्माण करण्यात आले. त्यास रिक्सडॅग असे म्हणतात. त्यामध्ये संपूर्ण देशाचे प्रतिनिधी या सभागृहात असतात.

१०) **एकेरी न्यायव्यवस्था** (Unitary Judicial System) :

स्विडीश राज्यघटनेचा ११ व्या भागात कलम १ ते १४ मध्ये न्याय व्यवस्थेची तरतूद करण्यात आली आहे. स्विडीश न्यायव्यवस्थेचे स्वरूप एकेरी न्यायव्यवस्था 'Unitary judiciery' असे आहे. त्यामध्ये (अ) सामान्य न्यायालये (General Cants) (ब) सामान्य प्रशासकीय न्यायालये (General .......... Courts) असे विभाजन केलेले आढळते. एकेरी न्यायालयाच्या माध्यमातून स्वीडीश राज्य घटनेमध्ये न्यायव्यवस्थेतील सुसुत्रता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

### ११) बहुपक्षपद्धती :

स्वीडीश राज्यघटनेचे बहुपक्षपद्धती हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. स्विडनच्या राजकीय व्यवस्थेत प्रमुख पक्षास राजकीय पक्ष कार्यरत आहेत. बहुपक्षपद्धती हे महत्त्वाचे तत्त्व स्विडीश राज्यघटनेने स्विकारले आहे. स्विडीश सोशल डेमॉक्रेटीक पक्ष हा आताचा सत्ताधारी पक्ष आहे. बहुपक्ष पद्धती या वैशिष्ट्यामुळे स्विडनमध्ये बऱ्याच वेळेस आघाडी सरकारे स्थापन झाली आहे.

### १२) संसदीय लोकपाल (Parliamentary Ombudsman) :

संसदीय ओंबुडसमन अर्थात रिक्सडॅग ओंबुडसमन ही तरतूद स्विडीश राजकीय व्यवस्थेमध्ये केली आहे. ते स्विडीश राजकीय व्यवस्थेमध्ये एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. स्विडीश रिक्सडॅग ने या तत्त्वाचा स्विकार हा १८०९ पासून केला आहे. तेव्हा 'रिक्सडॅग ओंबुडसमन' हे एक महत्त्वाचे वैशिठ्य आहे.

रिक्सडॅग ओंबूडसनमचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण रजाकीय व्यवस्थेसाठी आहे. त्यामध्ये कोणत्याही सरकारी पद धारण करणाऱ्या अधिकारी, नागरी सेवा क्षेत्रातील व्यक्ती किंवा स्थानिक शासनातील अधिकारपद प्राप्त करणारी व्यक्ती या विषयी कोणत्याही प्रकारची अनियमितता अथवा अन्याय झाल्यास त्या संदर्भातील चौकशीचा अधिकार रिक्सडॅग ओंबुडसमन राहिला. तसेच वरील सर्व घटक हे त्याच्या कार्यकक्षेत राहतील अशा प्रकारेची महत्त्वाची तरतूद स्वीडीश राज्यघटनेत झाली आहे.

## १.३ समारोप :

स्वीडीश राज्यघटनेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीकडे आणि त्यातील वैशिष्ट्यामध्ये पाहिले असता ही राज्यघटना उत्क्रांतीवादी राज्यघटनेचे एक प्रमुख उदाहरण असलेल्या इंग्लंडच्या राज्यघटनेबरोबरच साधर्म्य साधते. त्याच बरोबर त्याठिकाणी अधिकृतपणे राजेशाहीला स्थान दिले गेले असले तरी इंग्लंड प्रमाणेच राजा किंवा राणी हे नामधारी प्रमुख म्हणून कार्यरत असल्याचे दिसते. एकूण स्वीडीश राज्यघटना ही नागरिकांच्या मुलभूत हक्कांचा एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे असेच म्हणावे लागते.

## १.४ प्रश्न :

१) स्वीडनच्या राज्यघटनेची वैशिष्ट्ये सांगा.

२) १९७० च्या स्वीडनच्या राज्यघटनेतील बदलाची चर्चा करा.

३) ब्रिटीश राज्यघटनेतील राजेशाही व्यवस्था या घटकांची चर्चा करा.

## १.५ संदर्भ ग्रंथ :

1. The constitution of Sweden.

♦ ♦ ♦

कार्यकाल ५ वर्षाचा आहे. संकटकाळात किंवा अपवादात्मक परिस्थितीत याची निवड घेण्याची जबाबदारी स्थायी समितीची आहे. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत या सभागृहाची कालमर्यादा एक वर्षाने वाढविता येते. मात्र चुनच्या स्थायी समितीने २/३ बहुमताचा ठराव करावा लागतो. आणि तो ठराव सभागृहाची मुदत संपण्यापूर्वी २ महिने अगोदर संमत व्हावा लागतो.

- **अधिवेशन :**

राष्ट्रीय जनकाँग्रेसच्या अधिवेशनाच्या संदर्भात घटनात्मक तरतूद अशा प्रकारे केलेली आहे, जन काँग्रेसचे वर्षातून एकदा अधिवेशन भरेल, त्या अधिवेशनाची कालमर्यादा १० ते १५ दिवस असेल आणि असे अधिवेशन बोलवण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे. एखाद्या विशिष्ट प्रसंगात जादा अधिवेशन बोलवायचे असेल तर १/५ राष्ट्रकीय जन काँग्रेस प्रतिनिधींची मागणी असणे आवश्यक आहे. अशा मागणीवरून अधिवेशन बोलविता येईल. हे अधिवेशन खुला असते.

- **कामकाज पद्धत :**

राष्ट्रीय जनकाँग्रेस मधील सर्व सदस्य साम्यवादी विचारसरणीचे आणि साम्यवादी पक्षाचे सदस्य असतात. द्वि किंवा बहुपक्ष पक्षपद्धतीतील मंत्री मंडळाला प्रश्न विचारणे, अविश्वासाचा ठराव मांडणे किंवा तत्सम कार्यपद्धती अंमलात आणली जात नाही. या सभागृहात विरोधी पक्ष नसतो. त्यामुळे मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाला विरोध करता येत नाही, तसे झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करून कठोर शिक्षा दिली जाते. अधिवेशन खुले असते. त्यात आवश्यक पडल्यास चर्चा करणे, आवश्यक वाटल्यास दुरुस्ती करणे, अशा दुरुस्तीला मान्यता देणे अशी महत्त्वाची कामे राष्ट्रीय जन काँग्रेसला अधिवेशनात करावी लागतात.

- **अधिकार व कार्ये :**

राष्ट्रीय जन काँग्रेस हा चीन शासनाचा सर्वोच्च सत्ताविभाग आहे. एकात्मक शासन व्यवस्था असल्याने सत्तेचे विभाजन झालेले नाही. सर्व सत्ता केंद्राकडे एकवटलेली आहे. अमेरिका, भारत व देशातील सत्तेचे विभाजन झालेले दिसून येते. १९८२ च्या चीनच्या घटनेनुसार या सभागृहाला पुढील अधिकार किंवा कार्ये प्राप्त झालेली आहेत. राष्ट्रीय जन काँग्रेसची सदस्य संख्या जरी कितीही मोठी असली तरी त्यामधील स्थायी समितीच्या माध्यमातून पुढील कार्ये पार पाडली जातात.

**१) कायदे निर्मितीचे कार्ये :**

एकात्मक शासन व्यवस्थेमुळे जन काँग्रेसला कायदे निर्मितीचा अधिकार आहे. नवीन कायदे तयार करणे, जुन्या कायद्यामध्ये शक्य असेल तर दुरुस्ती करणे, टाकाऊ कायदे रद्द करणे याचा संपूर्ण अधिकार राष्ट्रीय जनकाँग्रेसला आहे. हा अधिकार सभागृहातील स्थायी समित्या उपभोगत असतात. तसेच एखादा कायदा तयार केल्यानंतर त्याला राष्ट्रीय जनकाँग्रेसची मान्यता असावी लागते. जर जन काँग्रेसची मान्यता नसेल तर तो आदेश तात्काळ रद्द होतो. यावरून कायदे निर्मितीचे महत्त्वाचे कार्य या सभागृहाला करावे लागते हे स्पष्ट होते.

**२) घटनादुरुस्तीची कार्ये :**

चीनच्या राज्यघटनेचे स्वरूप पूर्णत: लवचिक जरी नसले तरी परिस्थितीनुसार राज्यघटनेत बदल होणे अपेक्षित असते. राज्यघटनेत दुरुस्ती व परिवर्तन करण्याचा अधिकार राष्ट्रीय जन काँग्रेसला आहे. त्यामुळे स्वभाविकच सामाजिक राजकीय बदलानुसार राष्ट्रीय जन काँग्रेस १/५ सदस्यांनी सूचना केल्यास किंवा स्थायी समितीने तसे सूचित केल्यास घटना दुरुस्ती करण्याचे अधिकार राष्ट्रीय जन काँग्रेसला असतो. मात्र अशा घटनादुरुस्तीला राष्ट्रीय जन काँग्रेसच्या एूण सदस्यांच्या २/३ सदस्यांची संमती (बहुमताने मंजूरी) असणे आवश्यक आहे.

**३) आर्थिक कार्ये :**

कायदेमंडळाला अंदाजपत्र तयार करणे, आर्थिक नियोजन करणे, नवीन कर लावणे, जुने कर रद्द करणे, इतर देशांना मदत करणे, इतर देशांकडून मदत घेणे, अर्थसंकल्प मंजूर करणे, पंचवार्षिक योजनांची निर्मिती करणे या सर्व गोष्टींची जबाबदारी राष्ट्रीय जन काँग्रेसवर असते. राष्ट्रीय जन काँग्रेसच्या मंजूरी शिवाय एक पैसाही खर्च करण्याचा अधिकार चीनच्या शासनाला नाही. अर्थसंकल्पातील तरतूदी तपासण्याचा अधिकार राष्ट्रीय जन काँग्रेसला आहे. त्यामुळे ंदाजपत्रकाच्या मंजूरीसाठी राष्ट्रीय जन काँग्रेसचे अधिवेशन महत्त्वाचे मानले जाते. अंदाजपत्रक मंजूर झाल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीसाठी खास अधिकार राष्ट्रीय जन काँग्रेसला दिला आहे. अंमलबजावणी योग्य प्रकारे होते की नाही ते पाहण्यासाठी काही आयोगाची निर्मिती केली जाते व अंमलबजावणीवर लक्ष ठेवले जाते.

**४) कार्यकारी अधिकार :**

राष्ट्रीय जन काँग्रेसला १९८२ च्या राज्य घटनेनुसार कायदे विषयक अधिकार व्यापक स्वरूपात प्राप्त झालेले आहेत. याच घटनेनुसार दिलेले कार्यकारी विषयक अधिकार अपाल्याला पुढील प्रमाणे पाहतायेतील.

१) चीनचा राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींची निवड करणे. ही निवड सभागृहाकडून ५ वर्षासाठी केली जाते.

२) पंतप्रधान, उपपंतप्रधान, राष्ट्रीय समितीचे सर्व सदस्य, अध्यक्ष, स्थायी समितीचे सदस्य, विविध आयोगाचे अध्यक्ष, राजकीय पदाधिकारी आदि महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची निवड सभागृह करते. हे सभागृहाचे मूलभूत काम आहे.

३) सर्व पदाधिकाऱ्यांची निवड साम्यवादी पक्षाच्या समितीच्या आदेशानुसार होते, प्रसंगी त्यांच्याच आदेशाने या सर्व सदस्यांना पदच्युत करण्याचा अधिकार आहे.

४) केंद्रीय सैनिक आयोगाच्या अध्यक्षांची आणि इतर सदस्यांच्या निवडीचे काम राष्ट्रीय जन काँगेसकडून केले जाते.

५) चीनच्या कार्यकारी मंडळातील प्रमुख अधिकाऱ्यांनी म्हणजेच राष्ट्रपती किंवा मंत्रिमंहळाने परराष्ट्राशी केलेले संधी, करार, तह, परराष्ट्रीय धोरण, मैत्रीपूर्ण संबंध, युद्ध आणि शांतता या बाबत निर्णय घेण्याचा राष्ट्रीय

जन काँग्रेसला अधिकार आहे. जन काँग्रेसची मान्यता न मिळाल्यास संधी, करार, तह रद्द करण्यात येतो.

६) चीनच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे. त्याला कायदेविषयक रूप देणे त्याच्याबरोबर विकास योजनांची छाननी करणे आदि कार्यकारी विषयक कामे करावी लगातात.

**५) न्यायविषयक अधिकार :**

चीनमध्ये न्यायमंडळातील न्यायाधीशांची नेमणूकी ऐवजी निवड होते. सर्वोच्च न्यायालयाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, इतर न्यायाधीश, मुख्य प्रोक्युरेटर, उपप्रोक्युरेटर, न्याय व्यवस्थेतील सर्व पदाधिकारी यांची निवड करण्याचा अधिकार चीनच्या राष्ट्रीय जन काँग्रेसला आहे. त्यांची निवड ५ वर्षासाठी सभागृहाकडून केली जाते. तसेच त्यांना पदावरून दूर करणे, गुन्हेगारांना दया दाखविणे, शिक्षा करणे असे अधिकार राष्ट्रीय जन काँग्रेसला आहे.

## ब) स्थायी समिती :

स्थायी समिती ही चीनमधील नाविण्यपूर्ण संस्था आहे. ही एक राजकीय संस्था आहे. राष्ट्रीय जनकाँग्रेसची सदस्य संख्या जगातील कोणत्याही देशापेक्षा सर्वात जास्त आहे. चीनच्या कायदेमंडळाचे म्हणजेच राष्ट्रकीय जन काँग्रेसचे ते महत्त्वाचे अंग आहे. या सर्व सदस्यांना एकत्र काम करणे फार अवघड म्हणून १९८२ च्या राज्यघटनेने एक स्थायी समिती निर्माण केली आहे. रशियामध्ये शशसकीय व्यवस्थेमध्ये प्रेसिडीय नावाची संस्था ज्याप्रमाणे महत्त्वाची भूमिका वठविते त्याच प्रमाणे चीनमध्ये स्थायी समिती आहे. चीनच्या शासन व्यवस्थेत स्थायी समितीचे महत्त्वपूर्ण स्थान आहे.

- **रचना :**

कायदे विषयक कार्य करणारी ही एक राष्ट्रीय जन काँग्रेसची समिती आहे. चीनच्या राज्यघटनेत कलम ६४ मध्ये स्थायी समितीच्या रचनेची तरतूद आहे. चीनच्या स्थायी समितीमध्ये

१) १ अध्यक्ष

२) २२ उपाध्यक्ष

३) १ सचिव

४) इतर १२१ सदस्य

एकूण १४५ एवढी संख्या १९८५ मध्ये होती. मात्र आज ही संख्या सुमारे २०० एवढी आहे.

- **कार्यकाल :**

स्थायी समितीचा कार्यकाल ५ वर्षाचा असतो. ही समिती दुसरी समिती कार्यरत होईपर्यंत कार्यरत राहते. यातील सस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्यावहनाचा अधिकार राष्ट्रीय जन काँग्रेसला दिला आहे. स्थायी समिती आपल्या कार्याबद्दल राष्ट्रीय जन काँग्रेसला जबाबदार असते.

* **पदाधिकारी :**

स्थायी समितीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष समितीची बैठक बोलवितात. समितीचे अध्यक्ष वउपाध्यक्ष समितीने घेतलेल्या निर्णयाचे आणि आदेशाचे पालन करतात, या दोन्ही पदाधिकाऱ्यांना आपल्या पदावर दोनपेक्षा जास्त वेळ राहता येत नाही. साधारणत: स्थायी समितीच्या महिन्यातून दोन बैठका होत असतात.

* **स्थायी समितीचे अधिकार किंवा कार्ये :**

**१) कायदे विषयक अधिकार :**

१) स्थायी समिती राष्ट्रीय जन काँग्रेसची नियमित आणि गरज वाटल्यास खास अधिवेशन बोलवू शकते.

२) राष्ट्रीय जन काँग्रेसच्या विश्रांतीच्या काळात अध्यादेश काढणे.

३) राष्ट्रीय जन काँग्रेसने केलेल्या दुरुस्त्या, नियम, उपनियम करण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे. विधिनियम तयार करण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे. या अध्यादेश नियम उपनियमांना राष्ट्रीय जनकाँग्रेसची मान्यता घ्यावी लागते.

४) राष्ट्रीय जनकाँग्रेसच्या निवडणूक घेणे.

५) स्थायी समिती अध्यादेश किंवा वटहुकूमही काढू शकते.

**२) कार्यकारी अधिकार :**

स्थायी समिती ही राष्ट्रीय जन काँग्रेसची एक समिती असली तरी अधिकाराचा वापर व्यापक प्रमाणात करते. साम्यवादी पक्षाची संपूर्ण सत्ता असल्यामुळे आणि चीनच्या पक्षाच्या सर्वोच्च संघटनेचे स्थायी समितीवर नियंत्रण असल्यामुळे कार्यकारी विषयक सत्ता स्थायी समितीच वापरीत असते.

१) चीनचा राष्ट्रप्रमुख नाममात्र असतो.त याची कार्यकारी विषयक सत्ता स्थायी समितीकडे असते.

२) राष्ट्रपती, पंतप्रधान, आयोगाचे अध्यक्ष, मंत्रिमंडळाचे सदस्य, न्यायाधीश यांच्या नेमणूका व पदमुक्ती स्थायी समिती करु शकते. स्थायी समिती जरी कायदेमंडळाचे महत्त्वाचे भाग असले तरी राष्ट्रीय जन काँग्रेसच्या विश्रांतीच्या काळात शासनावर नियंत्रण ठेवण्याचे काम करते.

३) स्थायी समिती राष्ट्रीय जन काँग्रेसच्या विश्रांतीच्या काळात परराष्ट्र धोरण, तह, करार, संधी, राजदूत, नेमणूक, सम्मेलने, प्रतिनिधी, परराष्ट्रीय दुतांचा स्वीकार, सन्माननीय पदव्या देणे, आणिबाणी जाहीर करणे, युद्ध घोषीत करणे इत्यादी कामे पार पाडते.

* **न्यायदानविषयक कार्ये :**

चीनची खास न्याय व्यवस्था आहे. त्यामुळे स्थायी समितीला पुढील न्यायविषयक कार्ये पार पाडावी लागतात.

१) कायदेमंडळाच्या कायद्याचा अर्थ लावणे व तो अर्थ स्पष्ट करणे.

२) मंत्रिमंडळाने केलेला कायदा घटनाविरोधी असेल तर तो रद्द करणे.

३) सर्वोच्च न्यायालयाने गुन्हेगारांना फाशीची शिक्षा दिलेली असेल ती माफ करणे किंवा सूट देणे म्हणजेच अपराध्याला क्षमा करणे, दया दाखविणे आदि कामे करणे.

४) न्यायाधीश प्रोक्युरेटर जनरलची नियुक्ती करणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे व पदमुक्त करणे.

५) सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायालयीन निर्णयावर पुनर्विचार (पुर्नविलोकन) करणे.

६) संपूर्ण न्यायव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याचे काम स्थायी समितीला करावे लागते.

## २.५ सारांश :

चीनचे एकात्मक शासन व्यवस्था व पक्षपद्धती स्विकारल्याने चीनमध्ये कायदेमंडळाची सदस्य संख्या खूप मोठी आहे. १९८२ च्या राज्य घटनेनुसार चीनचा कारभार चालतो. राष्ट्रीय जनकाँग्रेसचे अधिवेशन वर्षातून फक्त १० ते १५ दिवस चालते. त्यामुळे राहिलेले वर्षातील सर्व महिने कायदे करण्याचा अधिकार स्थायी समितीला दिला आहे. ही कायदेविषयक आणि कार्यकारिणी विषयक कार्ये स्थायी समितीला पार पाडावी लागतात. राष्ट्रीय जन काँग्रेसचे स्थायी समिती हे एक अंग आहे. स्थायी समितीला व्यापक अधिकार प्राप्त झालेले आहेत. त्याला सत्तेचा उपभोग घेता येतो. चीनच्या प्रशासकीय राजकीय व्यवस्थेमध्ये स्थायी समितीला म्हणजेच या सभागृहाला मोठे मानाचे स्थान आहे हे विसरून चालणार नाही.

## २.६ सरावासाठी प्रश्न :-

१) चीनच्या कायदेमंडळाला ............ म्हणतात.

२) चीनमध्ये ............... प्रांत आहेत.

३) जन काँग्रेसचे ............... वर्षासाठी निवडले जातात.

४) कायदा निर्मितीचा अधिकार ............... समिती उपभोगते.

५) चीनची शासन व्यवस्था ............... आहे.

६) प्रोक्युरेटरची निवड ............... वर्षासाठी केली जाते.

७) १९८२ च्या राज्यघटनेने ............... समिती निर्माण केली आहे.

८) घटना दुरुस्तीसाठी ............... सदस्यांची मंजूरी आवश्यक आहे.

९) अंदाजपत्रकाच्या मंजूरीसाठी ............... चे अधिवेशन महत्त्वाचे आहे.

**उत्तर :**

१) राष्ट्रीय जन काँग्रेस २) २२ ३) ५

४) स्थायी ५) एकात्मक ६) ५

७) स्थायी ८) २/३ ९) एक पैसाही

१०) राष्ट्रीय जन काँग्रेस

♦ ♦ ♦

# (ब) स्वीडनचे कायदेमंडळ


२.० प्रास्ताविक

२.१ कायंदेमंडळ रचना

२.२ कायदेमंडळ कार्ये

२.३ समारोप

२.४ सरावासाठी प्रश्न


**२.० प्रस्तावना :**

स्वीडनच्या कायदेमंडळाच्या रचनेचा अभ्यास आपणास या प्रकरणात करावयाचा आहे. स्वीडीश राज्यघटना तेथील राजकीय व्यवस्था, राज्यव्यवस्थेचे स्वरूप इत्यादीचा आभ्यास सदर प्रकरणाबरोबर या पेपर मध्ये करण्यात आला आहे. या प्रकरणात स्विडनच्या कायदेमंहळाची रचना, ससंदीय गृह, सदस्य संख्या, त्या गृहाची कार्ये इत्यादी गोष्टींचा अभ्यास करण्यात आला आहे.

**२.१ कायदेमंडळ रचना :**

स्विडीश कायदेमंडळ अर्थात संसद म्हणजेच रिक्सडॅगची रचना खालीलप्रमाणे आहे. त्यामध्ये रिक्सडॅग हे स्वीडनचे एकगृही कायदेमंडळ आहे. या सदनाची सदस्य संख्या ३४९ इतकी आहे. हे सभासद अथवा सदस्य मुक्त, गुप्त व प्रत्यक्ष निवडणूकीद्वारे या सदस्यांची निवड होते. या निवडणूकीमध्ये वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या स्वीडीश नागरिक व रहिवाशी असलेल्या व्यक्तीला सदर निवडणूकीमध्ये मतदान करता येते. या बरोबरच निवडणूकीस पात्र होण्याकरीता देखील मतदानासाठीची पात्रता गृहित धरली आहे. म्हणजेच मतदान करणची पात्रता धारण करणारी व्यक्ती निवडणूकीस उभी राहण्यास देखील पात्र असते.

रिक्सडॅगच्या निवडणूकीकरीता एकूण २९ मतदारसंघ निर्माण केले गेले आहेत. ३४९ पैकी ३१० जागा ह्या स्थिर व कायम मतदारसंघ म्हणून विभाजीत करण्यात आलेल्या आहेत व ३९ जागा या समायोजित केल्या जातात.

रिक्सडॅगसाठीची मतदान पद्धती 'प्रमाणशिर' (Proportional) स्वरूपाची आहे. या रिक्सडॅगसाठीची निवडणूक दर चार वर्षांनी सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी घेतली जाते.

कलम १ विभाग ४ स्वीडिशच्या राज्य घटनेनुसार रिक्सडॅग या कायदेमंडळाचे अधिवेशन प्रत्येक वर्षी घेतले जाते. ते देशाची राजधानी स्टॉक-होम येथे घेतले जाते. रिक्सडॅग सदस्यांना सदस्य म्हणून मानधन दिले जाते व इतर आर्थिक लाभ दिले जातात. त्याच प्रमाणे त्यांनी निवृत्ती वेतन देखील अदा केले जाते. रिक्सडॅगच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही सदस्याला त्याच्या कर्तव्यात गैरहजर राहता येणार नाही. त्याच प्रमाणे जर एखाद्या गुन्ह्यात सदस्य दोषी सिद्ध झाल्यास तो रिक्सडॅगचा सदस्य म्हणून कार्य करण्यास अपात्र ठरतो. त्याच प्रमाणे न्यायालयीन निर्णयाप्रमाणे त्याला सदस्य म्हणून बडतर्फ केले जाते. (कलम ४:१२)

- **रिक्सडॅग अधिवेशन :**

रिक्सडॅगच्या सुरक्षीतेसाठी आणि स्वातंत्र्याच्या दृष्टीने रिक्सडॅगचे वार्षिक अधिवेशन बोलाविण्याचा अधिकार सभापतीला आहे.

**सभापती स्पीकर** (Speaker) : भाग चार कलम १ नुसार रिक्सडॅग सभापती व तीन उपसभापती यांची निवड करते. ही निवड रिक्सडॅगच्या निर्वाचीत सदस्यामधून केली जाते. त्यांचा कालावधी रिक्सडॅगच्या कालावधी इतकाच म्हणजे चार वर्षांचा असतो.

- **रिक्सडॅग समित्या** (Riskdag Committee's) :

रिक्सडॅगच्या कायद्यानुसार निर्वाचित सदस्यांची विविध समित्यांकरीता निवड केली जाते. त्यामध्ये राज्यघटना समिती (committee on constitution) आणि वित्त समिती (committee on finance) इत्यादी समित्यांचा समावेश होतो.

शासनातील प्रतिनिधी त्याच बरोबर रिक्सडॅगचे सदस्य यांना कोणालाही सभागृहात विधेयक मांडता येते. रिक्सडॅगच्या कार्यकक्षेत येणाऱ्या कोणत्याही विषयावर विधेयक मांडता येते.

- **पदाधिकारी :**

**सभापती** (Speaker) : कलम १ विभाग २ नुसार सभागृहाच्या कामकाजाची प्रक्रिया ही सभापतींच्या अध्यक्षतेखाली पार पडेल असे नमूद केले आहे.

सभागृह कामकाज सुरू करण्याकरीता सभापतीला सभागृहाचा सचिव मदत करतो. सभापती आपल्या कार्याची जबाबदारी उपसभापतीकडे सोपऊ शकतो. सभपाती व तीन्ही उपसभापतींच्या अनुपस्थितीत रिक्सडॅगचा सर्वात जास्त काळ सदस्य राहिलेली व्यक्ती सभापती पदाचे कामकाज पाहतो. तर दोन पेक्षा अधिक सदस्य सदस्यत्वाच्या बाबतीत समान काळाकरीता असतील तर त्यातील वयाने जेष्ठ व्यक्तीला सभापती पदासाठी काम करण्यास दिले जाते.

प्रत्येक सदस्याला सभागृहात त्याचे स्थान निश्चित करून दिलेले असते. तर सभापती व उपसभापतींकरीता विशिष्ट स्थान निश्चित केलेले असते. तसेच मंत्रीसदस्य असलेल्या सदस्यांना देखील विशिष्ट निश्चित स्थान दिलेले असते.

- **सभापतीची कार्ये** (Function's of Speaker) :

१) सभागृहाच्या कामाकाजाचे अध्यक्षपद स्विकारणे व सभागृहाचे कामकाज हाताळणे.

२) सभागृहाच्या कामकाजाचा कालावधी निर्धारीत करणे.

३) कामकाजाचे वेळापत्रक तयार करणे.

४) सरकारने विशेष निवडणूकांची मागणी केल्यास त्यावर विचार करून आपला निर्णय देणे.

५) सभागृहाच्या कामकाजाची माहिती व अधिवेशनाची रुपरेषा कळविणे.

६) सदस्यांना बोलण्यास परवानगी देणे.

७) सदस्यांच्या प्रस्तुत मांडणीतील विषयासंदर्भात चर्चा करणे.

८) पंतप्रधानाची निवड करणे.

- **कायदेमंडळाची कार्ये** (Function's of the Home)

**१) विधीविषयक कार्ये** (Legislative functions) : सरकार आपल्या विधेयकाचे प्रस्ताव रिक्सडॅगकडे सरकारी विधेयक स्वरूपात सादर करते.

सदर सरकारी विधेयकातील चर्चा विधेयक मांडणी दरम्यान चर्चा केली जाते.

सरकारी विधेयक सभागृहाच्या सचिवाकडे सादर केले जाते. ते पुढील कारवाई करीता. सदर विधेयकाची मुद्रीत प्रत सदस्यांना वितरीत केली जाते.

**२) अर्थविषयक कार्ये** (Financial Functions) :

रिक्सडॅगच्या अर्थविषयक कार्यामध्ये सरकारच्या अर्थविषयक विधेयकाची प्रक्रिया येते. त्यामध्ये १ जानेवारीला सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षासाठीचे वित्त विधेयक सभागृहात मांडले जाते. राज्याचा महसुल व खर्चाचा ताळेबंद अर्थविषयक स्वरूपात सरकार तर्फे सभागृहात मांडले जाते. सदर वित्तविधेयकामध्ये अंदाजपत्रक व त्या संबंधीचा प्रस्तावित आराखडा समाविष्ट असतो. कलम १२(५) नुसार अंदाजपत्रकामध्ये रिक्सडॅगच्या मान्यतेनुसार उत्पन्न व खर्च यासंबंधीची तररतूद केलेली असते.

ज्या वर्षी निवडणूका नसतात त्या वर्षी २० सप्टेंबर पूर्वी वित्त विधेयक सादर करावे लागते. आणि जर नविन सरकार स्थापन झालेले असेल तर सरकार स्थापनेनंतर लगेच दहा दिवसांच्या आत हे विधेयक सादर करावे लागते.

कोणतेही विधेयक १५ एप्रिल पूर्वीच मांडावे लागते. त्यातील सुधारणा आणि बदल या करीता हे विधेयक १५ एप्रिलपूर्वी करावी लागते.

**३) समिती विषयक कार्ये** (Committee functions)

विविध संसदीय कार्याकरीता संसदीय समिती पद्धती स्विडनच्या राजकीय व्यवस्थेमध्ये निर्माण करण्यात आली आहे.

**अ) संसदीय ओंबुडसमन :** भाग १३, कलम ११ नुसार संसदीय ओबुडसमनची नियुक्ती करण्याची पद्धत रिक्सडॅग कडून आमलात आणली जाते. तीन संसदीय ओंबुडसमन व एक मुख्य अशी चार ही संख्या संसदीय ओंबुडसमन ची असते. मुख्य ओंबुडसमन हा प्रशासकीय कार्यप्रमुख म्हणून आपली भूमिका बजावतो. या संदर्भात रिक्सडॅग आणखी एखादा अतिरिक्त उप-ओंबुडसमन नेमू शकते. मुख्य ओंबुडसमन निवड पद्धती

ही गुप्त पद्धतीने केली जाते. यांची निवडही चार वर्षाकरीता होते.

संसदीय कार्यसमिती ओंबुडसमनच्या कार्यपद्धतीवर त्या कार्य संघटनावर व प्रक्रियेवर लक्ष ठेवत असते.

**२) राष्ट्रीय लेखा कार्यालय** (National Audit Office) :

स्वीडिश राज्यघटनेच्या भाग १३ कलम ४ नुसार रिक्सडॅग महालेखापाल यांची नियुक्ती करते. याची निवड व्यक्तीगत होते. तीन पैकी एक लेखापाल हा मुख्य म्हणून जबाबदारी पार पाडतो. परंतु या पैकी कोण मुख्य म्हणून जबाबदारी पार पाडेल हे रिक्सडॅग ठरवते. अर्थात त्याची निवड रिक्सडॅगकडून होते.

या लेखापालांच्या निवडणूकीची प्रक्रिया संसदीय कार्य समितीकडून पार पाडली जाते. तसेच संसदीय समीतीने महालेखापाल यांना बडतर्फ करण्याची शिफारस केल्यास रिक्सडॅग महालेखापाल यांना पदावरून बडतर्फ करते.

**३) रिक्सडॅग समिती व युरोपीय संघ संबंध समिती** (Riskdag Commuttee and Commuttee on Europian Union)

रिक्सडॅग प्रशासनाच्या माध्यमातूनच या रिक्सडॅगचा सचिव हा रिक्सडॅग समीती व युरोपीय संघ समिती या दोन्ही समित्यांच्या कार्यात सहाय्य करत असतो. या सचिव पदावर असणारी व्यक्ती ही स्विडिश नागरीक असावी अशी तरतूद करण्यात आली आहे.

## २.३ समारोप :

स्विडनच्या कायदेमंडळाचे स्वरूप हे एकगृही कायदेमंडळ आहे. १९७० च्या घटना दुरुस्तीनुसार द्विगृही कायदेमंडळ बरखास्त करून एकगृही कायदेमंडळ (रिक्सडॅग) निर्माण करण्यात आले.

## २.४ प्रश्न :

१) रिक्सडॅगची स्थापना स्पष्ट करा.

२) रिक्सडॅगचा सभापती व त्याची कार्ये स्पष्ट करा.

◆ ◆ ◆

## घटक – ३

# अ) चीनचे कार्यकारी मंडळ

## (Executive : Cmposition and function)

**अनुक्रमणिका :**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ राष्ट्राध्यक्ष

 ३.२.२ राज्यमंत्री परिषद

 ३.२.३ पंतप्रधान

३.३ सारांश

३.५ सरावासाठी स्वाध्याय

२.६ संदर्भ पुस्तके


### ३.० उद्दिष्टे :

चीन हा जगातील महाशक्तीशाली देशामधील एक देश आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या या देशाची आहे. या देशाच्या कार्यकारी मंडळाच्या अभ्यासातून देशाची एकूण राजकीय रचना समजण्यास मदत होणार आहे. कायदे मंडळ व न्याय मंडळाप्रमाणे कार्यकारी मंडळाची रचनाही आपल्याला या प्रकरणात अभ्यासता येईल. देशाचा कारभार कोणत्या पद्धतीने चालतो. कार्यकारी मंडळ कसे नियुक्त केले जाते आदिंचा अभ्यास या प्रकरणात करता येईल.

### ३:१ प्रस्तावना :

लोकसंख्येच्या दृष्टिने पहिल्या क्रमांकाचा देश म्हणून चीनला ओळखले जाते. चीनचे अनेक वैशिष्टे आहेत. एक पक्ष पद्धती चीनमध्ये अस्तित्वात असली तरी चीनने लोकशाही व्यववस्थेचा स्विकार केला आहे. चीन हे प्रजासत्ताक गणराज्य आहे. १९५४ ते १९८२ या कालावधीत चार वेळा राज्यघटना अस्तित्वात आली. साम्यवादी चीनने नोव्हेंबर १९५४ मध्ये पहिले संविधान निर्माण केले. या संविधानाची संहिता निर्मितीसाठी ३३३ सभासदांची घटना परिषद निर्माण करण्यात आली होती. राष्ट्राध्यक्ष हा चीन गणराज्याचा औपचारिक प्रमुख आहे. कार्यकारी मंडळाने चीनचा राज्यकारभार कसा चालतो हे आपणांस पाहता येईल.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ राष्ट्राध्यक्ष (President) :

चीन प्रजासत्ताक, गणराज्याचे सरकार माओ-त्से-तुंग यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत झाले. प्रारंभी काही काळ पर्यंत चीनी प्रजासत्ताकाची राज्यघटना, विधीमंडळ किंवा कार्यकारी मंडळ अस्तित्वात नव्हते. या कालावधीमध्ये चीनी जनता राजकीय सल्लागार समितीच्या सल्ल्यानुसार व आदेशानुसार शासकीय कारभार चाललेला होता. चीनची घटना संहिता निर्मितीसाठी ३३ सभासदांची घटना परिषद निर्माण करण्यात आली. १९५४ मध्ये संविधान समितीचा मसुदा पूर्ण तयार झाला व चीनचे पहिले संविधान अस्तित्वात आले. त्यानंतर पुन्हा पुन्हा संविधानामध्ये बदल करण्यात आला. १९८२ च्या राज्य घटनेनुसार आज चीनच्या कार्यकारी मंडळाचा प्रमुख हा राष्ट्राध्यक्ष आहे. १९८२ च्या संविधानाच्या बदलाअनुसार चीनमध्ये आज राष्ट्राध्यक्ष व उपराष्ट्राध्यक्ष ही पदे निर्माण केली आहेत. राज्यघटनेच्या कलम ८० मध्ये राष्ट्राध्यक्षाच्या कार्याचे वर्णन केलेले आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाप्रमाणे चीनचा राष्ट्राध्यक्ष शक्तीशाली नाही. त्याला काही मर्यादीत अधिकार दिलेले आहेत.

- **पात्रता :**

१, तो चीनचा नागरीक असावा.

२. त्याचे वय कमीत कमी ४५ वर्षे पूर्ण असावे.

३. राष्ट्रीय जनकाँग्रेसने वेळोवेळी केलेली इतर पात्रता त्याने पूर्ण केली पाहिजे.

- **कार्यकाल :**

चीनच्या राष्ट्राध्यक्षाची निवड ५ वर्षासाठी केली जाते. एका व्यक्तीस केवळ दोन कालावधीसाठी या पदावर निवडून येण्याचा अधिकार आहे. तिसऱ्यांदा तो निवडून येण्यास पात्र रहात नाही. आपला पाच वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी तो राजीनामा देवू शकतो. राष्ट्राध्यक्ष राजीनामा दिल्यानंतर यांच्या जागी उपराष्ट्राध्यक्षाची निवड केली जाते. काही कारणाने उपराष्ट्राध्यक्षांचे पदही रिक्त असेल तर स्थायी समितीचा अध्यक्ष हा काही कालावधीसाठी राष्ट्राध्यक्ष म्हणून देशाची जबाबदारी सांभाळू शकतो. अध्यक्षाला त्याच्या कार्यात सहाय्यक करणे हे उपाध्यक्षाचे संविधानिक कर्तव्य आहे. अध्यक्षाप्रमाणेच उपाध्यक्षाचीही निवड केली जाते.

- **चीनच्या राष्ट्राध्यक्षाचे अधिकार व कार्ये :**

१९८२ मधील निर्माण करण्यात आलेल्या चीनच्या राज्यघटनेच्या कलम ८० मध्ये राष्ट्राध्यक्षाच्या कार्याचे विवेचन केले आहे.

**१. कायदे निर्मिती विषयक अधिकार :**

राष्ट्रीय जन काँग्रेसने किंवा स्थायी समितीने मंजूर केलेल्या विधेयकांना किंवा कायद्यांना राष्ट्राध्यक्षाची

मंजूरी घ्यावी लागते. त्याला राष्ट्राध्यक्ष मंजूरी देतोच. विधेयक तो नाकरू शकत नाही. जोपर्यंत राष्ट्राध्यक्ष विधेयकांना मंजूरी देत नाही तोपर्यंत त्या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होत नाही. काही वेळेला स्थायी समिती वटहुकूम काढते. त्या वटहुकूमाच्या प्रस्तावांना अंतिम मान्यता देण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना देण्यात आलेला आहे. राष्ट्राध्यक्षांची ही मान्यता जरी औपचारिक पद्धतीची असली तरी ती अत्यंत आवश्यक आहे.

**२. शासकीय/कार्यकारी अधिकारी :**

राष्ट्राध्यक्ष हा चीनचा औपचारिक कार्यकारी प्रमुख आहे. पंतप्रधान, उपपंतप्रधान, मंत्री मंडळातील सदस्य, आयोगाचे अध्यक्ष, महालेखापरिक्षक, राजदूत इत्यादिंची नियुक्ती करणे तसेच त्यांना पदावरून कमी करण्याचे अधिकार राष्ट्राध्यक्षांना आहेत. प्रत्यक्षात त्यांची नियुक्ती आणि पदमुक्ती करण्याचा अधिकार राष्ट्रीय जनकाँग्रेस व स्थायी समितीला असतो. कार्यकारी मंडळाची निर्मिती राष्ट्रीय जनकाँग्रेस किंवा स्थायी समिती करते. या नियुक्त्या करताना राष्ट्राध्यक्षाची मान्यता घ्यावी लागते. तसेच उत्तम कामगिरी केलेल्या नागरिकांना पदव्या देणे, पदके देणे इत्यादि कार्यही राष्ट्राध्यक्षांना करावे लागते. देशामध्ये संकट निर्माण झाल्यास देशात मार्शल लॉ ची घोषणा करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना देण्यात आलेला आहे. युद्ध घोषित करण्याचा अधिकार ही राष्ट्राध्यक्षांना देण्यात आलेला आहे.

**३. परराष्ट्र धोरणविषयक अधिकार :**

राष्ट्रप्रमुख या नात्याने परराष्ट्राशी तह करणे, करार करणे, मैत्री करण्याची मान्यता देण्याचे अधिकार राष्ट्राध्यक्षांना आहेत. परराष्ट्रात राजदूतांच्या नेमणूका तो करू शकतो. तसेच आपल्या देशात आलेल्या राजदूतांचे स्वागतही करू शकतो. परराष्ट्रातील राजदूतांना परत बोलविण्याचा अधिकार त्याला आहे. परराष्ट्र धोरणाविषयक कार्ये त्याला पार पाडावी लागतात.

**४. न्याय विषयक अधिकार :**

राष्ट्राध्यक्ष या नात्याने त्याला न्यायविषयक अधिकार प्राप्त झाले आहेत. सर्वोच्च जनन्यायालय आणि इतर जन न्यायालये यातील न्यायाधिशांच्या नेमणूका करणे, त्यांना पदच्युती करणे, गुन्हेगारांच्या शिक्षेत सूट देणे, त्यांना क्षमा करणे, शिक्षा माफ करणे इत्यादी कार्ये राष्ट्राध्यक्ष करू शकतात. राष्ट्रीय जन काँग्रेस किंवा स्थायी समितीने सूचविलेल्या व्यक्ती संदर्भात तो ते कार्य करतो.

- **चीनच्या राष्ट्राध्यक्षांची स्थान आणि भूमिका :**

जगातील प्रमुख राष्ट्राध्यक्षांमध्ये चीनच्या राष्ट्राध्यक्षांचा समावेश होतो. चीनच्या राष्ट्राध्यक्षांचे स्थान आणि भूमिकेचा विचार करता शासन व्यवस्थेत राष्ट्राध्यक्षाला जरी व्यापक स्वरूपाचे अधिकार दिले असले तरी प्रत्यक्षात राष्ट्राध्यक्षाचे पद नामधारी स्वरूपाचे आहे. राष्ट्रीय जनकाँग्रेस आणि स्थायी समितीच्या निर्देशानुसार त्याला आपले अधिकार वापरावे लागतात अथवा काम करावे लागते. इतर देशाप्रमाणे कायदे निर्मितीच्या प्रक्रियेत त्याला नकार अधिकार दिलेला नाही. एखादे विधेयक मंजूरीसाठी राष्ट्राध्यक्षांच्याकडे

आल्यानंतर त्याला त्यावर नकार अधिकार दिलेला नाही. एखादे विधेयक मंजूरीसाठी राष्ट्राध्यक्षांच्याकडे आल्यानंतर त्याला त्यावर सही करावीच लागते. राष्ट्राध्यक्षांच्या प्रत्येक कृतीवर स्थायी समिती आणि कायदे मंडळाचे नियंत्रण असते. भारताच्या राष्ट्रपतीप्रमाणे चीनच्या राष्ट्राध्यक्षाची भूमिका नामधारी स्वरूपाची बनली आहे. राष्ट्राध्यक्ष हे पद राष्ट्रीय सन्मानाचे आणि केवळ प्रतिष्ठेचे पद बनले आहे. १९८२ च्या चीनच्या राज्यघटनेने त्यांना स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार कोणत्याही प्रकारे दिलेला नाही. या देशात साम्यवादी पक्षाचा मोठ्या प्रमाणात प्रभाव आहे. साम्यवादी पक्षाच्या वरिष्ठ नेत्याची राष्ट्रपती पदावर नियुक्ती केल्याची उदाहरणे दिसून येतात. यावरून राष्ट्राध्यक्षाची भूमिका आणि कार्य समजून येते.

### ३.२.२ राज्यपरिषद (मंत्रिमंडळ) (The State Council) :

चीनच्या संविधानात 'स्टेट कॉन्सील' असा शब्दप्रयोग केला आहे. स्टेट कॉन्सील हे चीनचे सर्वोच्च कार्यकारी मंडळ आहे. संविधानाने मंत्रिमंडळ हा शब्दप्रयोग न करता स्टेट कौन्सील हा शब्दप्रयोग वापरला आहे. त्यावरून त्याचे वेगळेपण लक्षात येते. राज्यपरिषद (The State Council) हे राज्यातील सर्वोच्च सत्ता असलेले कार्यकारी मंडळ असून ते राष्ट्रीय जनकाँग्रेसला जबाबदार राहून कार्य करीत असते. असे १९८२ च्या चीनच्या राज्यघटनेच्या तिसऱ्या प्रकरणातील तिसऱ्या विभागात कलम ८५ मध्ये स्पष्ट नमूद केले आहे. कलम ८६ प्रमाणे राज्य परिषदेमध्ये -

१ पंतप्रधान

३ ते ४ उपपंतप्रदान

३० मंत्री

आयोगाचे ८ अध्यक्ष

ऑडिटर जनरल

सेक्रेटरी

अशी सुमारे ४५ सदस्य संख्या या मंत्रीपरिषदेत असते. साधारणत: ० ते १०० च्या जवळपास राज्यपरिषदेची सदस्य संख्या असलेली दिसून येते. काही वेळेला उपपंतप्रधानांची संख्या १० ते १५ च्या दरम्यान सुद्धा असते. उपपंतप्रधानाकडे शासनातील विशिष्ट खात्याच्या कार्याची जबाबदारी सोपविली जाते. त्याच्याकडे विशिष्ठ कोणत्याही खात्याच्या कामाची जबाबदारी नसते. तो विविध खात्यामध्ये समन्वयाचे काम करतो. एका अभ्यासकाने असे म्हटले आहे की, State Council चे स्वरूप म्हणजे आज्ञेचे मुख्यालय आहे. विभाग आणि यंत्रणांचे जाळे या राष्ट्रपरिषदेत असलेले दिसून येते. साम्यवादी कार्यकर्ते, पक्षघटक, कर्मचारी, अधिकारी त्यात काम करतात. विशेष म्हणजे शासनाच्या विविध कार्यक्रमांचा समन्वय प्रस्तापित करण्याची जबाबदारी ही संघटना पार पाडते.

- **राज्यपरिषदेची निवड व निर्मिती :**

राज्यपरिषदेच्या सदस्यांची निवड करण्याचा अधिकार चीनच राष्ट्रीय जन काँग्रेस व स्थायी समिती यांना आहे. कायदेमंडळाच्या पहिल्या अधिवेशनात मंत्रिमंडळाची निर्मिती केली जाते. प्रत्यक्षात पाहिले असता साम्यवादी पक्षाच्या कार्यकारणीचा प्रभाव पडतो. त्यांच्याच मताने राज्यपरिषद निर्माण होते. प्रत्यक्षात पहिले असता साम्यवादी पक्षाचे केंद्रिय कार्यकारिणी किंवा पॉलिट ब्युरो हे राज्यपरिषदेच्या सदस्यांची निवड करतात. साम्यवादी पक्षाच्या केंद्रिय समितीकडून आलेल्या सदस्यांच्या यादीला राष्ट्रीय जन काँग्रेस मंजूरी देते. पंतप्रदानांची निवड राष्ट्राध्यक्षांच्या शिफारसीं अनुसार जन काँग्रेस करीत असते. पंतप्रधानांच्या शिफारसीने इतर सदस्यांच्या नावांना कायदेमंडळ मान्यता देते. यावरून राष्ट्रीय जन काँग्रेसचे महत्त्व लक्षात येते.

- **राज्यपरिषदेचा कार्यकाल :**

१) राज्यपरिषदेचा कार्यकाल ५ वर्षांचा असतो.

२) कार्यकाल संपण्यापूर्वी पंतप्रधान व मंत्रिमंडळ राजीनामा देवू शकतात. तसेच पंतप्रधान किंवा मंत्री यांना राष्ट्राध्यक्ष राष्ट्रीय जन काँग्रेसच्या शिफारसी अनुसार पदावरून कमी करू शकते.

३) पंतप्रधान व मंत्री यांना दोन कार्यकालापेक्षा (१० वर्षापेक्षा) अधिक काळ सदस्य म्हणून मंत्रीमंडळात राहू शकत नाहीत.

- **राज्यपरिषदेची रचना :**

चीनच्या मंत्रीमंडळात ४५ मंत्री असतात. कामकाजाच्या सोयीच्या दृष्टिने त्याचे ३ प्रकार करण्यात आले आहेत.

**अ) अर्थ व्यापार मंत्रालय :** या मंत्रालयात ऊर्जा, शेती, यंत्र बांधणी, बांधकाम साधनसामग्री, स्टॅण्डर्ड व पेटंट अशा सहा खात्यांचा समावेश होतो.

**ब) इलेक्ट्रॉनिक मंत्रालय :** दूरदर्शन, नभोवाणी (आकाशवाणी), संगणक प्रशासन आणि यंत्र बांधणी अशी चार खाती या मंत्रालयात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

**क) परराष्ट्रीय संबध-व्यापार :** परराष्ट्रीय संबंध येणाऱ्या तीन महत्त्वपूर्ण खात्यांचा यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्यात परकीय आर्थिक संबंध, परकीय गुंतवणूक आणि आयात-निर्यात यांचा समावेश करण्यात आला आहे.

- **अंतर्गत मंत्रीमंडळ** (Inner Cabinet) :

अंतर्गत मंत्रीमंडळामध्ये १ प्रधानमंत्री, ४ उपमंत्री, १० जेष्ठ सल्लागार कौन्सीलमधील सदस्य, १ स्टेट कौन्सील कार्यालयाचा सचिव असे एकूण १६ सभासद असतात. देशाच्या दृष्टिने महत्त्वाचे निर्णय घेण्याचे काम हे अंतर्गत मंत्रीमंडळ करीत असते. महत्त्वाचे निर्णय या कॅबिनेटमध्येच घेतले जातात. साम्यवादी पक्षाची कार्यकर्ते, पक्षघटक अधिकारी व कर्मचारी अंतर्गत मंत्रीमंडळाला सहकार्य करताना दिसतात.

## • पंतप्रधान :

पंतप्रधान हा राज्यपरिषदेचा प्रमुख असतो. तो राज्यपरिषदेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवितो. पंतप्रधानाकडे कोणत्याही एका खात्याची जजबाबदारी नसते. सर्व मंत्रालय व आयोग यांच्या कार्यात समन्वय साधण्याचे काम पंतप्रधान करीत असतो. राज्यपरिषदेच्या कार्यांना मार्गदर्शन करण्याचे काम तो करतो. मंत्र्यांची निवड करुन त्याची माहिती व यादी राष्ट्रीय जन काँग्रेस किंवा स्थायी समितीला देतो. राष्ट्रीय विकासाचा आराखडा तयार करण्याचे कामही पंतप्रधानाला करावे लागते. अनेक महत्वपूर्ण कामे पंतप्रधान करीत असतात. पंतप्रधानाच्या अधिकाराबाबत चीनच्या संवेदनात फारशी माहिती नसली तरी विविध खात्यांची जबाबदारी त्यांच्यावर असते. भारत किंवा इंग्लंडमधील पंतप्रधानाला जितकी ताकद आहे तितकी ताकद व अधिकारक्षेत्र त्याच्याकडे असलेले दिसत नाही. असे असले तरी पंतप्रधानाचे स्थान महत्वाचे आहे.

## • राज्यपरिषदेचे अधिकार व कार्य :

चीनच्या १९८२ च्या संविधानातील कलम ८९ मध्ये राज्यपरिषदेचे अधिकार व कार्य विषय केलेले आहे. विविध कार्ये राज्यपरिषदेला पार पाडावी लागतात.

१. राष्ट्रीय जन काँग्रेसने मंजूर केलेल्या विधीनियमांची व धोरणांची कार्यवाहीची विविध खात्यांमार्फत अंमलबजावणी करणे.

२. शासन, प्रशासन विषयक धोरण ठरविणे. त्यासंबंधी नियम, उपनियम तयार करणे. प्रशासनावर नियंत्रण ठेवणे. देखरेख करणे, शासकीय, प्रशासकीय संस्थांना आदेश देणे अशी कामे करावी लागतात.

३. अर्थसंकल्प व राष्ट्रीय विकास योजनांची अंमलबजावणी करणे. देशाच्या आर्थिक विकासाचा आराखडा तयार करून विकास योजना व कार्यक्रम राबविणे.

४. चीनच्या अंतर्गत व विदेशी व्यापारावर नियंत्रण ठेवणे, विविध खात्यांच्या कार्यात समन्वय साधून प्रशासनकार्य सुलभ व कार्यक्षम बनविणे.

५. देशांत शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षितता राखण्यासाठी राज्यपरिषद विधीनियम तयार करून तो प्रस्ताव मंजूरीसाठी राष्ट्रीय जन काँग्रेस व स्थायी समितीपुढे पाठविणे.

६. चीनचे परराष्ट्र धाोरण ठरवून ते अंमलात आणण्याचे काम करणे.

७. शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, वाहतूक, सामाजिक स्वास्थ्य यासंबंधी योजना आखून त्याची पद्धतशीर अंमलबजावणी करणे.

८. प्रांत, स्वायत्त प्रदेश, नगरपालिका यांचे अधिकारक्षेत्र व जबाबदाऱ्या निश्चित करून त्यांच्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

९. सनदी सेवकांची भरती, बढती, निवृत्ती यासंबंधी राज्यघटनेतील नियमानुसार धोरण, योजना, ठरवून अंमलबजावणी करणे. प्रशासन व्यवस्था अद्यावत व कार्यक्षम बनविणे. सनदी सेवकांच्या कल्याणाच्या योजना राबविणे.

१०. राष्ट्रीय जन काँग्रेसने केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करताना नियम, उपनियम करणे, प्रदत्त कायदे निर्माण करणे.

११. विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट विधिनियमांची आवश्यकता भासल्यास त्यासंबधी विधेयक तयार करून त्याला वटहुकूम अद्यादेश स्वरूपात स्थायी समितीची मंजूरी मिळविणे.

१२. नागरिकांच्या अधिकाराचे रक्षण करणे, देशात शांता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यकता वाटल्यास मार्शल लॉ लागू करणे.

१३. नियमानुसार निश्चित झालेल्या पद्धतीने वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करणे.

१४. राज्यातील प्रशासकीय संस्थांनी, आयोगांनी घेतलेले निर्णय अयोग्य, अनावश्यक असतील तर ते रद्द करणे.

१५. याव्यतिरिक्त राष्ट्रीय जन काँग्रेस आणि स्थायी समितीने सोपविलेल्या जबाबदाऱ्या वेळोवेळी पार पाडणे.

- **राज्यपरिषदेचे स्थान आणि महत्व :**

चीनच्या १९८२ च्या संविधानातील कलम ८९ मध्ये राज्यपरिषदेचे अधिकार व कार्य विषद केलेले आहे. विविध कार्ये राज्यपरिदेला पार पाडावी लगातात.

१. राष्ट्रीय जन काँग्रेसने मंजूर केलेल्या विधीनियमांची व धोरणांची कार्यवाही विविध खात्यांमार्फत अंमलबजावणी करणे.

२. शासन, प्रशासन विषयक धोरण ठरविणे. त्यासंबधी नियम, उपनियम तयार करणे. प्रशासनावर नियंत्रण ठेवणे, देखरेख करणे. शासकीय, प्रशासकीय संस्थांना आदेश देणे अशी कामे करावी लगातात.

३. अर्थसंकल्प व राष्ट्रीय विकास योजनांची अंमलबजावणी करणे. देशाच्या आर्थिक विकासाचा आराखडा तयार करून विकास योजना व कार्यक्रम राबविणे.

४. चीनच्या अंतर्गत व विदेशी व्यापारावर नियंत्रण ठेवणे. विविध खात्यांच्या कार्यात समन्वय साधून प्रशासनकर्म सुलभ व कार्यक्षम बनविणे.

५. देशात शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षितता राखण्यासाठी राज्यपरिषद विधीनियम तयार करून तो प्रस्ताव मंजूरीसाठी राष्ट्रीय जन काँग्रेस व स्थायी समितीपुढे पाठविणे.

६. चीनचे परराष्ट्र धोरण ठरवून ते अंमलात आणण्याचे काम करणे.

७. शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, वाहतूक, सामाजिक स्वास्थ्य यासंबंधी योजना आखून त्याची पद्धतशीर अंमलबजावणी करणे.

८. प्रांत, स्वायत्त प्रदेश, नगरपालिका यांचे अधिकारक्षेत्र व जबाबदाऱ्या निश्चित करून त्यांच्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

९. सनदी सेवकांची भरती, बढती, निवृत्ती यासंबंधी राज्यघटनेतील नियमानुसार धोरण, योजना ठरवून अंमलबजावणी करणे. प्रशासन व्यवस्था अद्यावत व कार्यक्षम बनविणे. सनदी सेवकांच्या कल्याणाच्या योजना राबविणे.

१०. राष्ट्रीय जन काँग्रेसने केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करतान नियम, उपनियम करणे. प्रदत्त कायदे निर्माण करणे.

११. विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट विधिनियमांची आवश्यकता भासल्यास त्यासंबंधी विदेयक तयार करून त्याला वटहुकूम अद्यादेश स्वरूपात स्थायी समितीची मंजूरी मिळविणे.

१२. नागरिकांच्या अधिकाराचे रक्षण करणे, देशात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यकता वाटल्यास मार्शल लॉ लागू करणे.

१३. नियमानुसार निश्चित झालेल्या पद्धतीने वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करणे.

१४. राज्यातील प्रशासकीय संस्थांनी, आयोगांनी घेतलेले निर्णय अयोग्य, अनावश्यक असतील तर ते रद्द करणे.

१५. याव्यतिरिक्त राष्ट्रीय जन काँग्रेस आणि स्थायी समितीने सोपविलेल्या जबाबदाऱ्या वेळोवेळी पार पाडणे.

- **राज्यपरिषदेचे स्थान आणि महत्त्व :**

चीनच्या शासन व्यवस्थेत राज्यपरिषदेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आज राज्यपरिषद एक जबाबदार कार्यकारी विभाग म्हणून कार्यरत आहे. राज्यपरिषद ही आपल्या शासकीय कार्याबाबत राष्ट्रीय जन काँग्रेस व स्थायी समितीला जबाबदार राहून काम करताना दिसते. चीनच्या राजकीय व्यवस्थेमध्ये रचना, अधिकार आणि कार्ये यांचा विचार केला असता चीनमध्ये संसदीय शासनपद्धती अस्तित्वात असल्याचे चित्र दिसत असले तरी प्रत्यक्षात भारत व इंग्लंडसारखी तेथे परिस्थिती नाही. फक्त सैद्धांतिक दृष्टिने चीनमध्ये संसदीय शासनपद्धती आहे असे म्हणता येईल. कारण राज्यपरिषद राष्ट्रीय जन काँग्रेसला जबाबदार राहून कार्य करीत असते. राष्ट्रीय जन काँग्रेसच्या विश्रांतीच्याकाळात जन काँग्रेसचे सदस्य आणि स्थायी समितीचे सदस्य त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवत असतात. याचा बारकाईने अभ्यास केला असता राज्यपरिषदेवर मोठ्या प्रमाणात जन काँग्रेसचे व स्थायी समितीचे नियंत्रण असल्याचे दिसते. चीनचा पंतप्रधान आपल्या सर्व मंत्र्यांसह

सामुहिकरित्या राष्ट्रीय जन काँग्रेसला जबाबदार राहून कार्य करीत असल्याचे दिसते. तात्विक आणि घटनात्मक दृष्टिकोनांतून चीनमध्ये संसदीय कार्यकारी मंडळ आहे असे म्हणता येईल. परंतू प्रत्यक्षात पहिले असता चित्र वेगळे आहे. राज्यपरिषदेचे सर्व अधिकार साम्यवादी पक्षांचे वरिष्ठ नेते हाताळीत असतात. चीन सरकारचे सर्व प्रकारचे शासकीय निर्णय, धोरणे, विविध योजना आणि कार्यक्रम साम्यवादी पक्ष ठरवित असतो. त्यामुळे पंतप्रधान आणि त्यांचे मंत्री यांना केवळ अंमलबजावणीचे कार्य करावे लागते. धोरण निश्चिती, कायदा निर्मितीचे अधिकारही साम्यवादी पक्षाकडे असतात. साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीत व पॉलिट ब्युरो मार्फत संपूर्ण राज्यकारभार चालतो. थोडक्यांत, साम्यवादी पक्षाचे ध्येय धोरण व अंमलबजावणी करण्याचे काम राज्यपरिषद करीत असते. असे म्हटल्यास अतिशोक्ती ठरणार नाही. भारत, इंग्लंड या देशातील केंद्रीय मंत्रिमंडळा एवढे चीनच्या मंत्रिमंडळाला स्थान नसले तरी चीनच्या शासन पद्धतीत त्यांचे स्थान व भूमिका महत्त्वाची आहे. साम्यवादी पक्षाच्या नियंत्रणाखाली कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ कार्य करीत असते. एकच पक्ष चीनमध्ये आहे. त्यामुळे तेथे तत्वाला मोठे स्थान नाही. साम्यवादी पक्षाची संपूर्ण व्यवस्थेवर मोठी पकड असल्याचे दिसते. त्यामुळे चीनचा राज्यकारभार एकमुखी, एकात्मक पद्धतीचा झाला आहे. सर्व सत्ता साम्यवादी पक्षाच्या ठिकाणी केंद्रीय झाली आहे. असे असले तरी जगांत चीनची वैशिष्ट्यपूर्ण शासन पद्धती आहे. या शासनव्यवस्थेत कार्यकारी विभाग म्हणून राज्यपरिषद आपली भूमिका पार पाडताना दिसते.

## २.४ सारांश :

चीनच्या कार्यकारी मंडळाचा विचार केला असता राष्ट्राध्यक्षाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. पंतप्रधान व उपपंतप्रधान यांना स्थान असले तरी संपूर्ण सत्ता राष्ट्रीय जन काँग्रेस व स्थायी समिती यांच्या हाती एकवटलेली दिसते. राज्यपरिषद प्रशासनाची संपूर्ण व्यवस्था पाहते. राज्यपरिषद राष्ट्रीय जन काँग्रेस व स्थायी समितीला जबाबदार असते. साम्यवादी पक्षाकडे सर्व सूत्रे एकवटलेली आहेत. असे असले तरी चीनने चांगली प्रगती केलेली दिसते.

## २.५ सरावासाठी स्वाध्याय :

**१) मोकळ्या जागा भरा.**

१) चीनने ............. मध्ये पहिले संविधान निर्मार केले.

२) राष्ट्राध्यक्ष होण्यासाठी ............ वर्षे पूर्ण असावे लागतात.

३) चीनच्या राष्ट्राध्यक्षाची निवड ............ वर्षासाठी केली जाते.

४. ............ घोषित करण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना देण्यात आला आहे.

५. राज्यपरिषदेवर राष्ट्रीय जन काँग्रेस आणि ............... समितीचे नियंत्रण असते.

**उत्तरे :** १) नोव्हेंबर १९५४ २) ४५ ३) ५
४) मार्शल लॉ ५) स्थायी

**प्रश्न २ : उत्तरे लिहा.**

१) चीनचा राज्याध्यक्ष पात्रता, निवडणूक, कार्यकाल व अधिकार कार्ये स्पष्ट करा.

२) राज्यपरिषदेची निर्मिती व निवड, अधिकार स्पष्ट करा.

३) राज्यपरिषदेचे स्थान आणि महत्त्व.

**२.६ संदर्भ पुस्तके :**


१) चि. ग. घाकरेकर - तुलनात्मक शासन आणि राजकारण.

२) डॉ. अशोक काळे  तुलनात्मक शासन आणि राजकारण.

३) डा. रमेश ढोबळे - तुलनात्मक शासन आणि राजकारण.

४) प्रा. बी. बी. पाटील - तुलनात्मक शासन आणि राजकारण

५) रा. गो. देगावकर - आधुनिक राजकारण व्यवस्था, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

६. रा. ज. लोटे - तुलनात्मक शशसन आणि राजकारण.


❖❖❖

# (ब) स्वीडनचे कार्यकारी मंडळ

३.० उदिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ स्वीडनचा राजा

३.२.२ राजाचे अधिकार व कार्ये

३.२.३ राजाचे स्थान

३.२.४ स्वीडनचा पंतप्रधान

३.२.५ पंतप्रधानाचे अधिकार व कार्ये

३.२.६ पंतप्रधानाचे स्थान

३.२.७ स्वीडनचे मंत्रीमंडळ (कॅबिनेट)

३.२.८ वस्तुनिष्ठ प्रश्न

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे

३.८ स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

**३.० उदिष्ट्ये :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील बाबींचे आकलन होईल.

- स्वीडनच्या कार्यकारी मंडळाची रचना समजून घेता येईल.
- स्वीडनच्या या कार्यकारी मंडळामंडळामधील राजा, पंतप्रधान, मंत्रीमंडळ यांचे अधिकार व कार्ये काय आहेत हे समजून घेता येईल.
- स्वीडनच्या कार्यकारी मंडळाचे महत्व लक्षात येईल.

**३.१ प्रस्तावना :**

हा घटक अभ्यासण्यापूर्वी आपण स्वीडनच्या कायदेमंडळाचा अभ्यास केला आहे. कायदेमंडळाच्या रचना

व कार्याच्या अभ्यासानंतर कोणत्याही देशाचे कार्यकारी मंडळ अभ्यासणे महत्वाचे असते. सदरच्या घटकामध्ये आपण स्वीडनच्या कार्यकारी मंडळाची रचना, अधिकार व कार्ये यांचा अभ्यास करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन :

स्वीडनच्या कार्यकारी मंडळामध्ये १) राजा / राणी २) पंतप्रधान व ३) मंत्रीमंडळ यांचा समावेश होतो. स्वीडनमध्ये अत्यंत मर्यादित स्वरुपाची राजेशाही आहे तर प्रभावी संसदीय शासनपध्दती आहे.

### ३.२.१ स्वीडनचा राजा :

स्वीडनमध्ये पूर्वीपासून राजेशाही अस्तित्वात आहे. इंग्लडप्रमाणेच पूर्वी अनियंत्रित राजेशाही होती. मात्र औद्योगिक क्रांतीनंतर युरोपमधील राजेशाहीवर नियंत्रण येऊ लागले तसेच नियंत्रण स्वीडनमध्ये आल्याचे दिसून येते. अनियंत्रित राजेशाहीवर जनतेच्या, संसदेच्या मर्यादा निर्माण होऊ लागल्या. आजरोजी स्वीडनमध्ये नामधारी स्वरुपाची मर्यादित राजेशाही आहे. राजा हा देशाचा नामधारी प्रमुख आहे. राजघराणे 'रॉयल फॅमिली' या नावाने ओळखले जाते.

- **निवड :**

१९७५ च्या राज्यघटनेमध्ये कलम ५ (१) मध्ये ॲक्ट ऑफ सक्सेशन (१८१०) नुसार स्वीडनचे सिंहासन राजा किंवा राणी अधिग्रहीत करतील अशी तरतूद आहे. तर कलम ५(२) मध्ये इन्स्ट्रूमेंट ऑफ गव्हर्मेंट, १९७४ (Instrument of Government, 1974) नुसार जर राणी सिंहासनपदी स्थानापन्न झाली तर राजाला मिळणारे सर्व अधिकार राणीलाही मिळतील अशी तरतूद आहे.

- **वारसा :**

**१) वयाची अट :-**

इ.स. १८१० च्या ॲक्ट ऑफ सक्सेशन नुसार १९९४ पर्यंत राजाच्या मृत्यूनंतर त्याचा २५ वर्षे पूर्ण असणारा वारसदार राजपदावर येईल अशी तरतूद होती. इ.स. १९९४ नंतर ही वयाची अट १८ वर्षापर्यंत खाली आणण्यात आली म्हणजेच वारसदाराचे वय १८ पूर्ण असले पाहिजे.

**२) रिजंट (Regent) :-**

राजाचा मृत्यू झाला व रॉयल फॅमिलीमध्ये १८ वर्षे पूर्ण करणारा वारसदार नसेल तर अशा कालावधीमध्ये संसद सरकारच्या शिफारसीनुसार उत्तराधिकारी निवडते त्या उत्तराधिकाऱ्यास रिजंट (Regent) असे म्हटले जाते. मात्र हा रिजंट तात्पुरत्या स्वरुपाचा असतो. रॉयल फॅमिलीमधील वारसदार १८ वर्षे पूर्ण होताच रिजंट पदावरुन पायउतार होतो व संबंधित वारसदार राजपद भूषवितो. रिजंट बरोबर डेप्युटी रिजंटची निवडसुध्दा संसद करते.

**३) राणी पदाचा वारसा :-**

१९७५ च्या राज्यघटनेमध्ये राजा व राणी यांचा सिंहासनावर आरुढ होण्याची तरतूद असली तरी १९८०

पर्यंत राजपदावर फक्त राजपुत्र किंवा राज घराण्यामधील पुरुषच स्थानापन्न होईल असा कायदा होता. यालाच ॲग्नॅटिक सक्सेशन किंवा पुरुषप्रधान वारसा पध्दती म्हटले जाते. यापूर्वी इ.स. १३८९ ते इ.स.१४१२ मध्ये स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क एकत्र असताना (युनायटेड स्वीडन) मार्गारेट यांनी राणीपद भूषविले होते. पुढे डेन्मार्क वेगळा झाल्यानंतर स्वीडनच्या सिंहासनावर राणी होण्याचा मान राणी ख्रिस्तीना यांना मिळाला. गुस्ताव (II) ॲडॉल्फ यांची ही राजकन्या होय. ल्युटझेनच्या युध्दामध्ये गुस्ताव (II) ॲडॉल्फ यांचा मृत्यू झाल्यामुळे वयाच्या ६ व्या वर्षी रिक्सडॅगने (संसद) ख्रिस्तीना यांना रिजंट म्हणून नियुक्त केले व पुढे त्या इ.स. १६३२ ते १६५४ मध्ये स्वीडनच्या राणी बनल्या. त्या ख्रिस्तीना ऑगष्टा किंवा ख्रिस्तीना अलेक्झांड्रा या नावाने प्रसिध्द आहेत. चित्रकला, शिल्पकला, साहित्य, तत्वज्ञान इ. मध्ये आवड असणारी राणी म्हणून त्या स्वीडनच्या जनतेमध्ये आजही स्मरणात आहेत. परंतु १ जानेवारी १९८० मध्ये या कायदयामध्ये बदल केला आहे. यानुसार कॉग्नॅटिक सक्सेशन कायदा म्हणजेच स्त्री-पुरुष समान वारसा कायदा निर्माण केला आहे. यानुसार राजाचा थोरला मुलगा किंवा मुलगी असा लिंगावर आधारित भेदभाव न करता जर मुलगी थोरली असेल तर ती सुध्दा सिंहासनावर आरुढ होईल व ती स्वीडनची राणी बनेल अशी तरतूद केली आहे. सध्या कार्ल गुस्ताफ (१६ वा) हा स्वीडनचा राजा आहे. त्याला व्हिक्टोरिया नावाची थोरली असणारी राजकन्या आहे. यामुळे कार्ल गुस्ताफ (१६ वा) यांच्यानंतर पहिल्यांदाच स्वीडनच्या इतिहासामध्ये व्हिक्टोरिया ही राजकन्या स्वीडनची राणी बनेल व तेथून पुढे राणीपदाचा खऱ्या अर्थाने वारसा सुरु होणार आहे. कार्ल फिलीप हा गुस्ताफ (१६ वा) याचा राजपुत्र व व्हिक्टोरिया या राजकन्येचा भाऊ आहे परंतु तो व्हिक्टोरिया पेक्षा धाकटा आहे. एकूणच स्वीडनमध्ये राणी पदाचा वारसा १ जानेवारी १९८० च्या कायद्याने अस्तिवात आला आहे याचे स्वीडनचा जनतेने स्वागत केले आहे.

- **राजाचे वास्तव्य स्थान :-**

राजाला वास्तव्यासाठी स्टॉकहोम येथे भव्यदिव्य असा राजवाडा आहे त्याला 'रॉयल पॅलेस ऑफ स्टॉकहोम' असे म्हटले जाते. त्याठिकाणी राजासाठी चांदीचे सिंहासन (Silver Throne) आहे. १९८२ पर्यंत सर्व राजे याच रॉयल पॅलेसमध्ये वास्तव्य करीत होते. १९७४ मध्ये राजपदावर आलेले कार्ल गुस्ताफ (१६ वा) हे १९८२ पर्यंत रॉयल पॅलेसमध्येच वास्तव्य करीत होते. परंतु कार्ल गुस्ताफ (१६ वा) यांना निसर्ग व पर्यावरण रक्षण यामध्ये विशेष रुची व आवड असल्यामुळे सध्या ते स्टॉकहोमपासून बाहेर काही अंतरावर असणाऱ्या पॅलेस ऑफ ड्रॉटिंगहोम मध्ये वास्तव्यास आहेत.

- **राजाची बडतर्फी :-**

राजाला राजपदावरुन बडतर्फ करण्याचा अधिकार स्वीडनच्या संसदेला-रिक्सडॅगला आहे. मात्र राजावर किंवा तात्पुरत्या कालावधीसाठी राजपदावर असणाऱ्या रिजंटवर फौजदारी खटला चालविता येत नाही.

**३.२.२ राजाचे अधिकार व कार्ये :**

स्वीडनमधील राजेशाही ही ऐतिहासिक आहे. १९ व्या शतकापर्यंत राजाला भरपूर अधिकार होते मात्र नंतर ते कमी होत गेले. आजरोजी राजाचे अधिकार व कार्ये खालील प्रमाणे आहेत.

**१) नामधारी प्रमुख तसेच समारंभीय कार्ये :-**

१९७५ च्या राज्यघटनेमध्ये प्रकरण एक मधील कलम १ नुसार 'स्वीडनमधील सर्व सत्ता ही जनतेमधून आलेली आहे' अशी तरतूद आहे. यामुळे राजाचे सर्व अधिकार संपुष्टात आले आहेत. त्याचे स्थान केवळ देशाचा नामधारी प्रमुखाचे राहिलेले आहे. राज्यघटनेने राजाला कार्यकारी प्रमुख म्हणून अधिकार दिलेले नाहीत. तो केवळ प्रतिकात्मकदृष्टीने देशाचा प्रमुख आहे. राजा हा फक्त समारंभात्मक कार्ये पार पाडतो. राजाला परदेशामध्ये जाण्यासाठीसुध्दा पंतप्रधानाची सल्ला मसलत करावी लागते.

**२) कायदेविषयक कार्ये :-**

निवडणूका झाल्यानंतर नव्याने अस्तित्वात आलेल्या रिक्सडॅग (संसद) अधिवेशनाचे अध्यक्षपद राजा भूषवितो. दरवर्षी रिक्सडॅगचे (संसद) सप्टेंबर महिन्यामध्ये अधिवेशन सुरु होते. अधिवेशनाचे उद्घाटन राजाच्या हस्ते होते मात्र राजा अधिवेशन बरखास्त करु शकत नाही. सरकारच्या वतीने पंतप्रधान भाषण करतो व सरकारची भूमिका स्पष्ट करतो. १९७५ पूर्वी राजा रिक्सडॅगवरती नियंत्रण ठेवू शकत होता. आता मात्र राजाचे कोणतेही कायदेविषयक अधिकार राहिलेले नाहीत. रिक्सडॅगने संमत केलेल्या कायद्यावर राजाची संमती किंवा सहीची आवश्यकता लागत नाही. पंतप्रधानाच्या सहीने कायदा लागू केला जातो. मात्र पंतप्रधान वेळोवेळी राजाला राज्यकारभाराविषयी माहिती देत असतो.

**३) कार्यकारी विषयक अधिकार व कार्ये :-**

राजाला पूर्वी मंत्रीमंडळ नियुक्त करण्याचा अधिकार होता पण सध्या नाही. स्वीडनच्या पंतप्रधानाची निवड रिक्सडॅगचा (संसद) सभापती करतो. राजाच्या रॉयल पॅलेस मध्ये शपथविधीचा कार्यक्रमात राजा पंतप्रधानाला शपथ देतो. मात्र रिक्सडॅगचा सभापती आपल्या सहीने रिक्सडॅगच्या वतीने पंतप्रधानाला नियुक्ती पत्र देतो तसेच पंतप्रधानाला बडतर्फही करतो.

**४) आर्थिक अधिकार :-**

राजाला कोणतेही आर्थिक अधिकार नाहीत याउलट सध्या राजाला सुध्दा कर भरावा लागतो. राजाला त्याची कार्ये पार पाडण्यासाठी रिक्सडॅग आर्थिक निधी निश्चित करते.

**५) आंतरराष्ट्रीय प्रश्नाविषयीच्या सल्लागार समितीचा प्रमुख :-**

स्वीडनमध्ये आंतरराष्ट्रीय प्रश्नांची चर्चा व सोडवणूक करण्यासाठी तसेच स्वीडनच्या परकीय धोरणाबाबत रिक्सडॅग सरकारच्या सल्याने एका सल्लागार समितीची निवड करते. या समितीचे प्रमुखपद राजा भूषवितो.

**६) राजाला सर्वोच्च मानद सैनिकी रँक्स :-**

राजा हा स्वीडीश सैन्यदलाचा मानद कमांडर (कर्नल-इन-चिफ) असतो. त्याला जनरल व ॲडमिरल चा सन्मान आहे. परंतु सैन्यदलाच्या हालचाली किंवा इतर सर्व बाबीवर अंतिम नियंत्रण सरकारचे असते. राजाच्या कोर्टाचा एक भाग म्हणून सैन्यदलामधील उच्च अधिकारपदावरील स्टाफ कार्यरत असतो. तर राजा व राजघराण्यासाठीही सैन्यदलामधील स्टाफ कार्यरत असतो.

**७) न्यायविषयक अधिकार :-**

पूर्वी राजाच्या हातामध्ये सर्व न्यायविषयक अधिकार होते. गुस्ताव ॲडॉल्फ याने इ.स.१६१४ मध्ये न्यायविषयक स्वतंत्र यंत्रणा स्थापन केली. त्यासाठी प्रिव्ही कौन्सिल मध्ये स्वतंत्र न्यायविभाग स्थापन केला. पुढे १७८९ मध्ये किंग गुस्ताव यांनी प्रिव्ही कौन्सिलची पध्दती रद्द केली व किंग्ज सुप्रिम कोर्ट (King's Supreme Court) या नावाने स्वतंत्र न्यायमंडळ स्थापन केले. या संपूर्ण न्याययंत्रणेवर राजाचे नियंत्रण होते. मात्र १९७५ च्या राज्यघटनेच्या अंमलापासून राजाचे न्यायमंडळावरील नियंत्रण व अधिकार संपुष्टात आले आहेत. सध्या किंग्ज सुप्रिम कोर्ट चे रुपांतर 'सुप्रीम कोर्ट ऑफ स्वीडन' असे झाले आहे.

**८) परराष्ट्रविषयक अधिकार :-**

पूर्वी राजा हाच परराष्ट्रविषयक अधिकारामध्ये सर्वेसर्वा होता. परंतु सध्या राजाचे परराष्ट्रविषयक अधिकार अत्यंत मर्यादीत झाले आहेत. परदेशामध्ये दौरा करण्यासाठी सुध्दा त्याला सरकारशी सल्लामसलत करावी लागते. राजा व राज्यघराण्यामधील व्यक्ती स्वीडनचे परदेशामध्ये प्रतिनिधीत्व करत असतात. परकीय राजदूतांची अधिकारपत्रे स्वीकारणे तसेच स्वीडिश राजदूतांना अधिकारपत्रे देण्याचे अधिकार राजाला आहेत. मात्र याबाबत त्याला सरकारची संमती लागते.

**९) सांस्कृतिक कार्ये :-**

स्वीडनमध्ये विविध तारखांना राष्ट्रीय ध्वजदिवस साजरे केले जातात. हे ध्वजदिवस राजघराण्याशी संबंधित आहेत. या दिवशी संपूर्ण स्वीडनमध्ये ध्वज फडकविले जातात. या ध्वजदिवसामध्ये राजासाठी (२६ जानेवारी), राणीसाठी (८ ऑगस्ट), क्राऊन प्रिन्सेंस (१२ मार्च) यांचा समावेश होतो. गुस्ताव ॲडॉल्फ या पराक्रमी राजाच्या स्मरणार्थ ६ नोव्हेंबर यादिवशी फ्लॅग डे साजरा केला जातो. तसेच राजाच्या, राणीच्या व क्राऊन प्रिन्सेंस च्या वाढदिवसालाही फ्लॅग डे साजरा केला जातो.

**१०) नोबेल पारितोषिक वितरणाचा सन्मान :-**

संपूर्ण जगभरात नोबल पारितोषिक हे प्रतिष्ठेचे व प्रसिध्द आहे. स्वीडनमधील नोबेल फांऊडेशनतर्फे हे पारितोषिक भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, साहित्य, वैद्यकशास्त्र, अर्थशास्त्र इ. विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जगातील कोणत्याही व्यक्तीला दिले जाते. स्वीडनच्या स्टॉकहोम कन्सर्ट हॉल मध्ये नोबेल प्राईझ वितरणाचा मुख्य समारंभ दिमाखात पार पाडला जातो. अशा या जागतिक मान्यताप्राप्त नोबेल प्राईझचे वितरण राजाच्या हस्ते केले जाते हा राजाचा बहुमान आहे.

यामधील शांततेचे नोबेल पारितोषिक मात्र नॉर्वेजिअन नोबेल समिती (१९०४) मार्फत निश्चित केले जाते व नॉर्वेमधील ओस्लो या शहरातील ओस्लो सिटी हॉल मध्ये नॉर्वेच्या राजाच्या हस्ते पंतप्रधानाच्या उपस्थित दिले जाते.

**३.२.३ राजाचे स्थान व महत्व :**

स्वीडनच्या राजाचे १९७५ च्या राज्यघटनेपासून अधिकार अत्यंत मर्यादित करण्यात आले आहेत. १९७४

पर्यंत राजा हा काही प्रमाणात कार्यकारी प्रमुख होता मात्र १९७५ पासून राजाचे कार्यकारी प्रमुखाचे अधिकारसुध्दा संपुष्टात आले आहेत. राजाला कोणतेही कार्यकारी तसेच राजकीय अधिकार नाहीत. आज रोजी राजा हा केवळ स्वीडनचा देशाचा प्रमुख (Head of the state) आहे. इंग्लंड, डच, नॉर्वे या देशामधील राजासारखी नामधारी सत्तासुध्दा स्वीडनच्या राजाकडे नाही. तरीसुध्दा स्वीडनच्या जनतेमध्ये राजा व राजघराण्याबद्दल प्रचंड आदर व लोकप्रियता आहे. गुस्ताफ अॅडॉल्फ VI यांच्यासारखा लोकप्रिय राजामुळे स्वीडनमध्ये लोकशाहीवादी राज्यघटना निर्मितीस चालना मिळाली. जनतेमध्ये राजाविषयी त्यामुळे प्रेमाची, आपुलकीची भावना आहे. राजघराण्याचे स्थान मानाचे व महत्वाचे आहे. प्रसिध्द इतिहासकार युनुस नूरदिन म्हणतो, 'जनतेच्या उत्तुंग प्रेमामुळे आजही स्वीडनमध्ये राजेशाही या प्रतिकाचे महत्व पहिल्या स्थानावर आहे.'

### ३.२.४ स्वीडनचा पंतप्रधान :

स्वीडनच्या सरकारला किंवा कार्यकारी मंडळाला किंवा शासनाला रेजिरिंजेन (Regeringen) असे म्हणतात. या रेजिरिंजेन मध्ये पंतप्रधान व मंत्रीमंडळाचा (ट्रॅटस्राड- Statsrad) प्रामुख्याने समावेश होतो. राजा हा केवळ देशाचा प्रमुख असतो. तर पंतप्रधान हाच शासनाचा (रेजिरिंजेन) चा प्रमुख आहे. स्वीडनमधील संसदीय शासनपध्दतीमध्ये पंतप्रधान हाच वास्तव प्रमुख आहे. राज्यघटनेमधील प्रकरण सहा मध्ये कलम १ ते १० नुसार पंतप्रधान व मंत्रीमंडळ यांची नियुक्ती, अधिकार व कार्यासंबंधी तरतूद आहे.

- **पंतप्रधान पदाचा इतिहास / निर्मिती :-**

इंग्लडप्रमाणे स्वीडनमध्येही राज्यघटना तसेच विविध पदांची निर्मिती उत्क्रांती पध्दतीने झाली आहे. स्वीडनमध्ये राजेशाही परंपरा असल्यामुळे राजा हाच देशाचा सर्व बाबतीत प्रमुख होता. 'किंग इन कौन्सिल' या नावाने राजाच्या नियंत्रणाखाली संपूर्ण राज्यकारभार चालत होता. इ.स. १८७६ मध्ये औपचारिक पध्दतीने पंतप्रधान या पदाची निर्मिती झाली. लुईस गेरहार्ड डी गीर यांची पहिले पंतप्रधान म्हणून नियुक्ती करण्यात आली. सध्या सोशल डेमॉक्रॅटिक पक्षाचे स्टीफन लोफवेन हे (३ ऑक्टोबर २०१४ पासून) स्वीडनचे पंतप्रधान आहेत.

ऐतिहासिकदृष्टया स्वीडनमध्ये राजा व्यतिरिक्त दुसरा प्रमुख नव्हता. पुढे राजाने निर्माण केलेल्या प्रिव्ही कौन्सिल या सल्लागार मंडळाकडे राजाने आपले काही अधिकार दिले. काळाच्या ओघात खासकरुन स्वीडनमध्ये इ.स.१७१८ ते १७७२ या स्वातंत्र्य युगामध्ये (Age of Liberty) राजाचे कार्यकारी अधिकार मोठया प्रमाणात कमी झाले व ते अधिकार प्रिव्ही कौन्सिलच्या अध्यक्षाकडे वर्ग झाले. या काळात स्वीडनमध्ये प्रिव्ही कौन्सिलचा अध्यक्ष हा शक्तीशाली झाला. संसदीय शासनपध्दतीचा विकास होत होता यामध्ये ७ जून १८०९ रोजी नवीन इन्स्ट्रमेंट ऑफ गव्हर्मेंट अस्तित्वात आला. इन्स्ट्रूमेंट ऑफ गव्हर्मेंट म्हणजे राजाने जनतेसाठी नवीन तरतूद असणारी राज्यघटना बहाल करणे होय. अशा प्रकारची सुरुवात इ.स. १६३४ पासून झाली होती. जनता वेळोवेळी राजाकडे विविध अधिकारांच्या मागण्या करीत असे व राजा तशा अधिकारांची पूर्तता इन्स्ट्रूमेंट ऑफ गव्हर्मेंट मधून करीत होता. १८०९ च्या या इन्स्ट्रमेंट ऑफ गव्हर्मेंट नुसार पंतप्रधानासंबंधी दोन पदांची निर्मिती करण्यात आली. यामध्ये एक, प्राईम मिनिस्टर फॉर जस्टीस व दोन प्राईम मिनिस्टर फॉर फॉरेन अफेअर्स ही दोन पदे निर्माण केली. अर्थात ही पदे त्या त्या मंत्रीमंडळामधील विभाग प्रमुखाबाबत संबंधित होती. यामध्ये बदल होत पुढे

इ.स.१८७६ मध्ये ही दोन्ही पदे रद्द करण्यात आली. त्यांचे रुपांतर स्वतंत्र न्याय विभागाचा मंत्री व परराष्ट्र व्यवहार मंत्री असे करण्यात आले व २० मार्च १८७६ मध्ये स्वतंत्र कार्यभार असणाऱ्या पंतप्रधान (Prime Minister - Statsminister) या पदाची निर्मिती करण्यात आली. इ.स.१९१७ मध्ये राजाचे पंतप्रधानाच्या नेमणूकीसंदर्भात अधिकार कमी करण्यात आले तर १ जानेवारी, १९७५ च्या नवीन राज्यघटनेनुसार पंतप्रधान हाच स्वीडनचा वास्तव प्रमुख (Real Head) झाला आहे.

- **निवड :-**

स्वीडनच्या पंतप्रधानाची नियुक्ती रिक्सडॅगचा (संसद) सभापती करतो व राजाच्या उपस्थितीमध्ये शपथविधी सोहळा पार पाडला जातो. राज्यघटनेमधील प्रकरण सहा मधील कलम २ ते ४ मध्ये पंतप्रधानाची निवड प्रक्रिया सांगितली आहे.

रिक्सडॅग (संसद) साठीच्या सार्वत्रिक निवडणूका पार पडल्यानंतर रिक्सडॅगचा सभापती विविध पक्षांच्या प्रमुखांबरोबर पंतप्रधानपदाच्या उमेदवारासंबंधी चर्चा करतो. विविध पक्षांकडून उमेदवारांबाबत चर्चा झाल्यानंतर सभापती रिक्सडॅगच्या उपसभापती बरोबर सल्लामसलत करुन एका व्यक्तीचे पंतप्रधानपदासाठी नामांकन करुन रिक्सडॅगसमोर (संसदेसमोर) मतदानासाठी ठेवतो. रिक्सडॅगच्या (संसदेच्या) एकूण ३४९ सदस्य संख्येच्या निम्म्या किंवा निम्म्यापेक्षा जास्त सदस्यांनी म्हणजे १७५ सदस्यांनी पंतप्रधानपदाच्या नामांकन प्रस्तावाच्या विरोधात मतदान केले तर सदरचा नामांकन प्रस्ताव नाकारला गेला आहे असे समजले जाते व तो प्रस्ताव रद्द होतो. याठिकाणी नामांकन प्रस्तावाला नकारार्थी बहुमत लक्षात घेतले जाते. स्वीडनमध्ये नकाराचे संसदीय तत्व (Negative Parliamentary Principle) वापरले जाते. जर बहुमताने प्रस्तावाला नकार मिळाला नाही तर नामांकन प्रस्तावाला मंजूरी मिळते व पंतप्रधानाचे नाव निश्चित होते. याठिकाणी होकार मते (Yes Votes) दिली जात नाहीत.

रिक्सडॅगने जर बहुमताने नामांकन प्रस्ताव नाकारला तर सभापती विविध पक्षांशी चर्चा करुन नव्याने नामांकन प्रस्ताव सादर करतात. सदरचे नामांकन प्रस्ताव चार वेळा नाकारले गेले तर रिक्सडॅगच्या नव्याने निवडणूका घेतल्या जातात व वरील प्रक्रिया नव्याने राबवून पंतप्रधानाच्या नावाची निश्चिती होते.

- **पंतप्रधानाची नियुक्ती :-**

रिक्सडॅगने पंतप्रधानाच्या नामांकनाला मान्यता दिल्यानंतर रिक्सडॅगचा सभापती संबंधित निवड झालेल्या सदस्याला पंतप्रधान पदाच्या नियुक्तीचे पत्र रिक्सडॅगच्या वतीने देतो. (The speaker issues letters of appointment for the prime Minister on behalf of the Parliament (Chapter 6, The Government, Articles - 4) त्याचवेळी पंतप्रधानाला त्याच्या मंत्रीमंडळामधील सदस्याची निवड करण्याविषयी सांगितले जाते.

राजाच्या उपस्थितीमध्ये रॉयल पॅलेसमध्ये रिक्सडॅगचे विशेष अधिवेशन बोलविले जाते व या अधिवेशनात सभापती राजाला औपचारिक पध्दतीने पंतप्रधान व त्याच्या मंत्रीमंडळाच्या सदस्यांच्या नावाची घोषणा करतो.

त्याचवेळी जुने सरकार पायउतार होते आणि नवीन पंतप्रधान व त्याचे मंत्रीमंडळ सत्तेवर येते. याठिकाणी राजाला पंतप्रधानाच्या निवडची प्रक्रीया पार पाडत असतो. पंतप्रधानांचे कार्यालय स्टॉकहोम येथे आहे तेथूनच त्यांचे कामकाज चालते.

- **कार्यकाल :-**

स्वीडनच्या पंतप्रधानाचा कार्यकाल चार वर्षाचा आहे.

- **बडतर्फी :-**

रिक्सडॅग जोपर्यंत पंतप्रधान व त्याच्या मंत्रीमंडळावर अविश्वासाचा ठराव बहुमताने मंजूर करीत नाही तोपर्यंत तो सत्तेवर राहतो. रिक्सडॅगमध्ये विश्वास दर्शक ठराव मांडला जात नाही तर अविश्वास दर्शक ठराव मांडला जातो यालाच नकाराचे संसदीय तत्व म्हणतात. जर अविश्वास दर्शक ठराव (No confidence motion) मंजूर झाला तर त्याला राजीनामा द्यावा लागतो. पंतप्रधानाला पदावरुन काढून टाकण्याचे अधिकार रिक्सडॅगच्या सभापतीला आहेत. म्हणजेच सभापती पंतप्रधानाची नियुक्ती तसेच बडतर्फी करतो.

पंतप्रधान आपला राजीनामा सभापतीकडे देतो. राजीनामा, मृत्यू किंवा अविश्वास ठरावामुळे पंतप्रधानाचे पद रिकामे झाल्यास सभापती पुन्हा नव्याने प्रक्रीया राबवून नवीन पंतप्रधानाची नियुक्ती करतो.

- **पंतप्रधान पदाचा वारसा :-**

पंतप्रधानाचा अचानक मृत्यू, राजीनामा किंवा बडतर्फी झाल्यास उपपंतप्रधान पंतप्रधानपदाची सूत्रे हातात घेतो जर उपपंतप्रधान पदावर नसेल किंवा त्यांनीही राजीनामा दिला असेल अशा वेळेस मंत्रीमंडळामधील ज्येष्ठ कॅबिनेट मंत्री पंतप्रधानपदाची सूत्रे तात्पुरत्या स्वरुपात हाती घेतो. ही व्यवस्था तात्पुरत्या स्वरुपाची असते. सभापती पंतप्रधानपदासाठीची निवड प्रक्रीया लगेच सुरु करुन नवीन पंतप्रधानाची नियुकती करतो.

### ३.२.५ पंतप्रधानाचे अधिकार व कार्ये :

स्वीडनमध्ये राजेशाही हळूहळू संपुष्टात येऊन संसदीय शासनपध्दतीचा विकास झाला आहे व यामध्ये पंतप्रधान पदाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या पंतप्रधानाचे अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१) मंत्रीमंडळाची निर्मिती :-**

रिक्सडॅगमध्ये ज्या राजकीय पक्षाला बहुमत असते त्या पक्षाचा नेता पंतप्रधान होतो. सभापती त्याची नियुक्ती करतो. त्याचवेळी पंतप्रधान आपल्या मंत्रीमंडळाची निर्मिती करतो. मंत्रीमंडळाची निर्मिती व बडतर्फी करण्याचे संपूर्ण अधिकार पंतप्रधानाला आहेत. मंत्रीमंडळातील मंत्री हे रिक्सडॅगचे सदस्य असावे लागतात तसेच तो स्वीडीश नागरिक असला पाहिजे. कुशल, हुशार सदस्यांची मंत्री म्हणून नियुक्ती केली जाते. मंत्रीमंडळाच्या बैठका घेऊन त्या बैठकीचे अध्यक्षस्थान पंतप्रधान करीत असतो.

**२) मंत्रीमंडळाची बरखास्ती :-**

पंतप्रधान मंत्रीमंडळाची बरखास्ती करु शकतो. पंतप्रधानाने राजीनामा दिला तर संपूर्ण मंत्रीमंडळाचा

राजीनामा समजला जातो व संपूर्ण मंत्रीमंडळ बरखास्त होते. पंतप्रधान एखाद्या मंत्र्याला बडतर्फ करु शकतो. थोडक्यात इंग्लंड, भारत इ. देशाप्रमाणेच मंत्रीमंडळाची निर्मिती व बरखास्ती पंतप्रधानावर असते. विशेष बाब म्हणजे रिक्सडॅग एखाद्या मंत्र्याविरुध्द सुध्दा अविश्वास ठराव दाखल करु शकतो तो मंजूर झाला की संबंधित मंत्र्याला राजीनामा द्यावा लागतो.

**३) काळजीवाहू सरकार म्हणून भूमिका पार पाडणे :-**

सार्वत्रिक निवडणूका झाल्यानंतर नवीन सरकारची स्थापना होईपर्यंत पदावर असणाऱ्या पंतप्रधानाला त्या कालावधीमध्ये काळजीवाहू सरकार (Caretaker government) म्हणून कामकाज करावे असा आदेश रिक्सडॅगचा सभापती देतो. ही भूमिका पंतप्रधान पार पाडतो. जर पंतप्रधानाने नकार दिला किंवा राजीनामा दिला तर उपपंतप्रधानाकडे कार्यभार दिला जातो. उपपंतप्रधानाने जर असमर्थता दाखविली तर जेष्ठ कॅबिनेट मंत्र्याकडे काळजीवाहू सरकारची सूत्रे दिली जातात.

**४) कायदेनिर्मिती प्रक्रिया पार पाडणे :-**

रिक्सडॅगमध्ये कायदेनिर्मितीची प्रक्रिया पार पाडली जाते परंतु सभागृहामध्ये सरकारी विधेयके मांडणे, ती मंजूरीसाठी ठेवणे, मसूदा तयार करणे इ. कामे पंतप्रधानाच्या मार्गदर्शनाखाली मंत्रीमंडळ करीत असते. पंतप्रधानाच्या सहीने कायद्याची अंमलबजावणी सुरू होते.

**५) राजाला राज्यकारभाराविषयी माहिती देणे :-**

राजा हा केवळ देशाचा प्रमुख असला तरी राजाला राज्यकारभाराविषयी माहिती देण्याचे महत्वाचे कार्य पंतप्रधानाला करावे लागते. स्वीडनच्या जनतेमध्ये राजाविषयी आजही प्रचंड आदर, विश्वास व आपुलकी आहे. पंतप्रधानाने जर राजाला वेळेवर माहिती दिली नाही तर जनता पंतप्रधानावर टीका करते.

**६) रिक्सडॅग संसदेचा नेता :-**

पंतप्रधान स्वीडनमधील रिक्सडॅगचा (संसद) नेता असतो. शासकीय धोरणांची तो घोषणा करतो त्याचप्रमाणे विचारलेल्या प्रश्नांना संबंधित मंत्री उत्तरे देतोच परंतु जर त्या मंत्र्याने उत्तर दिले नाही तर पंतप्रधान उत्तरे देतो. तो संसदेचा नेता असतो.

**७) पक्षाचे नेतृत्व आणि पक्षावर नियंत्रण :-**

पंतप्रधान हा आपल्या पक्षाचे नेतृत्व करतो व संपूर्ण पक्षावर आपली पकड व नियंत्रण ठेवीत असतो. आपला पक्ष जास्तीत जास्त मजबूत व विस्तारित करण्याचे काम तो करतो. पक्षाचे नेतृत्व करीत असताना संसदेमध्ये व जनतेमध्ये आपल्या पक्षाची प्रतिमा प्रभावी करण्याचे कार्य तो करतो.

**८) परराष्ट्र धोरण विषयक कार्ये :-**

स्वीडनमध्ये राजा हा केवळ नाममात्र आहे त्यामुळे परराष्ट्र व्यवहारामध्ये सुध्दा पंतप्रधानांचेच वर्चस्व व नियंत्रण आहे. रिक्सडॅगला विश्वासामध्ये घेऊन तो परराष्ट्र धोरण ठरवित असतो. आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये आपल्या

देशाची प्रतिष्ठा वाढविण्याचे, परराष्ट्र धोरण आखण्याचे कार्य पंतप्रधान करीत असतो. यासंबंधीची माहीती तो रिक्सडॅगला देत असतो. इतर देशाबरोबर तह, करार मैत्री करण्याचे अधिकार पंतप्रधानाला आहेत.

**३.२.६ पंतप्रधानाचे स्थान :**

स्वीडनमध्ये पंतप्रधानाचे स्थान अत्यंत वास्तव व महत्वाचे आहे. कारण स्वीडनमध्ये राजा हा केवळ नाममात्र आहे सर्व सत्ता पंतप्रधानाच्या हातामध्ये आहे. तो जनतेचा, संसदेचा नेता असतो. त्याचप्रमाणे संपूर्ण मंत्रिमंडळ त्याच्या नियंत्रणाखाली काम करीत असते. इतर युरोपियन देशापेक्षा स्वीडनचा राजा हा अत्यंत नामधारी आहे. राजाला कोणत्याही प्रकारचे कार्यकारी, कायदेविषयक, परराष्ट्र विषयक अधिकार नसल्यामुळे व हे सर्व अधिकार पंतप्रधानाच्या हाती एकवटल्यामुळे पंतप्रधानाचे महत्व वाढले आहे.

१९७४ पर्यंत किंग इन कौन्सिल या नावाने राज्यकारभार चालत होता यामध्ये राजाकडे कार्यकारी अधिकार होते परंतु नवीन राज्यघटनेनुसार राजाचे सर्व अधिकार काढून घेतले आहेत त्यामुळे राजा केवळ नाममात्र पंतप्रधान हा वास्तव प्रमुख बनला आहे. तो व त्याचे मंत्रीमंडळ रिक्सडॅगला जबाबदार राहून कामकाज करीत असते. ओला उल्स्ट्रन, कार्लसन, फ्रेडरिक रेनफेल्ड, ओल्फ पाल्मे इ. व्यक्तींनी पंतप्रधान पदाची प्रतिष्ठा वाढविली आहे. यामधील ओल्फ पाल्मे हे १९६९ ते १९७६ या काळात दोनवेळा स्वीडनचे पंतप्रधान होते.

ओल्फ पाल्मे यांनी संयुक्त राष्ट्रसंघासाठी व आंतरराष्ट्रीय शांततेसाठी महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. ओल्फ पाल्मे यांच्या काळामध्ये स्वीडनमध्ये व्दिगृही कायदेमंडळ रद्द करुन रिक्सडॅग हे एकगृही कायदेमंडळ निर्माण केले तर १९७५ मध्ये पंतप्रधानाला वास्तव प्रमुख बनविणारी नवीन राज्यघटना स्वीडनमध्ये अंमलात आली. युनोच्या माध्यमातून शांततेसाठी ओल्फ पाल्मे यांनी महत्वपूर्ण कार्य केले आहे.

डॅग हॅमरशजोल्ड हे स्वीडनचे पहिल्या महायुध्दाच्या काळात पंतप्रधान होते पुढे ते १९५३ ते १९६१ या काळात संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस होते. त्यांनीही आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी महत्वपूर्ण कामगिरी केली आहे.

थोडक्यात स्वीडनचा पंतप्रधान हा खऱ्या अर्थाने कायदेशीर (डी. ज्युअर) व वास्तव (डी फॅक्टो) प्रमुख आहे. आज रोजी स्टीफन लोफवेन हे स्वीडीश सोशल डेमॉक्रेटिक पक्षाचे नेते ३ ऑक्टोबर २०१४ पासून पंतप्रधान आहेत तर ग्रीन पक्षाचे अॅसा रॉमसन हे उपपंतप्रधान आहेत.

**३.२.७ स्वीडनचे मंत्रीमंडळ (कॅबिनेट) :**

स्वीडनच्या पंतप्रधानाला राज्यकारभार करण्यासाठी मंत्रीमंडळाची निर्मिती करण्यात आली आहे. राज्यघटनेमधील प्रकरण ६ मधील कलम ४ मध्ये पंतप्रधानाने मंत्रिमंडळामधील मंत्र्यांची नावे व यादी रिक्सडॅगसमोर सादर करावी अशी तरतूद आहे. या मंत्रिमंडळाची वैशिष्ट्ये व कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१) रॉयल चॅन्सेरी ऐवजी शासन असे नामकरण :–**

स्वीडनच्या मंत्रीमंडळाला पूर्वी रॉयल चॅन्सेरी असे संबोधले जात होते. परंतु  १ जानेवारी १९७५ च्या नवीन

राज्यघटनेनुसार रॉयल चॅन्सेरी ऐवजी शासन कार्यालये (Government Offices) असे नामकरण करण्यात आले आहे.

**२) मंत्रिमंडळाची निर्मिती :-**

पंतप्रधान राज्यकारभारासाठी मंत्रीमंडळाची निर्मिती करतो. त्यानुसार पंतप्रधानासोबत नवीन मंत्रीमंडळ रॉयल पॅलेस मध्ये घेण्यात येणाऱ्या विशेष अधिवेशनामध्ये राजाच्या उपस्थित सत्ता हाती घेते. याठिकाणी रिक्सडॅगचा सभापती पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या नावाची औपचारिक घोषणा करुन राजाला त्याविषयी माहीती देतो. मंत्रीमंडळाची निर्मिती प्रक्रिया व कार्ये यांची तरतूद राज्यघटनेच्या प्रकरण ७ मध्ये दिली आहे. स्वीडनचे कमीत कमी दहा वर्षे नागरिकत्व असणारी व्यक्ती मंत्रीपदासाठी पात्र मानली जाते.

**३) रिक्सडॅगमध्ये बहुमताची आवश्यकता :-**

पंतप्रधान व त्याच्या मंत्रीमंडळाला रिक्सडॅग मध्ये ३४९ पैकी १७५ सदस्यांचा नेहमी पाठिंबा आवश्यक असतो. जोपर्यंत पंतप्रधान व मंत्रीमंडळावर अविश्वास दर्शक ठराव मांडला जात नाही तोपर्यंत ते सत्तेवर राहतात.

**४) पंतप्रधानाचा राजीनामा किंवा बडतर्फी म्हणजे संपूर्ण मंत्रीमंडळाची बडतर्फी :-**

इतर संसदीय शासनपध्दतीच्या देशाप्रमाणे पंतप्रधानांनी स्वत: राजीनामा दिला किंवा त्याला बडतर्फ केले तर संपूर्ण मंत्रीमंडळ बरखास्त होते. विशेष बाब म्हणजे रिक्सडॅग एखाद्या मंत्र्याविरुध्दसुध्दा अविश्वास ठराव दाखल करु शकते व तो ठराव मंजूर झाला तर संबंधित मंत्र्याला राजीनामा द्यावा लागतो.

**५) पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेटची बैठक :-**

मंत्रीमंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान पंतप्रधान भूषवित असतो. या बैठकीसाठी कमीतकमी पाच कॅबिनेट मंत्र्यांची उपस्थिती आवश्यक असते. या बैठकीमध्ये शासकीय कामकाजासंबंधी निर्णय घेतले जातात.

**६) संयुक्त जबाबदारीचे तत्व :-**

संसदीय शासनपध्दतीनुसार स्वीडनमध्येही संयुक्त जबाबदारीचे तत्व पाळले जाते. मंत्रीमंडळाच्या निर्णयाला सर्वच मंत्री संयुक्तपणे जबाबदार असतात. कोणताही निर्णय हा संपूर्ण मंत्रीमंडळाचा मानला जातो.

**७) मंत्रीमंडळाची कार्ये :-**

मंत्रीमंडळाला शासनाच्या माध्यमातून प्रामुख्याने दोन प्रकारची कार्ये करावी लागतात. एक, शासन व्यवहारासंबंधी कार्ये व दोन, प्रशासकीय कार्ये.

**अ) शासन व्यवहारासंबंधी कार्ये :-**

**१) कायदे निर्मिती :**

यामध्ये कायदे निर्माण करण्यासंबंधीच्या कार्यांचा समावेश होतो. मंत्रीमंडळामध्ये कायद्याच्या मसुद्यासंबंधी

चर्चा करुन विधेयक तयार केला जातो. पुढे हे विधेयक रिक्सडॅगमध्ये मांडले जाते.

**२) तह, करार याविषयी चर्चा करणे :**

परकीय देशांच्या बरोबर जे करार केले जातात त्याबाबत परराष्ट्र मंत्रालयामार्फत चर्चा करुन कॅबिनेटमध्ये निर्णय घेतला जातो.

**३) नियुक्त्यांविषयी चर्चा करणे :**

प्रशासनामध्ये ज्या विविध नियुक्त्या केल्या जातात त्याची चर्चा कॅबिनेटमध्ये केली जाते व त्यावरती निर्णय घेतला जातो.

**४) अंदाजपत्रक निर्मिती :**

मिनिस्ट्री ऑफ फायनान्सच्या मार्फत आर्थिक व्यवहार व अंदाजपत्रकासंबंधी चर्चा करुन निर्णय घेतले जातात.

**५) विविध कार्ये :**

मंत्रालयाच्या विविध खात्यामार्फत त्यासंबंधीची कार्ये केली जातात. उदा. शिक्षणविषयक, आरोग्यविषयक, पर्यावरणविषयक इ. कामे.

- **मंत्रीमंडळामधील विविध खाती (पोर्टफोलिओ) :-**

स्वीडनमध्ये सध्या पुढील प्रकारची प्रमुख खाती निर्माण करण्यात आलेली आहेत. १) पंतप्रधानांचे कार्यालय २) न्यायमंत्रालय ३) परराष्ट्र कामकाज मंत्रालय ४) संरक्षण मंत्रालय ५) आरोग्य आणि सामाजिक कार्य मंत्रालय ६) वित्त मंत्रालय ७) शिक्षण आणि संरक्षण मंत्रालय ८) पर्यावरण मंत्रालय ९) उपक्रम मंत्रालय १०) सांस्कृतिक मंत्रालय ११) रोजगार मंत्रालय.

- **सध्याचे स्वीडनचे कॅबिनेट :-**

दि. ३ ऑक्टोबर, २०१४ पासून सत्तेवर आलेले कॅबिनेट किंवा मंत्रीमंडळ हे सोशल डेमॉक्रॅटिक्स पक्ष आणि ग्रीन पार्टी यांच्या आघाडीमधून तयार झालेले संमिश्र सरकार आहे. स्टीफन लोफवेन हे पंतप्रधान आहेत तर त्यांच्या मंत्रीमंडळात एकूण २४ मंत्री आहेत. यापैकी १२ पुरुष व १२ महीला मंत्रीपदावर आहेत. स्वीडनमध्ये स्त्रियांचे राजकारणामध्ये अत्यंत लक्षणीय प्रमाण आहे. रिक्सडॅगमध्ये ४५ ते ४८ टक्के एवढ्या महीला सदस्य आहेत. त्याप्रमाणेच मंत्रीमंडळामध्ये सुध्दा स्त्रियांचा पुरुषाबरोबर सहभाग आहे ही बाब विशेष नोंद घेण्यासारखी आहे. अशाप्रकारे स्वीडनचे मंत्रालय हे संसदीय शासनपध्दीनुसार कामकाज करते.

**३.२.८ वस्तुनिष्ठ प्रश्न :**

१) स्वीडनमध्ये ............. स्वरुपाची राजेशाही आहे.

अ) मर्यादित ब) अमर्यादित क) वास्तव ड) यापैकी नाही

२) स्वीडनचा राजा हा ............... प्रमुख आहे.

अ) नामधारी ब) वास्तव क) अमर्यादित ड) यापैकी नाही

३) स्वीडनच्या पंतप्रधानाची नियुक्ती ............... करतो.

अ) राजा ब) रिक्सडॅगचा सभापती क) सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश ड) यापैकी नाही

४) स्वीडनच्या पंतप्रधानाचा कार्यकाळ ............... वर्ष आहे.

अ) तीन ब) चार क) पाच ड) सहा

५) स्वीडनच्या कार्यकारी मंडळाला किंवा शासनाला ............... म्हणतात.

अ) रिक्सडॅग ब) रेजिरिंजेन क) कॅबिनेट ड) यापैकी नाही

६) स्वीडनचा पंतप्रधान आपला राजीनामा कोणाकडे देतो ?

अ) राजा ब) रिक्सडॅगचा सभापती

क) सर्वोच्च न्यायालयाचा सभापती ड) यापैकी नाही

७) स्वीडनमध्ये देशाचा वास्तव प्रमुख कोण आहे ?

अ) राजा ब) पंतप्रधान क) रिक्सडॅगचा सभापती ड) यापैकी नाही

८) स्वीडनच्या पंतप्रधानाचे कार्यालय कोठे आहे ?

अ) स्टॉकहोम ब) ओस्लो क) माल्मो ड) गोथेनबर्ग

## ३.३ सारांश :

या घटकामध्ये स्वीडनच्या कार्यकारी मंडळाची सविस्तर चर्चा केली आहे. स्वीडनमध्ये राजा हा केवळ नाममात्र असून पंतप्रधानाच्या हातामध्ये वास्तव सत्ता आहे. राजा हा केवळ समारंभात्मक कार्ये करतो. स्वीडनचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे रिक्सडॅगचा सभापती हा अतिशय शक्तीशाली आहे. सभापती रिक्सडॅगवरती नियंत्रण ठेवतोच पण तो पंतप्रधान व मंत्रीमंडळावरही नियंत्रण ठेवतो. युरोपमधील इतर संसदीय देशापेक्षा स्वीडनमधील राजा अत्यंत दुर्बल सत्ताधारी असून जनतेचे सभागृह रिक्सडॅग, सभापती व पंतप्रधान यांच्याकडे वास्तव सत्ता आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द :

१) रिक्सडॅग - स्वीडनची संसद

२) रेजिरिंजेन - स्वीडनच्या कार्यकारी मंडळाला रेजिरिंजेन म्हणतात.

३) संसदीय नकाराचे तत्व - यामध्ये रिक्सडॅगमध्ये विश्वासदर्शक ठराव मांडण्याऐवजी अविश्वासदर्शक ठराव मांडला जातो. तो मंजूर झाला तरच सरकार सत्तेवरुन पायउतार होते.

४) रॉयल फॅमिली – राजघराणे

## ३.५ वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे :

| | | | |
|---|---|---|---|
| १) अ | २) अ | ३) ब | ४) ब |
| ५) ब | ६) ब | ७) ब | ८) अ |

## ३.६ स्वाध्याय :

प्रश्न १. स्वीडनच्या राजाची निवड, अधिकार, कार्ये व स्थान स्पष्ट करा.

प्रश्न २. स्वीडनच्या पंतप्रधानाचे अधिकार, कार्ये स्पष्ट करा.

**टिपा लिहा :**

१) स्वीडनचे कॅबिनेट

२) राजाची निवड व वारसा

३) पंतप्रधानांचे स्थान

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


1) Larsson, T, Back, Henry (2008).Governing and Governance in sweden, Lund : Student litteratur.

2) Nargelius, Joakim (2011), Constitutional Law in Sweden, Alphen aan den Rijn: Kluwez Law International BV.

3) Constitution of Sweden- Wikipedia, the free encyclopedia https://en.wikipedia.org/wiki/constitution_of_sweden

4) www.riksdagen.se>startpage>Laws

5) www.government.se/how_sweden-is-governed/the-constitution

6) https://sweden.se

7) www.government.se

8) www.wordpress.org

9) www.kungahuset.se


♦ ♦ ♦

### घटक – ४

# अ) चीनचे न्यायमंडळ व राजकीय पक्ष

## (A) – The Judiciary of China)

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ सर्वोच्च जनन्यायालय

 ४.२.२ सर्वोच्च जन-प्रोक्युरेटोरेट

४.३ सारांश

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ संदर्भ पुस्तके


### ४.० उद्दिष्टे :

चीनच्या प्रशासकीय यंत्रणेचा अभ्यास आपण केला आहे. आता याच व्यवस्थेतील तिसरे अंग असलेल्या न्यायव्यवस्थेचा अभ्यास आपणांस करावा लागेल. या प्रकरणात न्यायालयाची रचना, न्यायालयाची कार्यपद्धती, न्यायालयाच्या रचनेचे प्रकार, चीनच्या न्यायालयाची वैशिष्ट्ये याचा अभ्यास करता येईल.

### ४:१ प्रस्तावना :

चीन शासन व्यवस्थेतील न्यायमंडळ हे तिसरे अंग आहे. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाचा अभ्यास करत असताना न्यायमंडळाचा अभ्यास केल्याशिवाय चीनच्या प्रशासकीय व्यवस्थेचे स्वरूप समोर येणार नाही. त्यामुळे मंडळाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. साम्यवादी विचारसरणीशी बांधित असलेली न्यायपालिका चीनमध्ये अस्तित्वात असलेली दिसते. साम्यवादी विचारसरणी हेच चीनच्या न्यायव्यवस्थेचे स्वरूप आहे. मार्क्स, लेनिन व माओवादाचा प्रभाव न्यायव्यवस्थेवर झालेला दिसतो. त्यामुळे अमेरिका, भारत इत्यादी देशांच्या न्यायव्यवस्थेपेक्षा तिचे स्वरूप वेगळे आहे. साम्यवादी पक्ष न्यायालयाकडे शासकीय धोरण अंमलात आणण्याचे साधन म्हणून पाहताना दिसते. त्यामुळे न्यायालयाचे मूळ कार्य बाजूला गेल्याचे चित्र आहे. ही न्यायपालिका आपल्या कार्याविषयी राष्ट्रीय जन काँग्रेसला जबाबदार मानली जाते. कारण यातील सर्व सदस्य हे साम्यवादी पक्षाचे सदस्य असतात. चीनमध्ये रशियासारखीच न्यायव्यवस्था असलेली दिसते. सर्वोच्च न्यायालय आणि सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेट या दोन राजकीय संस्थांचा अभ्यास चीनचे न्यायमंडळ समजून घेण्याच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण ठरतो.

## ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ सर्वोच्च जनन्यायालय :

भारतासारखे चीनमध्येही सर्वोच्च न्यायालय आहे. त्याला सर्वोच्च जनन्यायालय असे म्हणता येईल. सर्वोच्च जनन्यायालय हे चीनमधील अंतिम न्यायालय आहे. हे न्यायालय बेजिंग या राजधानीच्या शहरात आहे. सर्वोच्च न्यायालयामध्ये किती सदस्य असावेत? त्यांचा कार्यकाल कसा असावा? त्यांची निवड कशी व्हावी? त्यांची संपूर्ण तरतूद चीनच्या राज्यघटनेमध्ये करण्यात आलेली आहे. चीनच्या १९८२ च्या संविधानात सर्वोच्च जनन्यायालयाचे विस्तृत विवेचन नसले तरी वरील काही गोष्टींची विवेचने आहेत. चीनमधील सर्वोच्च जनन्यायालय असून त्याला स्थानिक न्यायालय व विशेष न्यायालयांच्या कार्याचे निरीक्षण करण्याचा अधिकार आहे. असे घटनेत स्पष्ट करण्यात आलेले आहे. न्यायालयाचे दिवाणी व फौजदारी असे दोन विभाग करण्यात आले आहेत. चीनच्या न्यायालयाची रचना पिरॅमिड साारखी असलेली दिसते.

**१) रचना :** या न्यायालयात १ सरन्यायाधीश, १ सहन्यायाधीश व इतर न्यायाधीश असतात. न्यायाधीशांची संख्या ही चीनच्या कायद्यानुसार निश्‍चित करण्यात आलेली आहे. संख्या निश्‍चित करण्याचा अधिकार राष्ट्रीय जनकाँग्रेसला आहे.

**२) निवड :** सरन्यायाधीशांची निवड राष्ट्रीय जनकाँग्रेसकडून केली जाते. साम्यवादी विचाराचा अभ्यास असणारा व साम्यवादी विचारावर श्रद्धा असणारा, साम्यवादी पक्षांनी घेतलेले निर्णय बलपूर्वक करून घेणाऱ्या व्यक्तींची निवड न्यायाधीश म्हणून राष्ट्रीय जनकाँग्रेस करते. सहन्यायाधीश व इतर न्यायाधीशांची नेमणूक स्थायी समितीकडून केली जाते.

**३) कार्यकाल :** सरन्यायाधीश व सहन्यायायाधीश यांची निवड ५ वर्षाच्या कालावधीसाठी केली जाते. चीनच्या राज्यघटनेमध्ये न्यायाधीशांची पात्रता कोणती असावी. त्यांची निवड कशा पद्धतीने करावी. त्यांचा अनुभव किती असावा याबाबत स्पष्ट उल्लेख नाही. ५ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर न्यायाधीशांची फेरनिवड करता येते.

**४) पदच्युती :** सरन्यायाधीशाला पदच्युत करण्याचा अधिकार 'राष्ट्रीय जनकाँग्रेसला' आहे. तर सहन्यायाधीशांना व अन्य न्यायाधीशांना पदच्युत करण्याचा अधिकार 'स्थायी समितीला' आहे. या न्यायालयातील इतर न्यायाधीशांनासुद्धा साध्या बहुमताने ठराव करून पदच्युत केले जाते. राज्यघटनेने न्यायाधीशांना पदच्युत करण्यासाठी साधे बहुमत आवश्यक मानले आहे. साम्यवादी पक्षाने घेतलेले निर्णय किंवा केलेला कायदा बलपूर्वक नागरिकांकडून करवून न घेणाऱ्या न्यायाधीशाला पदच्युत किंवा बडतर्फ केले जाते.

- **सर्वोच्च जनन्यायालयाचे अधिकारक्षेत्र :**

चीनच्या १९८२ च्या संविधानात सर्वोच्च जनन्यायालयाच्या अधिकाराचे व सत्तेचे विस्तृतपणे विवेचन

असलेले दिसत नाही. परंतू यापूर्वीची चीनमधील संविधाने, अनुभव आणि वेळोवेळी केलेली तरतुदे यावरून सर्वोच्च जनन्यायालयाच्या अधिकारक्षेत्राचा अभ्यास करता येईल.

**१) प्रारंभिक अधिकारक्षेत्र :** शासकीय आदेश व विधीनियमांशी संबंधीत खटल्यांची सुनावणी ही सर्वोच्च जनन्यायालयात होते. अत्यंत महत्त्वाचे जे वाद असतील किंवा खटले असतील ते सर्वोच्च जनन्यायालयात येतात. राष्ट्रीय संपत्तीचा विनाश, राष्ट्रद्रोह, हिंसा इत्यादी दिवाणी व फौजदारी दावे स्वतंत्र विभाग करून चालविले जातात. नागरिकांना स्वातंत्र्य असावे असे घटनेत उल्लेख असला तरी त्याचा फारसा विचार न्यायालयाला पाळावा लागतो.

**२) पुनर्निर्णयाचे अधिकारक्षेत्र :** विशेष न्यायालय व उच्चस्तर न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध अपील दाखल करून घेण्याचा अधिकार सर्वोच्च जनन्यायालयाला देण्यात आला आहे. यामध्ये दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही स्वरूपांच्या खटल्याचा समावेश करण्यात आला आहे. सर्वोच्च जनन्यायालय इतर कनिष्ठ न्यायालयातील खटले काढून घेवून ते सर्वोच्च जनन्यायालयासमोर विचारार्थ सादर करू शकतात. सर्वोच्च जनन्यायालयाचा निर्णय हा अंतिम असतो. तो त्यांना मान्यच करावा लागतो.

**३) प्रशासकीय अधिकारक्षेत्र :** कनिष्ठ न्यायालय, विशेष न्यायालय यांच्यावर देखरेख ठेवणे, नियंत्रण ठेवणे, मार्गदर्शन करणे, न्यायिक प्रक्रिया पार पाडणे, न्यायालयीन कामकाजाचे नियंत्रण ठेवणे इत्यादी कामे सर्वोच्च जनन्यायालयाला करावे लागतात. वेगवेगळ्या स्तरावरील न्यायालये न्यायदान करताना कायद्याने घालून दिलेली प्रक्रिया पार पाडतात की नाही याचे निरीक्षण प्रोक्युरेटोरेट करतात. कनिष्ठ न्यायालयाकडून कायद्याची अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्याचे काम सर्वोच्च न्यायालय करते. वरकरनी न्यायालयाचे काम स्वतंत्र वाटत असले तरी भारत व अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालया इतके स्वयंपूर्ण व महत्त्वपूर्ण नाही. लोकशाही व्यवस्थेत नागरीकांच्यामूलभूत अधिकाराचे रक्षण करणे आहे. तो अधिकार सर्वोच्च जनन्यायालयाला चीनने दिला आहे. यावरून न्यायालयाची कार्यपद्धती लक्षात येते.

- **चीनच्या न्यायव्यवस्थेची वैशिष्ट्ये :**

चीनची न्यायव्यवस्था ही कार्ल मार्क्स, लेनिन व माओ याच्या विचारप्रवाहाने युक्त अशा साम्यवादी विचार प्रणालीवर आधारीत आहे. त्यामुळेच न्यायविभाग हे शासनव्यवस्थेचे वेगळे व स्वतंत्र अंग आहे. स्वतंत्र न्यायविभाग, न्यायविभागाची सर्वोच्चता व निष्पक्षता या सिंधानांना स्थान नाही. चीनच्या प्रशासनाचे एक अंग म्हणून न्यायालय काम पाहताान दिसते. जनतेला शिक्षा देणे, कायद्याचे पालन करून घेणे ही महत्त्वाची कामे ही न्यायव्यवस्था करताना दिसते. इतर देशाच्या तुलनेत ही न्यायव्यवस्था एकवेगळ्या प्रकारचे असल्याचे दिसते. जनप्रोक्युरेटोरेट ही राजकीय संस्था चीनच्या न्यायव्यवस्थेचे महत्त्वपूर्ण अंग आहे. असे असले तरी चीनच्यान्यायव्यवस्थेची काही महत्त्वाची वैशिष्टे असलेली आपल्याला दिसून येतात.

**१) न्यायालयाची रचना :** चीनचे न्यायालय तीन स्तरांवर विभागले आहे.

**अ) स्थानिक न्यायालय :** यामध्ये दिवाणी व फौजदारी या दोन्ही न्यायालयांचा समावेश होतो. याचे तीन प्रकार पडतात.

i) **उच्च लोकन्यायालय :** स्थानिक न्यायालयाचा हा सर्वात वरचा स्तर आहे. चीन देशातील स्वायत्त प्रदेश, विविध प्रांत, महानगरपालिका याठिकाणी अशा न्यायालयांची स्थापना करण्यात आलेली आहे.

ii) **मध्यस्थी लोकन्यायालय :** चीनमधील उच्च न्यायालय व सर्वात खालील प्राथमिक न्यायालय या दोन न्यायालयाच्या मधील न्यायालयाला मध्यस्थी लोकन्यायालय म्हणून ओळखले जाते.

iii) **प्राथमिक स्तर लोकन्यायालय :** स्थानिक लोकन्यायालयातील सर्वात खालचा स्तर म्हणून या न्यायालयाला ओळखले जाते. विविध प्रदेश, शहर, महानगर जिल्हे याठिकाणी या न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे. तेथे याचे काम चालते.

**ब) विशेष न्यायालय :** या तीन न्यायालयाव्यतिरिक्त चीनमध्ये काही विशेष न्यायालयांची स्थापनाही करण्यात आली आहे.

i) **सैनिकी न्यायालय :** सैनिका संदर्भातील दावे या न्यायालयात चालतात.

ii) **रेल्वे वाहतूक न्यायालय :** रेल्वेतील कर्मचारी अथवा रेल्वे संदर्भातील विविध दाव्यांचा समावेश या न्यायालयात केलेला आहे. ते दावे येथे चालविले जातात.

iii) **जलवाहतूक आणि जंगल न्यायालय :** या न्यायालयामध्ये बोटी व त्यांच्याशी संदर्भीत खटले जंगल संदर्भातील खटले चालविले जातात.

**२) प्रोक्युरेटोरेटपद :** चीनमध्ये स्थानिक स्तरांपासून राष्ट्रीय स्तरापर्यंत प्रोक्युरेटोरेट पदांची साखळी केली आहे. प्रत्येक गांव, जिल्हा व तालुका स्तरावर हे प्रोक्युरेटोरेट काम करत असतात. त्यांच्यावर सर्वोच्च प्रोक्युरेटोरेटचे नियंत्रण असते. राष्ट्रीय जनकाँग्रेसने मंजूर केलेल्या विधेयकांचे पालन नागरिकांकडून होते की नाही हे पाहण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. त्यांना मदतीला गुप्त पोलीसांची यंत्रणाही असते. प्रोक्युरेटोरेटला सर्वोच्च जनन्यायालयांपासून स्थानिक न्यायालयापर्यंत निरीक्षण करण्याचा अधिकारही देण्यात आला आहे. एका प्रकारे न्यायिक अधिकाराचे केंद्रीकरण चीनमध्ये झालेले दिसून येते.

**३) न्यायाधीशांचे काँग्रेसला उत्तरदायित्व :** चीनमधील स्थानिक पातळीपासून वरिष्ठ पातळीपर्यंत असलेली न्यायालये संबंधीत आपापल्या स्तरावर तेथील जनकाँग्रेसला जबाबदार (उत्तरदायी) असतात. जनन्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांची नेमणूक संबंधीत स्तरावरील जनकाँग्रेसद्वारे केले जाते. त्यांना पदावरून दूर करण्याचा अधिकारही जनकाँग्रेसलाच देण्यात आला आहे. एकाप्रकारे हे न्यायाधीश जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींना जबाबदार असतात.

**४) कमी खर्चाची न्यायालय :** चीनमध्ये वकीलीच्या व्यवसायाचे समाजवादीकरण करणत आले आहे. वकील एकत्र येवून सहकारी तत्त्वावर बार असोसिएशन तयार करतात. कायदेविषयक सल्ला देणे व या सहकारी संस्थांद्वारे न्यायालयात खटले चालविण्यासाठी ते मदत करतात. बार असोसिएशनला मिळणारे उत्पन्न सदस्यांमध्ये वाटण्यात येते. कमी खर्चात व लवकरात लवकर न्याय पक्षकारांना मिळतो. समाजवादी

रचनेत व्यक्तींना सहकार्य करण्याची भावना असते. तीच भावना त्या यंत्रणेत दिसते.

**५) तडजोडीची व्यवस्था :** एखाद्या खटल्यामध्ये न्यायालयामध्ये तडजोड होण्याची शक्यता असेल तर प्राथमिक जनन्यायालयामधील कमी महत्त्वाच्या खटल्यामध्ये दोन पक्षांत तडजोड घडवून आणण्यासाठी समझोता समित्या निर्माण करण्यात आलेल्या आहेत. इतर देशांमध्ये अशा समित्या आढळत नाहीत. या समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश असतो. यामुळे न्यायालयातील खटल्यांची संख्या कमी होते. परंतु या समितीने दिलेल्या निर्णयाविरोधात वरिष्ठ न्यायालयात अपिलीय याचिका दाखल करता येते. एका प्रकारे समित्या निर्माण करून मध्यस्तींची भूमिका पार पाडल्याचे दिसते.

**६) समाजवादी पक्षांचे संपूर्ण नियंत्रण :** न्यायव्यवस्थेवर समाजवादी विचारप्रणालीचा पगडा असलेला दिसतो. जे न्यायाधीश म्हणून नियुक्त होतात ते समाजवादी पक्षाचे सदस्यच असतात. समाजवादी विचारप्रणाली पासून ते दूर जावू शकत नाहीत. समाजवादी विचार प्रणालीचे संपूर्ण ज्ञान असणारा न्यायाधीशाचीच नेमणूक केली जाते. समाजवादी पक्षाने घेतलेला निर्णय बलपूर्वक करवून घेण्याची जबाबदारी न्यायालयावर असते. अशाच न्यायाधीशाची नेमणूक केली जाते.

**७) इतर वैशिष्ट्ये :**

अ) वरिष्ठ न्यायालयावर नियंत्रण आहेत.

ब) न्यायालयीन खटल्याची सुनावणी स्थानिक भाषेतून होत असते.

क) देशाच्या संरक्षणाच्या दृष्टिने महत्त्वाचे खटले गुप्त पद्धतीने चालविले जातात.

ड) सामान्य खटले जाहिरपणे चालविले जातात.

• **सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेट** (The Supreme Peoples Procuratorates) :

चीनच्या न्यायव्यवस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वोच्च जनन्यायालय होय. चीनच्या १९८२ च्या राज्यघटनेतील कलम १२९ व १३४ या कलमात जनप्रोक्युरेटोरेटची तरतूद केलेली आहे. या प्रोक्युरेटोरेट व्यवस्थेत सर्वोच्च शिखरावर सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेट आहे. संपूर्ण न्यायव्यवस्थेचा विचार केला असता स्थानिक स्तरापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत ही न्यायालयाची साखळी असलेली आपल्याला दिसून येते. प्रोक्युरेटोरेट ही एक अभिनव राजकीय संस्था आहे. इतर देशांमध्ये प्रोक्युरेटोरेटपद आढळून येत नाही. १९९० पूर्वीच्या सोव्हिएट रशियातील प्रोक्युरोटर जनरल या पदाशी मिळते जुळते हे पद असलेले दिसून येते.

**रचना :** सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेट हे एक मंडळ आहे अथवा त्याला एक समिती असेही म्हणता येईल. प्रोक्युरेटोरेट जनरल हा या मंडळाचा अध्यक्ष आहे. हे या व्यवस्थेतील सर्वोच्च पद आहे.

**निवड :** सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेटची निवड राष्ट्रीय जनकाँग्रेसकडून केली जाते.

**कार्यकाल :** राष्ट्रीय जनकाँग्रेसचा जितका कार्यकाल आहे म्हणजेच ५ वर्षाइतका कार्यकाल सर्वोच्च

प्रोक्युरेटोरेटचा असलेला दिसून येतो. राष्ट्रीय जनकाँग्रेसला मदत करण्यासाठी सहजन प्रोक्युरेटोरेटची नियुक्ती केली जाते. त्याची निवड स्थायी समितीकडून होते. त्याची फेरनिवड करता येते. म्हणजेच जास्तीत जास्त १० वर्षे त्याला आपल्या पदावर राहता येते. सर्वोच्च प्रोक्युरेटोरेट हे आपल्या कार्यासाठी राष्ट्रीय जनकाँग्रेस व स्थायी समितीला उत्तरदायी असतात. सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेटचे अधिकार व्यापक स्वरूपाचे आहेत. नागरिकांना व संस्थांना कायद्याचे पालन करावयास लावण्याची जबाबदारी चीनच्या राज्यघटनेने सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेटकडे सोपविली आहे.

- **सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेटचे अधिकार :**

१) समाजवादी विधीव्यवस्थेचे उल्लंघन करणाऱ्या अपरध्यांना पकडून न्यायालयासमोर हजर करून त्यांच्यावर खटले दाखल करणे. या खटल्याच्या सुनावणीवेळी सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेटवादी म्हणून काम करतो. विधीनियम आणि मुलभूत कर्तव्ये याचे उल्लंघन करणाऱ्यांना गुप्त पोलिस यंत्रणेच्या सहाय्याने शोधून काढण्याचे काम तो करतो.

२) न्यायालयीन प्रक्रियेवर लक्ष ठेवणे. जर न्यायकि प्रक्रियेत दोष आढळून आला तर ते दोष सर्वोच्च जनन्यायालयाच्या निदर्शनास आणून देणे. कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची खात्री वाटत नसेल तर तो स्वत:हून सर्वोच्च जनन्यायालयात अपील करतो.

३) चीन सरकारला वेळोवेळी कायदेविषयक सल्ला देवून सरकारने केलेल्या कृतींचे व घेतलेल्या निर्णयांचे, धोरणांचे वैधानिक दृष्टिकोनातून समर्थन करणे. थोडक्यात, सरकारी वकील म्हणून कायदेविषयक बाजू मांडण्याचे काम तो करतो.

३) चीनमधील नागरिकांना अटक करताना प्रोक्युरेटोरेटच्या संमतीशिवाय अटक करता येत नाही. प्रोक्युरेटोरेटवर सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेटचे नियंत्रण असते. तसेच अधिकारी अथवा नागरिक यांच्याकडून जर कायदेभंग करणारी कृती झाली असतील तर त्यांची चौकशी करून आरोपपत्र दाखल करण्याचे काम तो करतो. केंद्र आणि प्रादेशिक स्तरावरून कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याकडून देशविरोधी कृत्य घडल्यास त्याविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्याचे काम तो करतो.

४) चीनमधील नागरिकांना अटक करताना प्रोक्युरेटोरेटच्या संमतीशिवाय अटक करता येत नाही. प्रोक्युरेटोरेटवर सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेटचे नियंत्रण असते. तसेच अधिकारी अथवा नागरिक यांच्याकडून जर कायदेभंग करणारी कृती झाली असतील तर त्यांची चौकशी करून आरोपपत्र दाखल करण्याचे काम तो करतो. केंद्र आणि प्रादेशिक स्तरावरून कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याकडून देशविरोधी कृत्य घडल्यास त्याविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्याचे काम तो करतो.

५) साम्यवादी वा समाजवादी विधी व्यवस्थेचे जतन अथवा संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. साम्यवादी क्रांतीविरुद्ध कोणत्या संघटना, व्यक्ती पक्ष यांची कटकारस्थाने सुरू आहेत का याचा सतत शोध घेण्याचे काम तो करतो.

६) सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेटला देशाच्या सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करावे लागते. सार्वजनिक संपत्तीची हानी केल्यास त्याच्यावर शासनाच्या बाजूने फिर्याद तो दाखल करू शकतो.

७) कोणत्याही नागरिकाकडून अथवा संस्थेकडून त्याला कागदपत्रे मागविता येतात. शासकीय धोरण किंवा निर्णय योग्य नसतील तर शासनाच्या बाजूने फिर्याद तो दाखल करू शकतो.

८) मुलभूत कर्तव्याचे प्रत्येकाकडून पालन होण्यावर चीनमधील समाजवादी व्यवस्था सदृढ होणे अवलंबून आहे. म्हणून चिनी समाजव्यवस्था सदृढ करण्याच्या कार्यात समन्व करण्याचे काम प्रोक्युरेटोरेट करतो.

अशा प्रकारे सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेटला विविध अधिकार देण्यात आले आहे. ही न्यायविषयक व्यवस्था चीनमध्ये आढळून येते. साम्यवादी पक्षातील वजनदार व्यक्तींची निवड या पदावर केली जाते. एकूण चीनमध्ये न्यायव्यवस्थेच्या माध्यमातून समाजवादी व्यवस्था सदृढ व मजबूत करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

## ४.४ सारांश :

जगातील इतर न्यायव्यवस्थेपेक्षा वेगळी न्याय व्यवस्था समाजवादी विचारसरणीवर आधारलेली न्यायव्यवस्था म्हणून चीनच्या न्यायव्यवस्तेचा उल्लेख करावा लागेल. समाजवादी पक्षाची धोरणे राबविण्याचेच काम न्याय व्यवस्था करत असल्याचे दिसून येते. न्यायालयाची रचना करून एका प्रकारे नागरिकांच्याकडून कायद्याचे पालन करून घेण्याचे काम या न्यायालयाकडून होत असल्याचे दिसते. असे असले तरी चीनचे न्यायव्यवस्थेचा स्विकार केला आहे.

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय :

**१) मोकळ्या जागा भरा.**

१) चीनची न्यायव्यवस्था ............. विचारसरणीवर आधारलेली आहे.

२) चीनचे सर्वोच्च न्यायालय ............ शहरता आहे.

३) चीनचे न्यायालय ............ स्तरांत विभागले आहे.

४. सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेट हे सोव्हिएत रशियाच्या ............ पदाशी मिळते-जुळते आहे.

५. सर्वोच्च जनप्रोक्युरेटोरेटचा कार्यकाल .............. वर्ष असतो.

**उत्तरे :** १) साम्यवादी  २) बेजिंग  ३) तीन

४) प्रोक्युरेटर जनरल  ५) पाच

**प्रश्न २ : खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) सर्वोच्च जनन्यायालयाची रचना व अधिकारक्षेत्र स्पष्ट करा.

२) चीनच्या न्यायव्यवस्थेची वैशिष्ट्ये विषद करा.

## ४.६ संदर्भ पुस्तके :

१) चि. ग. घाकरेकर - तुलनात्मक शासन आणि राजकारण.

२) प्रा. बी. बी. पाटील - तुलनात्मक शासन आणि राजकारण

३) रा. गो. देगावकर - आधुनिक राजकारण व्यवस्था, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४) रा. ज. लोटे - तुलनात्मक शशसन आणि राजकारण.

५) डॉ. अशोक काळे  तुलनात्मक शासन आणि राजकारण.

६) डा. रमेश ढोबळे - तुलनात्मक शासन आणि राजकारण.

❖ ❖ ❖

# ब) चीनमधील राजकीय पक्ष
## (B – Political Party System)

### १) प्रस्तावना :

चीनच्या राजकीय पक्षाचा विचार केला असता साम्यवादी पक्षाचा प्रामुख्याने करावा लागेल. चीन हा साम्यवादी देश असल्याने चीनमध्ये साम्यवादी पक्ष (Communist Party) हा एकमेव राजकीय पक्ष आहे. या पक्षाची स्थापना १९२१ मध्ये झाली. १९४९ मध्ये राजकीय क्रांती साम्यवादी पक्षाने केली. १९५४ ते १९८२ च्या राज्यघटनेपर्यंत घटनात्मक स्थान साम्यवादी पक्षाला देण्यात आले होते. अमेरिका, स्वित्झर्लंड या पाश्चात्य लोकशाही देशामधील राजकीय पक्षापेक्षा चीनमधील साम्यवादी पक्ष मूलत: भिन्न आहे. त्यामुळे १९८२ च्या राज्य घटनेमध्ये असे म्हटले आहे की, ''साम्यवादी पक्ष मार्क्सवाद, लेनिनवाद, माओवाद यावर निष्ठा ठेवून त्याच्या वैचारिक आधारावर चीन या सार्वभौम राज्यात लोकसत्ताक हुकूमशाहीवर निष्ठा ठेवून समाजवादी, समाजरचना निर्माण करेल. साम्यवादी पक्षाचा इतिहास, घटना, धोरणे, कार्यपद्धती, नेतृत्व, राजकीय सहभागातील भूमिका यासंदर्भात चीनमधील राजकीय पक्ष वैशिष्ट्यपूर्ण आहे. गेली अनेक वर्षे चीन साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली झपाट्याने प्रगती करत आहे.

- **चीनच्या राजकीय पक्षाचे वैशिष्ट्य :**

**१) एक पक्षपद्धती :** कार्ल मार्क्स यांच्या विचारांवर आधारित समाजरचना निर्माण करण्यासाठी एक पक्ष पद्धतीचा स्विकार या देशांनी केलेला आहे. चीनच्या राज्यघटनेमध्ये एकाच राजकीय पक्षाला घटनेनुसार मान्यता दिल्यामुळे आणि त्याविरोधी पक्ष स्थापणस प्रतिबंध असल्यामुळे स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत एकच पक्ष असलेला दिसतो. दुसरा कोणताही पक्ष चीनमध्ये अस्तित्वात नाही. मार्क्सवादी तत्त्वप्रणाली व मूल्यांचा स्विकार केल्यामुळे त्यांना इतर पक्षांची गरज वाटत नही. कामगारांना मार्गदर्शन करणारा, त्यांचे नेतृत्व करणारा व त्यांची सेवा करणारा पक्ष म्हणून साम्यवादी पक्षाकडे पाहिले जाते. त्यामुळे त्यांना इतर पक्षाची आवश्यकता वाटत नाही.

**२) संविधानात पक्षाला स्थान :** चीनने तयार केलेल्या १९८२ च्या राज्यघटनेत साम्यवादी पक्षाला अधिकृतरित्या मान्यता देण्यात आली आहे. तसा उल्लेख घटनेमध्येच आहे. त्यामुळे हा पक्ष एक वैधानिक संस्था म्हणून कार्यरत असल्याचे दिसतो. शासनावर साम्यवादी पक्षाचे नियंत्रण आहे. हाच पक्ष शासनाचे ध्येयधोरण निर्धारण करतो. त्यावरून पक्षाचे स्थान लक्षात येते. या देशात सरकार आणि पक्ष यामध्ये कोणताही भेदभाव केला जात नाही.

**३) साम्यवादी पक्षाची मक्तेदारी :** राज्यघटनेमध्ये इतर कोणत्याही राजकीय पक्षाला मान्यता न दिल्यामुळे या पक्षाची एकाधिकारशाही निर्माण झाली आहे. या पक्षांशिवाय इतर पक्ष म्हणजे कामगार वर्गाच्या विरोधी असलेले पक्ष असे मानले जाते. त्यामुळे या पक्षाची मक्तेदारी शासनाच्या सर्वच संस्थांवर दिसून येईल.

**४) लोकशाही केंद्रवाद :** पक्षाचे संघटन व कामकाज पद्धती हे केंद्रात्मक सिद्धांतावर आधारीत आहे. स्थानिय, प्रांतिय आणि राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांची निवड पक्षामार्फत होत असते. पक्षातील सर्व सदस्यांना विचारस्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यांचे मत ऐकून घेवूनच पक्षसंघटनेत निर्णय घेतला जातो व तो निर्णय वरिष्ठ पातळीवर कळविला जातो. केंद्रीय पातळीवर निर्णय पोचल्यानंतर केंद्रीय समितीने घेतलेल्या निर्णयावर कनिष्ठ पातळीवरील कोणत्याही संघटनेला मत प्रकट करता येत नाही. अंमलबजावणी करणे इतकेच काम त्यांच्या हातात राहते. अशाप्रकारे साम्यवादी पक्षाने संघटनेत सत्तेचे लोकशाही केंद्रीकरण केले आहे.

**५) मयादित पक्ष सदस्यत्व :** पक्ष सदस्यत्व देताना चीनमध्ये दोन प्रकार करण्यात आले आहेत. त्यामद्ये १) प्राथमिक साम्यवादी पक्षाचे सदस्यत्व, २) कायमस्वरूपी सदस्यत्व. साम्यवादी पक्षाचे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी नागरिकाला विशिष्ठ पात्रता असावी लागते. पक्षाची दीर्घकाळ काम करणारी पक्षाचे ज्ञान असणारी व्यक्ती पक्षाचे सदस्यत्व मिळण्यास पात्र ठरते. याशिवाय त्या व्यक्तीने साम्यवादी पक्षाचे कार्य जबाबदारीने केले पाहिजे. पक्षाशी एकनिष्ठ राहून ध्येय धोरणाची अंमलबजावणी केल्यास त्याला कायमस्वरूपी सदस्यत्व दिले जाते. कायमस्वरूपी सदस्य असणाऱ्यांची संख्या तीन कोटीच्या घरांत आहे.

**६) पक्षश्रेष्ठी :** साम्यवादी पक्षामध्ये पक्षश्रेष्ठीला महत्त्वाचे स्थान आहे. वरिष्ठ पातळीवर पक्षाने घेतलेल्या आज्ञा किंवा पक्षाने दिलेले आदेश कनिष्ठ पातळीवरील सदस्यांना पाळावे लगातात. जे सदस्य आज्ञा पाळत नाहीत त्यांना पक्षातून काढून टाकले जाते. काही वेळेला अशा व्यक्तीविरुद्ध कठोर शिक्षाही केली जाते. यामुळे पक्षामध्ये शिस्त, एकजिनसीपणा राहून जे वरिष्ठ पातळीवर धोरण घेतले आहेत त्याची अंमलबजावणी करण्यास सोयीस्कर होते.

**७) शासनावर नियंत्रण :** चीनमध्ये असलेल्या सर्व शासकीय संस्था प्रशासन या सर्वांवर साम्यवादी पक्षाचा प्रभाव आहे. न्यायसंस्था, राष्ट्रीय जन काँग्रेस, अध्यक्ष, पंतप्रधान, मंत्रीमंडळ अशा सर्व राजकीय संस्थांवर साम्यवादी पक्षाच्या आदेशानुसारच कार्य चालते. विरोधी पक्षच अस्तित्वात नसल्यामुळे कोणीही विरोध करीत नाही. नियोजन, धोरण निश्चिती, अंमलबजावणी आदि कामे पक्षाच्या मार्गदर्शनानुसार होत असतात. त्यामुळे पक्षाचे शासनसंस्थेवर प्रभुत्व असल्याचे दिसून येते.

**८) संघटनात्मक रचना :** साम्यवादी पक्षाची संघटनात्मक रचना पिरॅमिडसारखी आहे. पक्ष तीन स्तरांवर संघटनेचे काम करताना दिसतात. प्राथमिक संघटना, प्रादेशिक संघटना व राष्ट्रीय स्तरावरील संघटना अशी रचना करण्यात आली. प्राथमिक संघटना ते पॉलिट ब्युरो व स्थायी समिती अशा कनिष्ठ ते वरिष्ठ संघटना चीनमध्ये निर्माण करण्यात आली आहेत. कनिष्ठ संघटना या वरिष्ठ संघटनांचे आदेशाचे पालन करताना दिसतात.

**९) इतर वैशिष्टे :** याशिवाय चीनच्या पक्ष पद्धतीचे अनेक वैशिष्टे आढळून येतात. १) विरोधी पक्षाचे अस्तित्व दिसून येत नाही. २) शासनाला समांतर अशी पक्षरचना असलेली दिसून येते.

- **साम्यवादी पक्षाचे संघटनात्मक बांधणी रचना :**

साम्यवादी पक्ष १९४९ मध्ये चँ-काय-शेक यांच्या राजवटीचे उच्चाटन करून सत्तेवर आला. तेव्हापासून आतापर्यंत हा पक्ष सत्तेवर आहे. माओ-त्से-तुंग हा साम्यवादी पक्षाचा संस्थापक अध्यक्ष म्हणून

या पक्षाला माओवादी पक्ष असे सुद्धा म्हटले जाते. चीनी साम्यवादी पक्ष संघटना पिरॅमिडप्रमाणे आहे. जसजसे वर जाईल तसतसे नेत्यांची संख्या कमी-कमी होत जाते. पिरॅमिडच्या शिखस्थानी राष्ट्र पातळीवरील संघटना आहे. तीला राष्ट्रीय पक्ष काँग्रेस असेही म्हणतात. स्थानिक पातळीपासून शिखरापर्यंत लाखो कार्यकर्ते पक्षामध्ये असलेले दिसून येतात. पक्षाची रचना पुढीलप्रमाणे असलेले दिसते.

**१) प्राथमिक पक्ष संघटना (स्थानिक सेल) :** कम्युनिस्ट पक्षातील हा सर्वात खालचा स्तर आहे. गावपातळीवरील संघटनेला स्थानिक सेल म्हणतात. प्रत्येक गाव, शहर, वॉर्ड आदि ठिकाणी स्थानिक सेलची स्थापना केलेली असते. या संघटनेत तीन सदस्य असतात. प्राथमिक पक्ष संघटना किंवा स्थानिक सेल हजारोंच्या संख्येने असतात. एकाच ठिकाणी असणाऱ्या व्यक्ती स्थानिक सेलमध्ये काम करतात. त्यांना माओ, लेनिन, मार्क्स यांच्या विचाराचा प्रसार करावा लागतो. पक्षसदस्यांना प्रशिक्षण देणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, नवीन पक्षसदस्यांची भरती करून घेणे, पदादिकाऱ्यांची निवड करणे आदि कामे स्थानिक सेलना करावी लागतात.

**२) म्युनिसिपल पक्ष काँग्रेस :** स्थानिक सेलच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासां म्युनिसिपल पक्ष काँग्रेसची र्मिती करण्यात आली आहे. प्राथमिक सेल कोणकोणती कामे करतो याची माहिती ते घेत असतात.

**३) प्रादेशिक पक्ष संघटना :** प्रांत, महानगरपालिका, स्वायत्त प्रदेश या संघटनातील सदस्यांची निवड केली जाते. ही निवड नगरपालिका काऊंटी यातील सदस्याकडून होत असते. सामान्यत: कनिष्ठ संघयनेतील सदस्येकडून वरिष्ठ संघटनेतील सदस्यांची निवड होते. वरिष्ठ संघटना आपल्याखालील कनिष्ठ संघटनेवर नियंत्रण ठेवण्याचे काम करतात.

- **पक्षाची राष्ट्रीय संघटना :**

राष्ट्रीय पातळीवर साम्यवादी पक्षाच्या चार प्रकारच्या संघटना कार्यरत असलेल्या आपल्याला दिसतात.

i) **राष्ट्रीय क्राँग्रेस :** साम्यवादी पक्षाच्या घटनेनुसार राष्ट्रीय काँग्रेस ही पक्षाची सर्वोच्च संघटना होय. प्रत्येक प्रांत पक्ष काँग्रेसद्वारे राष्ट्रीय पक्ष काँग्रेससाठी सात प्रतनिधी निवडतो. महानगरपालिका, स्वायत्त प्रदेश व प्रांत या स्तरांवरील हे प्रतिनिधी निवडून आलेले असतात. ही निवड पाच वर्षांसाठी केली जाते. राष्ट्रीय पक्ष काँग्रेसच्या वार्षिक अदिवेशनात पक्षाचे कार्यक्रम व उद्दिष्टे निश्चित केली जातात. म्हणजेच शासनाला मार्गदर्शन करण्याचे काम केले जाते. राष्ट्रीय काँग्रेसमधील सदस्यांची संख्या जास्त असल्यामुळे ज्यादा चर्चा न करता केंद्रीय समितीने ठरविलेल्या धोरणांना मान्यता देण्याचे काम राष्ट्रीय काँग्रेस करित असते.

ii) **केंद्रिय समिती :** चीनच्या राज्यघटनेच्या कलम १९ प्रमाणे साम्यवादी कम्युनिष्ट पक्षाच्या केंद्रिय समितीमधील सदस्यांची निवड राष्ट्रीय काँग्रेस कडून होते. त्यांचा कार्यकाल ५ वर्षाचा असतो. राष्ट्रीय काँग्रेसच्या विश्रांतीच्या काळात केंद्रित समिती राष्ट्रीय काँग्रेसची सर्व कामे करते. पॉलिट ब्युरोच्या सदस्यांची निवड व त्यांनी केलेल्या निर्णयांना मंजूरी देण्याचा अधिकार केंद्रिय समितीला आहे. याशिवाय साम्यवादी पक्षाचे धोरण ठरविणे, अंमलबजावणी करणे, पक्षाच्या कनिष्ठ संघटनावर नियंत्रण करणे आदि कामे केंद्रिय समिती करतात.

iii) **पॉलिट ब्युरो/स्थायी समिती :** केंद्रिय समितीकडून पॉलिट ब्युरो या सर्वोच्च संघटनेची निर्मिती केली जाते. केंद्रिय समितीमध्ये शंकर सदस्य असतात. साम्यवादी पक्षाच्या नियंत्रणाचे कार्य करण्यासाठी आणि महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी केंद्रिय समितीला वारंवार बैठका घेणे शक्य होत नाही. म्हणून केंद्रिय समितीकडून २१ सदस्यांची पॉलिट ब्युरो आणि ५ सदस्यांची स्थायी समिती स्थापन केली जाते. साम्यवादी पक्षाचा महासचिव हा पॉलिट ब्युरोचा अध्यक्ष असतो. पॉलिट ब्युरोच्या कार्यावर त्याचे नियंत्रण असते. केंद्रिय समितीने केलेल्या निर्णयाची कार्यवाही करणे, साम्यवादी पक्षाचे धोरण ठरविणे आदि कामे पॉलिट ब्युरो व स्थायी समिती करत असते.

iv) **सचिवालय :** साम्यवादी पक्षाच्या सर्वोच्च पातळीवर सचिवालय ही एक महत्त्वपूर्ण व आवश्यक संस्था आहे. पॉलिट ब्युरो व केंद्रिय समितीने निश्चित केलेली धोरणे कार्यान्वित करण्याचे काम सचिवालय करीत असते. सचिवालयाचा प्रमुख म्हणून महासचिवाचे पद महत्त्वाचे मानले जाते. पक्षनिष्ठेचा अभाव असणाऱ्या पक्ष सदस्यांची चौकशी करून त्याच्यावर प्रसंग शिस्तभंगाची कारवाईही महासचिवामार्फत होत असते. त्यामुळे या पदाला महत्त्वाचे स्थान आहे.

- **सरावासाठी स्वाध्याय :**

**प्रश्न १ : मोकळ्या जागा भरा.**

१) चीनमध्ये ............ पक्ष आहेत.

२) चीनच्या प्रशानावर ............ चे नियंत्रण आहे.

**प्रश्न २ उत्तरे लिहा. (सरावासाठी प्रश्न)**

१) चीन पक्षपद्धतीचे वैशिष्ट्ये सांगा.

२) साम्यवादी पक्षाची रचना स्पष्ट करा.

- **संदर्भ पुस्तके :**

१) चि. ग. घाकरेकर - तुलनात्मक शासन आणि राजकारण.

२) प्रा. बी. बी. पाटील - तुलनात्मक शासन आणि राजकारण

३) रा. गो. देगावकर - आधुनिक राजकारण व्यवस्था, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४) रा. ज. लोटे - तुलनात्मक शशसन आणि राजकारण.

५) डॉ. अशोक काळे - तुलनात्मक शासन आणि राजकारण.

६) डा. रमेश ढोबळे - तुलनात्मक शासन आणि राजकारण.

❖ ❖ ❖

# ब) स्वीडनचे न्यायमंडळ व राजकीय पक्ष

**अ) न्यायमंडळ**

१.० प्रास्ताविक

१.१ न्यायमंडळ रचना

१.२ राजकीय पक्षपद्धती

१.३ समारोप

१.४ सरावासाठी प्रश्न

१.५ संदर्भ ग्रंथ

ब) राजकीय पक्ष

२.० प्रस्तावना

२.१ राजकीय पक्षपद्धती

२.२ स्विडनमधील राजकीय पक्ष

२.३ समारोप

२.४ प्रश्न.

**२.० प्रस्तावना :**

स्वीडनच्या न्यायमंडळाची रचना सदर प्रकरणामध्ये आपल्याला अभ्यासायची आहे. संसदीय लोकशाही व्यवस्था असलेल्या स्विडनमध्ये न्यायमंडळाची रचना ही एकेरी पद्धतीची असलेली आहे. तीन स्तरांमध्ये स्विडनच्या न्यायालयीन व्यवस्थेची रचना आहे.

स्विडनच्या सर्वोच्च न्यायालयाची स्थापना १७८९ मध्ये करण्यात आली. स्विडनच्या सर्वोच्च न्यायालयाची रचना राज्य घटनेमध्ये नमूद केलेली आहे.

**१.२ न्यायमंडळाची रचना :**

सर्वोच्च न्यायालय, अपीलाचे न्यायालय आणि जिल्हा न्यायालये ही सर्वसाधारण न्यायालय होत. स्वीडनच्या सर्वोच्च न्यायालयात एकूण १६ न्यायाधिश आहेत. ज्यांची नियुक्ती सरकारकडून केली जाते. परंतु न्यायालय हे रिक्सडॅग प्रमाणेच एक स्वतंत्र व्यवस्था आहे. तेव्हा सरकारला न्यायालयीन प्रक्रियेमध्ये अथवा कार्यामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करता येत नाही. किंवा न्यालयाच्या एखाद्या निर्णया संदर्भात कोणतेही मत व्यक्त करता येत नाही. ऐतिहासिक दृष्ट्या पाहिले असता न्यायालयीन सत्ता ही राजाकडे होती. परंतु पुढील काळात

राजाच्या अधिकारात कपात होऊन संसदीय लोकशाही व्यवस्थेच्या स्थापनेमुळे स्वतंत्र एकेरी न्याय व्यवस्था स्थापन केली गेली.

१९७४ च्या इन्स्ट्रूमेंट ऑफ गव्हर्नमेंट कायद्याप्रमाणे स्विडीश राजेशाहीच्या नावाने निकाल देणे बंद होऊन तो संसदीय लोकशाहीच्या घटनात्मक अधिकारान्वये प्रदान केला जाऊ लागला.

- **न्यायालये :**

स्वीडिश न्यायालये दोन प्रकार पडतात. त्यामध्ये

**१) सामान्य न्यायालय** (The general Courts) : सामान्य न्यायालयामध्ये गुन्हेगारी / फौजदारी आणि नागरी स्वरूपाच्या दाव्यांचा समावेश होतो. आणि

२) **सामान्य प्रशासकीय न्यायालय हा त्याचा दुसरा प्रकार होय.** ज्यामध्ये सरकार व नागरीक यातील वाद यांचा समावेश सामान्य प्रशासकीय न्यायालयाच्या कक्षेत येतात. या दोन्ही प्रकारच्या न्यायालयाची रचना ही त्रीस्तरीय आहे. ज्यामध्ये संबंधीत न्यायालये त्यांच्या कक्षेतील दाव्यांाची सुनावणी व निर्णय संबंधीत अंतीम न्यायालयात करते.

- **सामान्य न्यायालय** (General Courts) :

सामान्य न्यायालयामध्ये फौजदारी स्वरूपाच्या खटल्यांचा समावेश होतो. स्वीडनच्या दंड संहितेमध्ये नमूद गुन्ह्यांच्या खटल्यांचा समावेश या कक्षेत येतो. या बरोबरच सामान्य न्यायालय कांही नागरी कायदा विषयक वाद असलेल्या खटल्यांचा देखील निर्णय देऊ शकते. ज्यामध्ये कुटुंब विषयक वाद व्यावसायिक घटकांमधील तंटे इत्यादी त्याबरोबरच कुटुंब विषयक बाबी, ज्यामध्ये दत्तक विधान कायदेशिर पालकत्वासाठीची प्रकरणे इत्यादी संदर्भातील बाबी मध्ये देखील सामान्य न्यायालय लक्ष घालू शकते.

- **जिल्हा न्यायालये** (District Courts) :

स्वीडनमध्ये सध्या ४८ जिल्हा न्यायालये कार्यरत आहेत. जिल्हा न्यायालये ही सामान्य न्यायालयासाठीची प्राथमिक माहिती देणारी यंत्रणा आहे. १९७१ मध्ये ही जिल्हा न्यायालये स्वीडनमध्ये निर्माण करण्यात आली. ती पूर्वीच्या तुलनेत मोठ्या शहरांकरीता असलेल्या न्यायालयांच्या बदल्यांत देशातील विविध भागाकरीता त्या भागाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार त्यांची निर्मिती करण्यात आली.

- **अपीलाचे न्यायालय** (Court of Appeal) :

स्वीडीश न्यायव्यवस्थेत सहा अपीलाची न्यायालये अस्तित्वात आहेत. अपीलाची न्यायालये ही द्वितीय स्तरावरील न्यायालये आहेत. ज्यामध्ये फौजदारी स्वरूपाच्या खटल्यांचा समावेश होतो. त्याचबरोबर इतर खटले ज्यांच्यावर जिल्हा न्यायालयामध्ये चर्चा व निर्णय झालेला असतो. अपीलीय न्यायालयाकडे त्याच खटल्यांना विचारात घेतो. ज्यामध्ये त्या न्यायालयाला सदर खटल्यामध्ये कांही विशिष्ट विश्वास ठेवण्यायोग्य बाबी असतील तर तसेच जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाबद्दलची भूमिका देखील तपासून पाहिली जाते.

म्हणजेच जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाबरोबर येणाऱ्या निर्णयानुसार अपीलाचे न्यायालय आपला निर्णय देते.

- **सर्वोच्च न्यायालय** (Supreme Court) :

सर्वोच्च न्यायालय हे सामान्य न्यायालय व्यवस्थेतील शेवटचे न्यायालय आहे. हे न्यायालय आपले अधिकार स्वत:च आबाधीत राखते. आणि कनिष्ठ न्यायालयाच्या अधिकाराची प्रस्थापना करण्याची जबाबदारी देखील या सर्वोच्च न्यायालयाची आहे.

- **सामान्य प्रशासकीय न्यायालय** (General Administrative Courts) :

सामान्य प्रशासकीय न्यायालयामध्ये विविध प्रकारच्या खटल्यांचा निवाडा केला जातो. प्रामुख्याने खाजगी व्यक्ती व सरकारी अधिकार प्राप्त व्यक्ती व संस्था यांच्यातील तंटे समाविष्ट होतात. ५०० च्या वर अधिक प्रकारचे खटले, विषय या सामान्य प्रशासकीय न्यायालयाच्या कक्षेत येतात. उदा. स्विडीश कर संस्था, स्वीडीश सामाजिक विमा संस्था इत्यादी घटकांसंदर्भातील अपील सामान्य प्रशासकीय न्यायालयामध्ये समाविष्ट होतात.

- **प्रशासकीय न्यायालये** (Admistrative Courts) :

स्वीडीश न्यायालयामध्ये १२ प्रशासकीय न्यायालये आहेत. प्रशासकीय न्यायालये ही सामान्य प्रशासकीय न्यायालयाचे प्राथमिक स्तर न्यायालय म्हणून कार्यरत असतात.

- **अपीलाचे प्रशासकीय न्यायालय** (Administrative Court of Appeal) :

स्वीडीश न्यायव्यवस्थेमध्ये प्रशासकीय न्यायालयाचे चार अपीलीय न्यायालये आहेत. प्रशासकीय अपील न्यायालयामध्ये कनिष्ठ स्तरीय न्यायालयामध्ये पूर्वी निर्णय झालेल्या खटल्यांचा व न्यायालयीन प्रश्नांचा समावेश होतो.

त्याच बरोबर सार्वजनिक वापराच्या जागा व कार्यालयीन अभिलेखा संदर्भातील प्रथम दखल खटल्यांचा समावेश खालील न्यायालयात केला जातो. प्रशासकीय अपील न्यायालयामध्ये व त्याच्या कार्यकक्षेत कर, खटले, मानसिक दृष्ट्या दुर्बल, प्रौढ व तरूण यांच्या संदर्भातील खटल्यांचा देखील समावेश होतो. या न्यायालयात खटला तेव्हाच दाखल केला जातो जेंव्हा त्या खटल्यांची सुनावणी कनिष्ठ न्यायालयात योग्य पद्धतीने असल्यास नाही असे निदर्शनास आले.

- **सर्वोच्च प्रशासकीय न्यायालय** (Supreme Administrative Court)

सर्वोच्च प्रशासकीय न्यायालय हे सामान्य प्रशासकीय न्यायालयाचे शेवटचे व अंतीम न्यायालय आहे. अपीला संबंधीची परवानगी सर्वोच्च प्रशासकीय न्यायालय तेव्हांच देते जेव्हा एखाद्या खटल्यामध्ये त्या खटल्यावर विश्वास ठेवण्यास जागा व विवेकाधीन राहून त्यावर निर्णय झाला असेल तरच कनिष्ठ स्तरावरील न्यायालयाकडून निर्गमीत कोणत्याही खटल्यांचा समावेश सर्वोच्च अपीलीय न्यायालयामध्ये केला जातोच असे नाही.

- **विशेष न्यायालये** (Special Courts) :

विशेष न्यायालयाच्या माध्यमातून अनेक लहान लहान खटल्यांची सुनावणी केली जाते. त्या विशेष न्यायालयाची संख्या मोठ्या प्रमाणात स्वीडीश न्यायव्यवस्थेमध्ये निर्माण केले गेले आहेत.

विशेष न्यायालया अंतर्गत विविध विषयासंदर्भात सामान्य प्रशासकीय न्यायालया अंतर्गत त्याची एक उपशाखा म्हणूनच हे विशेष न्यायालय कार्य करतात.

विशेष न्यायालयाची रचना अपवादात्मक परिस्थितीमध्ये एक स्तरीय अथवा द्विस्तरीय असते.

१) जमीन आणि पर्यावरण न्यायालय.

२) स्थलांतरण न्यायालय.

३) कामगार न्यायालय.

४) पेटंट अपील न्यायालय.

५) संरक्षण इंटेलिजन्स न्यायालय.

- **न्यायाधिशांची नियुक्ती :**

स्वीडीश न्यायव्यवस्थेमधील न्यायाधिशांची नियुक्ती ही अतिशय वेगळ्या पद्धतीची आहे. त्यामध्ये वकिली शिक्षणाचे म्हणजे लॉ. ग्रॅज्युएट झाल्यानंतर आपले वकीली क्षेत्रातील करीअर त्या व्यक्तीला सुरू करता येते. त्या प्रकारचा अर्ज त्या व्यक्तीने न्याय मंत्रालयाकडे करावा लागतो. जे मंत्रालय साधारणपणे ३०% अर्ज स्विकृत करत असते. सुरूवातीची दोन वर्षे कोर्ट क्लार्क व सहाय्यक म्हणून करावी लागतात. त्यानंतर त्या व्यक्तीला योग्य ती चाचणी उत्तीर्ण व्हावी लागते. त्यानंतर त्यांना जिल्हा न्यायाधिश पदावर नियुक्ती केली जाते.

सरकार न्यायाधिशांच्या नियुक्ती आणि बढती संदर्भातील निर्णय घेते. अपीलीय न्यायालयात न्यायाधिश म्हणून नियुक्त होण्याकरीता २० वर्षांचा अनुभव संबंधित व्यक्तीकडे असावा अशी पात्रतेची अट आहे.

- **प्रोसिक्युटर (वकिल – सरकारी) :**

स्वीडीश प्रोसिक्युशन अ‍ॅथॉरिटी कडून स्वीडिश प्रोसिक्युटरची नियुक्ती केली जाते. ज्यांच्या कामाचे स्वरूप हे गंभीर स्वरूपाच्या गुन्हेगारी खटल्यांमध्ये पोलीसांना मार्गदर्शन करण्याचे असते. प्रोसिक्युटर ही व्यक्तीच केवळ सरकारच्या वतीने अटक करण्यासंदर्भात व त्या व्यक्तीवर गुन्हे कलम लादण्यासंदर्भात अधिकृतरित्या काम करते. प्रोसिक्युटर हा न्यायालयीन पिठाचा (बेंच) चा सदस्य नसतो. व तसेच तो न्यायालयाच्या इतर खाजगी चर्चेत सहभागी देखील होत नसतो.

प्रोसिक्युटर हा एकमात्र सार्वजनिक पद धारण करणारा असतो. जो खटल्यांना अपिलीय न्यायालयात दखल करू शकतो.

* **ॲडव्होकेटस् (वकील) :**

स्विडीश बार संघटना त्या बारच्या सदस्यांवर नियंत्रण करत असते. तसेच एखाद्या बार सदस्याला वकीली करण्यास अपात्र ठरविण्याचा अधिकार या बार संघटनेला आहे. प्रोसिक्युटर जनरल बार संघटनेला वा मंडळाला न्यायीक प्रक्रिये संदर्भात निर्णय घेण्याची विनंती करतो.

**१.३ सारांश :**

'स्वीडीश न्यायमंडळाची रचना ही इतर देशांच्या तुलनेत वेगळ्या प्रकारची आहे. एकेरी पद्धतीची न्यायव्यवस्था स्विडन मध्ये स्थापन केली आहे. तीन स्तरीय न्यायव्यवस्था स्विडनच्या राज्यघटनेमध्ये समाविष्ट केली आहे.

**१.४ सरावासाठी प्रश्न :**

१) स्विडनच्या न्यायव्यवस्थेमध्ये किती प्रकारच्या न्यायालयाची तरतूद केली आहे.

२) ............ वर्षे अनुभव असलेली व्यक्ती अपीलीय न्यायालयात न्यायाधिश होऊ शकते.

३) प्रोसिक्युटर .............. प्रकारचा वकील असतो.

## ब) राजकीय पक्ष

* **राजकीय पक्ष पद्धती** (Political Prty system):

स्वीडनचा इतिहास हा संसदीय लोकशशही पद्धतीचा आहे. सध्या स्विडनच्या संसदेमध्ये (रिक्सडॅग) मध्ये आठ राजकीय पक्ष प्रतिनिधीत्व करत आहेत. प्रत्येक पक्षाला कमीत कमी ४% मत प्राप्त करावी लागतात. जर त्या पक्षाला रिक्सडॅगमध्ये प्रतिनिधीत्व प्राप्त करावयाचे असल्यास स्वीडन मधील राजकीय पक्ष पद्धती एक बऱ्याच काळापासून अतिशय स्थीर अशी पद्धती मानली जाते. ती जगातील एक स्थिर स्वरूपाची पक्षपद्धती म्हणून तिला मान्यता प्राप्त झाली आहे.

"Social Democrats" 'सोशल डेमॉक्रॅट' हा पक्ष अर्ध शतकाहून अधिक काळ सत्तास्थानी राहिलेला पक्ष आहे. अलिकडील काळात या पक्षाची राजकीय शक्ती कमी होत असताना दिसते आहे, परंतू आजही सोशल-डेमॉक्रॅटीक पक्ष हा मोठा पक्ष व तुलनेत बहुमत प्राप्त पक्ष असल्याचे दिसते.

प्रत्येक पक्ष हा आपल्या पक्षातील समीती पद्धतीने चालतो. समीती प्रमुखाच्या अध्यक्षतेखाली पक्षाचे निर्णय घेतले जातात. सरकारमध्ये असताना राजकीय पक्षाचे कार्य हे सरकारी धोरणांची आखणी करणे व त्याबरोबर रिक्सडॅगचा त्या धोरणांना व त्याच्या अंमलबजावणीला पाठिंबा व समर्थन मिळवणे हे असल्याचे दिसते. परंतू हेच कार्य अल्पमतामध्ये असणाऱ्या राजकीय पक्षाला सत्तेत राहून करताना अनेक अडचणीना सामोरे जावे लागते.

विरोधी पक्षात असणाऱ्या राजकीय पक्षाला राजकीय पर्याय निर्माण करण्याला व सत्ताधारी सरकारच्या

राजकीय धोरणांना पर्याय निर्माण करण्याची भूमिका सतत मांडावी लागते व ते कार्य ते राजकीय पक्ष मोठ्या प्रमाणात करताना दिसतात.

स्वीडनच्या पक्ष पद्धतीला 'आधुनिक द्विपक्ष पद्धती' असेही साधारणत: म्हटले जाते. जरी संसदेमध्ये अनेक राजकीय पक्ष प्रतिनिधीत्व करीत असले तरी याचे कारण सत्तास्थानी येण्याकरीता या राजकीय पक्षांना आघाडी करावी लागते आणि पर्यायी बहुपक्ष पद्धतीचे पर्यावसन द्वीपक्ष पद्धतीमध्ये होते. साधारणत: याला आणखी एक महत्त्वाची गोष्ट कारणीभूत आहे ती म्हणजे, या राजकीय पक्षाचे दोन गटांमध्ये झालेले विभाजन. समाजवादी गट SAP आणि VP तर दुसरा उदारमतवादी / परंपरावादी गट M, FP आणि C या सर्व प्रकरणामध्ये समाजवादी लोकशाहीवादी पक्ष "Social Demarats' हा अधिक काळ सत्तास्थानी राहिला आहे.

स्वीडीश राजकीय पक्षांच्या निर्मितीची मुळं ही त्या देशातील विविध सामाजिक संघटनांच्या आणि आंदोलनांच्या मध्ये आढळतात. लोक चळवळींच्या माध्यमातून स्विडनमध्ये अनेक राजकीय पक्षांची स्थापना झाली आहे. त्यामुळे स्वीडनच्या राजकीय पक्षपद्धतीचा आभ्यास करताना गोष्ट ठळकपणे समोर येते ती म्हणजे चळवळींच्या मधून राजकीय पक्षांची निर्मिती.

कामगार चळवळीच्या माध्यमातून विविध सामाजिक चळवळींच्या माध्यमातून राजकीय पक्ष उदयाला आलेले दिसतात. त्यामुळे या राजकीय पक्षांचा एक विशिष्ट स्वरूपाचे स्थान स्वीडीश संसदेमध्ये व राजकारणामध्ये असल्याचे दिसते. जसे की 'कन्झर्वेटिव' हा पक्ष संसदेतील गटबाजीतून निर्माण झाला आहे. समान हितसंबंध व त्यासंदर्भात चळवळ यामधून स्विडनमध्ये राजकीय पक्ष उदयाला आले आहेत.

- **स्विडनमधील राजकीय पक्ष** (Political parties lie Siwa)

**१) स्विडीश सोशल डेमॉक्रॅटीक पक्ष :**

SAP हा स्विडन मधील सर्वात जुना पक्ष आहे. ह्या पक्षाची स्थापना १८८९ मध्ये झाली. स्थापनेवेळी या पक्षाने समाजकल्याणकारी राजकीय व्यवस्थेच्या स्थापनेचे उद्दिष्ट ठेवले होते व हा पक्ष समाज कल्याणकारी राजकीय व्यवस्था स्थापन करण्यास प्रतिबद्ध आहे अशी विचारधारा त्यावेळी मांडली गेली होती. १९३२ ते १९७६ या कालखंडातील १९३६ मधील कांही थोडा कालावधी वगळता सातत्याने या पक्षाने सत्तास्थानी राहण्याचा मान मिळवला आहे. या दरम्यान कांही इतर लहान पक्षाबरोबर आघाडी करून सत्ता स्थापन करावी लागली आहे. स्विडिश समाजवादी पक्षाने एक महत्त्वपूर्ण सर्व समावेशक राजकीय व्यवस्था निर्मितीचा मोठा यशस्वी प्रयत्न केला आहे. ज्यामध्ये आरोग्य विमा, गृह योजना, लहान मुलांकरीता भत्ते, निवृत्ती वेतन, शिक्षण व्यवस्थेचे विस्तारीकरण इत्यादी बाबतीत त्याने मोठी कामगिरी बजावली आहे १९७० नंतर मात्र वाढती महागाई, वाढती वित्तीय तुट या कारणांमुळे यापक्षाची राजकारणावरील पकड ढिली होत गेली असल्याचे दिसते. यामुळे या पक्षाला स्वीडनला एक सर्वसमावेशी स्वरूपाची राजकीय व्यवस्था देण्यात अपयश आले आहे.

२०१४ मधील राजकीय निवडणूकीत या पक्षाला ११३ जागा प्राप्त झाल्या आहेत.

**२) मॉडरेट पार्टी** (Moderate Party) :

१९०४ मध्ये स्थापन झालेल्या या पक्षाने १९६९ मध्ये मॉडरेट पार्टी हे नाव धारण केले आहे. स्थानेवेळी हे नाव 'कन्झर्व्हेटीव्ह पक्ष' असे नाव होते. पुढील काळात या पक्षाने बाजारावर आधारीत अर्थव्यवस्था कर कपात, अर्थव्यवस्थेतील सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप या धोरणाचा अवलंब करण्याची भूमिका घेतली.

१९८० च्या दशकात स्विडन मधील आर्थिक संकटाच्या काळात यापक्षाने आपल्या कार्यक्रमाच्या व धोरणाच्या आधारावर सत्ता प्राप्त करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्याच दरम्यान या पक्षाला मोठा जनधार देखील प्राप्त झाल्याचे दिसते.

१९९१ मध्ये मॉडरेट पक्षाने चार इतर पक्षांच्या सहाय्याने सरकार स्थापन केले. त्याच बरोबर वाढत्या महागाईला आटोक्यात आणण्याकरीताच्या उपाय योजना, सरकारी सेवांचे खाजगीकरण, वित्तीय तुट कमी करण्याकरीताच्या उपाययोजना इत्यादीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केल्याने या पक्षाला अधिक समर्थन प्राप्त झाल्याचे दिसते. २००६ मध्ये झालेल्या निवडणूकीमध्ये मॉडरेटर पक्ष आणि त्यांच्या उपयोगी पक्षांनी सोशल डेमॉक्रेट पक्षाचा पराभव केला व 'फ्रेड्रीक रेनीफिडैट' हे पंतप्रधान झाले. या पक्षाला १०७ जागा प्राप्त झाल्या.

**३) ग्रीन पार्टी :**

ग्रीन पार्टीची स्थापना १९८१ मध्ये अण्वीक शस्त्रास विरोधी आंदोलनातून झाली. जसे की स्विडन मधील राजकीय पक्षांच्या निर्मितीला आंदोलन आणि चळवळींचा आधार आहे. त्या आधारावर ग्रीन पार्टीची स्थापना झाली आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून पक्षाने १९८८ मध्ये पहिल्यांदा संसदेमध्ये प्रवेश केला.

हा पक्ष हरित राजकारणाला पुढे आणू इच्छितो त्याच बरोबर हा पक्ष स्विडनच्या युरोपीय संघातील सदस्यत्वास विरोध करतो. सोशल डेमॉक्रॅट पक्षाला हा पक्ष समर्थन देतो. परंतू सत्तेमध्ये आद्याप पर्यंत सहभागी झालेला नाही. या पक्षाला आजच्या स्थितीत २५ जाना प्राप्त झालेल्या आहेत.

**४) सेंटर पार्टी** (Center Party) :

हा पक्ष देखील १९०४ मध्ये स्थापन झालेला आहे. प्रामुख्याने याला शेतकरी पक्ष असे म्हटले जाते. १९५८ मध्ये सेंटर पार्टी हे नाव पक्षाने धारण केले आहे. हा पक्ष प्रामुख्याने स्विडनच्या ग्रामीण भागाशी संबंध प्रस्थापित करून आहे. या पक्षाची विचार सरणी ही प्रामुख्याने सामाजिक उधारमतवादी राजकीय व्यवस्था प्रस्थापनेची आहे. त्यामध्ये सामाजिक, पर्यावरणीय व विकासात्मक विकेंद्रीकरण या बाबींवर अधिक भर दला आहे.

१९९१-१९९४ च्या आघाडी सरकारमध्ये हा पक्ष सत्तेमध्ये सहभागी होता. सध्यस्थितीमध्ये या पक्षाची सदस्य संख्या २२ आहे.

**५) लेफ्ट पार्टी** (Left Party) :

१९१७ मध्ये सोशल डेमॉक्रॅटीक पक्षामध्ये फुट पडून हा पक्ष निर्माण झाला. लोकशशही समाजवाद,

हरित राजकारण, पर्यावरण इत्यादी विषयांवर आधारीत मुद्यांवर या पक्षाचे राजकारण राहिले आहे. या पक्षाला आतापर्यंत एकदाही सत्तेत सहभागी होता आलेले नाही.

२०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये या पक्षाला एकूण २१ जागा प्राप्त झाल्या आहेत.

**६) लिबरल पिपल्स पार्टी :**

१९३४ मध्ये या पक्षाची स्थापना झाली. या पक्षाने आपली भूमिका स्पष्ट करताना उदारमतवाद, सामाजिक उदारमतवाद, उदारमतवादी स्त्रीवाद लिंगभाव समानता इत्यादी विषयावर आपली तात्वीक निष्ठा व्यक्त करून सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचे उद्दिष्ट या पक्षाने ठेवले आहे. या तत्वावर आधारीत राजकारण करताना या पक्षाला १९४०, १९४४, १९७६, १९७९, २००६, २०१० या काळात सत्तेमध्ये सहभागी होता आलेले नाही.

**७) ख्रिश्चन डेमॉक्रॅटस् :**

१९६४ मध्ये स्थापन झालेल्या या पक्षाने ख्रिश्चन धर्माचे शिक्षण आभ्यासक्रमात असायला हवे, तसेच क्रिश्चन तत्त्वानुसार लोकशाही स्थापन व्हावी या कांही मुद्यांसह आपली ाजकीय भूमिका ठरवून त्याप्रमाणे कार्य करत आहे.

## २.३ समारोप :

बहुपक्षपद्धत असलेल्या स्विडनच्या राजकीय व्यवस्तेमध्ये स्थीर पक्ष पद्धती निर्माण झाली आहे. विविध विचारसरणीवर आधारीत राजकीय पक्ष त्याठिकाणी आहेत. विविध प्रकारच्या आंदोलन व चळवळीमधून पक्षाची निर्मिती हा एक विशेष भाग स्विडनच्या राजकीय पक्षपद्धतीचे वैशिष्ट्या म्हणावे लागेल.

## २.४ प्रश्न :

१) .............. हा पक्ष दिर्घ काळ सत्तास्थानी राहिला आहे.

२) .............. हा पक्ष स्त्रीवादी दृष्टीकोनातून आपले राजकारण करतो.

३) .............. हे स्वीडनच्या राजकीय व्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य आहे.

♦ ♦ ♦